# हे प्रत्ययाचे बोलणे

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले - कऱ्हाड



# हे प्रत्ययाचे बोलणे

**पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कऱ्हाड**

**यांनी लिहिलेल्या आत्मपर लेखनाचे संकलन**

कै. पु. पां. गोखले यांच्या जन्मशताब्दी निमित्त

सप्रेम भेट

५ डिसेंबर १९९८

हे प्रत्ययाचे बोलणे

पहिली आवृत्ती
५ डिसेंबर १९९८

संकलक, संपादक व
प्रकाशक :
विद्याधर पुरूषोत्तम गोखले
४३६ सोमवार पेठ
कऱ्हाड – ४१५ ११०
दूरध्वनी – (०२१६४) २१४१५

मुद्रक :
राजहंस प्रिंटिंग प्रेस
नागाळा
कोल्हापूर – ४१६ ००२

मुखपृष्ठ
'निर्मिति'
कोल्हापूर.

# अर्पण पत्रिका

स्वार्थाचा संसार नको,
काळाची चिकित्सा नको
व्यक्तीची छाननी नको,
मात्र
शीलाची संपत्ती हवी
कर्तृत्वाची कसोटी हवी
भविष्याची दृष्टि हवी
मग जग
' मस्तक चरणी ठेवितसे'

– पु. पां. गोखले

प्रस्तावना

''जन्मापासुनि आली गेली वरुषे ओलांडुनी सत्तरी।
त्या माजी सरते करोनि परते उद्वेग सर्वांतरी ।।
दारी वा घरि ज्या कुणी न पुसते, त्याचा नमस्कार हा।
घे, का हे प्रभु भूत जा विसरूनी निश्चित धैर्ये रहा ।।''

अशी प्रार्थना मी चालविली असताही माझ्या जीवनाची कल्याणयात्रा कशी झाली ती समजावून घेण्याची माझ्या मागची निकड सुटेनाच ! तेव्हा आठवणींचा उकर काढून ''काही करावया जावे'' म्हणून लेखणी हाती घेतली आहे.

प्लेगच्या पहिल्या पहिल्या कहरात १८९८ साली माझा जन्म. याची मला जाण झाल्यावर आणि मी तीन वर्षांचा झालो नव्हतो अशा वेळी १९०१ साली माझ्या पाठच्या भावासह माझी आई स्वर्गवासी झाली हे समजल्यापासून पूर्वजन्मीचे आपण पातकी आहोत अशी रुखरुख कितीतरी दिवस माझ्या मनी होती पण सृष्टिक्रमात उत्पत्ती, स्थिती आणि लय हे सततच चालू असतात. हे निरीक्षणाने लक्ष्यात आल्यावर १८९८ मध्येच माझ्या आगेमागे जन्मलेल्या कर्तबगारांची चरित्रे एक एक आठवू लागली आणि मनाला समाधान झाले की एवढ्या कर्तृत्वकीर्तिवंताच्या जन्मसंवत्सरात जन्मण्याइतके तरी आपले पुण्य आहेच की ! कर्तृत्व–कर्तबगारीच्या सत्त्वशुद्धतेने चरित्रे आणि सामाजिक व राष्ट्रीय इतिहास घडत असतो ही अक्कल फुटल्यावर, गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासातील गोकुळ म्हणतो त्याप्रमाणे 'वाया गेलेली वर्षे जमेला धरली नाहीत, तर कोणाला आपला अमृतमहोत्सवी संवत्सर कोणता हे निश्चित सांगताही यावयाचे नाही. म्हणून निदान मी स्वतःपुरते तरी मानतो की माझ्या आठवणीतील समवयस्कांच्या मानाने आपण कर्तृत्वाच्या वर्गात शेवटाकडून पहिले असलो तरी वर्षगणतीने तरी जगाच्या व्यावहारिक हिशेबात त्या कर्तबगारांच्या पाठीमागून तरी ' आणि आम्ही !' म्हणण्याइतके आपण भाग्यशाली आहोत.

वि. स. खांडेकर, रँगलर ग. स. महाजनी, पं. विनायकबुवा पटवर्धन, मामा दाते, डॉ. अनंत सदाशिव आळतेकर, आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. द. गो. कर्वे, डॉ. टी. एम्. ए. पै, ग. वि. केतकर, नानासाहेब तावडे, श्रीपाद अमृत डांगे – माझ्या समवयस्कातील सहजासहजी आठवणीत आलेल्या या तोलामोलाच्या व्यक्ती. शिवायही आणखी कितीतरी तेजस्वी असतील. तेव्हा तारांगणातील फार तर एक लुकलुकता काजवा आपण आहोत अशी एकदा जाणीव झाली, म्हणजे 'कोठे इंद्राचा ऐरावत आणि कोठे शामभट्टाचे तट्टू' हा विवेक येतो. 'उंबरातील किडे उंबरातच बांधती वाडे' हे काव्यविहारींचे वचन आठवते आणि माणूस नम्र होऊन, जोपर्यंत जगण्यासारखे जवळ आहे तोपर्यंत मरण्यात (म्हणजे मरेमरेपर्यंत काम–कर्तव्य करण्यात आणि कर्मयोगाच्या रिकिबीत पाय ठेवून इहलोकीचे सीमाल्लंघन करण्यात) मौज आहे हे गडकऱ्यांचे वचन खरे करावेसे वाटते. 'मरावे परी

कीर्तिरूपे उरावे।' हे समर्थवचन त्या योगेच थोडेतरी पाळता येईल. 'आपली आपण करी स्तुती' (आणि निंदाही) 'तो एक मूर्ख' असे समर्थांनी म्हटले आहे; हे लक्ष्यात घेतल्यास मी आत्मचरित्र का लिहित नाही हे आपणास समजेल.

माझ्यासारख्याच्या सामान्य जीवनात लोकांना सांगण्यासारखे फारच थोडे. तेही मी भीतभीतच सादर केले आहे. काही असले तरी जीवनात सिंहावलोकनापेक्षाही आपली आपण केव्हातरी झडती घेतली तर गुणदोषांची जाणीव होऊन सुधारणेस व आत्मविश्वासास जागा होते. असे असतानाही, 'आयुष्याची संध्याकाळ आता झाल्याचे वारे सुटत असताना, तुम्ही आत्मचरित्र लिहू नका, सांगू नका, पण एकदा तुमच्या खाजगत व सार्वजनिक जीवनावर गरूडझेप टाकून तरी आम्हा तुमच्या एकवेळच्या विद्यार्थ्यांना तुमच्या अनुभवामृताचा निष्कर्ष द्याल तर उपयोग होईल.'' असा प्रेमाचा तगादाच लागल्यामुळे थोडासा प्रयत्न येथे करीत आहे. व्यवसायातील वा ध्येयमार्गावरील वाटचालींच्या रोज-कीर्द-खतावणी ''घे-लिख, लिख-दे'' असा काटेकोर हिशोब ठेवणारांचा पात्रता, पत, प्रतिष्ठा, प्रभाव याबाबतचा शिल्लकबाकीसह खर्डा हा नव्हे. हे माझ्या मनोमन मला ठाऊक आहे तरीही त्यातून कोणास काही मूल्यमापन सापडलेच तर त्याच्याइतकाच मलाही आनंद होईल, हे काय सांगावयास हवे ? अन्यथा एका व्यवहारशून्य जीवनाचे बिनमोल फलित म्हणून तसे आपल्या वाट्यास यावयासच नको, एवढी तरी सावधगिरी वाचणारास येईल. हा लाभ काय थोडा असे ?

ब्रिटिश रियासतीच्या पारतंत्र्यातून सुटून स्वाभिमानपूर्वक स्वावलंबनाने प्रत्येक भारतीयास शक्य तेवढ्या जास्तीत तेजस्वीपणाने जगता यावे आणि एकजिनसी भारतीयत्वाची कल्पना केदारेश्वरापासून कन्याकुमारीपर्यंत व कराचीपासून कलकत्त्यापर्यंत 'वंदेमातरम्' म्हणून भारतमातेला व भारतीयेतिहास-संस्कृतीला जीवेभावे मानणाऱ्या आणि मानू शकणाऱ्या जीवमात्रात मुरविण्याच्या उत्थापन प्रकर्षाच्या कालखंडापासून स्वातंत्र्यसंचालनाच्या सव्वातीन तपांच्या घडामोडींचा व त्यांनी भारतीय जीवनावर केलेल्या परिणाम प्रकर्षाचे ध्यानूर्वक चिंतन केले असता, त्या कालखंडातून आपल्या परिश्रमसेवासमर्पणानी भारतसेवा करणारांना अजून अपेक्षित 'रामराज्य' प्रस्थापित नाही (प्रगती खूप असली तरी) एवढी हळहळ खास आहे.

ज्या ठिकाणी तुरुंग मोकळे पडलेले, जेथे चोरीचे नाव नाही, लांडी लबाडीचा आश्रय केला जात नाही, दरवाजाला कुलूप लावण्याची जेथे गरजच भासत नाही, एकादा मौल्यवान पदार्थ रस्त्यावर पडला असला तरी त्यास कोणी हात लावित नाही आणि लावलाच तर सगळ्याना सांगूनसवरून आणि त्याचा मालक सापडताच त्याचा तो जिन्नस त्याला परत देण्याची तयारी ठेवून, तेवढ्या मुदतीपुरता त्या जिनसाचा जाहीर विश्वस्त राहण्यासाठीच हात लावतो, जेथे विवेकाने परस्परास समजावून घेऊन मतभेद वा तंटे मिटतात आणि वकिलांची वा कज्जेदलालांची डाळच शिजत नाही, जेथे बालमृत्युच नाही.

तरुणापुढे जेथे मृत्युच बिचकतो, जेथे वृद्धही सणसणित व रसरशित असतात व कालौघाच्या क्रमाक्रमानेच शरीर झिजले म्हणूनच ते सोडतात, त्या ठिकाणी राम-कृपा-राज्य आहे असे म्हणता येते. जेथे स्मशानाची आठवण किंवा दर्शन ''मरणाचे स्मरण असावे'' म्हणून घ्यावयाचे आणि घरदार, संपत्ति, सत्ता यांच्या अभिलाषाला आळा घालावयाचा शिरस्ता परमार्थी पाळतात, सोन्याचा कलश गंगोदकाने भरावा, तशा अंतर्बाह्य पावित्र्याने ''आत-बाहेर चोखट'' राहून ''निष्ठावन्त भाव भक्ताचा स्वधर्म। निर्धार हे वर्म चुको नये।'' या व्रताने जेथे आपल्या जीवनकार्यातील कर्तव्ये करण्यात विवेकी माणसे रममाण असतात, जेथे न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः । असे जनसामान्यांचे मार्गदर्शक आढळतात आणि तामीळ लोकांच्या तिरुक्कुरलमध्ये म्हटल्याप्रमाणे जेथे सदाचाराने पृथ्वीतलावर नेटका संसार करणाराला देवांच्या बरोबरीचे स्थान मिळते, पुरुषाचे भाग्य म्हणजे त्याची गृहिणी आणि भूषणे त्याची मुले असतात व जेथे आतिथ्य करताना व कृतज्ञता व्यक्त करताना, मधुर वाणीचा उपयोग केला जातो, अशी भारतीय समाजस्वास्थ्याची पुनर्रचना स्वतंत्र भारतात झाली पाहिजे, अशी अपेक्षा.

ही अपेक्षा स्वराज्य मिळविण्यासाठी इंग्रजाविरुद्ध चळवळ करणाऱ्या पहिल्या उठावदारापासून चालत आली आहे. त्यासाठी आर्वीकर जोशी महाराजानी, म्हटल्याप्रमाणे ''प्रपंचासी जो भ्याला। तो ना टिके साधनाला। प्रपंच करोनि निमाला। ऐसे व्हावे॥'' आणि ''पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी॥'' हे व्रत आचरण शुद्ध ठेवण्यावर भर असावा.

शैक्षणिक प्रगतीवर सामाजिक प्रगति अवलंबून असते. त्यासाठी स्वावलंबी व स्वतंत्र विचारांचे होऊन सारखे नवज्ञान मिळवावे. अशी आच तरुणांना लागेल; अशी लोकशिक्षणाची व्यवस्था सातत्याने प्रवाही राहणे आवश्यक होय. निव्वळ पुस्तकी ज्ञानाने मने सुधारत नाहीत की सुसंस्कृत होत नाहीत. मने पवित्र होतात ती संस्कारानी. ज्ञान, विज्ञान सुसंस्कार यांचा त्रिवेणी संगम व्हावयास मातृदेवो भव, पितृ-देवो भव, आचार्यदेवो भव असे मार्गदर्शन करीत करीत घर, शाळा, समाज, राष्ट्र आणि विश्व यातील साम्य, सहसंवेदना, सहकारसंभव यांच्या शोधावर माणसाने आपले व पुढीलांचे मन निष्ठाकेंद्रित कसे राहील हे पाहिले पाहिजे. ''समुद्रा-पलिकडील देखे। स्वर्गीचा आलोचु आइके। मनोमन ओळखे। मुंगीयेचे॥'' अशी धारणा मनुष्यामात्राला झाली पाहिजे. समाजसेवेसारखे परोपकाराचे कार्य करुनही परमेश्वर प्रसन्न होतो. मग निरलस अखंड परिश्रमानी ''अचूक चुकेना कोठे। त्याची राज्ये समस्तही॥'' का नाही साधणार ? ऋजु आणि निगर्वी स्वभाव, सहकार्याची सतत जाणीव, ऐतिहासिक सिद्धांताच्या बाबतीत सत्याग्रही वृत्ति आणि कर्तव्यपूर्तीची पोटतिडीक असल्यावर यश जाईलच कुठे ?

सोळाव्या वर्षापासून सत्तर वर्षापर्यंत तारुण्य असते. यापुढे तीस वर्षे ''परिहाणि अवस्था'' व त्यापुढे वृद्ध नि क्षीण अशा दहा दहा वर्षाच्या अवस्था आहेत. इतके एकशेवीस

वर्षांचे आयुष्य असण्याचा प्रत्येक मानवाला जन्मसिद्ध हक्क आहे. छान्दोग्योपनिषदातसुद्धा दीर्घायुष्याचा असाच काही हिशोब दिला असून, मनुष्य आपल्या 'ह्याच्यात' यावयास बावीसावे वर्ष लागते असे मानले तरी त्यापुढे सत्तर वर्षे तरी मनुष्याचा उपयोग कुटुंबाला, समाजाला, राष्ट्राला व मानवजातीला झाला पाहिजे. माणसाने फेडावयाच्या पितृऋण, देवऋण व समाजऋणापैकी तिसऱ्या ऋणाची फेड तरी त्यायोगे झाली असे म्हणता येण्यासारखा एकंदर हिशोब बहुशः होईल. कसे ? तरीही जनसामान्याने बिनचूक लक्ष्यात ठेवून चाललेच पाहिजे की आधी यशस्वी जीवन जगणे हा महत्त्वाचा धर्म, ऐश्वर्यशाली नसले तरी गौरवप्राप्त जीवनाच्या संपादणीसाठी पराक्रमांची व प्रयत्नपुरुषार्थाची नितांत गरज असते. तो प्रयत्नपुरुषार्थ व पराक्रम भारताच्या जीवनसूत्राला पवित्रपणे अबाधित राखूनच व्हावयास हवा. स्वतंत्र एकराष्ट्रीयत्वाची कल्पना ऋषिमुनींच्या काळापासून अर्वाचीन भारताच्या जडणघडणीतही चैतन्यमय आहे. ती उच्चस्वराने सदैव बजावत असते की राष्ट्राच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या सर्व प्रकारच्या अडचणी दूर करून जनतेला सुख होईल असे करणे ही राष्ट्रनिष्ठा होय. 'राजते तद्राष्ट्रम् ।' जे स्वतः प्रकाशते ते राष्ट्र. म्हणून कसलाही विचार, आचार वा अन्य काही करावयाचे मनात आणण्यापासून सर्व ते करीपर्यंत राष्ट्रापुरते तरी ''व्यापकपण सोडू नये । काही केल्या ॥'' हेच खरे ! ''जेणे वाढे समाज'' – वैदिक संस्कृति म्हणजे मनाची ठेवण उदार, सहनशील, सर्व संग्राहक, बुद्धिवादी, व समंजस अशी आहे. वैदिक हिंदुधर्म हाच जागतिक मानव्याचा धर्म ठरतो तो वरील तऱ्हेच्या मनाच्या ठेवणीमुळेच वा संस्कृतिमुळेच. ती स्पष्टच आपले अधिष्ठान शक्य तितके मानवतेवर, निदान राष्ट्रीयत्वावर आणि किमानपक्षी जास्तीत जास्त लोकांच्या जास्तीत जास्त कल्याणावर ठेवित असते. ''व्यापकपण सोडू नये । काही केल्या'' हा तिचा दण्डक हरघडी हरएक घडामोडीत असतो. जग कसे चालले आहे, आपण कोठे आहोत, आपल्या वागण्याने व विचाराधारानी वैयक्तिक, सामुदायिक, वा राष्ट्रीय अपकर्ष होताच कामा नये ही दक्षताच दक्षता घेण्याबद्दल वैदिक (भारतीय) संस्कृतीचा कटाक्षच असतो. कोणताही मनुष्य जन्मतः, धर्मतः, देशतः, कालतः, जातितः उच्च वा नीच समजणे सर्वस्वी चुकीचेच आहे. माणसामाणसाची प्रतिष्ठा त्याच्या त्याच्या गुणावर, गुणग्राहकतेवर, कर्तव्यतत्परतेवर, कर्तृत्वावर, शीलचारित्र्यावर, सामाजिक सहानुभूतिसहकार संपन्नतेवर आणि विद्या, तप, त्याग, ईश्वरभक्ति इत्यादि दैवी संपदेवर अवलंबून असते. ती मागून किंवा जिंकून मिळत नाही अथवा कोणी देऊ केली म्हणून ती अंगी मुरत नाही आणि तसे कधी चुकून झालेच, तरी ''वाघ्याचा पाग्या'' झालेल्याने आपला ''येळकोट'' सोडण्याची सिद्धता दाखवावी लागते. इतकेही झाले तरी माणसाने आपली महत्त्वाकांक्षा महान् ध्येयापायी लावावी लागते. त्यासाठी अविरत प्रयत्न हवेत आणि ते सुद्धा सेवासमर्पणबुद्धीचे. आपणाजवळ जे जे उत्तमोत्तम असेल ते ते सर्वच्या सर्व संपूर्ण समाधानाने समाजाला, राष्ट्राला, देऊन

टाकण्यात माणसाला धन्यता वाटू लागली म्हणजेच मनुष्याच्या अंगी वैदिक भारतीय संस्कृति मुरून आविष्कृत झाली असे म्हणावयास हरकत नाही. आपल्या देशात सध्याचे दिवसच असे आहेत की, सत्य, निर्भेळ सत्य जो बोलेल, त्याचा तिटकारा स्वजनापैकीही काही लोक करतील. परंतु मला खात्री आहे की अंती सत्य टीकाकाराच्या बाजूलाच सर्व सज्जन आहेत ते येऊन मिळतील समाजाच्या अस्तित्वाचे मुख्य व एकच कारण धर्म आहे. धर्म म्हणजे सर्वजनहितैषी असे वर्तन कर्तव्य म्हणून करावयाला लावणारा निर्बंध. या धर्मनिर्बंधाचे मुख्यतः तीन कस आहेत. ते निःसीम देशभक्ति, तत्प्रीत्यर्थ सर्वस्वाचा पूर्णत्याग व कायावाचामने करून समाजसेवा. या गुणांनी मंडित असूनही कीर्तीची वा बढाईची बाधा न होता, प्राप्त कर्तव्याला वाहून घेण्याची हरघटकेला तयारी. हाच खरा राष्ट्रधर्म. हा राष्ट्रधर्म पाळणारी माणसेच लोकोपयोगी संस्थांची कामे व्यवस्थितपणे, इमानाने व अक्कल हुशारीने भरीव व चिरस्थायी करतात. याचवेळी एक जाण पक्की असावी लागते की स्वार्थत्यागाचा योग्य परामर्ष घेणारे कौशल्य जर देशात निपजले नाही, तर त्याग गाभटतो व जिवंत स्वातंत्र्याला प्रसविण्यास असमर्थ ठरतो अथवा स्वातंत्र्याला सतेज सामर्थ्याने प्रभावी करण्यास दुबळा ठरतो. म्हणून आचारशुद्ध राखावयाचा धर्म म्हणजे व्यक्ति, समाज, देव अर्थात तेजस्वी, मनस्वी, कर्तृत्ववन्त, प्रभावी व पराक्रमी आणि ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध समाजघटक आणि इतरही सामान्य प्राणिमात्र याच्यासंबंधाने धनात्मक म्हणजे निश्चितार्थाने करावयाची व ऋणात्मक म्हणजे अलिप्तपणे सोडून द्यावयाची कर्तव्ये यांच्या समुच्चयार्थक परिणतीने ठरणारा महाराष्ट्रधर्मच होय. या महाराष्ट्र धर्माचे सर्वप्रमुख वक्ते श्रीसमर्थ रामदास स्वामी व प्रमुख कर्ते श्रीमच्छत्रपती शिवाजी राजे होत. प्रत्येक रक्तवाहिनीतून राष्ट्रीय भावना स्फुरण पावू लागल्याशिवाय संपूर्ण राष्ट्राशी तादात्म्य नाही. ते साधल्याशिवाय राष्ट्रीयत्वाच्या जिवंत भावना जनतेत विकास पावणार नाहीत. राष्ट्रीय भावनाजागृतीने समाजात नवचैतन्य निर्माण होईल आणि अनुभव येईल की – ''जेथे राहे तेथे जीवनचि असे। जरी मन नसे स्वार्थांकित ॥''

यासाठी अगदी लहानपणापासून प्रत्येक भारतीयास पालकाने, गुरुने, शिक्षकाने मार्गदर्शकाने, विचारवंताने आणि वडीलधाऱ्याने तसेच पुढाऱ्याने आपापल्या विचारोच्चाराचारानी असे वळण लावण्याची निष्ठा दाखविली पाहिजे की स्वतःचा विकास दुसऱ्यांच्याच नव्हे तर समाजाच्या विकासाशी आणि स्वतःला मिळणारा आनंद इतरांच्या व समाजाच्या आनंदाशी निगडीत असतोच असतो; म्हणून प्रत्येकाने आपल्याबरोबर समाजाचाहि व्यापक विचार करणे कर्तव्य आहे. संपर्कितानी व समाजाने स्वतःला जसे वागवावे, मानावे, कौतुकावे असे माणसाला वाटत असेल तसेच संपर्किताना व समाजालाहि माणसाने वागविणे, मानणे, कौतुकणे त्याचे कर्तव्यच कर्तव्य ठरते. जीवनाचे हे ''ठेवणे मीपणे ते कळेना।'' असे आहे. अर्थातच मीपण सोडून ''नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता ॥'' असाच अनुभव येतो. हा राष्ट्राचा भक्तियोग आहे. त्या मार्गाला लागले

असता, सेवा तर घडतेच, पण माणसाच्या हातून कोणाची चहाडी-निंदा होत नाही व स्वतःच्या होणाऱ्या निंदास्तुतीवर काठी लावता येते. व्यक्तिने निरंतर सावधपणाने राहिले-वागले पाहिजे. श्रेयः साधनाच्या प्रयत्नात अखंड जागृतीचे फार महत्त्व आहे. सन्त कबीर म्हणतात की -

''सूर-संग्राम है पलक दोचारका।
सतीधमसान पल एक लगे ॥
साधसंग्राम है रैनदिन झूजना।
देहपरजंतका काम भाई ॥१॥''

''शूराचा संग्राम दोन चार पळे चालतो; सतीचे अग्निदिव्य एकाद्या पळातच आटोपते; पण साधुला झुंज घ्यावी लागते ती देह असेपर्यंत रात्रंदिवस.''

माझ्या जीवनातील ही ओलवण आहे. वालुकारण्यात ज्या ठिकाणी पाणी असते किंवा पाणी जमिनीतून वर काढता येते त्याठिकाणी मानवजातीला राहण्यासारखी जागा होते आणि सुपीक जमीनही करता येते. वालुकारण्याऐवजी डोंगरच असेल तर पाऊस पडून हिरवळ जमते. या ओलवणात जशी ताडा-माडाची व खजुरीची झाडे होऊ शकतात तशीच धान्ये पिकून लाखो लोकास रसरशित जीवनही लाभते. माझ्या जीवनलेखीचे ओलवण जुनेपुराणे कोणास वाटले, तरी नवोदित, नवोत्साही, नवनिर्माणक्षमानी त्यातला ओलावा जिव्हाळ्याने जपला तर तो समर्पणबुद्धिने सेवा देण्यास चुकणारच नाही.

पु. पां. गोखले

***

## माझ्या शब्दांत मी

देवा, आज कृतज्ञचित्त नमितो, 'केला' च मी आपुला।
माझे विस्मृत हो गुणासह उणे – येथोनि इच्छा मला ॥
देता हाक कुणीहि ती झट घडो सेवा करीं या जरी।
मी अज्ञात धको, थको, अइ ! झुको निःशोक लोकांतरी ॥१॥
आता आज अशा क्षणी उतरतो जेव्हा असे प्रार्थना।
देवा जा विसरोनि पूर्ण मजला, माझ्या उण्या वा गुणा ॥
ज़्या का थोर मने मला उबविले आतावरी आपण।
त्या माझी नति ही कृतज्ञ नयने हस्तद्वया जोडुन ॥२॥
जे कोणी पसरीत गैरसमजा माझ्याविशी लौकिकी।
त्यांच्यासाठि न यत्न हो चुकुनिही, जाणीव हो त्या निकी
होई, होइल वा असाच मजसा कार्याग्र कोणी तरी।
आहे काळ अनंत हा, विपुल ही आहे धरित्री खरी ॥३॥
ज्या कोणा तरुणास म्या शिकविले, ज्या अर्थसाह्या दिले।
ज्याना संकटि रक्षुनी उभविले, नेले प्रतिष्ठे भले ॥
अन्यायास्तव न्यायनिष्ठुरपणे ज्यानाहि मी दंडिले।
त्यानी अश्रु कृतज्ञ हो कितिकदा माझ्या पदी वाहिले ॥४॥
ज्यांच्याशी मतभेद, पक्ष–पर–ता हो साधनाभिन्नता।
कालौघातुनि जाणली हृदयिची त्याही विशुद्धात्मता ॥
ते कालोाचित गौरवास सजले स्नेहाप्त माझ्या जसे।
व्हावे काय मला तया अधिक ? मी सर्वास वंदीतसे ॥५॥
माझी रुद्रविणा कदाचित कुणा की रुद्रवाणी कुणी।
गेली झोंबुनि ठाउके मज पुरे शस्त्रास्त्र जैसे रणी ॥
हिंदू–मुस्लिम, सान–थोर अथवा नेते–स्वयंसेवक।
गेले ते विसरोनि सर्व म्हणुनी ध्येयासवे प्रेरक ॥६॥
प्रारंभी तिलकानुयायि जरि मी द्वेषी कुणाचा नसे।
ज्याचे श्रेय तयास देउनि सदा सेवेस पूजीतसे ॥
ज्याने राष्ट्रीय उन्नतीस अपुले जीवित्व अर्पीयले।
तो तो हो गुरु की स्वकीय मजला, चिंती तयाचे भले ॥७॥
माझा भारत हा सुधर्मजनिता, सत्संस्कृतींचा पिता।
काळाला पुरुनी उरे पुरवुनी मानव्य विश्वा स्वता ॥
विज्ञानासह ऐहिकी सुख तया अध्यात्मसंपन्नता।
लाभोनी जगतास तो गुरु ठरो स्थापोनि निर्द्वन्द्वता ॥८॥

## १

प्लेग आपले तडाखे भारतास देऊ लागला होता, त्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी माझ्या मातोश्री पोटिशा होत्या, त्या पुढे १९०१ साली नव्या बाळासह देवाघरी गेल्या. त्यावेळी मी पावणे तीन वर्षांचा होतो. माझे संगोपन माझ्या वडिलांनी व आजींनी (पिताश्रींच्या मातोश्रींनी) केले.त्या वयात मला दिवेलागणीस '' शुभंकरोती '' मजकडून म्हणवून घेत. रात्रौ जेवण झाले की आजी सांगायची, '' आता खुशाल झोप हो बाळ ! लवकर निजे लवकर उठे ! त्यास ज्ञान संपत्ति आरोग्य भेटे ॥ ''

### प्रेमळ दिनक्रम

आजी पहाटे दळावयास उठावयाची. मला पाच वाजता जाग आली नाही तर हळूहळू माझ्या पाठकण्यावर हात फिरवीत मला जाग आणताना ती म्हणे '' ब्राह्मे मुहूर्ते बुध्येत स्वस्थो रक्षार्थमायुष: । व्यायाम दृढगात्रस्य व्याधिर्नास्ति कदाचन ॥ '' प्रातर्विधी उरकून झाल्यावर ती मला '' भुडुश्या '' (अंघोळ) घालावयाची आणि सूर्याला बारा नमस्कार घालावयास लावायची. माझी आजी लिहा-वाचायला शिकलेली नव्हती. पण पुराणे प्रवचने ऐकून '' बहुश्रुत '' होती.

### वैदिक आशीर्वाद

मी पाच वर्षांचा झालो आणि माझे नांव शाळेत घालावयाचे ठरले. शाळेतील एक शिक्षक पांडोबा लाटकर होते. आमचेच आळीत पण ते दुसरी इयत्ता शिकवीत. तरीही वडिल प्रथम त्यांच्याकडे गेले. म्हणाले- '' उद्या दसऱ्याला बाळ बाबूला शाळेत घालतो आहे. त्यावर लक्ष असू द्या.'' लाटकर मास्तर म्हणाले- '' मी लक्ष ठेवीन की ! कर्तव्यच आहे माझे ते. आमच्या हिला तो मावशी म्हणतो ना ? पण तुम्ही मला आवर्जून सांगायला आलात ? '' या प्रश्नाने माझ्या पिताश्रींच्या डोळ्यात अश्रू चमकले. मला आई नाही याच जाणीवेचे ते असावेत, कारण लाटकर मावशी म्हणाल्या मला-'' अरे बाबू , गणेश चतुर्थीला तू दरसाल आमचेकडे जेवायला येतोस, तेव्हां काकांच्या जवळ बसतोस ! मग आजच तू दादांना का त्रास दिलास ? '' तेव्हा माझे वडिल म्हणाले- '' मीच त्याला घेऊन आलो.'' त्यावेळी, कोठला तरी वैदिक ब्राह्मण तेथे आला होता तो म्हणाला, ''अहो, किती सहाजिक आहे हे ! शरीरमे तौ कुरुत: पिता माता च भारत : आचार्यतश्च यज्जन्म तत्सत्यं वै यथा मृतम् ॥ '' आणि माझे नांव पुरुषोत्तम कळल्यावर ते वैदिक म्हणाले, ''विनीतस्तु सुतो जात: कथं न पुरुषोत्तम:॥ '' त्या वैदिकांना दक्षिणा मिळाली पण लाटकर मास्तरांनी त्यांची ती सुभाषिते उतरून घेतलीच.

### रूळाचा झटका

अशी गोळा केलेली सुभाषिते लाटकर मास्तर प्रसंगा प्रसंगाने वर्गात किंवा लोकांशी बोलताना वापरीत. '' जे जे काही आपणासी ठावे । ते ते दुसऱ्यासी शिकवावे,'' असा रोख तसे करण्यात असे. वर्गात विद्यार्थ्यांना कडक शिस्त लावीत. दुसरीत मुले कित्त्यावर

बसवायची म्हणजे वळणदार अक्षरांचा नमुना पुढे ठेवून अक्षरे बोरुतून शाईने कित्याबरहुकूम काढावयास शिकावयाची. मी दुसरीत कित्याबरहुकूम अक्षरे काढीत असता, एकदा अक्षर माथ्यावरील रेघ सरळ न काढता शेवटी शेवटी जरा वरच्या बाजूस ईशान्येप्रत नेली. तसे लाटकर मास्तरांनी रूळाचा झटका माझ्या पंजावर दिलाच ! ''लालनाद् बहवो दोषा:, ताडनाद् बहवो गुणा: । तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयन्न तु लालयेत् ॥ असे लाटकरांचे मत होते. (त्या मताप्रमाणे त्यांनी तयार केलेले विद्यार्थी मोत्यासारखे सुंदर अक्षर काढण्यात तर तरबेज झालेच. त्यातील एक विद्यार्थी गणेश कृष्ण वेलणकर तर मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याचे पहिले बक्षिस मिळवू बसले होते.)

## मुंज

मी दुसरीत असताना माझी मुंज चैत्र शुद्ध पंचमीला झाली. म्युनिसिपल कारकुनाच्या मुलाची मुंज ती ! मग थाट काय तो पुसता ? पण त्या मुंजीला आगरकरांच्या टेंभूचे एक गृहस्थ आले होते. त्यांनी नव्या काळास अनुसरून मुंजीचा '' एक फॉर्म्युला '' सांगितला. तो पुष्कळ दिवस आमचेकडे चर्चेचा व थोडा कुचेष्टेचाही विषय झाला होता. तरीपण आजही मला तो विचारणीय वाटतो. '' फॉर्म्युला '' असा –मुंज हा विद्यारंभाचा संस्कार. पूर्वी कोठल्या तरी गुरूकुलात मुलाला ठेवीत. बारा वर्षे मुलगा आई–बापापासून दूर रहावयाचा. पण कोणत्या गुरूकुलात मुलाला ठेवावयाचे, ते पालकच ठरवीत. श्रीकृष्ण–सुदामा सांदीपनीकडेच शिकले. गुरुकुलात भटा – सम्राटांच्या मुलांना एकच शिस्त पाळावी लागे. आता सुद्धा गावातील कोणत्या शाळेत मुलाला घालावयाचे ते पालकांनी ठरवावयाचे आहे. जवळची तरी शाळा पालक पाहातातच की नाही ? आपल्या आळीतील त्या शाळेत जाणाऱ्या मुलांना आमच्या बाळाला तुमच्याबरोबर असू द्याहं !'' असे पालक सांगतातच की ! पण आता मुलाला बारा बारा वर्षे आई – बापापासून दूर रहावे लागत नाही. मग हवीत कशाला ही आईच्या निरोपाची 'मातृभोजने ' ? पाच सहा तासांनी काय होते ? त्यातून मुल सकाळी तीन तास व दुपारी तीन तास फार तर आई–बापांच्या नजरेआड ! तेव्हा शाळा सुरु करण्याचा संस्कार जो मुंज, त्याचा समारंभ असा करावा. पालकांनी शाळा पसंत केली म्हणजे आपल्या परिस्थितीच्या आवाक्याप्रमाणे, आपल्या मुलाच्या वर्गशिक्षकाला आणि त्याच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांना ( निदान आपल्या आळीतील तरी ) पूर्वीच्या अष्टवर्ग्यासारखे जेवावयास बोलवावे. त्यांच्या पंक्तीला आपल्या ' शाळकरी ' होणाऱ्या मुलाला बसवावे. गमती–जमतीने चाललेल्या त्या भोजनानंतर त्या शिक्षकाला ' आमच्या बाळाकडे लक्ष ठेवा ' म्हणून विनवावे. कारण 'विद्यागुरु' हाच विवेकवर्धक पिता असतो. आपल्या मुलालाही सांगावे की, '' हे तुझे गुरूजी. यांच्याजवळ तू खूप खूप शिक व शहाणा हो. आणि ते सुद्धा या मुलांत मिळून मिसळून, आजपासून हे तुझे भाऊ भाऊ आहेत. खेळगडी आहेत.'' ऐपत असेल तर शाळेतील सगळे शिक्षक व सगळे विद्यार्थी जेवावयास बोलवून वरील प्रमाणे समज करावी. हेच खरे '' शाळेत घालणे '' होईल.

## भाऊराव पटवर्धन

पुढे तिसरीत गेल्यावर भाऊराव पटवर्धन या व्याकरणपटु, तालीमबाज व विठ्ठलभक्त शिक्षकांच्या हाताखाली नांदू लागलो. त्यावेळी शाळातून दादोजींचे लघुव्याकरण बाजूला सरून रामचंद्र भिकाजी (जोशी) चे व्याकरण आले होते. तरी आमच्या पटवर्धनांची तक्रार होतीच की, ते तारीखतागायत नाही. इंग्रजी राज्यामुळे इंग्रजी भाषेच्या मोडमांडणीचा परिणाम मराठीवर झाला. त्याला धरून आगरकरांनी '' वाक्यमीमांसा '' हे पुस्तक लिहिले. रामचंद्र भिकाजीनी लघुव्याकरणासह वाक्यमीमांसेचा विचार घेऊन तारीखतागायत व्याकरण लिहावयास हवे होते. पण कुठलेतरी इंग्रजीच्या व्याकरणाचे चोपडे नजरेपुढे ठेवून रामचंद्र भिकाजीनी व्याकरण तयार केले आणि विकासशील मराठीला कसले व्याकरण हवे याचा विचार न होताच शिक्षणखात्याने ते लावले ! अहो, ' तृतीयान्त कर्ता, प्रथमान्त कर्म व कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे क्रियापदाचे रूप ' ही जर कर्मणि प्रयोगाची व्याख्या, तर '' बाजीरावास किल्ला सोडावा लागला, वाई सोडावी लागली, पुणे सोडावे लागले.'' हा प्रयोग कोणता ? भाऊराव पटवर्धन असे कार्हीसे चर्चासत्र आपल्या सहकारी प्रशिक्षितांबरोबर चालवित. आम्ही विद्यार्थी '' आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं '' चीच भूमिका त्यावेळी करीत असू, दुसरे काही शक्य तरी होते काय ?

## अपूर्णांक-पूर्णांक

पटवर्धन जसे मल्लखांब आणि कुस्ती शिकवण्यात कोणाला हार जाणारे नव्हते, तसेच आमचे चवथीचे शिक्षक चिंतोपंत लाटकर व पांडुरंग केशव लेंगरेकर कुलकर्णी गणित शिकवण्यात होते. त्यांनी '' व्यवहारी अपूर्णांक'' शिकवला व त्यांची बदली दुसरीकडे झाली. त्यांना निरोप देण्याचा समारंभ शाळेत झाला, त्यावेळी वर्गातर्फे बोलताना मी म्हणालो '' लेंगरेकरांनी आम्हाला अपूर्णांक शिकवला आहे. आज ते दुसरीकडे जात आहेत. पण आम्हाला पूर्णांक शिकवायला ते परत येथे येतील अशी आशा आहे.'' सगळाच अज्ञानाचा प्रकार. सत्काराला उत्तर देताना लेंगरेकरांनी सांगितलें-'' शिक्षक नेहमी व्यवहारी अपूर्णांकच शिकवतात. त्या अपूर्णांकाचा पूर्णांक विद्यार्थ्यांनीच आपल्या कर्तृत्वाने करावयाचा असतो. कारण उद्याचे जग त्याचे आहे.'' (सदर लेंगरेकर वयाच्या ऐंशीव्या वर्षी वारले. शेवटचे आयुष्यही त्यानी आपल्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्याला ज्ञानदान निरपेक्षपणे करूनच घालविले. शेवटी शेवटी त्यांना अंधत्व आले होते. इतके की त्यांच्या धर्म-पत्नीनी त्यांना भरविल्याशिवाय जेवता येत नव्हते. मी भेटावयास गेलो. होतो. तेव्हां जेवावयाचे वेळी त्यानी सौ. काकीना ''आई''म्हणून हाक मारली. मी विचारले,' कोण हवे ?' ते उत्तरले '.अरे माझी भोज्येषु माता.' ते स्त्रीदाक्षिण्य पाहून माझ्या डोळ्यात आदराचे अश्रू तरंगल्याशिवाय राहिले नाहीत.)

## संगमावर

पाचवीमध्ये इतिहास म्हणजे नुसते असे असे घडले एवढेच नसून वेगळे दर्शन घडले. पाचवीत आल्यापासून कृष्णा कोयनांच्या प्रीतिसंगमावरील वाळवंटात आम्ही उघड्या हवेत

खो–खो किंवा आट्यापाट्यांचा डाव मांडीत असू. पवित्र संगमावर ब्रह्मवृन्द संध्येसाठी असे. त्यातच आमचे त्या काळचे सार्वजनिक, लौकिक पुढारीही असत. एक दिवस खेळता खेळता, सूर धरणाऱ्यांच्या पायाखालील वाळूतील खडे संध्यानिष्ठांच्या अंगावर उडाले ! मग काय, त्यांनी डोळे विस्फारुन पाहिले अन् आम्हीही चपापलो. पण आट्यापाट्यांच्या हुलकावणीत वाळू उडणे साहजिकच होते. तेव्हा दुसरे दिवशी आम्ही खेळ मांडला संगमापासून पार खाली स्मशानभूमिजवळ ! आम्ही संगमावर आढळलो नाही तशी आमची शिक्षक मंडळी मनांतून खळबळलीच !

## मढ्या मारुती

सकाळी शाळा भरली. पाचवी, सहावी, सातवीच्या वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गांना आदले दिवसाच्या संगमावरील खेळबंदीबद्दल विचारलेच ! सर्वांचे एकच उत्तर–खेळबंदी नव्हती. मैदान बदलले होते. मग खेळ कोठे होता ? सर्व म्हणाले– मढ्या मारुतीजवळ !''

'' कऱ्हाडांत मढ्या मारुती आहे ?''

'' होय मास्तर. ''

'' दाखवाल आम्हाला ?''

'' हो तर ! ''

विद्यार्थ्यांनी खाणाखुणा स्मशानसुद्धा सांगितल्या. पण एकाही शिक्षकाने पटवून घेतल्या नाहीत. सायंकाळी पाचची घंटा झाली. ड्रील–तालीम मास्तर पटवर्धन यांनी पाचवी, सहावी, सातवीचे वर्ग शाळेच्या अंगणात रांगेने उभे केले. त्यावेळी त्यांच्या हाती लांबलचक वेताची छडी होती. सहावीचे शिक्षक एकनाथ ज्ञानोबा गुरव हे भूमिती व जमाखर्च काटेकोरपणे शिकवीत आणि इतिहासाचा नेमकेपणा त्यांना प्रिय असे. ते येताच तालीम मास्तरानी सर्व विद्यार्थ्यांची रांग चालू केली आणि वाळवंटातील मारुतीचे देवळाजवळ नेली. मागून पाचवीचे शिक्षक तबीब व सहावीचे गुरव येतच होते. देवळाजवळ आल्यावर गुरवानी विचारले, '' कोठे आहे रे तुमचा मढ्या मारुती ?'' आम्ही म्हणालो–'' तो काय, देवळांत आहे.'

'' नीट नीट नीट पहा. तो काय मढ्या मारुती आहे ? ''

'' त्याला सारे लोक मढ्या मारुती म्हणतात की मास्तर !''

'' अरे, (लोक हा ओक धरता धरवेना।) जवळ स्मशान आहे म्हणून का तो मढ्या मारुती झाला ? पहा तरी त्याने कशी उजव्या हाताची थप्पड उगारली आहे.'' '' होय मास्तर, त्याला वीर–मारुतीच म्हटले पाहिजे.'' '' अरे तो वीरानीच बांधला आहे. कऱ्हाडचे कवि विठोबा आण्णा दफ्तरदार, आपटे पैलवान या मंडळीनी तरी वरून धोंडे वाहून नेऊन नदीच्या पलिकडे हे देऊळ बांधवले आहे. त्यावेळी कृष्णा कोयनाचा संगम प्रवाह संगमेश्वराच्या बाजूने कऱ्हाडच्या घाटलगतून वहात होता. सन १८६८ पर्यंत गोपाळराव आगरकर प्रभृति विद्यार्थी संगमेश्वराचे देवळावरून प्रवाहात उड्या मारून पोहत होते. अनेक अवाढव्य पुराना दाद न देता हे देऊळ अढळ राहिले आहे. तेव्हा हे सारे वीरकार्यच आहे. तेव्हां त्या देवळातील मारुतिला तुम्ही कोणी वीर मारुति म्हणलात, तर नवल नाही. पण तुम्ही सातारा जिल्ह्यात

राहता ना रे ?''
'' हो ''
'' मग तुम्हांला चाफळ–सज्जनगडचा संत रामदास ठाऊक असेलच ''
'' आहे की ''
'' त्या संताने हिमालयापासून गावोगाव मारूति स्थापले वेशीवर. कशाकरता ठाऊक आहे ?''
उत्तर मिळाले नाही. तेव्हा गुरवमास्तर म्हणाले–' रामदासाचा एक श्लोक आहे की , रामांनी आपला अवतार संपविला तेव्हा मारूतिकडे आपले काम सोपविले. दुर्जनांचे, धटिंगणाचे चाळे थांबविण्यासाठी व जरूर तर त्यांचा नायनाट करण्यासाठी, यापेक्षाही आणखी एका कामासाठी समाजातील जे देव असतात, तेजस्वी माणसे असतात, त्यांना आपापल्या प्रतिष्ठेने काम करता येण्यासाठी, म्हणून रामावतारानंतर मारूति हेच काम करीत आला आहे. रामदास म्हणतात :– सदासर्वदा रामदासासि पावे । खळे गांजिता ध्यान सोडोनि धावे ॥''
'' मास्तर, मारूति रामाच्या दासानाच तेवढाच पावतो होय ?''
' मग, रामदास म्हणजे काय ते समजून घ्या.' गुरव मास्तर म्हणाले,' वृत्ति होईल उदासिन जेव्हां । रामदास म्हणणे मग तेव्हा ॥ मारूतिची वृत्ति म्हणजे मन, राहणी,करणे–सवरणे उंचच उंच, मोठे, विशाल होते. म्हणूनच तो राम–दास झाला. ज्याला रामासारखे मोठेपणाने वागावेसे वाटते व जो तसा वागतो तो रामदास. आपल्या आदर्शपुरूषासारखे वागणे म्हणजेच त्याची खरी भक्ति. तीच खरी विभूति–पूजा, म्हणूनच आपल्या ध्येयपरूष रामापुढे मारूति नेहमी हात जोडून दिसतो. एरवी तो उफाड्या छातीने ठाण मांडूनच असतो. त्यालाच रामदास प्रतापमारूति म्हणत. सगळ्या गावाची एकजूट मनाने, मेंदूने आणि मनगटाने प्रतापी असावी, हे ठरविण्यासाठीच रामदासानी प्रत्येक गावाच्या वेशीवर प्रतापमूर्ति स्थापला, हा वाळवंटातील मारूति देखील प्रतापमारूतिच आहे. राज्यकारभाराच्या नव्या व्यवस्थेत पंतप्रतिनिधींचे राज्य कऱ्हाडातून संपल्यावर या विठोबा अण्णांच्या मारूतिजवळ स्मशान आले आहे. म्हणून प्रतापमारूति काही मढ्यामारूति होत नाही. मढ्या तब्बेतीची माणसेच फक्त त्याला हिणवतात. कारण त्यांना इतिहासाची माहिती व अक्कलच नसते.'
'' पण मास्तर चांगले चांगले लोकही तसेच म्हणतात ना ?''
'' अरे म्हण आहे की–गतानुगतिको लोको न लोको पारमार्थिक: !''
'' पण मास्तर, प्रत्येक गावाला असा इतिहास असतो ?''
'' हो तर, तो आपण समजून घेतला पाहिजे. तुझे आहे तुझ्यापाशी, परि तू जागा चुकलासी । असे होता कामा नये.''
मग सगळ्यांनी देवदर्शन केले व घरची वाट धरली.

## २

वडिलांची इच्छा मी माझ्यासांरख्याच काही गरीब मुलाप्रमाणे मराठी सातवी करावी,

जमेल तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये जावे आणि प्राथमिक शिक्षक म्हणून जीवन काढावे. मी मराठी सहावीपर्यंत आलो व प्रश्न निराळाच उभा राहिला. पंधराव्या वर्षाशिवाय मला मराठी सातवीला बसता येत नव्हते. वयाच्या क्रमाने मी सातवीत चौदाव्या वर्षीच जाणार, तर एक वर्ष वाया जाणार. वय तर वाया जाऊ नये म्हणून एक वर्ष इंग्रजी शाळेत जावयाचे असे मी मुलामुलात ठरविले व तसे घरी सांगितले.

## समाजसेवा

कऱ्हाडास त्यावेळी म्युनिसिपल इंग्लिश स्कूल होते. (सुधारकाचार्य आगरकर हे ज्या शाळेत इंग्रजी तीन इयत्ता शिकले, तीच ही शाळा. पण शाळेचे शिक्षक म्हणत– ''केसरीकार आगरकर'' आमचे माजी विद्यार्थी होत. आगरकर केसरीचे पहिले संपादक नव्हते काय ?) माझ्यावेळी त्या शाळेत खोडशी गावची जोसकी करणारे वासुदेवराव जोशी मास्तर होते. तर्खडकरांची तीन भाषान्तरे त्यांच्याच भाषेत बोलावयाचे तर चॅप्टर अँड व्हर्स शब्दन् शब्द पाठ होती. ते शिकवीतही मनापासून. त्यांच्यापेक्षा, त्यांच्या पत्नी जुन्या वळणाच्या. त्यानी आगरकरांच्या आईनी केलेली देवादिकांची गाणी ऐकून ऐकून तोंडपाठ केली होती. '' आगरकरांशी ओळख'' या माझ्या पुस्तकात मी जे आगरकराच्या आईने केलेले '' कृष्णाबाईचे गाणे '' दिले आहे ते मला जोशीकाकूनीच दिले होते.फार काय, '' साहित्यिक कऱ्हाड '' मध्ये सन्त सखूचा म्हणून म्हटला गेलेला जो अभंग आहे, तो जोशीकाकूच्याकडे परंपरेने आलेला अभंगच मला त्यानी दिला होता. जोशी मास्तरांच्या वर्गात गेल्यापासून त्यांची माझ्यावर नजर असे. इतकी की पुढे दहा वर्षानी मी कॉलेजचा विद्यार्थी होऊन थोडेफार सार्वजनिक काम करू लागल्यावर, पूर्वास्पृश्यात मिसळतो हे त्यांच्या लक्षात आले. एक दिवस त्यांनी माझ्या आजीला '' बाबूनें काय हा भ्रष्टाचार चालविला आहे '' असा प्रश्न केला व आमची समाजसेवा उद्धारून सांगितली. माझी आजीही जुनी. तेव्हा ती मला सरळ घरात घेणार नाही, याची मला जाणीव होतीच. म्हणूनच, पूर्वास्पृश्यात काम करावयाचे मी ठरविले. त्या दिवशीच मी खूणगांठ बांधली होती की, घरी जाता कृष्णाबाईस जाऊन सचैल स्नान करून, ओलेत्याने घरी जावयाचे ! तसा मी घरी आलेला पाहिल्यावर माझ्या आजीच्या ( जोशी मास्तरांच्या सांगण्यावरून आलेल्या) रागावर पाणीच पडले ! हा क्रम आजी १९२५ साली गीताजयंतीला दिवंगत होईपर्यंत अव्याहत ठेवला. पुढे नाही.

## टु बी


इंग्रजी दुसरीला मला शिक्षक मिळाले श्री. गोविंद दत्तात्रय मेहेंदळे. हे माझ्या आईचे मामेभाऊ होते. टेंभूस त्यांचे आजोळ. ते नटही चांगले होते. त्यांचे गणित व इंग्रजी फर्डे असे. To be is a juggler in the English language हे वाक्य त्यांच्या तोंडून पुष्कळ वेळा येई. शेक्स्पीयरच्या हॅम्लेट नाटकात To be or not to be is a question असे एक वाक्य आहे. '' जगावे की मरावे ? हा प्रश्न आहे.'' असे काहीसे भाषान्तर आगरकरानी आपल्या हॅम्लेटच्या मराठी रूपान्तरात दिले आहे. आमच्या मेहेंदळे मास्तराना




तीर्थरूप पांडुरंग गुंडो गोखले
कऱ्हाड




तरुणपणीचे
बाबुराव



बुद्धिबळात रंगलेले मित्र.... - १९२२




श्रीकृष्ण क्लब...
खुर्चीवर - डावीकडून पाचवे... बाबुराव गोखले
१९२६




साईक्स
गो बॅक!
१९३०



नाट्यसेवा



सेनापती बापट... श्री. पुंडलिकजी कातगडे यांच्या समवेत !



'पद्मश्री' पुरस्कार स्वीकारताना - १९७०

आम्ही मुले '' टु बी '' या नावानेच संबोधित असू. कारण "To be or not To be " हाच धडा ते विद्यार्थ्यांना ऊठबस देत.'' मूर्ध्नि वा सर्वलोकस्य, विशीर्येत वनेऽथवा ॥'' या सुभाषितापेक्षा सामान्य माणसाला झेपेल असा धडा त्यात होता. शिक्षण क्षेत्रात ज्याला वैयक्तिक वैशिष्ट्याचे विशद किरण म्हणतात, ते प्रत्येक विद्यार्थ्याकडून मेहेंदळे अपेक्षित. प्रत्येकाने काही आगळे–वेगळेपण दाखवावे, नाही तर जगण्यात कांहीं अर्थ नाही, असे ते विद्यार्थीमनावर ठसवित. यांच्यापासूनच आम्ही विद्यार्थी जिद्द शिकलो. मी तर मेहेंदळ्यांच्या सारखे मॅट्रिकपर्यंत शिकलेच पाहिजे, असे ठरविले.

## इंग्रजी शिकणार

माझे असे कान लांबले, ते माझ्या एका दूरच्या मामाच्या उदाहरणावरून. त्यामुळे मी मॅट्रिकपर्यंत शिकणार, मराठी सातवीला बसणार नाही, असे मी वडिलांना सांगितले. तेंव्हा त्यांना वाईट वाटले. पण मुलाच्या महत्त्वाकांक्षेबद्दल कौतुकही वाटले. त्यांनी एक सुस्कारा टाकला अन् म्हणाले, माझ्या हातून रेटेल तोवर मी तुला शिकवीन. पण वेळ आली, तर स्वत:च्या हिंमतीनेच तुला शिकावे लागेल. मी होयच म्हटले. मग गाडी रूळाला लागली.

## ' आधुनिक व्रतस्थ '

इंग्रजी तिसरीला एक रिटायर्ड माटे फौजदार आम्हाला इंग्रजी शिकवावयास होते. इंग्रजी शब्दांचे उच्चार ते वेब्स्टरच्या कोशावरून शिकवित आणि ते त्याबरहुकूम न करणाऱ्या विद्यार्थ्याची भर वर्गात नक्कल करून त्याला चिडवीत व रेवडी उडवित,'' एक : शब्द : सम्यग ज्ञात :, सम्यक् प्रयुक्त :, स्वर्गे कामधुक् भवतीति वैय्याकरणानां मतम् ॥'' हे त्यांच्या शिकवणीचे सूत्र होते आणि चवथीला संस्कृत शिकविताना त्या सूत्राचा प्रबोध विद्यार्थ्यावर नेमस्तपणे ठसवित. आमचे दुसरे शिक्षक म्हणजे (१९३२साली) पुढे एक वर्ष केसरीचे संपादक झालेले वासुदेव कृष्ण भावे. (यांचे चुतल बंधु रघुनाथ विद्याधर भावे हे सावरकर पंथीय असून एकदा लोणावळे स्टेशनवर कलकत्त्यास वरिष्ठ कायदे मंडळाच्या बैठकीस चाललेल्या ना. गोखल्यांच्या जिवावरही चिडले होते. त्यामुळे सरकारचा भावे परिचयाचे घराण्यावर रोष ! परिणामत: शंकर विद्याधर भावे यास बुधगाव संस्थानची नोकरी सोडून आपल्या गानकलेवर उपजीविका करण्याकरता बेळगावकर स्त्रीसंगीत कंपनीत नट म्हणून नांदावे लागले व फलटणच्या प्रशाळेत शिक्षक असलेल्या वासुदेव कृष्ण भाव्याना गुपचूपपणे कऱ्हाड म्युनिसिपल इंग्लिश स्कूलमध्ये मास्तर व्हावे लागले होते. सदर वासुदेव कृष्ण)त्यावेळी गोड्या तेलाच्या समईवर बी.ए. ची पुस्तके वाचीत, स्वदेशीच कपडे वापरीत, लोकमान्य टिळकांना मंडालेची शिक्षा झाल्यापासून कपाळाला गंध लावीत नसत की साखर म्हणून कशी ती खात नसत. 'आधुनिक व्रतस्थ' म्हणून लोक त्यांच्याकडे पहात. प्रसिद्धिविन्मुख राहून अबोलपणे स्वदेशीव्रत कसे आचरावयाचे आणि तेही स्वावलंबनपूर्वक प्रयत्नवादाने, याचा कित्ता विद्यार्थी त्यांचेपासून घेत.

## गुरू-पिता

इंग्रजी चवथीत एकदम अनपेक्षित योग्यतेचेच शिक्षक आम्हाला आले. त्यात काशिनाथ रामचंद्र जोशी हे नामदार गोखले यांचे कोल्हापुरातील एक वर्गबंधु होते. ते होते इंटरपर्यंतच शिकलेले, पण ना. गोखले व न्या. रानडे यांच्या गोष्टी आणि स्वभावछटा वर्गाला शिकवण्याच्या विषयाच्या अनुषंगाने ते सांगत. त्यामुळे जग केवढे विशाल आहे आणि आपल्या देशातही केवढ्या तोलामोलाची माणसे आहेत, हे ऐकून विद्यार्थ्यांच्या दृष्टीला व विचारसरणीला भव्यता येई. त्यांच्या शिकवण्याचा विषय बीजगणित, मराठी भाषा व संस्कृत ते शिकवित. नवनीत तर त्यांचे हातखंडा होते. ते आपल्या पावशेर मिशातून गोलंकार आवाजीने व प्रेमळपणाने शिकवीत, '' सर्वत्र विजयमिच्छेत्, शिष्यादिच्छेत् पराजयम् !'' अशा ईर्षेचा हा गुरू होता. ते छडी मारावयाचे नाहीत, रागेच भरावयाचे नाहीत, पण त्यांच्या नैतिक, अभ्यासू व वत्सल आणि रूबाबदार वागण्याची छापच अशी असे. घरच्या वडिलाजवळ जेवढ्या लडिवाळपणे मुले बोलतात तसेच आम्ही विद्यार्थी बोलत असू आणि तेही विद्यार्थ्यांशी जातीभेदातीत राहून आपल्या चिरंजीवासारखेच सगळ्या विद्यार्थ्यांना मानीत. (ते नेहमीच म्हणत-शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणोभवेत् । अग्निहोत्रपरोदान्त सब्राह्मण इति स्मृत:।।आणि म्हणूनच यशवंता डवरी, बाळकू पवार हे, त्याना शामराव वाचासुंदर, बाबू गोखले यांच्या इतकेच जवळचे असत. या रूईकर जोशापैकीच एक कोल्हापूरच्या शिवाजी क्लबांतील क्रांतिकारकापैकी होते. त्यांचा माझा परिचय त्यांच्या संन्यस्त व काहीशा भ्रमिस्त अवस्थेत नरसोबाचेवाडीस झाला होता. आजकाल कन्हाडचे म्हणून सर्वत्र ख्यात असलेले पंचांग कर्ते उद्धव शास्त्री रूईकर हेही आमच्या जोशीकाका मास्तरांच्या कुळातील आहेत. त्यांचा लोभही मजवर आहे. हा एक योगायोगच.)

## सरकारी संशय पिशाच्च

जोशीकाकांच्या थोडे मागाहून आमच्या शाळेत महादेव हरि दुवेदी हे रहिमतपूरकर शिक्षक आले. ते सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी. दशग्रंथी ब्राह्मण. कुळाचे सगळे संस्कार त्यांच्या मातोश्रीनी त्यांच्यावर केले होते. त्यांच्या घराण्याकडे ज्यांचे यजमानकृत्य मुख्यत्वे असे, त्या रहिमतपूरच्या गोपाळराव ( प्रा. वा.गो. किंवा व्ही.जी. चे वडील) परांजपे वकिलांच्या नजरेला महादेवराव दुवेदीच्या बुद्धीची झेप आल्यावर, त्या वकिलानी दुवेदीना बदललेल्या काळात सरळ इंग्रजी विद्येचा पाठपुरावा करण्याचा सल्ला दिला आणि त्यावेळच्या इंग्रजी सहावे इयत्तेला पुरून उरेल एवढी इंग्रजीची तयारी स्वत: करून दिली. मोरशास्त्री साठ्यानी ( बृहस्पतितुल्य) कृष्णाशास्त्री चिपळूणकरास बदलत्या काळास अनुसरून खांद्यावरची शालजोडी सोडण्याचा सल्ला दिला होता, असे म्हणतात, त्याची आठवण होणे साहजिकच आहे. सातारा जिल्ह्यातील कोरेगावच्या शाळेवर मुख्याध्यापक मारूतराव कळंबे यांच्या संपर्कात दुवेदीना सरकारी चारचक्षूनी पाहिल्यामुळें कळंब्यासारखेच दुवेदीही सावरकरी पंथाचे आहेत, असा सरकारचा समज दुवेदी सातारा न्यू इंग्जिश स्कूलमध्ये परांजपे वकिलांच्या कृपेने मॅट्रिकच्या वर्गात शिकत असल्यापासूनच होता. पदवीपरीक्षा पास होण्यापूर्वीच दुवेदी

कऱ्हाडच्या शाळेत मास्तर आले तेव्हा त्यांच्या पाठीमागे असलेला ब्रिटिशसरकारचा संशयपिशाच्च आम्हा विद्यार्थ्यांनाही दिसला होता. १९३८ साली पहिले काँग्रेस मंत्रिमंडळ मुंबई इलाख्यात स्थापन झाल्यानंतरच दुवेदींच्या मागील त्या संशयपिशाच्चाने गति घेतली!!

## कऱ्हाडची शाळा

कऱ्हाडच्या शाळेत नोकरी करता करताच दुवेदी बी.ए. झाले, म्युनिसिपल इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक झाले आणि लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर त्याच आगरकर शिकलेल्या म्यु. इंग्लिश स्कूलचे रूपांतर शिक्षण मंडळाच्या टिळक हायस्कूलमध्ये झाले त्यावेळी त्या संस्थेच्या संचालक प्रमुखांतही मोजले गेले.

## अमर शिकवण

दुवेदी आम्हा चवथी–पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व संस्कृत शिकवीत. ते शिस्तीचे आणि बिनचूकपणाचे अतिशय चाहते. काव्यापेक्षा सुभाषितावर आणि व्याकरणाच्या किचकटपणातील बुद्धी–सौंदर्यावर ते शिकवताना बोलू लागले म्हणजे त्यांची पंडिती मोहून टाकी. नीतिशुद्ध नागरीकी ते विद्यार्थ्यांना रस्त्यावरही शब्दाच्या ठसक्याने व नेत्रसंकेतानेही शिकवीत. विद्यार्थ्यांच्या अडणुकी सोडविण्यासाठी त्यांचे दरवाजे चोवीस तास उघडे असत. देवपूजेला बसले असले अन् विद्यार्थी आला तर पूजेच्या मंत्रापेक्षा विद्यार्थ्याला शिकवणी देण्यात ते आनंदाने रमत. घरची अशी शिकवणी दुवेदी नि:शुल्कच करीत. त्यानी आम्हा विद्यार्थ्यांना अमर शिकवण दिली ती ही की–

सऽस्निग्धो कुशलान्निवास्यति य:तत्कर्म यन्निर्मलम् ।<br>
सा स्त्री यानुविधायिनी, स मतिमान्य: सद्भिरभ्यर्च्यते ॥<br>
सा श्रीर्या न मदं करोति, स सुखी यस्तृष्णया मुच्यते ।<br>
तन्मित्रं यदकृत्रिमं, स पुरूषोय: खिद्यते नैंद्रियै: '' ॥

## अतूट जिव्हाळा

दुवेदी शाळेत आल्यावर उघड्या मैदानांतील चेंडूफळी (क्रिकेट) चा खेळ आमच्या शाळेत आला. त्यांच्या शिस्तीप्रमाणे हा खेळ खेळावयास आम्ही रोज निमजग्याच्या माळावर जात असू. अपवाद होता शुक्रवारचा. कारण त्या दिवशी आम्हा कऱ्हाडकर गरीब मुलाना कृष्णाबाईच्या घाटावरील फुटाणे खारेदाणे खाण्यास एक पैसा मिळे. आमच्या वर्गातील तीस मुलापैकी बावीस मुले एकत्र फुटाणे खाण्याचा कार्यक्रम कृष्णाबाईचे वाळवंटावर आट्या–पाट्या किंवा खो खो खेळून झाल्यावर खेळत असू. आम्ही मराठी शाळेपासून चालविलेला हा दुवेदी मास्तंराच्या शब्दातील '' अड्डा '' त्यांची कडक शिस्त सुरू झाल्यावरही आम्ही चालविलाच होता. त्याचे प्रायश्चितही आम्ही दर शनिवारी सकाळी भोगतच असू. आमचे का. रा. रूईकर शाळेची घंटा झाल्याबरोबर पुकारावयाचे–डवरी, वाचासुंदर, फडके, गोखले, वेलणकर मुख्याध्यापकांचे तुम्हाला बोलावणे आहे. (यू आर कॉल्ड बाय दि हेडमास्तर) आम्ही दुवेदींच्या कचेरीत जावयाचे.त्यानी विचारवयाचे–काल सायंकाळी होतात कोठे ?

( व्हेअर वेअर यू लास्ट इव्हिनिंग? ) आम्ही उत्तर करावयाचे–कृष्णेच्या वाळवंटावर ( ऑन दि कृष्णा सँडस्) लगेच डाव्या हातावर दोन दोन सपाटेबाज सपकन् छड्या बसावयाच्याच ! शिस्तभंगाबद्दल दुवेदींचे गरगर फिरणारे डोळे, ताठ झालेल्या मिशा, गुं गुं आवाज देणारा त्यांच्या हाती फिरणारा वेत आणि आमच्या हाती पडणारे बळ, अशी ही आमची दर शनिवारी सकाळची मारूतीची उपासना अखंड चाले. ('' नकळत पद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधी घडे ॥''हे जरी खरे, तर आम्हा) गुरूशिष्यांचा हा दोन्ही बाजूनी चाललेला चिकाटीचा आग्रह उघड्या डोळ्यानी होत असल्यामुळे झाले हे काही वावगे झाले असे नाहीच. मतभेदापायी सहनशक्तीची पराकाष्टा करूनही दुवेदी आमचे कल्याणकरी शिक्षक व आम्ही त्यांचे न निश्चय कधी ढळो असे विद्यार्थी हा त्यांच्या उत्तरायुष्यात स्मृतिविनोदाचा विषय होता आणि आमचा त्यांचा जिव्हाळा अतूटच अतूट होता आणि आहेही.

## वनवास

त्यांची एक बाणेदारपणाची आठवण सांगितल्याशिवाय कसे राहावेल? १९३० साली टिळक स्कूलवरच्या लिंबाचे झाडावर काँग्रेसचे निशाण एक दिवस लक्ष्मण गणेश जोशी प्रभृति विद्यार्थ्यानी पहाटेच्या वेळी राष्ट्रगीत गाऊन फडकवले. लिंबाचे झाडाखालील खोलीतच साखर झोपेत असलेले शिक्षण खात्याचे इन्स्पेक्टर त्यावेळी कानावर आवाज येऊनसुद्धां बाहेर चौकशीला आले नव्हते; पण सूर्योदयानंतर दुवेदी शाळेत गेल्यावर इन्स्पेक्टरसाहेब त्यांना तो झेंडा दाखवून म्हणाले–शाळेवर हा झेंडा कसा लागला ? कोणी लावला ? कां लावला ? शाळेचे विद्यार्थी त्यात होते काय ?

दुवेदी– आपण सूर्योदयाबरोबर मला बोलावलेत, त्याप्रमाणे मी आलो आहे. मी येण्यापूर्वी काय, कसे घडले, त्यात कोण कोण होते, हे मला काय माहित ? आपणच येथे होता. आपण वा आपले शिपाई व सहाय्यक यांनाच कदाचित् माहिती असणार !

इन्स्पेक्टर– तुम्ही चौकशी करून गुन्हेगार पोलिसच्या ताब्यात द्या.

दुवेदी– ती राजकीय बाब आहे. मला त्यात पडण्याचे कारण नाही. सरकारचे गुप्तहेर बळकट आहेत.

शिक्षण इन्स्पेक्टरनी मग पोलिसाकडे रिपोर्ट दिला. परिणामत: चौकशी झाली. सरकारला '' गुन्हेगार '' घावरलाच नाही. दुवेदी आणि त्यांचे एक सहकारी याना सहा महिने घरच्या घरी वनवास काढावा लागला !!

## विद्यार्थ्याचे वृत्ति वर्तन

पुढे गांधी आर्विन–करार होऊन महात्माजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेले होते. त्या अवधीत त्या करारात स्वत:च्या नखाने ओरखडे निघालेले सरकार १९३० च्या पूर्वीचे चळवळीतील कार्यकर्त्यांना फोडझोडीने नामोहरम करण्यात गुंतले होते. आमच्या जिल्ह्याचे कलेक्टर हिरेमठ होते. इतराप्रमाणे त्यांनी मलाही बोलावणे पाठवून डाक बंगल्यात बोलणे केले. तरूण वय, आपला संसार सुरळीत करण्याचे सोडून, गांधींच्या चळवळीत पडण्याची

अक्काबाई तुम्हाला का आठवली? अशा तऱ्हेचे त्यांचे मला प्रश्न झाले. मी त्यांना उत्तर दिले– ''आपण मला हे काही सांगू नका. मी ऐकणार नाही. आपले–माझे कुळच भिन्न आहे.'' तेव्हा कलेक्टरसाहेबांनी समजूतदारपणे कसल्याही राजकीय चळवळीतून अलिप्त राहण्याचे ठरविणाऱ्या आमच्या जिल्ह्यातील दोन बंड्यांची पत्रेच मला दाखविली. त्यावर मी म्हटले की–''या थोर लोकाइतका पोक्तपणा मजजवळ नाही. तो ज्या दिवशी येईल, त्या दिवशी काय ते होईल. आज तरी मला पोक आलेले नाही. मला त्यांचा मार्ग पसंत नाही.'' मी डाकबंगल्यांतून बाहेर आलो तो गुरूवर्य दुवेदी रस्त्याच्या कोपऱ्यावर मला भेटले. मी नमस्कार केला. पुढे निघालो. गुरूवर्यही मागून झपाट्याने येऊ लागले. गावच्या मुख्य पेठेत आल्यावर गुरूवर्यांनी मला हाक मारली. मी थांबलो. त्यानी मला स्वत:च्या घरी चलण्याची सूचना केली. मी गेलो. घरातील बैठकीवर हळूच त्यांनी विचारले, '' डाकबंगल्यावर काय झाले?'' मी तपशीलवार अहवाल दिला. गुरूवर्यांनी मला शाबासकी दिली. मी विचारले– '' दादा यात शाबासकीसारखे काय आहे ?''

'' मला माझ्या विद्यार्थ्यांच्या बाणेदारपणाबद्दल अभिमान वाटतो. आम्हा शिक्षकांचा अभिमान, इच्छाप्रतिष्ठा सारे काही विद्यार्थ्यांच्या वृत्तिवर्तनामध्येच सामावलेले असते रे ! '' आणि मग एक सुभाषित बोलून गेले. ते हे–

किं जन्मना महति ? किं पितृपौरूषेण।<br>शक्त्यैव याति विजया पुरूष: प्रतिष्ठान्॥<br>कुंभो हि कूपमापी शोषयिंतुं न शक्त:।<br>कुंभोद्भवेन मुनिनाम्बुंधिरेव पीत:॥

## सव्यसाची आनंद

गुरूवर्य दुवेदी स्वतंत्रपणे गीताधर्म मंडळ चालवीत. दरसाल गीताजयन्तीचा उत्सव करीत. पाठान्तरास, निबंधास, प्रवचनास विषय नेमून देत. विद्यार्थ्यांसाठी संदर्भपुस्तकेही सुचवीत. बक्षिसे देण्यासाठी गांवातून वर्गणीही गोळा करीत. आपल्या जुन्या विद्यार्थ्यांपैकी गावातच व्यवसाय व वास्तव्य करणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांना गीतेची गोडी असल्यास, आपले सहकारी म्हणून घेत व कामे वाटून देत. गीतावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे यांच्यासारख्यांची गीतेवर प्रवचने घडवीत. आपल्या विद्यार्थ्यांची मुलेही, गीतेसारख्या सांस्कृतिक ग्रंथाचा अभ्यास करतात हे पाहून त्यांना जितका आनंद होई, तितकाच आनंद त्यांना आपल्या जीवनोपयोगी वस्तु त्या वस्तूंचा व्यवयास करणाऱ्या आपल्याच विद्यार्थ्यांकडून विकत घेण्यात आनंद होत असे.

# ३

" बस्स ! बस्स ! बस्स !"

असे समाधानाचे व शाबासकीचे उद्गार मनमोकळेपणाने काढणारे शिक्षक म्हणजे प्रभाकर श्रीपत ऊर्फ आबा शेणोलीकर हे सर्वच बाजूनी नमुनेदार शिक्षक होते. त्यांचे चोवीस तासांचे वेळापत्रक आखलेले असावयाचे. त्यामुळे ना. मंडलिकांच्या जाण्यायेण्यावरून जसे लोक घड्याळ लावून घेत तसेच आबांच्याही वर्गात शिकवावयाचा विषयही ते मोजकेपणाने शिकवीत. वर्गातील मंदबुद्धि मुलाला विषय समजला आणि आपण तो समजावून देताना बाकीच्या मुलांचे आपल्या प्रश्नाकडे व त्या मंद बुद्धीच्या उत्तराकडे चांगले लक्ष आहे यावर नजर राखली म्हणजे सर्व वर्ग तयार होईल, असा आबांचा रोख होता. बीजगणित, भूमिति आणि संस्कृत हे त्यांचे आवडते विषय. बीजगणितातील संख्यावयव (फॅक्टर्स)आणि संस्कृतातील समास मर्मग्राही अर्थबोधाने कोणी सोडविले की आरंभी दिलेले उद्गार त्यांचे तोंडून यावयाचेच. त्यांचा पोशाख साधाच पण व्यक्तिमत्त्वाचा उठाव करणारा असे आणि त्यांच्या हसतमुखातून बाहेर पडणारे शब्द रेखीव, कापीव, मोजके पण यथार्थपणे उद्बोधक असत. काटेकोरपणाने "रिकामा जाऊ ना दे क्षण" या स्वयंशिस्तीने वागणाऱ्या आबाना त्यांच्या त्या काटेकोरपणावरील कटाक्षाबद्दल एकदा विचारले असता, ते म्हणाले- "अरे, तुम्ही लोकांनी मला फार मोठे नाव दिले आहे. आईने मला प्रभाकर म्हटले आणि तुम्ही मला आबा म्हणता, मग सूर्याचा आणि शिवाजी महाराजांचा मोठेपणा अंगी नसला तरी नावापुरता तरी तो आणण्याचा प्रयत्न नको का करायला ? त्यातून मी पडलो शिक्षक. शिक्षकाचे कैसे बोलणे । शिक्षकाचे कैसे चालणे ।। यावर विद्यार्थ्यांचे लक्ष असते. तेव्हा आपल्यामुळे कोणालाही वाईट वळण लागताच कामा नये तर आपला कित्ताच त्यांनी घ्यावा, अशी दक्षता घेणे हे शिक्षकी करणारांचे आद्य कर्तव्यच."

## बावन्नाव्या वर्षी मॅट्रिक

कऱ्हाडच्या म्युनिसिपल इंग्लिश स्कूलमधील आणखी एका शिक्षकांची आठवण मला सांगितलीच पाहिजे. हे शिक्षक चित्रकला-शिक्षक होते. त्यांच्या सहज रेघोट्या मारण्यातून चित्रे निर्माण व्हावयाची ती बघत राहण्यासारखी. पण ती बघून तशीच चित्रे काढताना माझ्यासारख्यांना पुष्कळ वेळा वि-चित्र- कळा व्हावयाच्या. सदर शिक्षक एका डॉक्टरांचे चिरंजीव. पण वडिलांचे पश्चात चुलत्याजवळ सांगलीस राहण्याची पाळी आली आणि चुलत्यांनी आपल्या पुरोहिती वृत्तीस अनुसरून पुतण्यास शाळेत नादारी मागावयास सांगितली. डॉक्टरांचा मुलगा म्हणून गणेश विनायक फडक्यांना ती गोष्ट मानवली नाही. म्हणून त्यांनी चित्रकलेतील कुशलतेने

स्वावलंबी व्हावयाचे ठरविले. त्या निश्चयातून ते स्वत: वयाच्या बावन्नाव्या वर्षी मॅट्रिक झाले ही गोष्ट खरी; पण दरम्यान आपल्या अनन्तराव या भावाला पदवीधर करून सोडला. सदर अ.वि. फडके म्हणजे सातारच्या पॉप्युलर हायस्कूलचे संस्थापक होत. पण गणेश विनायकांचा कुर्रा एवढ्यावरच थांबला नाही. पैशाच्या अभावी होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण अडू नये या दक्षतेने तो कुर्रा उदार झाला. आपल्या प्राप्तीच्या रूपायातील ( त्या काळच्या चौसष्ट पैशांच्या रूपयातील) दोन पैसे निरपेक्षपणे विद्यादानास द्यावयाचे हे व्रत गणेश विनायकांनी पाच तपे आचरले आहे. या काळात चित्रकला-शिक्षकीतून छायाकिरण-चित्रकार झाले, विमा एजंट झाले आणि शेवटी दंत वैद्यही झाले. या सर्व अवस्थान्तरात त्यानी आपले विद्या-दानाचे व्रत अखंड चालविले. त्याचे सातत्यही समाजात चालावे, म्हणून होतकरू, गरजू विद्यार्थ्यांकडून विद्येसाठी दान देताना एक शपथ मात्र घेत आले आहेत. ती शपथ अशी:-

'' स्थैर्याचा मी भुकेला की । स्थितीने अति नाडलो ॥
सहाय्ये आपुल्या शुद्ध । ध्येयमार्गास लागलो ॥
कृतज्ञ करतो आज । संकल्प पुरूषोत्तमा ॥
दक्षतेने यथाशक्ति । माझे साह्य मिळो जना ॥

हे विद्या-दान देताना गणेश विनायकांची एक मर्यादाही आहे. ती ही की, '' दान आणि चैन कर्ज काढून करावयाची नाहीत.'' नादारी मागावयाच्या स्वत:वर आलेल्या आपत्तीतून गणेश विनायकानी वरील तऱ्हेचे प्रबोधन घेतले व समाजाला दिले. त्यातील त्यांची वृत्ति जी '' ये ये यथा मां प्रतिबाधयन्ति । ते ते तथा मां प्रतिबोधयन्ति ॥ '' असे म्हणणारी आहे, ती विरळाच नाही काय ?''

## भावासारखा सोबती

कऱ्हाडच्या म्युनिसिपल इंग्लिश स्कूलमध्ये पाचवे इयत्तेपर्यंतचेच शिक्षण होते. त्या काळातील माझ्या एका बालमित्राचे स्मरण मला आता त्याच्या मृत्यूला पन्नास वर्षे होऊन गेली तरी होतच असते. कोंडी रामा पडवळ हे त्याचे नाव. बिगरी इयत्तेपासून तो चवथी इयत्तेअखेर तो माझा वर्गबंधु. माझ्याच येथे येऊन त्याचा अभ्यास चाले. मी इंग्रजी शाळेत जाऊ लागल्यावर तो त्याच शाळेत '' घंटा मारणारा '' गडी म्हणून कामास आला, आणि १९१४ सालचे युद्ध सुरू झाल्यावर रंगरूट होऊन गेला.फ्लॅंडर्सच्या लढाईतील एका चकमकीत तो कामास आला. म.फुले यानी जो '' जातिभेद-विवेकसार '' हा ग्रंथ छापला तो लिहिणारे श्री. तुकारामतात्या पडवळ (मुंबई) हे आपले पूर्वज असल्याचा सार्थ अभिमान माझ्या मित्राला वाटे. रंगरूट होऊन जाताना, त्याने मला आर्जवून सांगितले की, माझ्या आळीत व त्याच्या शेजारीच राहणारी ''राधाबाई पवार ही माझी मावशी. तिचा मुलगा व माझा मावसभाऊ विठोबा आरेकसाचा धंदा करतो आहे. त्याच्या मुलांच्या शिक्षणाला हातभार लाव.'' राधाबाई या अनुभविक नर्सच होत्या. माझ्या आईची बाळंतपणे त्याच करीत. कोंडी रामाने ज्यावेळेस मला वरील आर्जव केले. त्यावेळी माझे वडील जवळच होते. ते

कोंडिबाला म्हणाले, 'कोंडिबा, तू माझ्या बाबूबरोबर भावासारखा वागतोस. तुझा शब्द आम्ही खाली पडू देणार नाही.' आणि राधाबाईची सात नातवंडे माझ्या पुस्तकावर शिकून शहाणी झालीच;पण माझ्या मुलांच्या पुस्तकांचा उपयोग करून राधाबाईची पणत्वंडेही मार्गी लागली. '' सत्यं दानं क्षमाशीलं मानृशस्यं तपोघनम् वृश्यन्ते यत्रयत्रैव स:ब्राह्मण इति स्मृत: '' या सुभाषिताचा साक्षात्कार कोंडी रामा पडवळाच्या संगतिसोबत निर्विवाद होई.

## पैसे पुरवीन

कोंडी रामा पडवळ रंगरूट होऊन गेला आणि कऱ्हाडची शैक्षणिक तरतूद संपल्यामुळे, माझ्या बरोबरीची मंडळी पुढच्या शिक्षणासाठी पुणे, सांगली, सातारा येथे आपापल्या सोईप्रमाणे जाऊ लागली. मी कोठे जावयाचे ? असा प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला. मीही आता कोठेतरी पाट्या टाकण्यास जावे, अशी आमच्या कुटुंबाच्या हितचिंतकांची भाषा सुरू झाली त्यासरशी मला कविता आठवली की,

कवे, संक्रान्तीचा नव रुचिर आदेश कळला।
असो पुष्टी–तुष्टी–वनि, जनि, रणी शान्तिगुणिला ॥
प्रतिष्ठावी प्रज्ञा प्रखर पुरुषार्थी कृति सदा।
शिरी काळाच्याही सतत चढवोनी निज पदा ॥

मग, निश्चय केला की आपण सातारा येथे जावयाचे ते न्यू इंग्लिश स्कूलमध्ये जावयाचे. एक तर ते सुविख्यात शिक्षणप्रदान केंद्र होते आणि सरकारी हायस्कूलपेक्षा तेथे फी कमी, म्हणून मला प्रवेश द्यावा असा एक विनंतिअर्ज ह्या शाळेकडे पाठविला. आणि अनपेक्षित धक्का बसला. तो असा की, त्या अर्जाला परत डाकेने धाडकन् उत्तर आले की ''तुम्ही आपल्या परीक्षेचे गुण कळविलेत ते सर्व ठीक आहेत, पण जर आमच्या शाळेच्या पहिल्या मासिक परीक्षेत नापास झालात तर फिरून मागच्या इयत्तेत बसावे लागेल, ही अट तुम्हाला मान्य असेल तर आमच्या शाळेत प्रवेश दिला आहे.'' या उत्तराची चर्चा आमच्या घरी आणि माझ्या वडिलांच्या स्नेही मंडळीत खूपच झाली. आणि मी ठरविले की, '' दिव्याला '' तोंड द्यावयाचेच ! हे साहस मी करू नये, कारण माझ्या वडिलाना त्यावेळी अकरा रुपये पगार होता. त्यापैकी दरमहा पाच रुपये ते मला पाठविण्यास तयार होते. पण त्यावेळी म्युनिसिपालिटीचे पगार ठरल्या तारखेला होत नसत. चार रुपये खानावळ आणि चार आणे खणी भाडे असलेली खोली, दिवाबत्ती वगैरे भागले तरी नीटनीटके कपडेलत्ते तरी हवेत, ते कोठून व्हावयाचे हीच चिंता आमच्या हितचिंतकाना होती. पण त्या चिंतेला विरजण घालावयास माझ्या वडिलांचे एक स्नेही कृष्णाजी सीताराम देशपांडे वकील पुढे आले. ते मला म्हणाले– ''बाबू तू आमचे गावचा दणगट मुलगा; शरीराने तसाच बुद्धीने, तू खुशाल शिकायला जा, पैसे कमी पडले तर मला माग.'' त्याना दुसऱ्या एका त्यांच्याच आडनावाच्या लोकपुढाऱ्याने विचारले– वा रे, जहागीरदार किती दिवस त्याला तू पैसे पुरवशील ? तुझा तुला संसार आहे की नाही ? उत्तर उमटले की ''बाबू बॅरिस्टर होऊन येईपर्यंत पैसे देईन. म्हणणे काय तुमचे, बोला !!''

## मोठी पत

आणि माझ्या अंगावर उगीचच मांस चढले. माझ्या मुनिसिपल क्लार्क असलेल्या बापाची पत केवढी मोठी आहे, याचा मला प्रत्यय आला. अशीच पत आपल्यालाही मिळवावयाची असेल, तर याचनेचा हात कोणापुढेही पसरवायचा नाही, हे माझ्या वडिलाचे व्रत मी चालविले पाहिजे, असा विचारही मनांत येऊन गेला. देशपांडे वकिलांच्या प्रोत्साहनाने मला परमेश्वराचा आशीर्वादच मिळाल्यासारखे वाटले आणि मी सातारा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नांव घातले.

## लक्षवेधी विद्यार्थी

नवख्या जगात एकाकी, अनोळखी परिस्थितीत, आणि शहरी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात, खेड्यातून पुढे सरकणाऱ्या मंडळींना बुजल्यासारखे होते. पण मला तसे काहीच झाले नाही. दुवेदी-शेणोलीकरांचा मी विद्यार्थी, मला न्यू इंग्लिश स्कूलमधील वातावरण " भयकृत् "वाटलेच नाही. वर्गशिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मी तेथे रूळलेल्या विद्यार्थ्यांच्या इतकाच सफाईने देतो, हे पाहिल्यावर अनेक विद्यार्थी व वर्गशिक्षक माझ्या आपुलकीचे झाले. पण खरी कसोटी मासिक परीक्षेची होती. शाळेचे मुख्याध्यापक आम्हाला इंग्रजी गद्य शिकवित; इंग्रजी काव्य पालेकर गुरूजीकडे होते; आणि निबंधगुरू होते हरिभाऊ पानवलकर. मला पहिल्याच मासिक परीक्षेत मुख्याध्यापक देवधरांचे विभागात त्यांच्या काटेकोर तपासणीतूनही चाळीसपैकी छत्तीस गुण मिळाले; तितकेच पालेकरांचे विभागातही मिळाले आणि त्या ऐंशी गुणांची प्रश्नोत्तरे लिहिता लिहिताच माझी पुरेवाट झाल्याकारणाने, मी निबंध लिहिला- लिहिला कसला खरडला, त्यात वीस पैकी फक्त चारच गुण मिळाले !! गणित, इतिहास, संस्कृत-मराठीमध्ये साठ टक्क्यापेक्षा कोठेच खालती गुण मिळाले नाहीत. मग मी सर्वच शिक्षकांचा लक्षवेधी विद्यार्थी ठरलो. तरीही हे मला सांगितलेच पाहिजे की, मला निबंध लिहिता येत नाही, म्हणून भरवर्गात माझी चेष्टा करून चार छड्या चमकावल्याच ! त्याचा वचपा पुढच्या मासिक परिक्षेत मी वर्गातील सर्व विद्यार्थ्यापेक्षा प्रदीर्घ आणि मुद्देसूद निबंध लिहून काढला. हरिभाऊ पानवलकरांचा विश्वासच बसेना की, मी तो निबंध लिहिला या गोष्टीवर ! पण हस्ताक्षर तर माझेच तेव्हा त्याना हे सर्व वर्गात बोलून दाखविल्याशिवाय राहवले नाही. माझे वर्गबंधु व पुढे सातारा कन्या शाळेचे संस्कृत शिक्षक झालेले विश्वनाथ केशव महाबळेश्वरकर ( हे हल्ली वाईस आपल्या कन्येजवळ असतात) हे ही गोष्ट कोठेहि माझे नाव निघताच आठवणीने नवीन होतकरू विद्यार्थी-विद्यार्थीनीना सांगतातच ! म्हणून मला हरिभाऊ पानवलकरांचे हार्दिक आशीर्वाद आर्जवून सांगण्याचा मोह टाळताच येत नाही.

## मनमोकळी दिलगिरी

गु. हरिभाऊ पानवलकर पुढे सरकारी हायस्कुलात नोकरीस गेले व आपल्या पात्रतासिद्धीने एज्युकेशनल इन्स्पेक्टरही झाले. ते पेन्शन घेऊन पुण्यास रहात असतात (हल्ली ते विजापुरास आपले चिरंजीवाजवळ असतात, असे ऐकतो) मला चित्रशाळेसमोर भेटले. मला म्हणाले,'' अरे तू कऱ्हाडचा गोखलेच ना ? माझ्या घरी येतोस का ? मी म्हटले ''सर, मी आपल्या घरीच आपले नीट दर्शन घेतो.'' आम्ही त्यांच्या घरी गेलो. ते कपडे काढून एका खुर्चीवर बसले, मलाही एका खुर्चीवर बसावयास सांगितले; मी त्यांना नमस्कार करून बसलो. जुन्या आठवणींचा, परस्पर परामर्शाचा आणि जीवनोघातील चमत्कारांचा शब्दौघ सुरू झाला. आम्ही रंगलो आणि त्या १९४५ साली माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या '' आगरकरांशी ओळख '' या पुस्तकाचा विषय निघाला. एकदम गहिवरून हरिभाऊ म्हणाले,'' गोखले, तुला निबंध लिहिता येत नाही म्हणून मी तुला छड्या मारल्या; तू दुसरा निबंध लिहिलास त्याच्या अस्सलपणाबद्दल मी संशय प्रगट केला; हे तुला आठवत नसले, तरी मला आठवते. अन् काल तुझे आगरकरावरील पुस्तक वाचल्यापासून माझी तुझी गाठ पडावी व एकदा मनमोकळी दिलगिरी व्यक्त करावी, अशी सारखी ओढ लागली होती.....''

' दिलगिरी कशाबद्दल सर ?'

'' अरे, माझा तुझ्याबद्दलचा झालेल्या गैरसमजाबद्दल व तुला केलेल्या शिक्षेबद्दल.

'' सर, त्यानीच कदाचित् मला लिहावयाला समर्थ केले असेल. मी तसा अजूनही लेखकूच आहे.''

'' गोखले, तूं लेखक झालास आणि चरित्रनायकाच्या विरोधकावर अगर मतभिन्नतेवर कसलाही अपशब्दांचा अगर निंदेचा शिडकावा न लिहिता, चरित्र लिहिता येते, हे मराठी विचारवन्ताना पटविलेस याबद्दल मला खरोखरच आनंद वाटतो. तेव्हा तुझे अभिनंदन करून चढत्या वाढत्या पदवीचा हो, आशीर्वादच मी तुला देतो.''

' या आशीर्वादापेक्षा मला आणखी काय हवे सर ?

भूमौस्खलितपादानां भूमिरेवावलम्बनम् ।
स्वयेजाता पराधस्य त्वमेव शरणं मम ॥'

## न्यू इंग्लिश स्कूल

न्यू इंग्लिश स्कूल मधून सरकारी नोकरीत गेलेल्या पानवलकरांबद्दलच्या माझ्या भावना वरीलप्रमाणे होण्यात, न्यू इंग्लिश स्कूलमधील वातावरणच कारण होते. त्या शाळेत क्रमिक पुस्तकाच्या झरोक्यातून आजचे व उद्याचे संभाव्य जग दाखविण्यात येई '' पठका: पाठकाश्चैव ये चान्ये शास्त्रचिंतका: । सर्वे व्यसानि धूर्तो, य:। क्रियावान् स पंडित:॥'' हाच ठसा तेथे शिक्षणप्रणालीतून विद्यार्थ्यांच्या मेंदूवर मुख्यत: उमटे; निदान माझ्यातरी ! क्रियावान होताना, राष्ट्र खरे जगते ते कोणाच्या जीवावर ? तर-'.' ये दीनेषु दयालव:

स्पृशति यानाऽल्पोपि श्रीमद: व्यग्रा येच परोपकारकरणे, दृष्यति सेवारतौ ॥ स्वस्था: सन्ति च यौवनोन्मदमहा व्याधि प्रकोपऽप्रिये। तैस्तमेरिव सुस्थिरै: किल भराक्लंता धराधर्याते '' हा धडा लक्षांत ठेवला पाहिजे, हे विशेषत: मुख्याध्यापक गु. सीताराम गणेश देवधर यांचे शिक्षणातून मिळावयाचा. एवढेच नव्हे तर विहाय पौरूषं योहि दैवमेवावलम्बते प्रासादसिंहवत्तस्य मूर्ध्नि तिष्ठन्ति वायसा:'' हाही इशारा त्यांच्या शिकवणीतून मिळे. गु. देवधर यानी शाळा चालविण्यात,'' मुलांचा लाभ मोठासा, निष्पापे, तुज होइल कीर्तिडा अतुला लोकी तत्कृतीनेच येशिल '' या आशीवार्दाची अपेक्षा शाळेसाठी जनतेकडून केली होतीच. पण ती मुले कशी असावीत याची अपेक्षाही ते ह्दयस्थ परमेश्वराजवळ व्यक्त करीत. गु. देवधरांचेच हे पद्य पहा:-

'' कर्तव्यावरि उत्कट प्रीति। उच्च ध्येय तशि उच्च संस्कृति ॥

असुनि न सत्पथच्युत जे होती। प्रसवो संस्था शिष्या ऐशा ॥ ''

गु. देवधरांची ती अपेक्षा त्यांच्या ह्रदयस्थ इंशाने कितपत पूर्ण झाल्याचा दाखला दिला, ते समजण्यास मार्ग नाही, पण आपण देवधरांचे विद्यार्थी आहो हा अभिमान बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दोन पिढ्या तरी न्यू इंग्लिश स्कूलला दुवा देताना आढळतात. '' विवेकाची दृढ बुद्धि। तुझे नि गुणे ॥ १ ॥ भावार्थाचे आगरू। प्रबळ शांतिचा सागरू '' असे समर्थ रामदास आपले आईसंबंधी म्हणत; तसेच कृतज्ञतेचे उद्‌गार न्यू इंग्लिश स्कूलसंबंधी अनेकानेक देवधरांचे विद्यार्थी आजही काढतात. गु. देवधर वर्ग कसा घेत याचे वर्णन प्रा. माटे यानी '' मी पाहिलेले जग '' या त्यांच्या आत्मचरित्रात लिहिले आहे तसेच स्वत: गुरूवर्यानीही आपल्या जीवनयात्रेतही लिहिले आहे. सुधारकाचार्य आगरकरांचे ते सहकारी होते तरी विषयाच्या अनुषंगाने आगरकरांच्या शिकवणीत पृथ्वी प्रदक्षिणेचा जसा आनंद मिळे, तसा देवधरांच्या शिकवणीत प्रस्तुत विषयाच्या सर्व बाजू बारकाव्यासह नेमकेपणाने कळत. आणि विषय समजल्याच्या पूर्णानंदात विद्यार्थी डोले. मात्र विद्यार्थी स्वयंविचारी व्हावा हा दोघांच्याही शिकवणीतील केंद्रबिन्दु असे. माजी-आजी विद्यार्थ्यांची साखळी सहकाराने राखण्यात त्यांचा हातखंडा असे. न्या. रानडे, ना. गोखले विशेषत: सुधारकाचार्य आगरकर यांच्याबद्दल त्याना सामाजिक सुधारणा इतकाच जिव्हाळा होता. आणि म्हणून त्यांच्या विरोधकाशी ते युक्तिसिद्ध सामना करण्यास कचरत नसत. पण तसे करताना प्रतिपक्षाचे अवमूल्यन, अवमान वगैरे आपल्या शब्दाने वा कृतीने होऊ नये याची ते दक्षता घेत. लोकमान्यांच्याबद्दल त्याना नितान्त आदर असे, असा माझा व्यक्तिश: अनुभव असून त्यांचे जीवनयात्रेच्या सूक्ष्म वाचकालाही तो समजतो. क्रांतिवीर चाफेकरांच्या गोफण्या मारूति क्लबातील भटजी ऊर्फ भिडे गुरूजी देवधरानी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये तालीममास्तर नेमून आणि निभावून घेतले होते, हे एक निरीक्षकांच्या जगाला केवढे तरी कोडे हवे होते. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये देवधरांच्यासारखेच भिडेगुरूजींचेही स्मारक आहे.

पर: कालात्परो यज्ञात्परस्मात्परतश्चय:

अनागतादिगूढस्य तस्मै विश्वात्मने नम:

## ४

देऊळ, शाळा, आखाडा, दवाखाना आणि वाचनालय ही ज्या गावात कार्यक्षम, ते गाव तारीखतागायत सुधारलेले असे मानण्याची पद्धत होती. त्यात आता सहकारी पतपेढीची भर घातली पाहिजे, असा प्रचार करावयास सातारा जिल्ह्यात गोपाळ कृष्ण देवधर आले. या गोष्टीकडे लक्ष वेधून आमचे न्यू इंग्लिश स्कूलमधील इतिहासाचे शिक्षक एल. जी. मेहेंदळे हे आपल्या गणिती टिपणबाजीने व क्रिकेटपटुत्वातील खेळकर वृत्तीने, विद्यार्थ्यांना होत असलेल्या इतिहासासंबंधी जागरूक रहावयास शिकवीत. इति म्हणजे गति, गतिमान जीवनातील महाप्राण ठरलेल्या घडणी म्हणजे इतिहास अशी शिकवण या दिलदारीने म्युनिसिपल मेंबरशिप करणाऱ्या शिक्षकाने चक्क एखाद्या प्राध्यापकासारखी दिली होती. चालू काळातील अशा ऐतिहासिक महत्त्वाच्या घडामोडी कोणत्या ठरू शकतील, याचा अंदाज आम्हांला शंभुराव आठल्ये या टाइम्सची बातमीदारी करणाऱ्या, मोरोपंत शिकवण्यात तरबेज असणाऱ्या गोष्टी वेल्हाळ मराठीच्या शिक्षकाकडून ज्ञानकोशाची पाने उलटल्याच्या सोपेपणाने आम्हास मिळे. '' अंतरी निर्मळ '' तसाच बाह्यही असा स्वयंशिस्तीचा आदर्श म्हणून आमचे संस्कृतचे शिक्षक पंढरीनाथ वामन घाणेकर,घडणाऱ्या इतिहासाला शीलाशिवाय सात्त्विक तेज चढणार नाही, असे सोदाहरण शिकवीत. '' अनेकी एकत्व '' पाहण्याची त्यांची दृष्टि अलौकिक असे. '' या कुन्देन्दु तुषारहार धवला '' या सरस्वतीच्या वर्णनाशी '' ध्यायामि तां महालक्ष्मीं कर्पूरक्षोद पांडुराम् '' या लक्ष्मीवर्णनाच्या श्लोकाची तुलना मांडीत, त्यावेळी बुद्धिचातुर्याच्या लीला म्हणजे काय हे सहज समजे. सुधारकी मतांचे हे बुद्धिवादी शिक्षक मानव्याचा धर्म निष्ठेने पाळत. विश्वचैतन्यावरील विश्वास, सहनशील सरकार, स्वाभिमानपर्वूक परिश्रमशीलता, साधी राहणी व उच्च विचारसरणी आणि सामुदायिक कल्याणकर कृति असे त्यांच्या प्रतिपादित धर्माचे घटक असत. सामुदायिक अध्यात्मीकरणासाठी त्याना आदर्श पुढारीची आवश्यकता वाटे.

### जीवन यज्ञ

'' स्वामी म्हणती तया संत पूर्णज्ञानी
ब्रह्मनिष्ठपणी सुखी सदा
जगासि तारावे हाचि धंदा त्यासी
दाविती दीक्षेसी आचरोनी ''

या अभंगपंक्ति नाथ घाणेकरांच्या आवडत्या असत. सातारा जिल्ह्याची गावे आपल्या पायानी सर्वप्रथम होमरूल लीगच्या व असहकाराच्या चळवळीच्या निमित्ताने पाहाणारा प्रचारक आणि १९३५ नंतर कम्युनिस्ट झालेला जिद्दीचा '' गरीबांचा कनवाळू '' म्हणून गाजलेला नाथ घाणेकर पुढारी सगळ्यांच्या परिचयाचा आहे, पण मतभेदामुळे माणुसकीला मुळीच रजा न देता सर्वभूती समत्वाने वागणारा खरा हाडाचा शिक्षक म्हणून आम्हां त्यांच्या विद्यार्थ्यांइतके नाथ घाणेकर मास्तर कोणाच्याच परिचयाचे नाहीत. वैदिक दृष्टिने किंवा

गीतेने सांगितल्याप्रमाणे मनुष्याचे सर्व आयुष्यच यज्ञमय आहे. आपल्या संपूर्ण जीवनाचा उपयोग लोककल्याणाकरताच करीत राहण्याने जीवनयज्ञ होतो, असे पंडित सातवळेकर म्हणत. त्याचे मूर्तिमंत उदाहरण आम्हांला जवळकीने नाथांचेच होते. त्यांच्या जीवनिकेचे प्रबोधन असे होते की, सामाजिक व आर्थिक समता यांच्या प्रस्थापनेबद्दल जागरूकता, देशाच्या भौगोलिक विस्ताराचा अभिमान, आपल्या ऐतिहासिक उज्ज्वल परंपरांचा व कर्तबगारांचा वारसा चालविण्यातील व्रतस्थता, आपल्या धर्माधर्मातील आणि संस्कृतिसंस्कृतील उदात्ततेचा सातत्याने पाठपुरावा आणि अशा घटकांच्या जोडीला स्वत:च्या अक्कलहुशारीने प्राप्त कालावर मात करण्याची जिद्द ज्या माणसाच्या जवळ स्वप्नस्वप्नांतरीही अढळ असते, तोच देशभक्त. नाथ घाणेकरांच्या इतक्याच निरागसपणे विद्यार्थ्यांच्या विषयी आस्थेने दक्षता घेणारे आणखी एक शिक्षक म्हणजे ग्रीक तत्त्वज्ञानावर कथा वाङ्मयापासून प्रबंधापर्यंत ग्रंथ लिहिणारे प्राध्यापक गोपाळ विष्णु तुळपुळे होत. इन्फ्ल्युंएझांचे साथीअगोदर साताऱ्यात प्लेग सुरू झाला होता. माझ्यासारख्या होतकरू विद्यार्थ्यांच्या राहाण्यापासून सगळ्या अडचणी लक्षात घेऊन, त्यानी आपल्या बिऱ्हाडीच माझी राहण्याची सोय केली. कारण कोणत्याही कारणाने माझे वर्ष वाया जाऊ नये अशी त्यांची आस्था होती. त्या उदारधी शिक्षकाचे विद्यार्थ्यांत बापूसाहेब माटे यांच्या तोलामोलाचे अभ्यासक होते, हे लक्षात आले म्हणजे तुळपुळेकाकांच्या इच्छेप्रमाणे मी त्या सालच्या मॅट्रिक विद्यार्थ्यांत आमच्या शाळेमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो, हे सांगण्यात फारसे स्वारस्य आहे, असे मला वाटत नाही.

## छातीला दगड बांधला

सन १९१९ साली इन्फ्ल्युंएंझाची साथ जशी गावेच्या गावे बेचिराख करीत होती, तसा त्या सालचा दुष्काळहि माणसाचा अंत पहात होता. गुरांचीहि सत्वपरीक्षा वैरणीचा दुष्काळ घेतच होता. मी पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकू लागलो होतो. मला तेथे चैनच पडेना म्हणून दिवाळीच्या सुट्टीला म्हणून मी घरी आलो तो इन्फ्ल्युंझांने माझी सहा भावंडे उचलून नेल्याचे ऐकावे व पहावे लागले. घरी पिताजी आणि त्यांच्या मातोश्री डोळे भरल्या रडून आल्या परिस्थितीला तोंड देत होती. मीच धक्का खातो की काय असा त्यांच्या जिव्हाळ्याला धाक होता ! पण त्या म्हाताऱ्याच्या जीवनाशी समरस होऊनच मी माझ्या छातीला दगड बांधला! मी गेल्यावर दोन-तीन दिवसांतच आमच्या वीतभर जमिनीचा वाटेकरी माझ्या पिताजीकडे '' कडब्याचे पैसे किती द्यावयाचे '' म्हणून विचारावयास आला. तेव्हा कडब्याचा दर शेकडा ५ ते ६ रूपयावरून पंचेचाळीस रूपयावर चढला होता. माझे पिताजी तुकाराम बर्गे या वाटेकऱ्याला म्हणाले- '' तुकारामबुवा, तुमची जनावरे जगली तर शेती व्हायची ! तेव्हा नेहमीप्रमाणे कडबा तुम्ही आपल्या जनावरासाठी न्या. दिवस पालटले म्हणजे पाहू हिशेब ! '' या बोलण्याला दोन वर्षे गेल्यावर कुळमालकांचा हिशोब झाला. तेव्हां दुष्काळापूर्वी शेकडा पाच दरानेच माझ्या पिताजीनी हिशोब पुरा करून घेतला ! तुकारामबुवानीं कृतज्ञतेच्या अश्रूंनीच माझ्या वडिलांचे पाय धुतले ! ही पुढची गोष्ट ! पण

त्या खायला उठलेल्या दुष्काळ– तापसरीच्या साथीत माझे वडिल सकाळ संध्याकाळ देवाला अथर्व वेदानीच प्रार्थना करीत असत ती मला आठवते ती अशी:–'' यस्यां गायन्ति, नृत्यन्ति, भूम्यां मर्त्या व्यैलव्या: । युध्यन्ते यस्यामाकन्दो यस्यां वदति दुन्दुभि: ॥ सा नो भूमि: प्रणुदता सपत्नानलपत्नं या पृथिवी कृणोतुम् '' अथर्व १२/१/४१ जेथे लोक नृत्यगीतात गुंगून आहेत, जेथे घोडे खिंकाळतात, नगारे वाजतात अशी ही आमची मायभूमी आमच्या ( ऐहिक, आधिदैविक ) शत्रूंचा नाश करून आम्हास शत्रुशून्य करो.''

## विक्राळ काळ

त्या प्रार्थनेचा प्रत्यक्ष कितपत उपयोग झाला ते इतिहास सांगतच आहे. पण तशा प्रार्थनेत माझ्या वडिलांच्या मनाचे समाधान होते. त्याना त्या समाधानात रमत ठेवून आणि ती. आजींच्या शुश्रुषेला त्यांची काय होईल ती मदत घेत घेत, मला आम्हा तिघांच्या पोटभरणीसाठी सकाळ–संध्याकाळ'' चुलत सासुबाईंची आराधना करणे '' आलेच होते, '' एक पुती रडे, सात पुती रडे '' असा तो विक्राळ काळ होता. कारण तापसरीने '' घरच्या कारभारणीवर '' एवढी करडी नजर धरली होती की '' चुलवणाचे वळण '' पुरूषांना घरोघर घ्यावे लागले होते. म्हणून तो उद्योग सांभाळून दुसराही उद्योग सार्वजनिक कर्तव्य म्हणून माझ्यासारख्याच्या खांद्यावर चढला होता. तो म्हणजे दिवसाकाठी अनेका स्मशानयात्रा पोहोचवाव्या लागत. त्यातूनच वेळ काढून दुष्काळग्रस्त जनावरांपुरता चारा, मिळेल तेथून शिरओझ्याने सुद्धा आणून पुरवावा लागे. हे सगळे शक्य झाले, याचे कारण माझ्या वडीलधाऱ्यांची सहनशीलता जबरदस्त होती म्हणूनच. कारण मी जरी कॉलेज शिक्षणासाठी, पुण्याच्या जोगेश्वरीजवळील देवधर यांच्या हॉटेलात रात्रपाळी करून बशा विसळण्यापासून ( प्रसंगवशात् ) भजी तळण्यापर्यंत कामे करीत होतो, तरी आमचे पाकशास्त्र '' तळी रक्षा झाली, मधिच गिजगा, वरति हिरवा '' भात करण्याइतपतच त्यावेळी तयार होते. सराव–सवईनी पुढे आमचे ज्ञान स्वयंशिक्षित होऊ लागले, पण अजूनहि पाकशास्त्र माझ्याशी अपाक असहकारच करीत असते.

## लोकमान्यांना दिलेला शब्द

दिवस किती कठीण गेले ! आणि चोहोंकडून प्राप्त परिस्थितीत प्राप्त कर्तव्याची '' जो तो बुद्धीच सांगतो '' असे वातावरण निर्माण झाले. मी कॉलेजचा व परिणामत: पदवीधर होण्याचा ( त्यावेळी बहि:शाल परीक्षाप्रदान नव्हते ! ) नाद सोडावा आणि कोठेतरी चार पाट्या टाकून लग्न करावे व म्हाताऱ्या वडीलधाऱ्याना सुख द्यावे, असा त्या माझ्या हितचिंतक बुद्धीचा रोख होता. मला तो रूचत नव्हता; पटत नव्हता, शालेय अभ्यासक्रमाच्या झरोक्यातून । आजचे व उद्याचे संभाव्य जग पाहण्याची मला सवय झाली होती. त्या संभाव्य जगात माझे स्थान कोणते असावे, याचा मी अंदाजही बांधला होता. तो तर ढासळण्याचे सर्व संभव समोर उभे होतेच; पण लोकमान्य टिळकांची सुदैवाने १९१७ साली प्रत्यक्ष भेट

झाली असता, मी परकीय सत्तेची नोकरी करणार नाही, असे त्याना मी सांगितले होते, तेही माझ्या डोळ्यापुढे नाचत होते. लोकमान्याना दिलेला शब्द म्हणजे जिवंत, मूर्तिमंत देवाला दिलेला शब्द, तो मी जिवाच्या कराराने पाळलाच पाहिजे असें माझ्या सद्‌गुरुंनी मला बजावले होते, तेही मी विसरलो नव्हतो. '' स्तुति करिजेसा नाहीं अधिकार न कळे विचार योग्यतेचा'' अशी जर संत तुकारामासारख्यांची अवस्था होणे शक्य असते, तर मी कोण, कोठला पाला ? यावेळी जहागीरदार देशपांडे वकीलासारखे पाठीशी उभे राहणारे गुणग्राहकही दुर्दैवानें ओढून नेले होते. तेव्हा मी माझ्या पिताजींच्या व आजींच्या चरणांजवळ त्यांचा मानस समजावून घेण्याकरता बसलो. आणि '' आनंद कोंदला हृदयकमळी। सप्रेम नमुनी मुनिमंडळी । वाचे आनंदे धुमाळी । वसन करतळी झेलुनी ॥ ( हरिवरदा ८६/२५२ ) असाच अनुभव मिळाला. त्या उभय वडिलधाऱ्यांनी मला एकच सांगितले '' न निश्चय कधी ढळो ''

## नवा उत्साह

मग मी नव्या उत्साहाने कॉलेजला गेलो. कॉलेजच्या प्रथम वर्षाची परीक्षाही उत्तीर्ण झालो. भगवती सरस्वतीविषयी कृतज्ञतेने मग सहजच उद्‌गार निघाले की–

''देवि स्मृता हरसि भीतिमशेषजन्तो: । स्वस्थै: स्मृता मतिमतीव शुभां ददासि ॥
दारिद्य–दु:ख भयहारिणि का त्वदन्या । सर्वोपकार–करणाय सदार्द्रचित्ता'' ॥

मी इन्टरमध्ये नाव घातले आणि एक दिवस देवधरांच्या उपाहारगृहात मी कामास असताना, अचानक मला माझ्या मामांच्याकडून बोलावणे आले. हे माझे मामा म्हणजे किर्लोस्कर थिएटरात जे जोगळेकर हॉटेल होते, त्यांचे मालक. पुण्यात मी चांगला वर्षभर देवधरांकडे काम करीत आहे, हे सहजासहजी त्यांच्या एका गिऱ्हाइकाच्या तोंडून माझे नाव व इतिहास कळल्यामुळे समजले. शिक्षण सोडून अकाली आपले गावही सोडावयास लागलेल्या त्या माझ्या मामांचा एकोणीस वर्षे पत्रव्यवहारही नव्हता. पण १९१३ पासून त्यांचे बस्तान पुण्यात चांगले होते. त्यानी माझी गाठ पडून सर्व हकिकत ऐकून घेतल्यावर आपल्या येथे येऊन राहण्याचा आदेश दिला. माझे मित्र म्हणजे माझे वर्गबंधू सागाव (सं. कोल्हापूर) येथील हणमन्त बाळकृष्ण कुलकर्णी आणि वाल्हे ( जि.पुणे ) येथील देशपांडे यांचेकडून मामांना मजबद्दल जे कळले, त्यातून त्यांचे वात्सल्य जागृत झाले. '' त्रिजगी पाहता आम्हा तुझा। अपाड प्रेमा तो एक '' असे ते माझे दोघेही स्नेही '' सज्जनांचे जे मुगुटमणि । सत्तम म्हणिजे त्या लागुनी '' आणि ' मैत्री केलिया जे ठायी । तेथ फलाशा न दिसे काही '' अशा योग्यतेचेच होते. त्यानी हे जग सोडूनही आता वीस वर्षाहून अधिक काळ लोटला, तरी '' बुडता हे जन देखवे न डोळा। येतो कळवळा म्हणोनिया '' ही त्यांची मजसंबंधीची उदात्तता माझी कृतज्ञता अमरपणे स्मरतच राहणार.

## भावनाप्रधान नातें

मी ती. मामांच्याकडे येऊन राहिलो. त्यांच्या घरातील बाजारहाट करावा, त्यांच्या मुलांना शिकवावे–वळण लावावे आणि आपला अभ्यास सांभाळून जुन्या तपकीर गल्लीत

असलेल्या श्रीगणेश मोफत वाचनालयात ज्ञानसाधना करीत बसावे, असा हा माझा कार्यक्रम सुरू झाला. जरूर त्यावेळी ती. मामांच्या आज्ञेवरून मी त्यांच्या उपहारगृहातही सेवा करी. पण आता ती बहुधा '' गल्ल्यावर '' बसण्याची असे. याच जीवनक्रमात मला दोन आणखी स्नेही भेटले ते म्हणजे श्रीगणेश मोफत वाचनालयाचे संचालक हरि भालचंद्र देशपांडे आणि सावंतवाडीच्या वैनतेय पत्राचे संस्थापक संपादक मेघश्याम दत्तात्रय शिरोडकर होत. या दोघांचा अकृत्रिम उत्साह मजबद्दलचा जिव्हाळा एवढा मोठा आहे की, '' करूनि पाद्यपूजा प्रथम। त्याना अर्चितसे पुरुषोत्तम '' असेच भावप्रधान नाते मी सांभाळित आलो आहे.

## म. गांधी

जीवनाचे, विशेषत: सार्वजनिक जीवनाचे उदात्तीकरण झाले पाहिजे, असे साचार प्रतिपादणाऱ्या प्रतिष्ठांची परंपरा उत्कटतेने चालविणारा एक देदीप्यमान तारा भारताच्या क्षितिजावर आपला प्रभाव पाडू लागण्याचा तो काळ होता. भगवानखाइस्ट नंतर एकोणिसाव्या शतकात टॉलस्टॉय, रोमाँरोलाँ, कायसरलिंग, नि कोलाय शीरमन् अशी जीवनाध्यात्माची नररत्ने पाश्चिमात्यात निपजली तशीच राजा राम मोहन रॉय, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद , रामतीर्थ, रविंद्रनाथ टागोर, महर्षि अरविंद घोष अशी भारतातही निर्माण झाली. त्यांच्याच मालिकेत शोभणारे महात्मा गांधी आता जालियनवाला-बाग प्रकरणामुळे ब्रिटिश रियासतीशी असहकाराचे पवित्रे टाकू लागले. जरा पुढची गोष्ट असली तरी महात्मा गांधीनी आपले आत्मचरित्र,'' सत्याचे प्रयोग '' म्हणून प्रसिद्ध केल्यावर बाबू अरविंदाच्या ''प्रोब इन्टु दि डेप्थऑफ माइन्ड '' मधील विचारधारेची याद अभ्यासकाना आल्याशिवाय राहिली नाही. पी. डब्ल्यू व्हेरिजिन्प्रमाणे महात्मा गांधीनी जीवनातील '' विनाशायच दुष्कृताम् '' अगदी राजकारणाच्या क्षेत्रात करावयाचे ठरवून, हिंदुस्थानात लोकशाही स्वराज्य नेटसपणे नांदावयाचे असेल तर ''तेल्यातांबोळ्यानाही'' ते स्वराज्य आपले वाटले पाहिजे म्हणून, त्या स्वराज्याच्या प्राप्तीत आणि प्राप्त्युत्तर संचालनांत आपलाही काही हात आहे, असा जागृत स्वाभिमान रहावा म्हणून भारतीयांच्या पुढे म. गांधीनी आपल्या '' विधायक कार्यक्रमाची '' भलावण चालविली होती. '' सर्वस्वरूपे, सर्वेशे, सर्वशक्तिमन्विते । भयेभ्यस्त्राहि नो देवी ॥'' अशी जनशक्तीची त्यांची आराधना पाहिल्यावर भारतीय तशी पावले उचलण्याचा विचारच करू लागले. इतक्यात राष्ट्र-चैतन्य लोकमान्य टिळकाना परमेश्वराने उचलून नेले ! ! अशा अवस्थेत राष्ट्राला नेतृत्व देणारे सर्वकष तेज महात्मा गांधीशिवाय लोकांना आढळेनाच ! त्याचे प्रत्यंतर १९२० च्या सप्टेंबर महिन्यात कलकत्ता येथे झालेल्या कॉंग्रेसच्या खास अधिवेशनातच येऊन चुकले ! !

## असहकारातील समर्थता

'' चित्तिरूपेण या कृत्स्नतव्याप्य स्थिता जगत् नमस्तस्यै नमस्तस्यै । नमो नमा:'' म्हणून भारतीय महात्मा गांधींच्या असहकारातील समर्थतेची उपासना आपापल्या परी चालवू लागले. विनोदबुद्धिसुद्धा सर्व बारीकसारिक अंगोपांगानी एकजिनसी झालेले जीवनच उदात्त

झाले पाहिजे, हे महात्माजींच्या चारित्र्यसंपन्नतेची सेंट ऑगस्टाइनच्या आत्मचरित्राशी तुलना अभ्यासकांच्या मनात ( अमेरिकन ग्रंथकार जेम्स टी गॉटवेलसारख्याही) उतरतातच, एक नवे वारेच उफाळत्या उमेदीच्या मंडळीत संचरू लागले. जनसामान्यांला तर लो. टिळकांच्या स्वराज्यचतु:सूत्रीची जीवनदर्शिका महात्मा गांधीच्या असहकारप्रणालीत प्रकर्षाने प्रतिबिंबित झालेली वाटली. तीमधील '' मानवता प्रेम '' हे एक असे प्रेरक होते की '' स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ''. अशी श्रद्धा निर्माण होऊन दारूच्याच काय, पण चहाच्या दुकानावरही निरोधने ( क्वचित् ) व बहिष्कार सुरू झाले. ''नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिसे । तुझे दारी वसे ऐसे करी ''असे असहकाराला आळविण्यात लोकांना भूषण वाटू लागले.

## बहिष्कार

त्या असहकारातील एक कार्यक्रम सरकारमान्य शिक्षण-संस्थावर बहिष्कार हा होता. तो अमलात आणून कित्येक ठिकाणी राष्ट्रीय शिक्षणसंस्थाही निघाल्या व त्या लोकमान्यांच्या राष्ट्रीय शिक्षण प्रणालीत बसणाऱ्या असल्याने, अन्यथा बुद्धिप्रामाण्याने महात्मा गांधीचा असहकार अमान्य असणारानीही चालविल्या व संगोपिल्या.

## कॉलेज सोडले

अशी झेप सर्वानाच कशी साधणार ? मारूतीची वा गरूडाची झेप घेता येत नाही तरी देखील '' आकाश-अंत कळूनिहि अंतरिक्षी शक्तीनुसार करतात विहार पक्षी '' आपण पाहतोच की मग आपल्या आवाक्याप्रमाणे आपणही काही करावे, असे माझ्यासारख्या कमकुवताना वाटले तर नवल काय ? श्रीरामाच्या सेतुबंधनाला चार वालुकाकण लावण्याचे खारीने नाही का मनात आणले ? तसेच आम्ही आपल्या मगदुराचा विचार करून '' एक वर्षाच्या मुदतबंदीने '' कॉलेज सोडले व ' परत खेड्यात '' लोकजागर करण्याचे ठरविले!!

## परिणाम

या आमच्या अर्धवटपणावर मात्र आमचे जिव्हाळ्याचे म्हणून जे कोणी होते ते सर्वच रागावले. तोंडाशी आलेल्या परिक्षेला टाळण्याकरता उडाटप्पूपणावर ते देशभक्तीचे दांभिक पांघरूण घातले हा आरोप आमच्यापैकी कित्येकावर आलाच; पण स्वत:च्या जीवनावर होणारे बरेवाईट परिणाम ज्याना आकलन करता आले नाहीत ते ( महाविद्यालय व विश्व ) प्रवेशपरीक्षा ( मॅट्रिक ) पहिल्या प्रतीने उत्तीर्ण झाले असले तरी तो कागदी पत्त्याचा बंगला ठरला, असा माझा टोला माझ्या प्रामाणिकपणावर नितान्त विश्वास असणाऱ्यानीही मला दिला.'' होणारे न चुकेल होइल जरी ब्रह्मा तया आडवा !'' असे आमचे कुण्डलीवादी स्नेही बोलले. माझे वडिल एवढेच तुकारामाच्या शब्दानी उद्‌गारले की- '' प्रारब्ध काही न पालटते सोसे । तृष्णेचे हे पिसे वायावीण ॥ तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥''

५

आमचा शेतकरी वर्ग म्हणजे समाजाचा अन्नदाता वर्ग आणि श्रमसाहसी. त्यामुळे तो समाजाचा पाठकणाच. त्यामुळे वैरणचाऱ्याच्या दुष्काळांत त्याची सेवा करणे आपले कर्तव्य आहे असे मला मनापासून वाटले आणि तेथूनच माझ्या सार्वजनिक-सेवा-जीवनाला सुरुवात झाली, म्हटले तरी चालेल. शास्त्रशुद्ध शेती करावयाची म्हटली त्या काळांत तरी जनावरांच्याशिवाय ती होणारी नव्हती.ज्या समाजांत आणि ज्या समाजाच्या सहानभूतीने आपण जगत असतो, त्या समाजाच्या सेवेसाठी आपण आपला उत्साह, कुवत आणि शहाणपण निष्ठेने वाहिले पाहिजे, अशी लोकमान्यांची शिकवण होती.'' अलौकिक असावें परी अलौकिक होऊ नये लोकाप्रति '' ही समर्थ रामदासांची पठडी तर माझ्याच सातारा जिल्ह्यात निर्माण झालेली. जे शहाणपण लोकसेवेला उपयोगी पडत नाही, ते ग्रंथालयातील अमोल ग्रंथासारखेच फार मानता येईल. म्हणून दुष्काळग्रस्तांच्या सेवेसाठी मी त्याकाळी (१९१९) घरोघर हिंडून हजार रूपयावर रक्कम गोळा केली, वैरण खरेदी केली व काही वैरणीच वर्गणी म्हणून स्वीकारली आणि ओल्याकोरड्या वैरणीचे भारे स्वत:च्या डोक्यावरून गरजू शेतकऱ्यांच्या घरी पावते केले.

या सेवेमुळे बहुजनसमाजाशी माझा संपर्क साधून त्यांच्या सुख:दुखाशी मला समरस होता येऊ लागले. लोकांच्या दृष्टीने मी सुशिक्षित असूनही बहुजनसमाजाला आपल्यातीलच एक मी असल्याचे वाटू लागले.

## असहकार

जालियनवाला बागेच्या हत्याकाडांनतर महात्मा गांधीनी आपली असहकाराची चळवळ सुरू केली. लोकमान्यानी विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत जी बहिष्काराची चळवळ सुरू केली होती, तिचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हणजे असहकाराची चळवळ असे माझे मत झाले. हिंदुस्थानांत जर लोकशाही स्वराज्य मिळवावयाचे व चालवावयाचे तर त्या कामी आपलाहि काही सेवाभाग आहे असा आत्मविश्वास बहुजनसमाजाला वाटावा आणि राष्ट्रीय पुनर्रचनेचा कालोचित पाया घालावा, म्हणून असहकाराच्या चळवळीपासून खादी, अस्पृश्यता निवारण, दारू दुकानावरील निराधने, हिंदु-मुसलमान ह्यांचा एकोपा वगैरे कार्यक्रमांचा विधायक भाग महात्मा गांधीजीनी संचारविला; त्यांत समाजशास्त्रांतील व अर्थशास्त्रातील प्रमेयांचा विचार तात्कालीन नफातोट्याकडे लक्षच दिलेले नव्हते; तर त्यातून अपेक्षित असलेल्या स्वाभिमानपूर्वक समाजस्वास्थ्याकडे लक्ष होते; महात्माजींचा हा ऐतिहासिक उपक्रम मला तरी महत्त्वाचा वाटला. म्हणूनच मी असहकार चळवळीत भाग घेऊ लागलो आणि ब्रिटिश हद्दीत सरकारने सभा-बंदी पुकारली, तर जवळच्या संस्थानी हद्दीच्या सीमेवर सार्वजनिक सभाही घेऊ लागलो.

## प्रेमाची बेगड

असहकाराच्या चळवळीला तेज चढावयास, त्याकाळी ' मॉंटफोर्ड '' सुधारणा ज्या राज्यकारभारात आल्या होत्या, त्यांतील निराशा हेही एक कारण होते. गांधीची चळवळ अप्रिय करण्याकरता, महाराष्ट्रात जी सरकारने उपाय-योजना केली, तीमधील एक पुणे येथे छत्रपति शिवाजी महाराजांचा पुतळा इंग्लंडच्या युवराजांचे हस्ते उभारणे ही होत. पण अभ्यास निरिक्षकांनी आपली दिशाभूल करून घेतलीच नाही. युवराजांच्या आगमनावर त्यानी बहिष्कार घातलाच. पण छत्रपतीबद्दलचे इंग्रजाना असलेल्या प्रेमाची बेगडही उघडी पाडली. हिंदुस्थानात सर्वप्रथम छत्रपति शिवाजीमहाराजाचा सार्वजनिक उत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू केला आणि त्यांतून निर्माण झालेल्या राष्ट्रीय उत्थानाचा इंग्रज एवढा द्वेष करीत होते की, १९१४ च्या केसरीकंदनापर्यंत शिवाजीचा उत्सव करणारांच्यावर इंग्रजांची करडी नजर असे व त्यापैकी कित्येकांची शिक्षणे नि संसारही उध्वस्त झाल्याचा अनुभव होता. त्या महायुद्धात मराठा-पलटणीं जेव्हा छत्रपतींचा जयजयकार करूनच लढतात असा इंग्रजांना अनुभव आला, तेव्हांपासून शिवाजी उत्सवावरील इंग्रजी नजर सौम्य झाली, तरी टिळकपक्षीय अगर कॉंग्रेसानुयायी याचे व्याख्यानावरील इंग्रजाचा हेवादावा जबरदस्तच होता. त्यामुळे आमच्या सातारा जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील समंजस जनतेने असहकाराची चळवळ कमालीची उचलून धरली. १९२१ मधील कऱ्हाड येथून निघालेली चार हजार खादीधारी हिंदु-मुस्लीम स्त्रीपुरूषांची दसरा मिरवणूक आणि असहकारापायी आपल्या वकिलीच्या धंद्यावर पाणी सोडून त्या मिरवणुकीचे अभिनंदन करणाऱ्या समर्थभक्त आप्पासाहेब आळतेकर प्रभृतींची भाषणे हे सर्व मजेने केलेले सीमोल्लंघनच इंग्रज सरकारला वाटले. दारूदुकानावरील निरोधकानी व्यसनग्रस्तांच्या कुटुंबास स्वास्थ्य लाभून दिले. इंग्रजांचे व दुकानदारांचे अबकारी उत्पन्न कमी झाले आणि निरोधकांना मात्र दंड व शिक्षा भोगाव्या लागल्या. त्यामुळे एक वर्षाच्या अवधित इंग्रज सरकार लोकादरातून पारच उतरल्यासारखे झाले !

## लोकजागृति

नंतर स्वराज्यपार्टी निघून १९२३ पासून विधिमंडळाच्या चार भिंतीच्या आतही स्वराज्याची लढत सुरू झाली आणि लोकपुढारी विठ्ठलभाई पटेल चावडीत ( मध्यवर्ति विधिमंडळाच्या अध्यक्षपदी ) बसला आणि १९२५ सालला अर्थसंकल्पही फेटाळला गेला. त्यामुळे सायमन कमिशन नेमले जाऊन राजकीय सुधारणा देण्याचा बूट इंग्रजानी काढला. पण त्या कमिशनवरही राष्ट्राने बहिष्कार घातला. तेव्हा सर्वपक्षीय एकमुखी मागणी होईल तर त्या राजकीय सुधारणा देण्याचा विचार होईल, असे आव्हान इंग्रजानी सूचित केले आणि राष्ट्राने ते स्वीकारून नेहरूरिपोर्ट तयार केला. ''तूर्त पण ताबडतोब'' मागितलेल्या त्या एकमुखी राजकीय सुधारणांचे स्वरूप '' वसाहतीच्या स्वराज्याचे '' होते. १९२७ च्या कॉंग्रेमध्ये कॉंग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय जाहीर केले असताही, राष्ट्राच्या एकदिल मागणीचा ऊर्फ नेहरू रिपोर्टाचा प्रचार मी १९२८ साली जिल्हाभर केला. तेव्हापासून

पुढील दहा वर्षांत मी जिल्ह्याची तेराशेवर असलेली गावे पायाने प्रवासली आणि स्थानिक व राष्ट्रीय स्वरूपाच्या सामाजिक नि आर्थिक समस्यासंबंधी लोकजागृती केली.

### स्वातंत्र्याचा जाहीरनामा

सरकारने नेहरू रिपोर्टाची अवहेलना केल्यामुळे १९२९ च्या अधिवेशनात संपूर्ण–स्वयंपूर्ण स्वातंत्र्याचा ठरावच केला. लोकांनी ठरावाप्रमाणे सक्रीय वर्तन केल्याशिवाय, कोणत्याही ठरावाची काय बरे मातब्बरी ? म्हणून १९३० च्या सव्वीस जानेवारीला काँग्रेसप्रणित स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचून त्याला लोकमताचा पाठिंबा घेण्याचा कार्यक्रम काँग्रेसने आखला. कायदेशीर चौकटीत राहून राजकीय चळवळ करणारांनी तो जाहीरनामा वाचून दाखविण्याचे मनावर घेतले नाही आणि इंग्रज सरकारने २६ जानेवारीच्या सभाच सरळ पार पडून द्यावयाच्या नाहीत, असा निश्चय केला. अशा दुहेरी काचीत स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचून लोकपाठिंबा घेण्याचा प्रयत्न करण्याची जबाबदारी माझ्यासारख्याच अनेकावर पडली. लाठीमाराच्या धास्तीत असूनहि अशा सभा शांतपणे पण थोड्याश्या गनिमी काव्याने आम्ही पार पाडल्याच ! तेव्हापासून सरकारच्या डोळ्यावर व डोळ्यांत मी व माझे साथीदार खुपऱ्या झालो !!

### कायदेभंग

पुढे दांडीमोर्चा काढून महात्माजींनी अनैतिक व अन्याय कायदे तोडण्याची चळवळ सुरू केली. दारू दुकानावरील निरोधनाच्या निष्ठेनेच मिठाचे व जंगलचे कायदे लोकांनी तोडले. एका जंगल सत्त्याग्रहात फॉरेस्ट रेंजर श्री. मोघे बंदुकीच्या गोळ्या झाडण्याच्या तयारीनेच सत्याग्रह्यांवर धावून आले पण आम्ही सत्याग्रहीनी छाती पुढे करून गोळ्या घालण्याचे आव्हान करतांच ते घाबरले नसले तरी बावरले व पळाले. नंतर भरलेल्या जाहीर सभेत अनत्याचार म्हणजे अत्याचाराचा अभाव तर आहेच पण भित्रेपणाचा, भागुबाईपणाचा अभाव ( आत्याबाईसारखा आचार नव्हे तो अनत्याचार ) अशी मी व्याख्या केली. सत्याग्रहीने अनत्याचाराचे हे पथ्य पाळले पाहिजे असेहि प्रतिपादिले मसूरास ! !

### काळी निशाणे

ही माझी व्याख्या कऱ्हाड मामलेदार करमरकर व सातारा कलेक्टर याना अशी बोचक वाटली की, १९३१ साली गांधीअर्विन करार होऊन दुसऱ्या गोलमेज परिषदेस गांधीजी गेले असताही, तो गांधीअर्विन करार मोडून काँग्रेसला संकटात आणू पहाणारे इंग्रज सरकार आपल्या अधिकाऱ्यामार्फत '' जातभाईनी वाईटपणा देऊ नये '' अशी मोहिनी सत्याग्रहीस घालू लागले. आणि तसल्या कसल्याच मोहिनीना माझ्यासारखे बळी पडत नाहीत, असे पाहिल्यावर १९३० साली कऱ्हाडास दक्षिण साताऱ्यातील पस्तीस हजार लोकानी १३ जुलै रोजी जे मुंबई राज्यपालांचे काळ्या निशाणानी स्वागत केले होते, त्याच्या पुढाकारात मी एक असल्याबद्दलची आठवण देऊन, मला कलेक्टरसाहेबाची मसूरला मी दिलेल्या व्याख्यानासारखी व्याख्याने फिरून न देण्याबद्दल समक्ष भेटीस बोलावून बजावले.

१३ जुलै १९३० चा बहिष्कार व बाजारबंदी एवढी प्रचंड प्रमाणावर यशस्वी झाली होती कीं पैसे देऊनही बंदोबस्ताच्या पोलिसाना अन्न मिळाले नाही आणि शेवटी आम्हीच पस्तीस हजार काळी निशाणवाल्याबरोबर आमचे देशबांधव म्हणून पोलिसांच्याही जेवणाची सोय केली हे लक्षात ठेवण्यास मी अधिकाऱ्यांना बजावले व राष्ट्रीय उत्थापनाच्याबाबत त्यांनी मला कसलाही उपदेश करण्याच्या भानगडीत केव्हाच पडू नये असा इशारा करून रहदारी-बंगल्यातून तडक निघालो.

## राजकारणी प्रमाद

दुसऱ्या गोलमेज परिषदेहून महात्माजी परत येताक्षणीच ४ जानेवारी १९३२ रोजी त्याना व इतरही भारतवर्षीय पुढाऱ्यांना स्थानबद्ध करून आणि इतर सत्याग्रहींना पोलिसठाण्यावर हजेरी ( गुन्हेगार जमातीसारखी ) लावून इंग्रजानी एक चळवळच हिंदुस्थानवर लादली ! त्याबद्दल कऱ्हाडच्या अभ्युदयात मी लेख लिहिला तर अभ्युदयकारावर नोटीस बजावली गेली आणि १६ जानेवारी ह्या न्या. रानड्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने कऱ्हाडास कृष्णा घाटावर तीन हजारांच्या सभेत ''सर्वज्ञ: स हि माधव: '' या लोकमान्यांच्या श्रद्धेचे विवरण करताना, इंग्रजी राज्य हे परमेश्वरी प्रसाद नसून आमचाच राजकारणी प्रमाद आहे असे प्रतिपादन केले. ते माझे व्याख्यान '' आग व्हावी पण बोंब मारण्याची सोय राहू नये '' असे झाल्याचे आमचे जिल्हापुढारी दादासाहेब करंदीकर प्रभृतीनी बोलून दाखविले. मग मी २३ तारखेस गडकरी पुण्यतिथी निमित्त '' मागुनि आणा शिवरायाची भवानी तलवार '' या विषयावर व्याख्यान देण्याचे जाहीर केलेले सरकारी यंत्रणेला कसे मानवणार ? मी आता खेड्यापाड्यातून हिंडेन आणि प्रस्थापित सरकारबद्दल लोकमताचा उठाव करीन, असे सरकारी यंत्रणेने डोक्यात घेतले आणि मलाही पोलिस कचेरीवरील हजेरीची नोटीस बजावली.

## कारावास

ही नोटीस तर मोडावयाचीच ! पण तसे करताना गनिमी काव्याने सातत्याने कायदेभंग चालावा आणि या आठवड्यात एका तालुक्यात तर दुसरे आठवड्यात दुसरेच तालुक्यात सत्याग्रही उभे करून परकीय सत्तेला सदैव बेचैन ठेवावे, असा काही डाव खेळण्यासारखी संघटना बांधता येईल काय, याचा माग मी काढला आणि २३ जानेवारीला सकाळीच सातारचे दत्तोपंत गडणीस यानी मला येऊन सांगितले की, तसा बस बसणारा नाही ! कारण गांधी अर्विन करारापासून ''दूरदृष्टी '' राजकारण्याना '' स्वराज्य '' जवळच आल्याचे दिसू लागल्याकारणाने त्यानी राजकारण सोडून काही अध्यात्मिक व नैतिक सेवाक्षेत्र पसंत केले होते ! काहीना गनिमी काव्याने कायदेभंग करणे महात्माजींच्या ब्रीदाला बट्टा लावणारे वाटत होते तर काही ना तो मार्ग पळपुटेपणाचा वाटत होता. '' नैको ऋषिर्यस्य वच: प्रमाणम् '' अशी अवस्था झाल्यावर ज्याने त्याने आपल्या विवेकबुद्धीवर अनुसरावे, हा साहजिकच निर्णय लागला. त्यास अनुसरून मी कशाला हजेरी द्यावयास जातो आहे ? तेव्हा परिणामत: धरणे आले, खटला चालला आणि २६ जानेवारी रोजी मला दीड वर्षाची शिक्षा व पन्नास रूपये दंडही झाला !!

## वृद्धाचा आशीर्वाद

ही वार्ता वृत्तपत्रात आली. माझ्या आईचे चुलते अनंत रामचंद्र जोगळेकर यानी ती वाचली. ऐंशी वर्षाचा तो म्हातारा पेन्शनर थर्ड इयर ट्रेन्ड प्राथमिक शिक्षक तडक चाफळच्या आपल्या घरातून उठला कऱ्हाडला माझ्या पिताजीकडे आला आणि त्याना घेऊन मला तुरूंगात भेटावयास आला ! त्या वृद्धाचे दर्शन होताच, गजाआडूनच मी त्याला आदबीने नमस्कार केला. तो वृद्ध उघडपणे मला आशीर्वाद देऊन म्हणाला–'' भले बहादुर ! बाबू, तू हे देशभक्तीचे व्रत सोडू नकोस. माझ्या पुतणीचा तू मुलगा आहेस. तुझा दंड मी भरीन. बापू गोखल्यांच्या वंशात जन्माला आल्यासारखे तुझ्या हातून कांही घडते आहे. मनात असून आमच्या हातून काही घडले नाही. आम्ही इतिहास घोकले, पढविले, तुमची पिढी इतिहास घडवू लागली. माझ्या डोळ्याची आज तृप्ती झाली. बापापेक्षा मुलगा आणि गुरूपेक्षा शिष्य सवाई निपजला तर राष्ट्र तेजस्वीपणाने जगते. देव तुझे कल्याण करो. तुझ्या आईला मी अंगाखांद्यांवरून खेळवले.तिचा मुलगा लौकिकास चढायला लागला.देवाजवळ मी आणखी काय मागू ? मरावे परी कीर्तिरूपे उरावे.''

## इतिहासाचा दृढभाजक

या धीराच्या आशीवार्दावर मी येरवडा, नाशिक, धुळे व विसापूर येथील कैदखाने कंठिले नाही, काटले ! बाहेर आल्यावर माझा भ्रमंतीचा कार्यक्रम सुरू झाला.१९३४ च्या पुणे येथे भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीत येऊ घातलेल्या राजकीय सुधारणान्वये विधिमंडळाच्या निवडणुका लढविण्याचे ठरविले; तसेच १९३५ साली कॉंग्रेसचा अर्ध–शतसंवत्सरिक उत्सवही करण्याचे ठरले. '' निश्चयाचा महामेरू '' असलेल्या एका दूरदर्शी पुढाऱ्याने असेही सूचक विधान सुनावले की, स्वराज्योदयाला आता एका तपापेक्षा अधिक काळ लागणार नाही, तेंव्हा प्रत्येक जिल्ह्याने आपआपल्या स्वातंत्र्योन्मुख चळवळीचा इतिहास तयार करण्यास लागावे, म्हणजे सर्व जिल्ह्यांच्या इतिहासांच्या दृढभाजकाने अखिल हिंदुस्थानचा इतिहास तयार होईल. ही कल्पना आमच्या जिल्ह्याचे लोकप्रिय पुढारी भाऊसाहेब सोमण, दे.भ. बुवासाहेब गोसावी आणि समर्थ संपादक विनायक शंकर तथा बाबुराव वैद्य यानी आत्मसात् केली आणि त्या कामी माझ्या अभ्यासापेक्षा सेवेची अपेक्षा केली. अनेकानेक माहिती केंद्रातून, वृत्तपत्रातून,व्यक्तिभेटीतून सर्व माहिती मिळवून, सातारची गादी इंग्रजांनी समाप्त केल्यापासून १९३५ च्या जूनअखेर झालेल्या बाबू राजेंद्रप्रसादांच्या दौऱ्यापर्यंत सातारा जिल्ह्याचा मी सर्वकष इतिहास लिहिला, तो कॉंग्रेसच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी प्रसिद्ध झाला आणि जाणकार लोकमताच्या व संपादकीय विचक्षणेच्या कसोटीसही तो उतरला. सबंध हिंदुस्थानात एकमेव सातारा जिल्ह्याचा सुसंगत व सर्वपक्षसमन्वयी इतिहास म्हणून त्या पुस्तकाची ख्याति झाली त्याची दुसरी चारशे पृष्ठांची आवृत्ती १९६६ च्या जानेवारीपर्यंतचा इतिहास देणारी प्रसिद्ध झाली तीही पहिल्याच लोकप्रियतेने लोकादरास पात्र झाली की पाच वर्षाच्या अवधीत दोन हजार प्रतीपैकी

पाचपंचवीसच प्रती शिल्लक असतील !! '' जागृत सातारा '' या इतिहास पुस्तकाने मला साहित्य क्षेत्रात स्थान मिळाले आणि जनतेचे धन्यवाद इतके मिळाले की या पुस्तकाने ऑक्स्फोर्ड–केंब्रिज विद्यापीठातील इतिहासाभ्यासकांच्या हाताडोळ्यापर्यंत मजल मारली आहे व अमेरिकेतील भारत जिज्ञासूंच्या ग्रंथालयात प्रवेश केला आहे.

## पन्नास टक्के यश

सन १९३७ सालच्या विधिमंडळाचे निवडणुकीस काँग्रेसने आपले उमेदवार उभे केले आणि आमचे जिल्ह्यात जे चार उमेदवार काँग्रेसतर्फे निवडून आले त्यात बोरगावचे आत्माराम नाना पाटील हे अग्रेसर मतानी निवडून आले त्यासाठी सरकारी यंत्रणेपासून स्वार्थसाधूंच्या गुंडगिरीपर्यंत सगळ्यांचे विरूद्ध आम्हास झगडा करावा लागला तेव्हा कोठे पन्नास टक्क्यांच्यापुढे यश पदरी पडले. माझ्या सारख्याचा खेड्यापाड्यातील आम जनतेशी दीडतप संपर्क येत गेला होता, त्याचेच फळ एव्हापासून जे मिळत गेले ते १९४६ मधील माझ्या स्वत:च्या निवडणुकीत व १९५२ साली दे. दादासाहेब आळतेकरांच्या लोकसभेच्या निवडणुकीतही चढत्यावाढत्या पदवीने माझ्या प्रत्ययाला आले.

## सिंहाचा वाटा

सन १९३६ साली आमचे लोकपुढारी दानशूर पांडुअण्णा शिराळकर आणि भाऊसाहेब सोमण यांचे षष्ठ्यब्दिपूर्ति समारंभ झाले आणि लोकसहाय्याने दे.भ. भाऊसाहेब सोमणानी सातारा जिल्हा लोकसेवा संघ काढला. त्याचे चिटणीसपदी दे. भ. बुवासाहेब गोसावी होते. या संघाचा एक कार्यकर्ता म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली. खेड्यापाड्यातील जनतेच्या अनारोग्य निर्मूलनापासून, सरकार–दरबारातून निवारण होऊ शकणाऱ्या त्यांच्या अडीअडचणीपर्यंत आस्थापूर्वक अभ्यासाने व सेवेने लोकसेवा संघाने सातारा जिल्ह्यातील जनतेची राजकीय, सामाजिक, आर्थिक शैक्षणिक व धार्मिक बाबतीत '' नामूलं लिख्यते किंचित, उच्यते किंचित !'' अशी सेवा केली. दोन वर्षात लोकसेवा संघाने केलेल्या पद्धतशीर व लोकमानसास विश्वासात घेऊन प्रत्यक्ष केलेल्या सेवेचा गौरव व तत्कालीन काँग्रेस मंत्रीमंडळाचे अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठे आणि गोखले एकॉनॉमिक इन्स्टिट्यूटचे प्रभावी संचालक धनंजयराव गाडगीळ यांनी मुक्तकंठाने केला आणि त्या सेवा कार्यातील माझा वाटा, इंग्रजी म्हणीप्रमाणे '' सिंहाचा '' वाटा– असल्याकरणाने, माझे मनोमन समाधान असे होते की, विष्णुबुवा ब्रह्मचारी व ना. गोखले ज्या कुळात जन्मले, त्याला कमीपणा न येईल एवढी तरी सार्वजनिक सेवा आपण करू शकलो !

## वैयक्तिक सत्याग्रह

वैयक्तिक सत्याग्रह म्हणून प्रसिद्ध असलेली चळवळ सुरू झाल्यावर प्रांताधिपती म्हणून दे. भ. गोसावी महाराष्ट्रप्रदेश काँग्रेस कमेटीवर गेले. वैयक्तिक सत्याग्रहासाठी जे सत्याग्रही युद्धविरोधी घोषणा करण्यासाठी निवडावयाचे होते, ते शीलवान अहिंसावादी

असावयाचे होते. युरोपात जर्मनीच्या हिटलरने महायुद्धाची होरपळ पेटविली होती ती आर्यवंशाची (जर्मनी इताली वगैरेंच्या) दादाशाही प्रस्थापनेसाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरुद्ध, ब्रिटिशांचा राजकीय अंकित म्हणून हिंदुस्थानला त्याची संमति न घेताच '' युद्धमान ''म्हणून जाहीर करण्यात आले होते. साम्राज्यशाही वा हिटलर मुसोलिनींची दादाशाही हिंदुस्थानला नकोच होती. आणि शिवाय राष्ट्राराष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाचा जन्मसिद्ध हक्क डावलला गेला होता. म्हणूनच रणांगणावरच्या अकारण खाटिकखान्याला नैतिक अधिष्ठानावरून माणुसकीच्या धर्मासाठी वैयक्तिक सत्याग्रह होता. त्याला मी माझ्यापरी चांगलाच हातभार लावला.

६

हिंदुस्थानात लोकशाही स्वराज्य नांदावयाचे आणि हिंदुस्थान जगातील स्वतंत्र राष्ट्रांच्या बरोबरीने चालावयाचे तर, हिंदुस्थानची फेर-रचना लोकशाही मनोवृत्ती मुरवून व मूळ धरावयास लावून केली पाहिजे. ना. गोखल्यांच्या भारतसेवक समाजाचा आणि म. गांधीनी व म. गांधीच्या नावावर काढलेल्या आश्रमांचा तोच धडा प्रबोधनपूर्वक जनतेस होता. जीवनाच्या अंगोपांगीय कार्यक्षेत्रात विधायक प्रवृत्ति आणि प्रगती करीत राहण्यानेच नवीन समाजरचनेचा दम, जोम आणि राम वाढावयाचा. हिंदुस्थानातील लोकशाहीचे रामराज्य आता कोणी दशरथपुत्र राम चालविणार नसून, धडधाकट अवयवांच्या मनुष्यमात्राला त्याच्या पात्रतासिद्धीचे काम, कामाचा मोबदला, जीवनावश्यक वस्तूंचा बाजारदराला पुरेल व पुरून उरेल एवढा दाम, त्या दामातून भरपूर आरोग्यसंपन्न आराम आणि तशा आरामातून नव्या उत्साहाचा व उमेदीचा राम व्यक्तिमात्रास लाभल्यानेच, हिंदुस्थानातील लोकशाही रामराज्य यशस्वी व प्रभावी व्हावयाची आहे. या जाणीवेने सातारा जिल्ह्यात लोकशिक्षणाला १९२१ सालापासून खेड्याखेड्यांची यात्रा करून परचुरेशास्त्री यानी सुरूवात केली होती. त्या यात्रेतच ते महारोगाचे बळी ठरले, हे मोठे दुर्दैवच होय. त्यानंतर तो उपक्रम माझे न्यू इंग्लिशमधील एक सद्‌गुरू, सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे एक वेळचे कर्तबगार अध्यक्ष व आयुष्याच्या साठीत कम्युनिस्ट झालेले पंढरीनाथ वामन घाणेकर यांनी सुरु केला होता. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून १९२८ ते १९३६ पर्यंत मी जिल्ह्यातील सर्व गावे टिपली आणि या निर्णयाप्रत आलो की, लौकिक जीवनातील वैयक्तिक आणि सार्वजनिक त्रुटी भरून निघाल्याशिवाय व राष्ट्रीय जबाबदाऱ्यांची तीव्र जाणीव जागृत राहिल्याशिवाय लोकशाही स्वराज्यातील रामराज्याचा मामला सकस होणारा नव्हे. त्यामुळेच मी भाऊसाहेब सोमणांच्या लोकसेवा संघात हिरीरीने १९३७ पासून काम करू लागलो. आणि लोकसंपर्कामुळे मला पहिल्या वहिल्या काँग्रेस मंत्रीमंडळाच्या कारकीर्दीत शिराळ्या पेट्याच्या फिरतीत परिस्थितीचे वर्णन करावे लागले की- '' राज्य इंग्रजांचे, कारभार काँग्रेसचा, अंमल गांवगुंडांचा. '' लोकसेवासंघाच्या दुसरे वर्षाच्या अहवालात या वस्तुस्थितीला जसे प्रसिद्धीकरण आले तसेच नवा-काळप्रभृति वृत्तपत्रातही आहे. स्वराज्य येऊनही १९४७ नंतरसुद्धा वरील दुःखाला जेव्हा आळा बसत नाहीसे दिसले, तेव्हांच प्रश्नोत्तरांच्या तासाचा फायदा घेऊन मला आमदार या नात्याच्या कर्तव्यबुद्धीने सहा वर्षे

मंत्रिमंडळ, सरकारी अधिकारी आणि स्वैराचारी स्वार्थी यांचा रोष ओढवून घ्यावा लागला ! हे जितके खरे, तितकेच हेही खरे की, स्वराज्याची दोन तपे झाली तरी जग कोठे चालले आहे, आपला देश कोठे आहे व आपण कोणती कर्तव्ये व तयारी केली पाहिजे याचा समजूतदारपणे लोकशिक्षण राज्यकर्ता पक्ष वा विरोधक पक्षही प्रत्यक्ष लोकसंपर्क साधून क्वचित्‌च करीत असतात. त्यामुळेंच स्वराज्यातील रामराज्य तर आपणास दिसत नाहीच, पण निश्चितार्थासाठी निश्चित पाऊलटाक आत्मविश्वासाचे पुढारी वा राष्ट्रीय जीवनाचे आधार असलेले तरूण दैनंदिन जीवनयात्रेत करीत असलेले आढळण्यास शोधूनच काढावे लागतात. दारूबंदी कायद्यातील पराभूत मनोवृत्तीने चाललेली कुतरओढ आणि गावोगाव चाललेली पूर्वास्पृश्यांची कुचंबणा व कोंडमारा ही विदारक उदाहरणे असून, अस्पृश्यता निवारणाचा कायदा मध्यवर्ती सरकारने कायदेकलमी कितीही कडक केला तरी लोकशिक्षणाने लोकमत कार्यनिष्ठ केल्याशिवाय त्या कायदेकलमांची अंमलबजावणी अपेक्षित वास्तव ठरणार नाही.

## माणुसकीचा बंधुभाव

लोकसेवासंघातील माझ्या सेवेचा माझा अनुभव आहे की, लोकांना विश्वासात घेऊन त्यांना मार्गदर्शन केल्यास गांवपोहोच रस्ते होतात, शाळांतील शिक्षणक्रमास राष्ट्रीय वळण लागते, भजनी मंडळीसुद्धा संतवाङ्मयाचा अर्थ व आचरण प्रवृत्तिनिवृत्तीचा संगम साधून करतात. प्रातर्विधीपासून आरोग्य रक्षणाच्या रीतिरिवाजांत विज्ञानशुद्ध सुधारणा होते, सहकारी सोसायट्यांत गरजू गरीबांच्या सोयीकडे प्रथम लक्ष दिले जाते आणि अस्पृश्यता निवारण अंगवळणी पडून जातीय उच्चनीचताच काय, पण हिंदु–मुस्लीम–ख्रिस्त इत्यादी धर्मभेदही विसरले जाऊन माणुसकीचा बंधुभाव स्थिर होऊ लागतो. मग, अक्षरशत्रुत्व जाऊन अक्षरमित्रत्व स्थायी होते आणि शीलवंत सद्‌गुणींचा आशीर्वाद व सहकार यांना आदरपूर्वक पाचारण करण्यात येते, यात नवल नाहीच नाही ! वृत्तपत्रांचे जाहीर वाचन, जीवनोपयोगी व उदात्त दृष्टी देणाऱ्या ग्रंथांचे सहज बैठकीतील सारांश कथन, स्थानिक इतिहासातील उदात्त प्रसंगाचे स्मरण इत्यादि साधनांचा उपयोग हमखास कार्यकर्त्यांना होतो. लोकांत समरस होऊन केलेल्या लोकसेवेचा लोकजिव्हाळा कार्यकर्त्याला एवढा मिळतो की, कार्यकर्ता प्रत्येक घरी आप्तस्वकीय ठरत असतो. परळी–तारळे खोऱ्यांच्या जंगली सरहद्दीवर हिंडत असता, मी एकदा " जंगलच्या राजाच्या " क्रूर नजरेत गवसलो असता, तीन तासात खरे म्हटले असता, घामाघूम होऊन विरघळूनच गेलो असतो. पण प्रत्येक खेडूत माझ्याशी भावाप्रमाणे वागला आणि धीर देऊन त्याने मला झाडझाडोऱ्यातून माझ्या मुक्कामाच्या गावाकडे, तो जंगलचा राजा भोवताली वास काढीत असताही, वाट काढून दिली. त्रिकाळकर्त्या शि. ल. करंदीकरानी ही बातमी तर आपल्या पत्रात दिलीच होती; पण वर लोकसेवासंघाच्या फिरतीचे फलित म्हणून मी १९३९ साली " परिचित सातारा " ही पुस्तिका प्रसिद्ध करताच, माझ्या निरलस सेवेचे कौतुक करून, मी माझ्या जिल्ह्याचा कोंबड्यापासून कडेकपारींचा जसा निरीक्षणपूर्वक अभ्यास केला, तसा इतरत्र होण्याची आवश्यकता आपल्या संपादकीय अभिप्रायाने वाचकांचे मनी आवर्जून बिंबवली.

लोकदरास पात्र झालेल्या माझ्या लोकसंपत्तीचा उपयोग मला '' चले जाव '' चळवळीच्या वेळी भूमिगत अथवा '' गुप्ते '' चळवळ्याशी निकट संबंध सुखरूखपणे ठेवण्यात झाला. कुंडलच्या लाडबंधूनी चालविलेल्या '' तुफान सैनिकांच्या '' शिक्षण शिबिरापासून तो शुकाचार्याच्या डोंगरात नेत्यांच्या वैयक्तिक गाठीभेटी घेऊन समाचार देण्याघेण्यापर्यंत मी बहुतेक प्रसंगी चांगलाच निभावलो. '' चले जाव '' ची चळवळ ही जशी ब्रिटिश राज्यकर्त्याना '' इशारा '' होती, तशीच हिंदुस्थानवासियानाही '' इशारा '' च होती. ब्रिटिशांनी राजकर्ते म्हणून हिंदुस्थान सोडावा आणि हिंदुस्थानची भाग्यभगवती हिंदुस्थानवासियांच्या हातीं सुपूर्त करावी. परकीय सत्ताधाऱ्यांनी पाळावा अशी ही काही काँग्रेसची हुकमत नव्हती. देशातील कोणत्याही राजकीय वा अन्य स्वरूपाच्या संस्थेने काहीही ठराव केले तरी परकीय राज्यकर्त्यानी त्याची फिकीर केलीच पाहिजे, असे थोडेच बंधन होते ? परकीय सत्ताधारीही स्वत:च्या इज्जतीची कमालीची कदर करणारे असल्यामुळे. त्यांनी साहजिकच दडपशाहीचा वरंवटा बेगुमानपणे सुरू केला. सार्वजनिक चव्हाट्यावर वा रस्त्यावर '' चले जाव '' ची घोषणा झाली रे झाली की, लोकांच्या टाळक्यात व पाठीवर पोलिसांच्या लाठीचे तडाखेच बसू लागले. दहा ऑगस्ट १९४२ रोजी एका ओसाड व पडक्या अशा जुन्या वाड्यात विद्यार्थ्यानी एक सभा घेतली. त्या सभेत '' चले जाव '' ठरावाच्या कारणांचा साद्यंत इतिहास उलगडून दाखविण्याचे कर्तव्य मला करावेच लागले. साहजिकच पोलिसानी मला अटक केली व कैदखाना दाखविला. पण एक दिवसातच मी मोकळा झालो. कारण सरकारी कायदेबाजांच्या मते एखाद्या घटनेचा इतिहास सांगणे म्हणजे प्रस्थापित सरकारविरूद्ध उठाव करणे वा उठावास उत्तेजन देणे नव्हे असे ठरले. याच सुमारास मुंबईला अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या सभेस गेलेले तरूण देशभक्त आपापल्या कार्यक्षेत्रात परतू व उतरू लागले होते. ते जुन्या नव्या कार्यकर्त्याच्याबरोबर विचार विनिमय करून चळवळीची व्यावहारीक आखणी करू लागले होते. या विचारविनिमयातील एक घटक मीही होतो. '' चले जाव '' चा ठराव झाला पण चळचळीच्या पाऊलटाकीची दिशा महात्मा गांधीनी लोकांस सांगितलेली नाही, असा एक सूर त्या विचारविनिमयांत निघे. मी म्हणे की, महात्माजीनी '' निर्वाणीचा एक पांडुरंग '' असे मार्गदर्शन स्पष्ट केले आहे. ठरावाच्या लोकसंमतीच्या क्षणापासून स्वतंत्र–स्वयंपूर्ण हिंदुस्थानचे आपण नागरिक आहो असे लोकानी खास समजावे आणि त्या नात्याने जे कांही कर्तव्य असेल ते करावे, नाहीपेक्षा खुशाल आत्माहुति द्यावी. अशा ( Do or die) अर्थाचे जे महात्माजींचे उद्‌गार आहेत, तेच त्यांचे मार्गदर्शन आहे. चळवळीची पाऊलटाक आता लोकांची लोकानी करावयाची असून '' चले जाव '' चळवळ नेतृत्वप्रेरित न ठरतां, लोककर्तृत्वसिद्ध चळवळ ठरली पाहिजे. माझा हा दृष्टिकोन सर्वसामान्य होत नव्हता तरी कार्यकर्त्यांच्या आवाक्यास व आरोपास अनुसरून दोन आघाड्या निर्माण करण्याबाबत मात्र एकमत होत असे. स्वातंत्र्याच्या अखेरचा लढा म्हणून जिवाच्या करारावर परकीय सत्तेची दमछाट करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक संघटना

बांधावयाची. या " गुप्त्यांच्या " संघटनेला लागेल ते सहाय्य व परकीय सत्तेच्या धोरणांतील नि हालचालितील मख्ख्यापासून माजोरीपर्यंतची माहिती पुरवून साळसूदपणे "सनदशीर" चळवळीचे पुरस्कर्ते म्हणून अगर आपण चळवळीच्या गावचेच नव्हे, असे गनिमी काव्याने चालू शकणारे कार्यकर्ते ज्यात आहेत, अशी दुसरी संघटना विकासेल, अशीही श्रमविभागणी करावयाची ! ! या दोनही आघाड्याना आपल्या स्वयंसेवक संघटना उभाराव्या लागल्याचे त्या स्वंयसेवकांच्या शिस्तशिकवणीसाठी वर्ग, शिबिरे वा 'शांतिप्रियते' च्या संस्था चालविणे आहे. या उपक्रमातून हिंदुस्थानची राजकीय प्रतिष्ठा, " चले जाव "चा काँग्रेसचा ठराव आणि परकीय सत्तेच्या उच्चाटणाची आवश्यकता तीव्रतेने पण सूचक नि कार्यप्रेरक मार्गदर्शनाने तरूणांच्या व चळवळ्यांच्या मनीमानसी बिंबवण्याची खबरदारी घेणेच जरूरी झाले. कुंडल व आटपाडी महालात आणि शिराळा पेट्यात, त्या लोकशिक्षणाच्या कामी मी माझी सेवा समर्पण केली. मी पूर्वाश्रमाप्रमाणें लोक सेवासंघाच्या कामासाठीच हिंडत असतों, अशी सरकारी अधिकारी व लोक यांची दर्शनी समजूत असली तरी " अंदरकी बात " लोक जाणत होते व सरकारी अधिकारी दोषदर्शनाची दुर्बिण घेऊनच बसले होते.

" चले जाव "

तारीख ९ सप्टेंबर १९४२ पर्यंत तहसिलदार कचेऱ्यावर तिंरगी झेंडा फडकविण्यासाठी जाहीर मोर्चे काढण्यात आले. त्यातील काही मोर्चाच्या पुढाऱ्यांना झेंडा लावण्याच्या प्रयत्नात असताना पकडण्यात येऊन बंदीत ठेवण्यात आले. पण आमच्या जिल्ह्यातील वडूज व इसलामपूर येथील मोर्चे म्हणजे रणांगणाला आव्हानच ठरले.पोलिसानी गोळीबार अमानुषपणे करण्यास कमी केले नाहीं. परशुरामभाऊ घाडगे पहिलवान आणि त्यांचे साथी यांच्या रक्तांची थारोळी वडूजचे तहसील कचेरीवर झाली ! सदैव सरकारजमा पक्षाशी गोडीगुलाबी राखणाऱ्या " जयराम स्वामींच्या " वडगावचे पुढारी बंडोपंत लोमटे यांचे " तरूण ताठे " बच्चे त्या मोर्चात होते आणि औंध हायस्कूलात शिक्षक असलेल्या रायगावकर देशपांडे मास्तरांचे चिरंजीव सुद्धा होते, हे लक्षात आले, म्हणजे " चले जाव " च्या चळवळीतील तीव्रता किती खोलवर रूजली होती हे लक्षात येते. १९३० च्या जंगलसत्याग्रहातील कासाई–परटीणीपासून आणि बिळाशीच्या बंडातील वीरांगना व हुतात्मा ठरलेली " चांभाराचे छावे " यांच्यापासून लढतीची सुरू झालेली परंपरा " चले जाव " चळवळीच्या वेळी उफाळून उठली, यात मला नवल वाटले नाहीं पण अभिमान मात्र जरूर वाटला. पै. परशुरामभाऊबरोबर आणखी सात जीव धारातीर्थी पडले,शेकडो जखमी झाले आणि ब्रिटिश सरकारची शंभरी भरवावयाची ही ईर्षा वाढीस लागली. इसलामपूर येथे किर्लोस्कर वाडीचे " पंड्याजी " जीवित समर्पण करून बसले व कित्येक कार्यकर्ते जायबंदी झाले. तासगांव येथे न्यायमूर्ति व तहसिलदार यांना गांधी टोप्या घालूनच मोर्चेवाले मंडळीनी झेंडावदंन केले !! अशा जयाजयातून लोकांचा आत्मविश्वास वाढला व परकीय सत्तेच्या मनाने कच खाल्ली की आपले नोकरही," चले जाव " च्या चळवळीला अनुकूल आहेत की काय ? सरकारी दडपशाहीने मग प्रलयरूद्र व्हावयाचे ठरविले. लोकमानसाने त्या सरकारी

उन्मादाचे स्वागतच करण्याचे ठरविले. कारण स्वातंत्र्यप्राप्तीचा यज्ञ आत्मसमर्पण बुद्धीनेच पार पाडला तर राष्ट्रात तेज तेवत ठेवत असतो.

## प्रतिसरकार

स्वतंत्र हिंदुस्थानचे नागरीक म्हणून आपापल्या आवाक्याप्रमाणे कर्तव्ये करीत राहावयाची, तर आपला राज्यकारभारही आपणच हाकला पाहिजे, हा विचार दिवसेदिवस प्रबळ होऊ लागला आणि '' प्रतिसरकार '' स्थापण्याचे मनसुबे सुरु झाले. पंचायतराज्याच्या पूर्वार्जित कल्पनेला उजाळा मिळाला आणि गावोगावी तो उपक्रम करण्याचे ठरून ग्रामसंरक्षक दलाच्या उभारणीची योजना आखण्यात आली. ती घरोघरी जाऊन दैनंदिन जीवनांच्या गरजांची वा ''उण्याची'' नोंद घ्यावयाची आणि शक्यतोंवर '' उणे पडू देवू नये कोणी एकाचे '' या दक्षतेची. अन्न, वस्त्र आणि गुंडापासून संरक्षण या त्या काळातील प्रत्येक खेड्याच्या निकडी होऊन बसल्या होत्या. सामाजिक व दैनंदिन जीवनाचे स्वास्थ्य अबाधित रहावे म्हणून स्वयंसेवकसंरक्षकाची एक सेनाच संघटित व शिस्तबद्ध करण्यावर भर देण्यात आला. त्यातीलच जरा चपळ व चतुर मंडळीना तुफान (Strom Troopers) सैनिक म्हणून दक्षता देण्यात आली.ते गुप्त्यांचे संकेत-संदेश उघड्या छातीच्या संघटकाकडे नेत-पोहोचवीत. उघड कार्यकर्त्यांचे संदेश-इशारेही गुप्त्यांच्यापर्यंत दाखल करण्याचेही ते काम उरकीत. प्रत्येक खेड्यांत अशा तऱ्हेने एक तथाकथित स्वास्थ्य संरक्षक दल तयार तर झालेच. रात्ररात्र जागून ती मंडळी गावास व गावात पहारा देत, रवण घालीत, आणि नुसत्या चोराचिलटापासूनच गावाचे रक्षण करीत, इतकेच नव्हे तर परकीय सत्तेच्या गुप्तचरांच्या हालचालीवर आणि गावातील स्वार्थसाधु चहाडखोरावरही कडक नजर ठेवीत. या व्यवस्थेमुळे स्थानिक व परिसरातील गुण्ड गडबडले पण गडगडले नाहीत ! रात्री चाललेल्या प्रतिसरकारच्या सर्व हालचालीचा आणि घडामोडी चा पाढा सरकारी पोलिस अधिकाऱ्यांच्या कानाला लावून वाचण्याचा परिपाठ गुंडानी व स्वार्थांधळलेल्या प्रतिष्ठितांनी ठेवला ! त्यातूनच चहाडखोरांची, दगाबाजांची आणि गुंडांची खोड मोडू शकेल अशी व्यवस्थायोजना उभारणे भाग आले. भीमरूपी महारूद्रांची उभारणी करून गुण्डाना ताळ्यावर आणण्यात यश मिळविण्याचे ठरले, मग न्यायान्याय चिकित्सकपणे पहाण्याची जबाबदारीच त्यातून उद्भवली ! त्यासाठी काही निवृत्त न्यायाधीश आणि अनुभविक वकिल '' उदंड करी परी गुप्तरूपे '' कामास घ्यावे लागले. उत्तर साताऱ्यात न्यायदानाचे काम प्रामुख्याने बाबूरावजी घोरपडे तारगावकर करू लागले तर दक्षिण साताऱ्यात धन्वंतरी लक्ष्मणराव कासेगावकर ती जबाबदारी सांभाळू लागले. त्यानी दिलेल्या निवाड्याविरूद्ध कोणी ब्र काढला नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे, प्रतिसरकारच्या बाकी जबाबदाऱ्या कवठे (ता. वाई) चे किसनवीर व कुण्डलचे लाडबन्धु क्रांतीवीर नाना पाटलांचे नाव सांगून पार पाडू लागले.

## पत्रीसरकार

प्रतिसरकारच्या समर्थ संचालनेचे पडसाद परकीय सत्तेच्या केंद्रातही आपले निनाद उमटवू लागले होते. त्यामुळे प्रतिसरकारला नेस्तनाबूत करण्याचा पहिला घण म्हणून परकीय सत्तेने प्रतिसरकारला पत्री सरकार हे संबोधून घातला. गुंडचहाडखोराना ज्या जन्मभर लक्षात राहाण्यासारख्या शिक्षा पत्रीसरकार लावी, त्यांत तळपायावर व टांचावर छडीमार करून पाय निकामी करून मुदतबंदीने हालचाल बंद करण्याचा एक प्रकार असे. त्यावरून '' पत्रीसरकार '' ही प्रतिसरकारची चेष्टा करण्यासारखी एक कोलीत तयार झाली होती.

## एकजिनसीपणा

प्रतिसरकार आपला अंमल निर्धास्तपणे बसवू शकले. ती गावे पुष्कळशी हमरस्त्यापासून दूर व डोंगर कपारीचीच बहुधा असत. कृष्णा-वारणा-दऱ्यातील प्रतिसरकार लोकमान्यतेने जवळ जवळ तीन एक महिने तरी चालले. त्या काळात ब्रिटिश सरकारच्या दबदब्याची आणि घासमोजणी पुरवठा पद्धतीची पर्वा न करता प्रतिसरकारच्या कारभाराखालील खेड्याना अन्न-वस्त्र-स्वास्थ्य सुबत्तेच्या काळासारखे लागले होते, हे विसरून चालणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन आणि त्यांच्याच '' आग्र्याहून सुटके '' उदाहरण डोळ्यापुढे ठेवून येरवड्याच्या तुरूंगांतून शिताफीने बाहेर आलेले किसनवीर प्रभृति मंडळीच प्रतिसरकारची सूत्रसंचालक मंडळी होती. येरवड्याहून निघण्यापूर्वी त्यानी ज्यांना विचारले होते, त्यापैकी मी एक होतोच. साहसे श्री प्रतिवसति राजकारणाच्या रणांगणावर व पटांगणावर नेहमीच लागते. तीस अनुसरून या मंडळीनी प्रतिसरकार स्थापन करून स्वराज्याचा अनुभव थोडा फार जनतेस दिला तेंव्हा सर्वत्र आशा फुलल्या असल्यास नवल काय ? लोक म्हणू लागले की, शिवाजी महाराजांच्या नेकीने असे ग्रामराज्य चालावे आणि सामान्य खेडुतालाही विकासाची संधि मिळून आपल्या अक्कलहुशारीने आपल्या आवाक्यातील उच्चतम स्थान मिळवता यावे आणि प्रगत जीवनाने उन्नतिच उन्नति करून घेता यावी. तरूणांच्या सात्त्विक महत्त्वकांक्षा साकार झाल्या आणि माणुसकीच्या धाग्याने सर्व थरातील मंडळींचा सहकार-समन्वय साधून मानसिक, वैचारिक व कार्यप्रवर्तक एकजिनसीपणा निर्माण होईल तर हिंदुस्थानकडे सगळे जग एक तऱ्हेच्या आदबीने पहात राहील आणि कित्येक बाबतीत हिंदुस्थानचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवतील.

## नोकरशाहीला पोटशूळ

म्हणून लोक भूमिगत संघटनांच्या गुप्त्याना आपला खरा हितचिंतक वर्ग म्हणून निष्ठा वाहू लागले. आणि रात्रौ दिवसा लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटुन,'' गुप्ते '' पुढाऱ्यांचा प्रबोध, त्यांचा गौरव राखून सुखरूपता सांभाळून आणि त्यांच्या योगक्षेमाची काळजी घेऊन, ऐकू लागले. ब्रिटिश सरकारच्या नौकरशाहीला त्यायोगे पोटशूळ झाला. इकडे गुप्ते पुढाऱ्यांच्या कौटुंबिक मंडळीना सरकारी यंत्रणेचा जसा त्रास झाला, तसाच रोजच्या चरित्राच्या टंचाईचाही

त्रास जाणवू लागला ! तरीही त्या त्रासाची पावनखिंड करूनच गुप्ते जशी आपली चळवळ धीरगंभीरतेने पुढे नेत होते, तसेंच त्यांचे कौटुंबीय आणि आश्रयधारी पोट बांधूनसुद्धा काळावर मात करीत राहिले होते.

## ७

जगातील प्रत्येक माणसाला निसर्गत:च स्वातंत्र्य प्रिय असते. स्वातंत्र्याविना वैयक्तिक,राष्ट्रीय व जागतिक शांतता, मानवी-हक्क-रक्षण, व संस्कृतिसंरक्षण होऊच शकत नाही. म्हणून स्वातंत्र्याप्राप्तीसाठी, संरक्षणासाठी आणि संगोपनासाठी मनुष्य प्राण पणाला लावून जिंद्दीने प्रयत्नांची, पराक्रमांची आणि प्रभावीपणाची पराकाष्ठा करीत असतो. १९४२ च्या ८ ऑगस्टला इंग्रजाना 'छोडो भारत' असा इशारा देऊन 'करेंगे या मरेंगे' अशी लोकप्रतिज्ञा घोषविणारा जो ऐतिहासिक प्रसंग गवालिया टॅन्कवर घडला त्याच गवालिया टॅन्कवर १८८५ साली राज्यकर्ते ब्रिटिश आणि भारतीय प्रजाजन यांच्यातील वाहणाऱ्या विचाराचार-प्रवाहावर पूल बांधण्यासाठी समजूतदार मंडळी जमली होती. ही दोनही दृश्ये कॉंग्रेस या संस्थेच्या इतिहासातीलच असून संसारातही अद्‌भुत आणि रम्य असतातच, पहाणारा मात्र पाहिजे या साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांच्या वचनाची प्रचिति देणारी आहेत.

चळवळ सुरू झाल्यापासून एक महिना लोटावयाच्या आतच सातारा जिल्ह्यातील तीनशे कार्यकर्ते तरी बंदीवासी झाले. तरीही इंग्रजी राजवटीला बेचैन करण्यासाठी तारा तोडणी, सरकारी निवासस्थानांचे अग्निदिव्य, रेल्वे रूळांची उखड व पगारी गाड्यांची लूट, वगैरे प्रकार चालू राहिल्याकारणाने सरकारी यंत्रणा पिसळावयाची ती पिसाळलीच ! मग संशयिताना स्थानबद्ध करण्याचा मोहिमेचा आधार घेऊन चळवळीला अनैतिकतेने नामोहरम करण्याचा व्यूह रचला आणि परिणामत: त्या फंदात पडलेले अधिकारी स्वत:च्याच अनैतिकतेने नामोहरम झाले. श्रीमंत, मनदुबळे, असे लोक स्थानबद्धतेसाठी कच्च्या तुरूंगात आणून टाकावयाचे. सबब ही की, ते कॉंग्रेसच्या गुप्त्यांचे आश्रयदाते आहेत म्हणून ! आपण तसे नाही, हे सिद्ध करावयाचे असेल, तर चळवळ्यांची लागेल ती कुणकुणसुद्धा त्यानी पोलिसला कळविली पाहिजे आणि बंदी वॉरंट काढणाऱ्या अधिकाऱ्यांना आर्थिक आश्रय दिला पाहिजे. सातारा जिल्ह्यातील एका मग्रूर पण चलाख फौजदाराने अशी महंमद गझनवी करून तीन लाख रूपये मिळवले, ते पचावेत म्हणून दक्षिणेकडील एका संस्थानी काशीक्षेत्रात राहणाऱ्या आपल्या भावाच्या हाती साठवले आणि चळवळी संपून स्वराज्य आल्यावर व विशेषत: संस्थानांचे विलीनीकरण झाल्यावर, आपल्या निवृत्तीच्या सुखासाठी भावाकडे पैसे मागितले. पण ' पण चोरीचा मामला व हळूहळू बोंबला ' असा जमाना उभा राहिल्याकारणाने, आम्हाला त्या सर्व प्रकारची कुणकुण तरी लागली, पण फौजदारसाहेबास हात चोळीत बसूनच मन:संतापाच्या अतिरेकाने अकालीच परलोकवासी व्हावे लागले. आपल्या मुलीच्या लग्नाचे निमित्ताने अहेरासाठी आलेल्या चांदीच्या भांड्यांची कडीपाटापर्यंत लागलेली रास, आपल्या स्वत:च्या डोळ्यानी एका मामलेदारानी पाहिली, त्यांनी ती आपल्या

गृहसम्राज्ञीसकट सर्व आप्तेष्ट व स्नेही सोबत्यानां दाखवली पण ती पचविण्याकरता रात्रीच्या काळोखात एका क्रोडोपती व्यापाऱ्याचे ' तळघरी नेउनी पुरली !!' रावसाहेबांनी सेवानिवृत्तीनंतर ती संपत्ति घरभरणीसाठी हळूहळू हलविण्यासाठी आराखडा तयार केला, पण दरम्यान 'हार्टफेल' ने तो व्यापारीच देवाघरी गेल्याकारणाने त्याच्या मुलांनी सरळ कानावर हात ठेवले आणि रावसाहेबांना कायमचा ह्द्रोग लागला ! आजकाल त्या व्यापाऱ्यांचे चिरंजीव कोठे दानशूरांच्या यादीतून वृत्तपत्रात केव्हा केव्हा झळकत असतात आणि तशी वार्ता वाचताच आपले आयुष्य का संपत नाही, अशा चीडेने रावसाहेब पंढरपूर-मंगळवेढा अशा क्षेत्रात यात्रेला जाऊनही जळफळत असतात !

## राष्ट्रीयत्वाच्या मागचा सुरूंग

सरकारी यंत्रणेतील अनैतिक नामोहरतेची ही ठळक वानगी ! आता विना चौकशी स्थानबद्धतेच्या कायद्याखाली पकडून येरवड्यासारख्या मध्यवर्ती बंदीखान्यापर्यंत यात्रा घडविलेल्या मंडळीत राष्ट्रीय आणीबाणीच्या चळवळीत पोलिसाच्या अमानुष गोळीबाराने जखमी झालेल्या जखमींची सेवा माणुसकीच्या धर्मासाठी करावयास गेलेले पण मतनिष्ठेने हिंदुमहासभावाले असलेले डॉक्टर जसे होते,तसेच जीनासाहेबांचे पाकिस्तानी पुरस्कारी मुस्लीम बांधवही होते, कारण अडविल्याशिवाय पदरात माप पडत नाही, असा त्यांचा स्वराज्य-हावऱ्या काँग्रेसजनासंबंधी अनुभव असल्याकारणाने पाकिस्तानाला संमति दिल्याशिवाय स्वराज्य नाही अशी मनोवृत्तीच ' अखंड भारताचा ' पुरस्कार करणाऱ्या गांधीच्या अनुयायात निर्माण करून, महात्मा गांधीचे हातपायच मोडून काढावयाचे, असा त्यात इंग्रजी डाव होता. सदर मुस्लीम बंधु आजकालही राष्ट्रीय मुस्लीम म्हणून आमच्या शासनाकडून वेळीअवेळी प्रशंसिले जातात. पण कालच्या 'ह्याह्यामर्दिनी इंदिरा प्रियदर्शनी' च्या ऐतिहासिक गाथेच्या रचनेच्या कालात, ते आमचे बांधव मशीदीतून शान्तीपाठ म्हणताना ' ह्याह्याच्या ' विजयाबद्दलच प्रार्थना करीत होते, हे ज्यानी पाहिले आहे, त्याना भारतीय राष्ट्रीयत्वाच्या मागचा सुरूंग सारखा भेडसावीत राहून अखंड सावधानता बाळगणेस बजावितच असतो. स्थानबद्ध केले त्यात आणखीही एक कृत्रिम देशभक्तांची जमात सरकारने आणून सोडली होती. ती म्हणजे सरकारी हेरखात्याचे छुपे बगलबच्चे ! जेलमधून त्यांच्या आठवड्यातून दोनदा बाहेर जाणाऱ्या पत्रात अव्वल काँग्रेसवाल्यांच्या हालचालींचा व विचारसरणींचा छद्मी प्रशंसेने इत्थंभूत अहवाल जात असे. ह्याला आमच्या नातेवाईकाकडे झालेल्या विशिष्ट सरकारी '' फाजील चौकशा '' संबंधी जे उल्लेख येत, त्याच्यावरून ती स्पष्ट कल्पना आली. म्हणून तशा एका सरकारकृत देशभक्तांच्या पोटात शिरण्याचा प्रयत्न मी एक आठवडाभर करताच, त्याचे पोट फुटले; त्याच्या पत्राचे पत्त्यावर असलेले '' सांकेतिक नातेवाईक '' हे गुप्तचरखात्याचे अधिकारी असल्याचा आढळ झाला. आणि ? त्याच्यावर

आम्हा सर्वांची नजर राहू लागताच, चारदोन दिवसातच त्याच्या जेलमुक्तीचा हुकूम येऊन आमचे रोजच्या दोन तासांच्या करमणुकीला आम्ही मुकलो. सदर कृत्रिम देशभक्त १९७० साली एप्रिलमध्ये दिल्लीस मला भेटले आणि केल्या पापाबद्दल क्षमा मागू लागले. मी त्याना सांगितले की, ' स्वराज्य आल्यापासून आम्ही आपल्यासारख्यांची कृष्णकृत्ये केव्हाच विसरलो आहोत व खरोखरच तुम्हाला पश्चाताप झाला असेल तर ' परिमाणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां ' झटण्याचे एकच कृष्णकृत्य आपण करीत रहावे अशी अपेक्षा करीत आलो आहो.'

## राष्ट्रीय कार्यक्रम

बंदीखान्यात आम्हा स्थानबद्धांचे कार्यक्रम अगदी जेलची टीप सांभाळून पण राष्ट्रीयवृत्तीच्या पोषणाचे, निदान राष्ट्रीय वृत्ती विलोपाकडे झुकू नये, याच दक्षतेने चालत. राष्ट्रसेवादलाचे कार्यक्रम म्हणजे संचलन, खेळ, सामुदायिक प्रार्थना, बौद्धिक, ऐतिहासिक व राष्ट्रीय दिनपावित्र्य, आम्हाला मिळणाऱ्या पत्रातून वा वृत्तपत्रातून डोकावलेल्या पण ' चले जाव ' च्या लढ्यात देवाघरी गेले. त्यांच्या बातम्यावरून शोक प्रदर्शन, असे कार्यक्रम हटकून असायचेच. पेणचे इतिहास-संशोधक प.रा. तथा अण्णासाहेब दाते हे आम्हा तृतीय-वर्गीय स्थानबद्धाना नेकीचे नेटाचे व नियमितपणाचे पुढारी लाभले असल्याकारणाने, सकाळपासून संध्याकाळपर्यंतच्या अशा कार्यक्रमाला खंड म्हणून कसा तो नसे. एकजिनसी सामूहिक जीवन शक्य तितक्या गुण्यागोविंदाने व राष्ट्रीयत्वाची इज्जत आणि शान कायम राखून काढावयाचे, असा सगळ्या मनाचाच दृढभाजक होता. म्हणूनच विविध स्वभावाची मंडळीतील एक-जीवजीवन साकार होत असे. १९३० सालापासून झालेल्या राजकीय आन्दोलनातून वरचेवर बंदीखान्यात आलेल्या चळवळ्यांच्या वर्तनपरिचयामुळे आणि त्या आन्दोलनांचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणून इंग्रजी राजवटीच्या सेवकातही देशभक्ताविषयी अंकुरलेल्या सहानुभूतीमुळेही बंदीखान्यातील सामूहिक व शिस्तीच्या जीवनाचा जम जमला होता, असे धरून चालावयास हरकत नाही. खेळ, कवाईत, सामुदायिक सूतकताई, सामुदायिक प्रार्थना यांच्याशिवाय वैयक्तिक वाचने, लेखने, विचारविनिमय व राजकीय आंदोलकांच्या गुणदोषाची ऐतिहासिक समालोचने यात बंदीवासाचा वेळ भुर्कन जात असे.

## व्यामोह

चळवळ सुरू झाल्यापासून दोनअडीच महिने स्थानबद्धांची संख्या वाढतच होती. वाढत्या वेगाबरोबर आता चळवळेहि आता सशस्त्र होऊ लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. ब्रिटिशनिष्ठेबाबत नौकरशाहीतहि शिथिलता घर करू लागल्याचे वास लागत होते.

अशा स्थितीत सच्चा आन्दोलकहि स्वनीतिभ्रष्ट व्हावा असा एक व्यामोह ब्रिटिशसरकारने उभा केला. अर्जी केल्याबरोबर फर्जी जावयाचे, हा तो व्यामोह होता. कोणतीहि सुख सोयी मागण्याचा अवकाश, ती सरकार ताबडतोब देई. प्रकृतीच्या सबबीवर दूध-लोणी मिळण्यापासून, मुदतबंदीची आंदोलनालिप्त सुटका देण्यापर्यंत ब्रिटिश सरकारने उदारतेची खैरात चालविली होती. ज्या सरकारला ' छोडो भारत ' म्हणून शांतीयुद्धास आव्हान करावयाचे, त्याच सरकारला सुखसोयीचा जोगवा मागावयाचा म्हणजे आपल्याच अकलेचे दिवे पाजळून आपल्याच चळवळीची होळी करून घ्यावयाची आणि महात्मा गांधीच्या अनुयायीत्वाला, भारताच्या प्रतिष्ठेला व स्वराज्यासाठीच्या अंतिम संग्रामाला बट्टा लावावयाचा !! म्हणून आमच्या थर्ड सर्कलमध्ये असे काही नामुष्कीचे घडू नये याबद्दल अण्णासाहेब दाते, दामुअण्णा एकबोटे, नानासाहेब अधिकारी आमच्यासारख्यांच्या सहकाराने दक्षता घेत. पण स्वत:च्या दम्याच्या आजारासाठी, पत्नीच्या शेवटच्या दुखण्यातील भेटीसाठी, मुलामुलींच्या लग्नमुंजीसाठी '' मुदत बंदीचा छुटकारा '' ऊर्फ पॅरोल मागण्याचा प्लेग जेव्हा '' फर्स्टक्लास '' स्थानबंदीत फैलावला , तेव्हा, आमच्या थर्ड सर्कलमध्येही त्याचे अनुकरणात्मक उन्दीर घोटाळू लागले. त्यातला एक उंदीर माझ्याच पत्नीच्या पत्रातून माझ्या थोरल्या मुलाच्या मुंजीच्या सबबीवर एका ख्यातनाम वकील पुढाऱ्याच्या उदाहरणावरून मजपर्यंत आला, तेव्हा मला धक्काच बसला ! माझे पिताजी माझ्या मुलाची मुंज करतील व मला दिला तसा त्यालाही गायत्रीचा उपदेश करतील, अशा समजुतीचे पत्र मी माझ्या पत्नीस लिहिले व ज्या आंतरराष्ट्रीय कायद्याखाली पॅरोल मागता येतो, असा सल्ला माझ्या पत्नीस ख्यातनाम वकील पुढाऱ्यानी दिला हाता, त्यानाच, आंतरराष्ट्रीय कायदा भारतास केव्हापासून लागू झाला व तो झाला असल्याचा भारत अजून ब्रिटिश-शासित का, असे मी त्या वकीलपुढाऱ्यास विचारीत आहे, असेही माझ्या पत्नीस लिहिले. त्याप्रमाणे केलेही. 'मी तुमच्या इतका काटेकोर नैतिक कसोटीला उतरू शकत नाही; मी माझ्या पत्नीच्या शेवटच्या दुखण्यात मरणसमयी दूर असू नये, या भावनेने पॅरोलवर आलो खरा !'' असे मला वकील पुढाऱ्यांचे पत्रोत्तर आले. ते मी मग माझ्या पत्नीस कळविले. त्यामुळे ' ना-खेद, ना खंत ' अशा माझ्या गैरहजेरीत माझ्या मुलाची मुंज माझ्या वडिलांनी फक्त संस्कार-साजरी केली.

## शांती संग्राम

अशा लगबगीच्या, तगमगीच्या आणि झगमगीच्या जीवनातही, स्थानबद्धातील नवजवानापैकी काहीच्या मनाच्या उड्या, ' करेंगे या मरेंगे ' या असिधाराव्रतावर विवेकविचक्षणेने पडत असल्याकारणाने ते अनिद्र कासावीस होत होते, अगदी बंदीवासाच्या पहिल्या दिवसापासून !

' करेंगे या मरेंगे ' या जिद्दीने चालावयाचे, तर तुरूंगात खितपत पडणे अगर शिस्तीचा बंदीवास करणे, त्यात बसतच नाही. अडणूक, अडवणूक, अडथळा, अटकाव आणि अवघडपणा या सर्वावर मात करून इंग्रजाना हिंदुस्थानातील आपल्या राजकीय सत्तेचा

गाशा गुंडाळून घेऊन मायदेशी परतण्यात प्रगति करीत, करवीत अगर घडवीत राहिलो, तरच त्या शांतिसंग्रामाच्या अंतिम लढ्याला काही अर्थ ! अशी होती त्या तरूण मंडळींच्या अंत:करणाची तळमळ. त्यामुळे शिवाजी महाराजांची ' आग्र्याहून सुटका ' हे ऐतिहासिक नाटक दसरा–दीपवाळीला करावयाचे अशी भाषा सुरू झाली. ' धूर्तास कळती धूर्तपणाच्या गोष्टी ! इतरास त्याचे काय होय ?' त्या नाटकाची पुस्तके मागवून त्यातील पात्रांचे वाटप कसे करावयाचे, तालमी कोठे व कशा शिस्तीने घ्यावयाच्या याचे आराखडे 'भोळीखुळी असति जी धनिक वणिक बाळे !' ती आखू लागली असता, तुरूंगात कंत्राटी कामावर येणाऱ्या ' घामगाळ्या ' मार्फत आपल्या समानधर्मीयांचा सल्ला व सहाय्य घेण्याचे प्रयत्न नेटाने होऊ लागले. शिवाजी महाराजांचे नाव घेऊन बंदीवासातून बाहेर पडणाऱ्या पांडवांच्या मूर्ति मुक्रर झाल्या. आपण करणार असलेल्या नाटकाच्या पूर्ततेसाठी, आपण उत्कृष्ट नट कसे होऊ हे जणू पडताळून पाहण्यासाठी कोणी काही काळ मारवाडी शेटजींचा पोषाख घालून पाहू लागला, तर कोणी औरंगजेबी थाटात आपण कसे दिसू याचा पोषाखी अविष्कार करू लागला तर कोणी एल्फिन्स्टन माल्मकमूची नकली मूर्ती आपण कशी शोभू याचा पडताळा पाहू लागला. ठरलेल्या पांडवांना यात कसलाच रस नव्हता. पण सर्वांबरोबर तेही आपली करमणूक करून घेत आणि त्या धनिक–वणिक चाळ्यापैकी कशाचा फायदा आयत्या वेळी कसा घ्यावयाचा, याचा हिशोब मनात ठेवीत. याबाबत धाडसाचा पहिला मुहूर्त अर्थातच सीमोल्लंघनाचा दसरा ठरला होता. त्या दिवशी सौजन्यमूर्ती बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली सामुदायिक प्रार्थना सर्वच स्थानबंदीची घ्यावयाची असे ठरवून, त्या प्रार्थनेचा ' शांतिरस्तु, पुष्टिरस्तु, तुष्टिरस्तु ' हा एक मंत्र पांडवानाही आशीर्वाद ठरावा अशी योजना होती. सामुदायिक प्रार्थनेसाठी स्थानबंदी शिस्तीने एकत्र येत असता, कंत्राटी कर्मचाऱ्याने माझ्या कानात आबासाहेब ( शिवाजी महाराजांचे हे खासगत नांव नव्हते काय ?) वीरांना निरोप दिला की, ' गाडी चुकते आहे कारण ती नादुरूस्त असल्यामुळे मिळतच नाही ! !' मी हा निरोप आबा वीराना पोहोचविला तेव्हा आमच्यातील अनेक धर्मवीर आणि सेनापती आश्चर्यवत् '' पाहू लागले.'' पण त्यांच्या पाहण्यासारख्या तोंडाची पर्वा न करता आबासाहेब वीरासह ते पांडव आणि मीही बाळासाहेब खेरांच्या प्रार्थना संचालनाते समरस होऊन विलीन झालो ! !

## दुसरा मुहूर्त

मग दुसरा मुहूर्त दीपावलीच्या लगतचा म्हणजे ता. १ नोव्हेंबर १९४२ चाच निघाला. संकेताच्या निरोपाचा बुरडी पेटारा बंदीखान्यात आला. मोटारगाडी बंदीखान्याबाहेर कोठे, किती वाजता, कोणत्या शिस्तीत हजर आहे वगैरे संकेताची मिठाई आपल्या वर्णनाने पांडवाच्या कानात व मेंदूत पक्की बसली. बंदीखान्यातील सायंकाळच्या जेवणाचे '' थाळी पॉट '' पुढे रांग धरू लागले व वाढपही सुरू झाले. इतक्यात आबासाहेब वीरानी मजकडून '' दाढी करण्याची ब्लेड '' मागून नेली. ब्लेडने जेलला काय जखम होणार, याचा होरा मी

बांधला. तिन्हीसांजा दाढी करण्याच्या खुळेपणाबद्दल आमच्या धर्मवीरानी धिक्कारणी केली. पण कोणालाच त्या धिक्कारणीचे सोयरसुतक नव्हते.

## घंटा खणखणली

बंदीखान्याच्या आतील व्यवस्थापनाच्या सर्व आघाड्यावर सामसूम होण्याची वेळ आली. रात्रौ ८ वाजण्याच्या सुमार असावा ! ! येरवडा तुरूंगाचे मागले बाजूस तंबू ठोकून हजार-बाराशे स्थानबद्ध ठेवले होते. तिकडून मुख्य बंदीखान्याकडे येणाऱ्या एका पोलिसाला दिव्यांचा प्रखर झोत, मोटारीची वेगवान् घर घर, उडीचा दणका वगैरे एकसमयावच्छेदे करून होणाऱ्या चमत्कार-समूहामुळे भूताटकीचा धसकाच बसला ! ! बंदीखान्याचे कचेरीत आला तो पोलीस पण त्याची वाचा बसलेली ! ! नखशिखांत गडी घामाने निथळला होता. त्याच्या त्या अवस्थेने बंदीखान्याचे अधिकारी गडगडले. इतक्यात एक दुसरा पोलीस अधिकारी आला आणि त्याने मुख्याधिकाऱ्याशी कानगोष्टी करताच ' भयसूचक घंटा ' खणखणली.चार पोलिसासह बंदीखान्याचे मुख्य अधिकारी बंदीखान्याच्या मागील बाजूला गेले. येरवडा बंदीखान्याच्या दक्षिण बाजूच्या दरवाजाजवळ म्हणजे मृतनिपटीकरण दरवाजा ( डेड् डोअर ) जवळ ते आले. भुताटकीची खरी भीति तेथेच नव्हे काय ? ' भयचकित ' होण्यासारखी तेथे काय वस्तूस्थिति आढळली ? भिंतीला एक शिडी उभी केलेली असून ती थोडीशी मोडलेली होती, पण वाकलेली नव्हती !! मग मात्र संशयपिशाच्चाने बंदीखान्याचे अधिकाऱ्यांचे डोके चक्करच करू लागले. दिवस पाळीचे पोलिस शिपाई घरातून भयसूचक घंटा ऐकताच पोशाख चढवून बंदीखान्यात संकटाला तोंड देण्यासाठी सज्ज होऊन आलेच होते. भयसूचक घंटेच्या घणघणापेक्षाहि आता धावाधाव करणाऱ्या पोलीशी बुटांचा खडखडाट व अधिकाऱ्यांच्या वृत्तीतील मस्तवाल खरखराट सुरू झाला. आहे काय प्रकार ? पलित्याच्या झगमगाटात बंदीखान्यातील कैद्यांची ( राजकीय-अराजकीय ) गिनती उर्फ मोजदाद सुरू झाली !! अर्ध्या तासातच भोडक्या शिडीवरून कोणीतरी धडधाकट व वजनदार बन्दी आपल्या बाडबिस्ताऱ्यासह ' बजरंग बली !!' करून पसार झाल्याचा ताळा अधिकाऱ्यांना सुचला व पुण्याच्या बलदेव प्रसाद या पहेलवानांचे नाव घुमू लागले !!! तिसऱ्या सर्कलमध्ये मग हुडकाहुडकीचा, तपासण्याचा, दटावण्याचा एकच घोळ झाला !!! कारण ' बंदीवानांचा पाचुंदा ' परागंदा होता. ती रात्र ' कत्तलची नव्हे, नव्हे, आई भवानीच्या जागराची ठरली. कारण आमचे ' शिवाजी ' आपआपल्या मथुरेच्या मार्गी लागले.

## ८

येरवड्यातून बाहेर पडून आपापल्या कार्यक्षेत्राकडे शिवाजीमहाराजांच्या सफाईने रवाना झालेले ''गुप्ते'' आपापल्यापरी देशसेवेची उठावणी करावयास संधि पाहत असताच, '' आली ! दिवाळी आली !! हासत, नाचत आली ! दिवाळी !! हे पद ''माणुस'' की म्हणू लागली.

## वाया गेलेल्या माणसाचे आयुष्य

येरवड्याच्या बंदीशाळेत मात्र '' गेली दिवाळी गेली ! छळीत, जाचीत, चिंतेत गेली !!' अनेकांच्या घरून आलेले फराळाचे डबे कोलमडत, कुंथत आणि गडगडत राहिले आणि आलेले बुरसल्यावर जेव्हा ते हाती लागले तेव्हा वाया गेलेल्या माणसाच्या आयुष्याप्रमाणे त्याना वाऱ्यावर सोडून देण्यात आले !!!

## तितिक्षा

या साऱ्या घटनेचा खेद वा खंत '' अंदरकी बात '' जाणणाराना नव्हतीच नव्हती !! काळावर मात करण्यासाठीच आमच्या '' गुप्त्यानी '' केलेल्या अग्निदिव्यातून कोणते सत्त्व साकार होते याची तितिक्षा ते अगदी गुपचूपणे करीत होते. येरवड्यातील बंदीवानांची शांतीशिस्त मूळ धरू लागली, तशा बाहेरून वृत्तपत्रांच्या रकान्यात आणि खासगत पत्रव्यवहारात गुप्त्यांच्या क्रम–विक्रम–पराक्रमाच्या वार्ता झिरपून झिरपून येऊ लागल्या. त्यांच्या अनुषंगाने बारकावे शोधू लागताच, गुप्त्यांच्या हालचाली पद्धतशीर विकासाने प्रतिसरकार स्थापण्यापर्यंत पोहोचल्या आणि '' प्रजानांविनयाघानात् '' पर्यंत मजल पोहोचली नसली, तरी '' रक्षणाद्भरणाद्पि '' कारभारकुशलता लोकसंग्रहाचे जोरावर साकार करता येते हे गुप्त्यानी दाखवून दिल्याचे समाधान सर्वत्र पसरू लागले.

## आवळलेली मूठ

पण आरंभलेला लोक–कारभार सुरळित चालविण्यासाठी आणि कारभाराची जबाबदारी अंगीकारणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आणि त्यांच्यावर अवलबूंन असणाऱ्या कुटुंबियांच्या चरितार्थासाठी दिवस गतीप्रमाणे पैशांची चणचण भासू लागली. टपालखात्यातील ठेवीपासून सावकारी तिजोऱ्यापर्यंत मग गुप्त्यांची नजर पोहोचल्याचे आढळले, रेल्वेची बुकिंग ऑफिसेस, पे ट्रेन्स याही त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. पिस्तुले छातीवर धरल्यावरच किंवा संगिनीचे टोक दाखवल्यावरच ज्यांची आवळलेली मूठ झाली तर सैल व्हावयाची, किंवा ज्यांच्या कमरेचे कसे खाली व्हावयाचे अशा गरीबांच्या पिळणूकपारध्याना गुप्त्यानी पहिल्याने देशकार्यासाठी आपली संपत्ति द्यावयास लावण्याचा पायंडा पाडला होता. या संबंधात पिळणूक पारध्यानी इंग्रजी सत्तेकडे परित्राण मागितल्यामुळे आणि विशेषत: गुप्त्यांचे प्रतिसरकार लोकप्रिय होत चालल्यामुळे, त्या गुप्त्याना पकडून देणाऱ्यासाठी इंग्रज सरकारने हजारापासून पंधरा–पंचवीस हजारापर्यंत बक्षिसेही जाहीर केली. हात चोळीत बसण्याइतकेच यश लोकांनी इंग्रजास दिले. रात्रीअपरात्री बायाबापड्यानीसुद्धा गुप्त्याना कांदाभाकर खायला दिली आणि परकीयसत्तेच्या पोलिसाना त्यांचा मागमूसही लागू दिला नाही !! गुप्त्यांना त्या लोकविश्वासामुळे आपल्या कारभार–कर्तृत्वाबद्दल आत्मविश्वासही आला आणि लोकहि राजीखुषी होते. अशाप्रकारे प्रतिसरकार रामराज्याची किरणे फेकू लागले असता, काळाच्या ओघातच अहंभाव आणि सत्तालोलुपता यानी सरतेशेवटी गुप्त्याना घेरावयास कमी केले नाही. चिमठाण्याचे खजिना लुटीपासून, त्या विकारसंनिपाताला प्रारंभ झाला असे

म्हणावयास सर्वसाधारणपणे हरकत नाही !! लाखो रूपये हाताशी एकदम लागल्याकारणाने, आपण म्हणू ते धोरण व बांधू ते तोरण असे गुप्त्याना होऊन गेले. त्यायोगेच प्रतिसरकारच्या स्वास्थ्यसरणीला अर्धांगवायूचे झटके येऊ लागले. गुप्त्यापैकी जे निर्मळ चरित व प्रागतिक होते, त्यांनी ते झटके थांबविण्याचे प्रयत्न केले तरी ते वंदनीय आणि पराकाष्ठेचे प्रयत्न १९४४ सालच्या अखेरीस सपशेल पालथ्या घड्यावरचे पाणी ठरले. त्यामुळे शिलवन्तांच्या नेतृत्वाखाली आपली स्वतंत्र संघटना उभारणेचाही त्यानी विचार केला. पण त्या सुमारास दुसरे जागतिक महायुद्ध म्हणून सगळ्यानी संबोधिलेली जगाची हिटलरी होरपळ संपुष्टात येत चालली होती आणि अहंभावी व सेवाभावी गुप्त्यांच्या संघटनेचें पेकट मोडावयास इंगजांच्या हाती थोडीफार लष्करी सज्जताही सहज साध्य झाली होती. खेड्याखेड्यातून आता लष्करी तुकड्या मोर्चे काढू लागून दहशतीचे वातावरण उभारू लागल्या. त्यामुळे देशद्रोही कृत्याला परकीय सरकारच्या कानाशी भुंकावयास चांगलाच वाव मिळाला. सातारा जिल्ह्याच्या मुख्य पोलिसठाण्यातून चार बंदूकी पळविणारांची नावे आणि प्रामाणिकपणे प्रतिसरकार यशस्वी करून दाखविणारांची गाववार नोंद एकदम सरकारच्या हाती आली ती वर म्हटलेल्या कानभुंकीतूनच !!!

## लोकमताचे नाणे

या अवस्थेतून जात असताच जागतिक प्रतिष्ठाच इंग्लंडची इतकी चिघळली की, हिटलरी होरपळीत मिळालेला विजयही हळूहळू अपयशापेक्षा दु:सह होऊ लागला. तेव्हा स्वत:च्या स्वास्थ्यासाठी आणि आपली प्रतिष्ठा स्वर्गसारीपाटातील सर्पाच्या शेपटीवर येऊन बसली होती, ती तेवढी तरी अबाधित राखण्यासाठी इंग्लंडने हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या मुक्त करून आपल्यातर्फे त्याची रजाच घ्यावयाची असे ठरविले. म्हणून हिटलरी होरपळ संपताच १९४५ साली इंग्लंडने भारतीय लोकमताचे नाणे खणखणीतपणे कसे आवाज देते, ते पाहण्याचे ठरविले. स्वत:च्या, काँग्रेसच्या आणि इतर पक्षीयांच्याही लोकपाठिंब्याचा अंदाज नव्या निवडणुकानी पडताळला जाणार होता.

## निवडून आलो

सन १९४६ साली झालेल्या निवडणुकीत सातारा जिल्ह्यातून मीहि एक प्रतिनिधी म्हणून काँग्रेसक्षीय आठजणात निवडून आलो. आमच्यामध्ये श्री. यशवंतरावजी चव्हाण, केशवराव पाटील कामेरीकर व गौरीहर सिंहासने हे गुप्त्यांपैकी होते. ब्रिटिश सरकारची लोकमताबद्दल मनोमन खात्री पटली आणि बॅ. जिनांचे मत असेल तर अखंड हिंदुस्थान आणि नसेल तर हिंदुस्थान व पाकिस्तान असे स्वतंत्र देश निर्माण करून इंगजांनी आपला राजकीय गाशा हिंदुस्थानातून गुंडाळण्याचे ठरविले. १९४७ च्या ऑगस्टमध्ये पाकिस्तान व हिंदुस्थान ऊर्फ भारत अशी दोन राष्ट्रे निर्माण केली. खग्रास ग्रहणाचे खंडग्रास ग्रहण

झाले. इंग्रज गेले, काळेसाहेब आले. कारभारकुशलतेचा नेटका अनुभवच एकशे नव्वद वर्षाच्या इंग्रजी राजवटीत खलास झाल्यामुळे, इंग्रजी राज्याच्या जुन्या चाकोरीला फारसे सोडून नव्या राजवटीला जाताच येईना. इंग्रजी राजवटीत जे काळे कारभारयंत्रणेत होते, ते आपलेच देशबांधव असल्याकारणाने, नव्या राजवटीत त्याना जुळते करून घेण्याची ही जबाबदारी कमी नव्हती. त्यामुळे स्वराज्यासंबधीच्या लोकापेक्षा जितक्या जलद पुऱ्या होतील असे वाटत होते, तितक्या जलद त्या पुऱ्या होत नव्हत्या. म्हणून लोकप्रतिनिधीना कारभारसूत्रधारांच्या नजरेस लोकापेक्षा व लोकदु:खे पुष्कळ वेळा तीव्रतेने आणणे भाग पडू लागले. त्याशिवाय कारभार यंत्रणेतून लोकदु:खाचा निरासच होत नव्हता. प्राथमिक शिक्षकांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण आणि त्यांच्या जीवनमानाची बाजारदराप्रमाणे मातबरी यासाठी थोडी फार वर्दळ करावीच लागली. अशाच प्रकारची लोकसेवा साधताना कारभारातील काही त्रुटी, दुर्लक्षे अगर बेफिकीरी यांच्यावर कर्तव्यकठोरतेने बोट ठेवणेही जरूर होऊ लागले. माझ्यापुरतेच बोलावयाचे तर पक्षप्रतिष्ठेला बाधा तर येऊ नये आधि लोकसेवा तर जाहीर नि:स्पृहपणाने व्हावी म्हणून भाषणापेक्षा प्रश्नोप्रश्नांच्या बारकाव्यानी सत्तारूढपक्षाच्या मंत्र्याना आणि त्यांच्या खातेवार चिटणीसाना त्रास होण्याइतके मला, नाइलाजाने का होईना, पण शिणवावे लागले. तथापि माझ्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनामुळे, कारभारी मंत्र्याना मला अनेक समित्यावर व विधेयकांच्या चिकित्सा समित्यावर निवडावे लागलेच. प्राथमिक शिक्षणाच्या,( पब्लिक सेफ्टी ) लोकस्वास्थ्य संरक्षणाच्या, सहकारी कायदादुरूस्तीचा अशा कितीतरी चिकित्सासमित्यावर मी कामे केली व माझी मते मी स्पष्टपणे मांडली. कारभारकुशलांचा काही काळ थोडा फार रोष माझ्यावर झाला, पण माझ्या वृत्तिच्या मागे माझ्या कसल्याही स्वार्थाची प्रेरणा नाही किंवा दुसऱ्या कोणत्याही पक्षाच्या हातातील मी कळसूत्री बाहुली नाही, असे अनुभवाने ठरताच, '' तुमच्या प्रश्नोपप्रश्नापासून आम्हाला पुष्कळ प्रकाश मिळाला '' असे मंत्रिमहाशयानी समक्षच कळविले होते. त्यात प्रामुख्याने गृहमंत्र्याचा मला कृतज्ञतेने उल्लेख केला पाहिजे. मराठी वृत्तपत्रसृष्टी तर मला विधानसभेचा रामभाऊ मंडलीकच समजण्यापर्यंत मजल मारून बसली होती. मी ज्या कॉंग्रेसपक्षाचा होतो व आहे, त्याचा कारभार संशयातीत व निर्दोषच निर्दोष चालावा म्हणून कर्तव्यदक्ष बंधुभावानेच मी चाललो होतो आणि त्यामुळेच माझ्या आमदारीची परिसमाप्ती होताना, जी सिंहावलोकने प्रसिद्ध झाली, त्यात माझ्या निर्मळ, नि:संकोच व लोकहितदृष्ट्या कार्याचे प्रांजळ गौरव प्रसिद्ध झाले.

## लोकशाहीचे संगोपन

'' चलेजाव '' ची चळवळ जनसामान्यानी जीव ओतून संगोपिली होती व म्हणून लोकशाहीच्या मूलभूत संगोपनासाठी जनसामान्यांच्या '' उचित हित ''– साधणीवरच प्रत्येक विचारवंताने लक्ष ठेवले पाहिजे, तरच स्वराज्याबद्दलचा जिव्हाळा जनसामान्यात नंदादीपासारखा अखंडपणे तेवत राहील. जनसामान्यांचा समुदाय घेऊन चळवळीचे प्रारंभी तहसीलीवर, न्यायमंदिरावर अगर शाळा कॉलेजावर '' तिरंगी '' फडकवण्याचा खटाटोप

म्हणजे म.गांधीचे अनुकरण करून, सत्ता काबीज करण्याच्या अगर समान्तर सरकार स्थापन करण्याच्या जननिश्चयाची आगाऊ परसत्तेला दिलेली समज होती. जनसामान्यांची ही मानसिक तयारी जाणकार पुढारी १९३५ साली काँग्रेसचा सुवर्ण महोत्सव झाला तेव्हापासूनच करीत होते. वसईच्या ( १८०२ च्या ) तहापासून काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवाअखेर आपापल्या जिल्ह्यातील स्वातंत्र्य प्रयत्नांचा आढावा घेण्याचे मनावर घेऊन उगवत्या पिढीला इतिहाससिद्ध वारसा कोणता आहे, हे दाखवून ठेवावे असे मनसुबेही हाकले गेले. जिल्ह्याजिल्ह्यांतून या कल्पनेला साकार करण्याचे प्रयत्न निष्ठावंतपणे तेव्हापासून झाले असते, तर ब्रिटिश-रियासतीची वासलात लावून टाकणाऱ्या स्वातंत्र्यान्दोलनाचा अखिल भारतीय इतिहास जिल्ह्याजिल्ह्याच्या इतिहासांच्या दृढभाजकातून सहज तयार झाला असता ! सातारा जिल्ह्याने याबाबत हयगय केलेली नाही. ब्रिटिशांच्याविरूद्ध सातारच्या चतुरसिंग भोसल्यानी १८०४ मध्ये उभारलेल्या व अकरा वर्षे चालविलेल्या उठावापासून सातारा जिल्ह्याचा इतिहास काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवाचे वर्षापर्यंत लिहून तो जनतेच्या हाती सातारा जिल्ह्याने त्या महोत्सवाचे वेळी दिला, तो प्रस्तुत लेखकाच्या विनम्र चिकित्सेला व लेखणीला सेवेला लावूनच ! ! त्या ऐतिहासिक पुस्तकाचे स्वागत जनतेकडून आणि इतिहासज्ञाकडून मुक्तकंठाने एवढे झाले की दुसऱ्या आवृत्तीची मागणी १९४५ सालापासून तीव्रतेने होऊ लागली. लोकांची अपेक्षापूर्ति करण्यासाठी आणि पहिल्या पुस्तकाचे नुसते पुनर्मुद्रण करण्यापेक्षा त्याची तारीखतागाइत आवृत्तिच काढली तर काढावी म्हणून मी अभ्यासास लागलो आणि आमच्या लोकप्रिय भाऊसाहेब सोमणासारख्या नेत्याने संस्थापिलेल्या लोकसेवासंघाने प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्यामुळेच १९६५ अखेरचा सातारा जिल्ह्याचा इतिहास १९ जानेवारी १९६६ रोजी सातारा जिल्ह्याचे सुपुत्र ना. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पुरस्काराने व शुभहस्ते प्रसिद्ध झाला. या इतिहासात सशस्त्र क्रांतिकारकसुद्धा सर्व जहाल मवाळ पक्षोपक्षानी राष्ट्रस्वातंत्र्यासाठी केलेल्या सेवेचा नि:पक्षपाताने आढावा घेतलेला आहे आणि तो लोकपसंतीस व जाणकारांच्या चिकित्सतेच्या कसोटीस उतरला आहे. प्रस्तुत " लेखकूला " तो इतिहास म्हणजे आपल्या लेखणीची एक करामत वाटते यांत शंकाच नाही.

## महाराष्ट्रीय कर्तृत्व

" जागृत सातारा " मी माझ्या इतिहासाच्या पुस्तकाप्रमाणेच " अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र " ही माझी ऐतिहासिक पुस्तकेहि लोकप्रिय झाली. त्या सशस्त्र स्वातंत्र्यसमरात दक्षिण भारतात काही फारसा उठावच झाला नाही, ही समजूत तर त्या पुस्तिकेने घालविलीच, पण जनतेतील सर्व थरांच्या लोकांनी त्या स्वातंत्र्यसमरात भाग घेतला होता हे मी अनेक अस्सल पुरावे देऊन हा राष्ट्रीय कर्तृत्वाचा आविष्कार त्या पुस्तिकेत केला

आहे. या इतिहास पुस्तकाइतक्याच निर्मळपणाने माझ्या लेखणीने ''आगरकरांशी ओळख '' लोकप्रिय भाऊसाहेब सोमण, नामदार गोखले व वेदव्यास पंडितजी सातावळेकर ही चरित्र पुस्तके प्रसवली व तीही लोकांच्या कौतुकास पात्र ठरली. चरित्रनायकाच्या गुणदोषांची चिकित्सा चरित्रनायकाची आदब राखून करावयाचीच करावयाची; पण चरित्रनायकाचा मोठेपणा वाचकमनावर ठसविण्यासाठी चरित्रनायकाच्या विरोधकांचा, सामनेवाल्यांचा, समकालीनांचा पाणउतारा चुकूनही करावयाचा नाही, हे व्रत त्या चरित्रग्रंथांत कटाक्षाने पाळले गेले असल्याकारणाने चरित्रनायकाचा सोज्ज्वळ अभ्यासच तरूण मंडळींच्या सुष्टु वाचनासाठी मी सादर केले असल्याचा आनंद अनेकानेक अभिप्रायकानी व परिक्षकानी व्यक्त केला आहे.

## एक ठेवा

वरील चरित्राबरोबर अनेक पौराणिक, राष्ट्रीय, ऐतिहासिक स्त्रीपुरूषांची कथाचरित्रे मी उगवत्या पिढीच्या संस्कारक्षमतेसाठी लिहिली असून महाराष्ट्रातील बालवाचकानी व बालशिक्षणतज्ज्ञानी दिलेला प्रतिसाद हा माझा एक ठेवा आहे.

## जीवनाचा अमृतमहोत्सव

कऱ्हाड येथील अर्बन बँकेचा दहा वर्षे चेअरमन म्हणून केलेली लोकसेवा, शिवाजी एज्युकेशन सोसायटीचा चेअरमन व ट्रस्टी म्हणून मी लोकशिक्षणाची उभारी, नाट्यादि कलागुणांची मी नवयुवकामध्ये केलेली जोपासना, अथवा प्रसंगवशात् मी दिलेली व्याख्याने, लिहिलेले लेख व केलेली संपादने यांच्या योगाने '' रिकामा जाऊ ना दे क्षण '' अशा कटाक्षाने मला माझ्या जीवनाचा हिशोब घेता येतो व कोणी मागितलाच तर देताहि येतो. वयाची साठी उलटल्यापासून मी कोठेही कसलीहि अधिकाराची खुर्ची घेण्याचा प्रयत्नही केलेला नाही आणि जन्मात केव्हाच कोठलीही अडविली नाही. किंबहुना '' जनाचा प्रवाहो चालला म्हणजे बरे । तुंबता कामा नये '' हे मी पहात आलो आहे व तोच माझ्या जीवनाचा अमृतमहोत्सव आहे.

## दिल के बोल

पत्रातून व मुलाखतींतून व्यक्त झालेले
बाबुराव गोखले यांचे मनोगत.

## मन की कहानी

जब दूरसे बोलना पडता है, तब सीधेसे सीधा साधन खतही होता है
बंदीखानेसे रिश्तेदारोंको दिलके बोल देनेका खतही एक उपाय है।
हाँ, जब बन्दीशाला मेरा राजभवन था तब कौटुंबिक कर्तव्य
के बारेमें लिखापढी मेरी एकही साधन थी।
('दिल के बोल' मधून)

पांडुरंग गुंडो गोखले

सातारा १२-६-२०
सकाळी ८-३० वा.

आपला निरोप घेऊन निघालो तो आज सकाळी ६ वाजता येथे सुखरूप पोहोचलो. नालेवरून टांगा करून आलो तो कऱ्हाड स्टेशनवर ९-२० झाले होते. मेल येण्यास बराच अवधि होता. भूक लागल्यासारखी वाटली म्हणून तीन आण्याचे आदपाव पेढे व एक आण्याचा चिवडा घेऊन खाल्ला. मेल येईपर्यंत ' फर्स्ट अँड सेकंड क्लास ' वेटिंगरूममध्ये खुर्चीवर बसून होतो. मेल फारच उशीरा आली. इतकी उशीरा की तिने जेव्हा कऱ्हाड स्टेशन सोडले त्यावेळी बरोबर बारा वाजले होते. मग इंग्रजी नियमितपणाचे बारा वाजल्याचे ते द्योतक असल्यास न कळे ! गाडीत गर्दी चिकार होती. कारण दोन का तीनच, तिसऱ्या वर्गाचे डबे होते. मला सक्त मजुरीची निष्कारण शिक्षा झाली. सातारा स्टेशनवर वहाने पावसाळ्यातल्या वहानाइतकी विपुल नव्हती. त्यामुळे धमणीस एक रूपाया सीट पडू लागली. तेव्हा चार आणे अधिक देऊ करून टपाल टांग्यातून येथे सहाला येऊन पोहोचलो. चि. कृष्णाची प्रकृती बरी आहे. अशक्तपणा त्यास सोडत नाही. अन्न अजून खात नाही म्हटले तरी चालेल. चालत नाही, पण बोलतो बराच.

धुंडिराजशास्त्री बापट

पुणे
१२-७-१९२३

आपले कृपापत्र जूनच्या २६ तारखेसच मिळाले. पत्रावरील पत्त्यात घरनंबर ६८९च्या ऐवजी चुकून ३८९ पडला आहे. कदाचित माझ्या सांगण्यातच चूक झाली असेल! आपल्या पत्राचे उत्तर इतक्या दिरंगाईने घालण्यात वडिलांचे वळण सवाईने गिरवत असलो तरी त्यालाहि थोडेसे कारण आहेच. पैकी एक भाग म्हणजे आपण स्वत: ता. १मिनहूच्या सुमारास इकडे येणार होता, ते अजून आल्याचे कळले नाही.

जूनच्या २० तारखेसच मी कॉलेजमध्ये नाव घातले आहे. प्रेमळ मित्रांच्या व हितचिंतकांच्या सहाय्याने जागेची वगैरे व्यवस्था नीट लावून अभ्यासाचे बस्तानही गेल्या दहा तारखेपासून चांगले जमले आहे. येथे मी अभ्यासासाठीच राहिलो असल्याकारणाने दुसरीकडे लक्ष बिल्कुल पुरवणार नाही. माझ्या अभ्यासाबद्दल काळजी करू नये.

पांडुरंग गुंडो गोखले

पुणे, ५९८ , बुधवार
ता. ३-१०-१९२३

कृ.शि.सा.न.वि.वि. सोमवारी सायंकाळी ६॥ वाजता निरा कालव्यावर रा. गोविंदराव रानडे यांजकडे उतरलो. त्या नव्या संसाराचा प्रेमळ पाहुणचार घेऊन व रात्रौ उघड्या हवेची थंड व शांत झोप घेऊन सकाळी ७ च्या गाडीने रा. देशपांड्यांच्या वाल्ह्यास गेलो. गावचा स्वच्छ साधेपणा, मोकळी हवा, भरल्या शेतांचा सुंदरपणा, महर्षी वाल्मीकिच्या पुण्य समाधीचे दर्शन आणि या सर्वांपेक्षाही मि. देशपांड्यांची गोड आपुलकी यांचा वेडावतार आस्वाद घेऊन

मंगळवारी ११ च्या गाडीने पुण्यास ३वा. ५मि. नी आलो. कणसे, तिखट व सुंठीच्या वड्या वगैरे ती.गं. आत्याबाईंनी दिलेले ज़िन्नस पोचविले. चि. माणकूताई भावे डेंग्यू तापाने आजारी होती ती आता बरी आहे. सौ. काशीताईस मात्र एक दोन दिवस ताप आला होता. आजपासून ( ३-१०-१९२३) कॉलेजला व्यवस्थित येऊ लागलो असून उद्यापासून अभ्यासाला सुरुवात करतो. ती.गं. आजीस बालकाचा शि.सा.न. कळावे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

आपला नम्र

पुरुषोत्तम

धुंडिराजशास्त्री बापट ७-१-१९४१

रत्नागिरीस वे.शा.सं. वासुदेवशास्त्री केळकर ( तात्या हे त्यांचे घरगुती नाव ) व केळकरांच्या सर्वच मंडळींनी चि. मथूचा परिचय करून घेतला आणि एकंदर घराची राहणी व केळकर मंडळींच्या स्वभावछटा अगदीच स्थूलमानाने तरी चि. मथुरेच्या ओळखीच्या झाल्या, अर्थात केळकरांना मथुरा व मथुरेस केळकर घराणे मनपसंत ठरले. पण त्या दिवशी उपवधू केळकर रा. कृष्णराव तेथे नव्हते. ते आपल्या धंद्याच्या काही कामानिमित्त परगावी होते ते रविवारी रत्नागिरीस आले. नंतर त्यांनी मथुरेस व मथुरेने त्यांना पाहिले. प्रश्न कोणीच कोणाला विचारले नाहीत. फक्त रा. कृष्णराव माझ्याशी बोलले. त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट आशय असा दिसला की वधूपित्याने वरपरीक्षा करावयास येणे जरूर होते. त्यावर मी ( धुंडिराजशास्त्री बापट यांच्या पत्राप्रमाणे ) ' अधिकृत ' आहे असा खुलासा केल्यावर, '' मी आपला चार इयत्ता इंग्रजी शिकलेला हरहुन्नरी आहे. पतकरत असला तुमच्या मुलीला तर पहा !'' असे रोकडे उद्गार रा. कृष्णराव केळकरांनी काढले. विशीच्या तरूण आणि तरतरीत मुलाला शोभण्यासारखे ते उद्गार होते. मुलगा आहे सडपातळ. पण हुरूपाचा नि चलाख वाटला. मथुचेही तसेच मत झाले असावे. कारण तिने स्थळाबद्दल पसंतीच व्यक्त केली आहे. तेव्हा चि. मथुरेस रत्नागिरीकर केळकरांकडे द्यावयाचे ठरवावयाचे असले तर –

१. रत्नागिरी ते वाईपर्यंत व परत केळकरांच्या वीस (तेवढीच त्यांची मंडळी जास्तीत जास्त येतील) मंडळीच्या भाडेखर्च करावा लागेल.

२. लग्न दोनही अंगी करून द्यावे लागेल.

३. नवरा मुलगा, त्याचे वडील, थोरला भाऊ व त्याची पत्नी, धाकटे दोन भाऊ, तीन बहिणी, मामा-मामी, आत्याबाई वगैरे मंडळी मानाची म्हणून लक्षात ठेवून मानपानाचा खर्च करावा लागेल. (वरपक्षाकडील कोणी रूसणा-रागावणार नाही)

४. रा. तात्यांच्या पत्नी म्हणजे नवऱ्या मुलाच्या मातोश्री यंदाच वारल्या असल्यामुळे लग्न फाल्गुनापुढे ठेवावयाचे नाही. मात्र वे. तात्या केळकर यांना माघ व ॥ ७ मीच्या आसपासचा मुहूर्त नको आहे, कारण त्यावेळी त्यांचेकडे ' पितृथिती ' असते.

श्री. बापट २५० एक रूपये सदर लग्नाप्रीत्यर्थ खर्च करू शकतील, जास्त नाही अशी स्पष्ट कल्पना मी वे. तात्या केळकर यांस दिली आहे व ही सर्व हकिगत श्री. बापटांकडे कळवून त्यांनाही स्पष्ट कल्पना दिली आहे की '' सभ्य गृहस्थ म्हणून आपुलकीने जेवढे

करता आले तेवढे केले. यापुढे कसलीही जबाबदारी मजवर नको. कारण राजकारणातील आंदोलनात मी आता निर्धास्त किती राहीन, याचा नियम नाही ''

विनायकराव फणसळकर
येरवडा
६-१-४३

मेरी खबर है की बेलापुरेजीका नाटकगृह–नहीं नहीं बोलपटगृहकी सुविधाके लिए हमारी गल्ली म्युनिसीपैलटीने चौडी की है। इसवास्ते हमारा पैखाना तथा कचराखाना भी स्वतंत्र कर दिया है। हमारा नुकसान जैसे पडोसी न चाहे या न करे तो कौन कंगाल चाहेगा या करेगा। नुकसानी, कष्ट या आफत मुझे तो नयी चीज नहीं है। लेकीन जब विना अपराध वह आती है, विशेषत: अपने माने हुए जिवलगोंकी संमतीसे या लापरवाहीसे, वह कष्ट या आफत हृदयको जबरदस्त धका देती है। श्री. जोशी वकील, मेरी रायसे, एक **नाथाके ट्रस्टी है न ? उनकी जिम्मेदारी उन्होंने अपनी दिखाऊ मित्रता के लिए फेंक दी है ऐसी है मेरी खबर। क्या उसमें कुछ सत्य है ? --- अगर यह घटना सार्वजनिक हितसंबंधमें हो, तो बेलापुरजीका नाटकगृह नये कानूनसे सम्मत रचना धारण कर रहा है ? क्या हमभी सार्वजनिक जीवनके घटक नहीं है ? सिर्फ कंगालीसे और सत्ताहीनतासे समंजस पांढरपेशी पडोसी हमारी बनाते हैं, क्यों कि वे पूंजीवाले है या वशिलेबाजी उनके हाथोंका मामला है। वाहवा हमारी सामाजिक नीति।

श्री. पंडितराव बापटजीने शनैश्वर ता.२ जान्युआरी १९४३ रोज मुझे एक गुलकंदकी शिशी, वॉशिंगसोप और कुछ चिवडा भेजा था। ता. ३ जान्युआरी १९४३ रोज मैंने उनके साथ म्हस्करसाबके दो घीके डिब्बे, एक खौबरेलकी शिशी, एक दंतमंजनकी, दो रक्तवर्धककी और एक थैलीमें मैंने गांधीजयंतिसे उस दिनतक काता हुआ चालीस (४०) गुंडी सुत वापिस लौटी है।

चिरंजीवी उज्ज्वलाकी पूर्वपरीक्षा इस हफ्तेमें होनेवाली है।यदि उसकी परिक्षाकी फी उसकी माँ के साथ न हो तो विनायकराव फणसळकर तरतूद करनेवाले है।

भास्कर
येरवडा इस्पिताल
२२-३-१९४३

अंत:करणके सब सद्‌भावोंसे मैं आशीश देता हूँ। उनकोही मंगल अक्षताएं समझो। राजाकाका कुलकर्णी पिंपलेकी राष्ट्रीयशालासे वैसेही चाहते हैं। कर्तव्यकी पूरी चाहनेवालोंको अपनी सब अभिलाषाअें प्राप्त नहीं होती जैसी आज हमारी। मगर ह्दय ह्दयसे कहाँभी मिल सकता है। तो तुम समझो। जीवन झगडा नहीं; विकास है। उस विकासमें भलपनका सुवास और कर्तव्यदक्षता की क्रान्ति होनी चाहिये। उनके लिए, हमारी गलती– गफलतीको जानबुझकर ठुकरा दो और जो कुछ शील हो उसका अनुकरण करो।

उपनिषद्‌का उपदेश यही है। व्रतबंधी यानि संयमी होकर तुम आजसे (२६ मार्च) गायत्रीका उपासक और सरस्वतीका सेवक बनते हो। अच्छा यशस्वी हो। प्राथमिक प्रमाण परीक्षामें सौ में ६५ गुण की कमाई होगी ऐसा उज्ज्वलाका आत्मविश्वास है।

मेरी मूलव्याधि उठी नही, न उसके ऑपरेशनकी जरूरत। यदि हो तो फौरन कर लूँगा। ( तुम्हारी माँ ) भोली लिखती है ' हमारे लिये तबियतकी खराबी मत करो '। क्या मुझे आकांक्षा नहीं कि मैं कर्तव्यदक्ष सौ बरसकी उम्र संसारको दूँगा। मगर लाचारीसे नहीं। उसकी यह भी राय होगी कि घरके हिसाब पढनेसे मैं कष्टी हो रहा हूँ। सचमुच यह भूल है। जो कठिनाई बाहर तुम लोगोंको उठानी पडती है उसमें मै भागी नहीं, इतनीही मेरी लाचारी है। बल्कि तुम्हारी माँ, भाऊकाका, या वैद्यकाका तथा म्हसकरसाहब और सौ. कमलाबहुजी मेरे लिए तुम्हारे मामाजी जैसे कष्ट उठाते है, पैसा बेंचकर मेरी सुखरूपता सफल करते हैं। जिनके बारेमें मेरे हार्दिक धन्यवाद अधुरे हैं।

डॉक्टर नारायणरावजी कोल्हापुरेजीने छपी हुई मेरी किताब ' गीताधर्म प्रवेश ' का प्रकाशन सौ. सुलोचनाने गीताजयंती को किया है। किंतु इसका खर्चा क्या हुआ, इसका कागजका बिल क्या है वगैरे सब नतीजा मुझे मालूम होना चाहिये।

चिरंजीवी उज्ज्वलाको भी कह दो कि खतके उपर उसकी तारीख लिखना जरूरी है। परीक्षामें यह तिनकीसी भूल भी गोता दे सकती है। उज्ज्वलाके लिये मैं यहाँ एक राष्ट्रभाषा का परिचय देनेवाली किताब तैय्यार कर रहा हूँ। जो महत्ता पिछले पिढीमें अंग्रेजीकी थी वह है आगामी पिढीमें राष्ट्रभाषाकी। इसलिये मैं मेरे घरसे प्रथा शुरू करता हूँ।

इंदुमती येरवडा जेल

२७-५-

१९४३

जबतक सौ. सुलोचना काम कर नहीं सकती और सिर्फ घूमनेमेंभी तकलिफ उसे मालूम होती हैं, तबतक उसकी तबियतका अहवाल मुझे हररोज मिले तो अच्छा होगा। मैं यह चाहता हूँ कि यहाँ मेरी चिन्ता कम हो जाय। क्योंकि मेरी नींद उड गई है। तुम्हारी माँ को सन्धिवात है। इस बीमारीके लिये एक दवाई सितारेके श्री. दामुअण्णा एकबोटेजीकी माँके साथ है। वह सितारामपंत गरूडजीकी हाथसे तुमको मिलेगी। कोशीश करो।

उज्ज्वलाकी शिक्षाके लिये क्या मुक्रर हुआ। उसे कन्याशालामें जाना हो तो जाओं। जरूरीके लिये पैसा ख़रच करनेमें मत डरो।

डॉ. वाचासुंदर साहबने मुझे लिखा है कि मैं तुरन्त वहाँ आवे। तुम्हारी माँकी सेवा मेरे हाथों होना जरूरी है। पर वह बात इतनी सीधी नहीं है। क्या मैं खुद माफी माँग कर राष्ट्रसभाकी कीरत बद्द कर दूँ।

मेरी मूलव्याधि भी १ मअीसे जोर कर रही है। उसकी ऑपरेशन जरूर पडे तो मैं करनेवाला हूँ। देखता हूँ तकदीर क्या है।

गेल्या वर्षात

येरवडा मंदिरातून सुटून आल्यावर वर्षभर आपण आपली प्रकृती अतिशय नादुरूस्त व कित्येक प्रसंगी तर अंथरूणाला खिळवून टाकणारी असताना काय काय

लोकसेवा केली याचे एक टिप्पण जनतेस सादर करीत आहे :

(१) हिंदी ही राष्ट्रीय भाषा लोकव्यवहाराची व्हावी, यासाठी तिचा दैनंदिन व्यवहारातील परिचय जनतेस असावा म्हणून जिल्ह्यातील वृत्तपत्रांनी काही मर्यादित जागा नियमितपणे द्यावी अशी खटपट केली, तिला सक्रीय आशीर्वाद फक्त ऐक्य, श्रीशाहू आणि लोकसंख्या यांनी वाढत्या प्रमाणात दिला.

(२) जिल्ह्यात आज दोन वर्षे खरा खावयाला उठलेला प्रश्न लोकांच्या भाकरीचा होता. याबाबतीत लोकांना विश्वासात घेऊन शास्त्रशुद्ध नी यशस्वी धोरण कसे आखता येईल याचे स्पष्ट दिग्दर्शन करणारे पत्र मे. कलेक्टरसाहेबांस लिहिले. तसेच जिल्ह्यातील अन्नप्रश्नावर. लोकसंख्या ( सांगली ), ऐक्य, काळ, सकाळ, ज्ञानप्रकाश, लोकमान्य, भारत ज्योती ( इंग्रजी ) या वृत्तपत्रातून लेख व मुलाखती प्रसिद्ध केल्या. याची परिणती म्हणून जिल्ह्यात ' सर्वपक्षीय धान्य समिती ' आ. शंकरराव साठे यांच्या अध्यक्षतेखाली होऊन गाडी रूळास लागली. मुंबईचे मेयर मसानी यांनी प्रांतिक परिषद अन्नधान्याबाबत बोलाविली होती. सरकारने मासिक पत्रकार परिषद बोलाविली होती. या सर्व ठिकाणी मी गेलो होतो. तथापि सत्ताकेंद्रावर लोकविश्वासाचे लोकप्रतिनिधी असल्याशिवाय अन्नप्रश्न सुटणारच नाही असे माझे अनुभवान्ती मत झाले.

(३) १४ ऑक्टोबर १९४३ रोजी जिल्ह्यातील तुरूंगाच्या व्यवस्थेसंबंधी मी एक सडेतोड पत्र आय.जी.पीं. ना लिहिले, तेव्हा त्यांनी स्वत: लक्ष घालून शक्य तेवढ्या सुधारणा केल्या. ' कच्ची कैद ' किती अमर्याद असावी व पोलीस-किंवा मॅजिस्ट्रेटच्या ताब्यातील कैदी स्वतंत्र कुलूपबंदीत असण्याचे बाबतीत काहीच सुधारणा झाली नाही !!

(४) सदर्न मराठा रेल्वेमध्ये प्रवासाकरिता लावावयाच्या सूचना (पुण्यापासून हुबळीपर्यंत तरी) मराठीत असाव्यात म्हणून खटपट केली, पण यश आले नाही.

(५) युद्धोत्तर पुनर्रचनेच्या वेळी निवडक गावे घेऊन विखुरलेल्या क्षेत्रावर ग्रामोद्धाराचे आदर्श प्रयोग करण्यापेक्षा प्रस्तुत लष्करी उपयोगासाठी घेतलेल्या लोणंद भागातच ते प्रयोग केले तर दर तीन वर्षांनी जिल्ह्याच्या पूर्वभागात जाणवणारा दुष्काळाचा प्रश्न सुटेल. संकलित प्रयत्नामुळे अन्यथा खर्च वाचेल व इतर ठिकाणच्या ग्रामसेवकांना स्फूर्ती मिळेल असे मुंबई सरकारच्या निदर्शनास आणले व सरकारने ते स्वार्गताह मानले पण नीरा राईट बॅक कॅनॉलची शाखा आणून तो भाग सुपीक करण्याची सूचना अव्यवहार्य ठरविली आहे.

(६) बंगालच्या दुष्काळग्रस्तांसाठी घरोघर स्वयंसेवक धाडून रू. १७० जमा करून पाठविले.

(७) श्री. शि. ल. करंदीकरांनी आपले सावरकर चरित्र जप्त झाल्यावर लोकसंग्रह छापखान्यासाठी काढलेल्या फंडासही मदत केली.

(८) सांगलीच्या नाट्यमहोत्सवात व साहित्यसंमेलनात भाग तर घेतलाच; पण सातारा जिल्हा नाट्य समितीच्या नाट्येतिहास ग्रंथास माहिती पुरविली. कऱ्हाडचा नाट्येतिहास ( कऱ्हाडची नाट्यसेवा ) प्रसिद्ध करवला, कऱ्हाडच्या नाट्यमहोत्सवावेळी स्थानिक नाटककाराचे नाटक ( बाहुलीचा संसार ) रंगभूमीवर आणविले. गडकऱ्यांची २५ वी पुण्यतिथी

असल्याने त्यांचे ' भावबधंन ' नाटक बसविले होते.

(९) नाताळात होणाऱ्या परिषदांनी '' लोकशाही स्वातंत्र्याला धरून हिंदुस्थानची भाग्यरेखा ठरावयास हिंदुस्थानाच्या खालसा व संस्थानी प्रथेने निवडलेले स्वतंत्र मताचे प्रतिनिधी असतील तरच तह परिषदेस ठरणारा निर्णय मान्य होईल'' अशा अर्थाचा ठराव पसार करावा अशी मी जाहीर विनंती केली होती.

(१०) कोल्हापूरच्या पत्रकार परिषदेसाठी जाहीर सूचना ' श्रीशाहू ' द्वारे केल्या; त्या अनुरोधाने तेथे ठरावही पसार झाले. शिवाय आर्थिक सहाय्यही मिळवून दिले.

(११) दे. भ. बाळकृष्णपंत शिखरे यांच्या सुटकेची खटपट, समर्थ पत्र फिरून सुरू करण्याबद्दलचे व्यवहार, डॉ. भडकमकर सत्कार समितीचा गौरवग्रंथ संपादण्यास केलेली मदत आणि नोंदलेल्या पदवीधरातर्फे प्राचार्य-प्राध्यापकांच्या मंडळींनी खटपट करून जनता व विद्यापीठ यांचे संबंध निकट राहण्यासाठी स्वत:ची उमेदवारी, वगैरे बाबी अगदी, ताज्या आहेत.

(१२) या शिवाय १९४२ च्या आंदोलनामुळे उघडे पडलेले आणि अकारण टीकेस पात्र झालेले देशभक्त व त्यांचे कौटुंबीय यांचा परामर्ष मी आपल्यापरी घेतला तो लोकांपुढे मांडण्यास अजून काळ परिपक्व नाही.

(श्रीशाहू, सातारा)

धुंडिराजशास्त्री बापट २४-६-४४

( पत्र मोडीत )

कऱ्हाडच्या बातमीदाराने 'काळ' मध्ये व 'सकाळ' मध्ये पाटण तालुक्यातील एका गावी विजेने केलेल्या अनर्थाचे वर्णन दिले होते, कऱ्हाडचे नव्हते. तेव्हा इकडील काळजीचे कारण नाही.....

माझे निवडणुकीसंबंधी आपण काळजी घेतली याबद्दल कृतज्ञ आहे.

' तारीख ५ मे १९५३ रोजीं आम्हां उभयतांच्या वैवाहिक जीवनास तीस वर्षे पुरी होतात. या अवधींत आर्थिक अपुरेपणापासून अनेक अडचणींतून आम्हाला जावें लागलें असलें तरी एकंदरीने विचार करतां आमचे वैवाहिक जीवन सात्विक स्वाभिमानाचें व सदुपयोगाचेंच झालें आहे. हे समाधान वडीलधाऱ्यांच्या मंगल आशीवार्दांनी, बरोबरीच्या स्नेहांकितांच्या निकोप जित्हाळ्यांनीं आणि लहानग्यांच्या उत्साही सहकारानेंच आमचे वांट्यास आले आहे. म्हणूनच आज अशी ही अभिवादनपूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहोंत, मानून घ्यावी हे विनंती.'

पु. पां. गोखले -सौ. सुलोचना

'' माझ्याबरोबर आजपावेतो भाऊकाका गरूड, विनायकराव फणसळकर, नारायणराव पोतनीस यांनी अनेक सार्वजनिक कामात सहकार्य दिले आहे ''

'' सार्वजनिक आयुष्याच्या आरंभी जसा मी स्वयंसेवक होतो, तसाच उतारवयातही स्वयंसेवक म्हणून काम करावे असा माझ्या मनाचा कल आहे आणि म्हणून तरूणांना जागा

खाली करून देण्यासाठी मी पुढारीपणापासून अलिप्त रहात असतो. तरूण पुढाऱ्याच्या हाताखाली स्वयंसेवक म्हणून काम करण्याची आजही मला उमेद आहे आणि माझी तयारी आहे."

" मला पटलेला एक ध्येयादर्श आहे, तो म्हणजे रस्त्यावरच्या माणसाला रास्तपणे रस्त्यावरून चालविणे हे ज्याला साधेल त्याच गोखल्यांचा रास्ते होऊ शकेल असा आधुनिक काळाचा ओघ आहे."

" आपल्या सचोटीची हुंडी जनतेच्या अन्त:करणाच्या पेढीवर पटली पाहिजे तरच जीवनाची बँक यशस्वी झाली असे म्हणता येईल. जास्तीत जास्त कल्याण कशाने होईल आणि नुकसान सहसा कोणाचेच होणार नाही असा व्यापक दृष्टिकोन प्रत्येक बारीकसारीक गोष्टीतसुद्धा राखला पाहिजे तरच सार्वजनिक जीवन सार्थ म्हणता येईल "

(मुलाखत, दै काळ, पुणे २३-१-१९५४)

कृतज्ञतेचा नमस्कार ३१-१-१९५४

प्रिय महाशय,

शनिवार ता.२३ जानेवारी १९५४ च्या नेताजी जयंती दिवशी महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या आशीर्वाद-मांगल्याने आम्हा उभयतांचा जो लौकिक सत्कार झाला, त्यात अन्नपाण्यापासून बसण्या-रहावयाच्या गैरसोयीही सोसून, खेडोपाडीच्या शेतकरी-कामकऱ्यापासून तो शहरातील विद्वान-व्यापाऱ्यापर्यंत सर्व स्त्रीपुरूषांनी आपलेपणा दाखविला, एवढेच नव्हे, तर खरोखरच चार चार आण्याच्या देणग्यांनीही जी थैलीची भर केली ती आई जनाईचीही आमच्यावरील असीम माया आहे. त्या मायेची तोड कसल्याही वैभवाला जशी नाही, तशी तिची फेड कृतज्ञतेच्या अश्रूशिवाय आणि निकोप सेवेशिवाय कशांनीही होणार नाही. जागा अपुरी पडल्यामुळे सुमारे तीन हजार मंडळीस रस्त्यावर ताटकळत उभे रहावे लागले अगर बसावे लागले तरीही (आणि त्या मंडळीत सामान्यांप्रमाणे मातबर माणसेही होती) आपल्याच एका ' पोराचा ' गौरव पहाण्याऐकण्यासटी आणि विशेषत: महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या दर्शनासाठी व मार्गदर्शनासाठी त्या सर्व मंडळीनी कष्ट सोसले. त्यांची गैरसोय झाली याबद्दल सत्कार समितीला जेवढे दु:ख होत आहे, तेवढीच हळहळ आम्हा उभयतांना वाटत असून कृतज्ञतेचा साधा नमस्कारही समक्ष करण्यास जमले नाही, म्हणून या पत्रकाद्वारे ते कर्तव्य आम्ही करीत आहोत. स्वीकार व्हावा ही विनंती.

ज्या मंडळींनी शुभेच्छेचे संदेश पाठविले, ज्या ज्या वृत्तपत्रांनी गौरव-कौतुकाचे चार तरी शब्द लिहिले आणि आपापल्या घरी बसूनही ज्यांनी आमचा लौकिक होतो आहे याबद्दल संतोषाने माना डोलविल्या त्यांचे आम्ही आभारीच आहोत.

महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या मंगल आशीर्वादाबद्दल कृतज्ञतेच्या अश्रूशिवाय आमचे जवळ दुसरे काय आहे ? सत्कार समितीलाही आम्ही अभिवादन करतो.

आपले

पु. पां. गोखले-सौ. सुलोचना

सौ. सुलोचना गोखले ९ जुलै १९५५

काल ती. दादांची पुण्यतिथी होती. त्यांच्या आशीर्वादाने मी कालच माझ्या लौकिक कर्जातून पार मुक्त झालो आणि मग ' हिरण्य ' करून जेवलो. हे वाचून मी कऱ्हाडास श्राद्धासाठी आलो नाही, याबद्दल आपले सर्वांचे मन खट्टू झालेच असले तर आता आनंदित होईल.

चि. इंदुमतीला नौकरी करून आपले कुटुंब पोषण करावे लागत आहे हे मी विसरलो नाही. तिच्या सहकारामुळेच मुख्यत: मी कर्जमुक्त झालो. तिच्या लग्नाचेही जुळले नाही, ही रूखरूख माझे मनास आहे. पण ती. दादांचे आशीर्वादाने ती लवकरच दूर होईल अशी मला आशा आहे.

**TO, Board Of Directors** **Karad Urban Bank 1960**

We feel dutybound to write this letter. It is hereby requested that Urban Bank has to learn a good deal from the recent defaulter's case. While considering the application for sanction of loans in lumpsums at the General Meeting (Annual) on the 18th. sept 1960 and thenceforth, particular attention has to be paid to the sureties as also to the sure business. No individual loan should go up bey and the limit of fifteen thousand Rupees or there about; until social morals come to normality. Surprise checks and inspection of the sureties and goods at the disposal of the Bank as well as of the goodness_ought to be a practice regularly. Reports concerning the same must come forth as immediately as possible before the board and the supervising committee, both meeting together if and when possible. The Bank staff should not be allowed to grudge any rise in the clerical work arising out of this caretaking policy.

कृ. पां. गोखले १८ सप्टेंबर १९६२

मातुश्री कै. ती. सौ. रूक्मिणीवहिनी यांची आज बेचाळीसावी पुण्यतिथी. एकोणीस वर्षे मला त्यांनी वात्सल्याने सोबत दिली होती व मजबद्दल जिव्हाळा व अभिमान धरला होता. कृतज्ञतेने मी त्यांची पुण्यतिथी आजवर मानीत आलो व मातृगयाही केली व आजतर एकाहत्तर संस्थांना तीनशे पाच रूपये मातुश्रींचे नावे पावते करून पुण्यतिथी केली आहे. आता अनर्जनाच्या माथ्यावर वयाच्या चौसष्टाव्या वर्षात असलेल्या आणि आजपर्यंत

जीवनाच्या दऱ्याखोऱ्यांतून मार्ग काढीत आलेल्या माझ्यासारख्या सामान्य माणसाकडून यापुढे जे घडेल ते ईश्वरेच्छा.

आयुष्याचा ताळेबंद

झाली साठ नि सात आज वरूषे, हा जन्मल्यापासुनी
सांगे काळ गणोनि तै मम मनी हासू फुटे पांसुनी
वायसा गेलि किती, कितीक वरूषे वा लागली कारणी
यांचा काय हिशोब ? वा सकलही आली नि गेली सुनी ? १
आईने दिधले, जनात रूळले, ते नाव सार्थावया
केली काय कृती ? दिवे उजळिले वा प्रत्यया यावया ?
ताळेबंद तसा करोनि बघता जी जी पळे उज्वल,
आयुर्मानच तेतुले, उरत ते सारेच की निष्फळ. २
खाया काळ, भुईस भार बनुनी हो शून्य कोणी तरी
सर्वस्वे इतिहास रंगवि कुणी राहोनि शून्यान्तरी
शून्या त्या पहिल्या न मूल्य, भरली शून्यी परार्धे दुजा
दुष्टा शासन, सुष्टरक्षण, जना चैतन्य, जन्मा ध्वजा ३
लाखो सैनिक रक्त सांडिति रणी, सेनानिचे नाव हो
लाखो सेवक घाम गाळिति खरे चातुर्य पावो जयो
कोठे सैनिक-सेवकास गणती ? शून्यात त्यांच्या परी
पुण्याची भरली परार्ध-शतके-ती ईश्वराची परी ४
सेवाभक्ति तशी कृतिकृतिमधी, अध्यात्म ते जीवनी
ते हो संस्कृति भारतीय बहुधा आविष्कृता सद्गुणी
व्हावा शिष्य गुरूहुनी, बहुगुणी, ताताहुनी संतती
होवो दिव्य भविष्य, शून्य करूनी की वर्तमानाप्रती ५

समर्थ सातारा :
दिनांक २३ ऑक्टोबर १९६५

इंदुमती गोखले १५-११-६५

काल येथे श्री. वि. ना. फणसळकर यांची प्रकृती ब्लडप्रेशरने थोडी बिघडली होती. आता सारे बरे आहे... त्यामुळे एक विचार मला चाटून राहिला आहे. विनायकराव माझ्यापेक्षा नऊ महिन्यांनी लहान आहेत. त्यांच्या प्रकृतीचा विचार करता, त्यांच्या अगोदर मला स्वत:च्या प्रकृतीचा विचार करून काही गोष्टी तुम्हा मंडळीशी बोलावयाच्या अहेत आणि आवश्यक कर्तव्ये करून रिकामा व्हावयाचे आहे. पुण्यास यावयास मला मुहूर्त लाभला पाहिजे तो या दृष्टिने. पाहू या काय होते ते. शेवटी देवाच्या इच्छेवाचून एकही पान हलत नाही हे आहेच.

इंदुमती गोखले २५-७-१९६८

येथे यंदा पाऊस नाहीच म्हणण्याइतका कमी आहे. धरणफुटीची अकारण भीती घेऊन काही श्रीमंत व चोचलेबाज मंडळी गाव सोडून गेली आहेत... पानपतावरून नाना फडणवीस तोफांचे आवाज ऐकून तरी पळून आला, पण ही मंडळी कागदी, वृत्तपत्रीय व ज्योतिषी शब्दतांडवानेच नाना फडणवीसांची वारस ठरली. धरणफुटीची भीती कोयनेस निसर्गत:च व स्थापत्यकौशल्यानेही नाही आणि असती तरी आपल्या भोवतीची मंडळी सोडून मी तरी हाललो नसतोच !

२३-६-१९६९

श्री नवाथे मास्तर गेले, आचार्य अत्रे गेले, हे ध्यानात घेऊन मीही हात जोडूनच उभा आहे.

इंदुमती गोखले ८-७-१९६९

नव्या नातीचे नाव शिवगंगा, शुभांगी, शिवांगी ठेवावे असे निर्मला मनाशी ठरवून गेली आहे. नावरस नाव 'नो' प्रारंभाचे निघत आहे, ते काही सुचले नाही. चि. सौ. विनया ठेवील तेच नाव आम्हाला आवडेल.

द. र. कोपर्डेकर २५-७-१९६९

विट्याचे माझे मित्र श्री. बापूसाहेब जोगळेकर निधन पावल्याचे वृत्त मी आजच्या केसरीत वाचले. त्यामुळे विषण्ण आहे. तरीही आज श्री. विनायकराव फणसळकरांना ७१ वे लागत असल्याने, त्या कुटुंबाच्या आनंदात सहभागी व्हावयास जातच आहे. '' यासी जीवन ऐसे नाव।'' दुसरे काय ?

बाबुराव स्पष्ट बोलतो, माफ करा !

पुणे, दि. २९-१-७०

स. न. वि. वि.

प्रजासत्ताकदिनानिमित्त आपण ' पद्मश्री ' हा बहुमानाचा स्वीकार केलात याबद्दल आश्चर्य वाटले. आपणांस पद्मश्री करण्याच्या अगोदर विचारले होते का ? विचारले असल्यास आपण परवानगी दिली होती का ? ही माहिती आपण कृपा करून कळवावी. आपल्यासारख्या निरपेक्ष, बुद्धिमान, अभ्यासू, आणि निपटून स्वार्थ त्याग करणाऱ्याला पैसा प्रतिष्ठा यांची प्राप्ती एकसमयावच्छेदे करून देणाऱ्या अनेक जागा असून त्यांपैकी एकही जागा आपणास न देता देवाला नैवेद्य दाखवून तो स्वत: खाणाऱ्या बडव्याची भूमिका शासनाने घेतली आहे. आपण तिला मान्यता द्यावी हे आपल्या भूमिकेस विसंगत आहे. एका पत्रकाराने पद्मश्री

उपाधी परत केलेली आहे. आपणही ती परत करावी म्हणजे आपल्या प्रतिष्ठेशी ते सुसंगत दिसेल. सूज्ञास अधिक काय लिहावे ?
क. लो. अ. ही. विनंती

आपला कृपाकांक्षी
पां. र. अंबिके.

कऱ्हाड : २ फेब्रु १९७०

सेवेसी कृ. सा. न. वि. वि.
धन्यवाद ! धन्यवाद !

आपले २९ जानेवारीचे कृपापत्र पावले. राष्ट्रपतीकडून मला काही पदवी देण्याचा विचार होत आहे, हे मला १६ जानेवारी १९७० रोजी जाणवण्यात आले होते. गेली चौदा वर्षांच्या काळात मी प्रसंगाप्रसंगाने शासकीय धोरणातील न्यूनाधिक्यावर परखड बोलत राहिलो असताही, शासनास काही गुणग्राहकता परिचित असेल, तर तिचे स्वागत करण्यास काहीच हरकत नाही. कारण त्या वृत्तीची आवश्यकता लोकशाहीला व समाजस्वास्थ्याला आहे, असे मत मी प्रदर्शित केले होते. ज्या पत्रकाराने पद्मश्री परत केली होती तो महान् आत्मविश्वासाचा कर्तबगार होता. मी पद्मश्री काका कारखानीस यांच्या मानाने छोटाच समाजसेवक ! मला कोण कसा मोजतो, हे पाहून प्रगत राहण्याचे कर्तव्य करावयाचे असते. शासकीय पदवीने मी कसा हुरळेन ? ती बद्दल लोकमतही प्रगट होत आहे. त्यातच सर्व आले

चि. धुं. बापट १८-३-१९७०

माझी जीवनसंजीवनी अनपेक्षितपणे शिवरात्रीस शिवस्वरूप झाली. त्यायोगे उत्पन्न झालेली पोकळी भयप्रदच आहे. पण प्राप्त परिस्थिला तोंड देऊनच जाणकारास कर्तव्य बजावित राहणे क्रमप्राप्त असते. आपल्यासारख्यांच्या स्नेह-सहानुभूतीनेच तसे होणे शक्य आहे.

सु. ह. कुलकर्णी ७-५-१९७०

मी चि. सौ. निर्मलास पोहोचविण्यासाठी मद्रासेस आलो आणि तोही माझी असमंजस नात चि. गार्गीला घेऊन ! तरीही आपण व चि. सौ. निर्मला यांनी आमची व्यवस्था एकाद्या स्टेटगेस्टप्रमाणे ठेवली ! आपला गृहस्थाश्रम घेत असलेले हे वळण स्पृहणीय असले तरी सरतेशेवटी माणसाला आर्थिक अंथरूण पाहूनच पाय पसरावे लागतात हे काही खोटे नाही !! काल निघताना आपण माझा छोटासा सत्कार केलात. ' कशाला हवा बरे हा ?' एवढेच उद्‌गार माझ्या तोंडून निघाले ! केवळ आपल्या जिव्हाळ्याला दुखवू नये म्हणून मी तो सत्कार घेतला. पण माझ्या उद्‌गारामागची भावना आजही कायम आहे.

काल ६ मे होती ! चि. सौ. निर्मलाच्या आईस जाऊन काल दोन महिने झाले. ती एकदाही सौ. निर्मलाचे माहेरपण करू शकली नाही. मान्वी जीवन परमेश्वराचे इच्छेप्रमाणे

चालते असे गृहीत धरले तरी आईच्या वत्सलतेचा हात चि. सौ. निर्मलास अंतरला ! मी कितीही जिव्हाळ्याने वागलो तरी आईची माया ती आईचीच माया !! काल मी हे माझे मन उघडे करावयास सुरूवात केली आणि पोरीच्या डोळ्यांतून आसवे गळतील म्हणून माघार घेतली. आता ती सर्वस्वी आपली आहे. चुकली, सवरली तरी सांभाळून घ्या, यापेक्षा मला आताही लिहवत नाही ! पुढचा काळ तुम्हा तरूणांचा आहे ; त्याच्यावर मात कशी करावयाची हे आयुष्याच्या आवराआवरीला लागलेल्या माझ्यासारख्याने सांगून काय करावयाचे ?

द्वा. वा. केळकर २२-४-१९७३

आपल्यासारखे तरूण समर्थ संप्रदायाचे पुरस्कार करीत राहतील तर कै. देव यांनी म्हटल्याप्रमाणे '' समर्थांचे विस्मरण म्हणजे महाराष्ट्राचे मरण '' हे दुर्दैव कधीच ओढवणार नाही. म्हणून आपल्या पुस्तकावर अभिप्राय प्रगट करताना, माझ्यासारख्या बुरसलेल्या माणसाच्या दृष्टीत काही विकृती घडली असल्याचे आपणांस आढळल्यास ते आपण अवश्य कळवावे, म्हणजे तरूण पिढीबरोबर असण्या-धावण्याचा मनोधर्म मला सांभाळता येईल.

हरी भालचंद्र देशपांडे २९-१०-१९७३

केसरीत काय मजकूर आहे मला अजूनही ठाऊक नाही ! पण तिथीप्रमाणे त्यादिवशी व ता. १५ नोव्हेंबर रोजी मी ' अवघे पाऊणशे वयमान ' सांगू लागलो.

'' मी राजकारणातून निवृत्त झालो नाही. टिळकांनी, स्वातंत्र्य मिळताच पन्नाशीच्या पुढील साऱ्यांनी बाजूस राहून सत्ता तरूणाकडे द्यावी, असे सांगितले. ते व्रत आम्ही आचरित आहोत. पण वेळ आलीच तर शेलारमामाप्रमाणे आम्ही पुन्हा उडी घेण्यास व बलिदानास तयार आहो. आमचा नि:स्वार्थी समाजसंपर्क सुरू आहे. ''

(मुलाखत दै. सकाळ पुणे १७-११-१९७३)

माझ्या जीवनाला माझ्या पत्नीनं साथ केली आहे. त्या काळात माझी काय किंमत होती, जगाच्या दृष्टीनं- एक व्यवहारशून्य नवरा होतो ! पण तशाही स्थितीत तिनं अखेरपर्यंत मला साथ दिली. गुंजभरही सोनं मी कधी तिला घेतले नाही. ती आयुष्यभर लंकेची पार्वती राहिली !

अण्णासाहेब कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली माझा जो सत्कार झाला तो पाहून माझ्या शेजारी बसलेल्या पत्नीच्या चेहऱ्यावर धन्यतेचे तेज विलसत होतं, ते पाहून मला खरं समाधान वाटलं. राष्ट्रकार्यात मला दिलेल्या सहकार्याचं, भोगलेल्या हालअपेष्टांचे मोल काय आहे हे तिच्या प्रत्ययाला त्यावेळी आलं नि अशी माझी थोर मनाची सहचारिणी दिवंगत झाली तो माझ्या आयुष्यातील सर्वात दु:खाचा प्रसंग !

माझी पत्नी अनपेक्षितपणे गेली. जाण्याआधी अर्धा तास मी तिच्याशी बोललो होतो.

महाशिवरात्रीचा दिवस होता. फराळ करायचा– म्हणून साबुदाण्याच्या खिरीचे दोन चमचे घेऊन तिसऱ्या चमच्याला ती गेली. जिच्या जिवावर मी घर सोडून निर्धास्तपणे हिंडत होतो, ती गेली ! त्याच्या इतका मोठा धक्का मला कधीही बसला नाही. दुसऱ्याच्या घरचं लग्नकार्य उरकून ती गेली... सारी कर्तव्ये पूर्ण करून गेली ? डॉ. म. प. पेठे

(मुलाखत, महाराष्ट्र टाइम्स मुंबई ३–२–१९७४)

डॉ. बाळासाहेब देशपांडे २०–५–१९७४

आपल्या पत्रातील सोज्वळता व उदात्तता केवळ अभिनंदनीयच नसून अनुकरणीयही आहे. आपणास डॉ. कानिटकरांनी फी दिली ती आपल्या कामगिरीची आहे. '' जो जो जयाचा व्यवहार । तेथे असावे खबरदार '' असे समर्थांचे सांगणेच आहे. सदर पैसे आपण मला कसले परत करता ? कारण डॉ. कानिटकरांना मी एकही पैसा दिला नाही. आपल्या घरावर मी काही उपकार केलेले मला तरी स्मरत नाहीत. जर मी काही केलेच असे तर आपले पितामह व माझे पिताजी यांच्यातील जिव्हाळ्यामुळे कर्तव्य म्हणून काही सेवा केलीही असेल. त्याबद्दल आपल्या अंत:करणास जी कृतज्ञता वाटते तीच '' परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसन्त : सन्ति सन्त : '' अशा पंखी आहे. हा दुर्मिळ मोठेपणा आपल्याजवळ आहे, याचाच मला आनंद व अभिमान आहे. म्हणून आणि डॉ. कानिटकरांनी दिलेले पैसे आपल्या हक्काचे असले तरी आपल्या–आमच्या जिव्हाळ्यामुळे ते जवळ ठेवून घेण्यात आपले अंत:करणास (आपण होतील म्हणता त्या) अकारण वेदना होऊ नयेत म्हणून की आपण मजकडे पाठविलेल्या पैशात माझी फुलाची पाकळी घालून पाठवीत आहे. विनंती अशी की ते सर्वच धन आपण एकाद्या गरजू व गरीब रूग्णाच्या सेवेस लावावे म्हणजे आपल्या व माझ्या कोणाच्याच हृदयास रूखरूख राहणार नाही. शेवटी संत तुकारामांच्या शब्दांत आशीर्वाद देतो की, '' कर्मधर्मे तुम्हा असावे कल्याण ।''

(डॉ. बाळासाहेब देशपांडे यांचे मूळ पत्र) १९–५–१९७४

आजच मला डॉ. कानिटकरांचेकडून ॲनेस्थिशियाची फी मिळाली ती मी या पत्रासोबत आपल्याला परत करीत आहे. आपले आमच्या घरावर मोठे उपकार आहेत ते ऋण आमचे हातून कमी होणे शक्य नाही. या शिवाय आपल्या हातून झालेले व होत असलेले समाजकार्य या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर हे पैसे मी जर जवळ ठेवले तर माझ्या मनाला अतिशय वेदना होतील आणि त्याला काहीच औषध नाही. तेंव्हा कृपया याचा स्वीकार करावा. आशीर्वाद असावा.

इंदुमती पोळ ता. ९-१२-१९७५

आपले बंधु प्रा. विद्याधर गोखले हे मुख्य चिटणीस असलेले मराठी साहित्य संमेलन काल यशस्वीच यशस्वी होऊन पार पडले. संमेलनास आलेली मंडळी आज रोजी आपापल्या गावी परतली..... संमेलनात कृष्णातरंग या नावचे पुस्तक (कवितांचे) प्रसिद्ध झाले. त्यात कै. सौ. सुलोचनाबाई गोखले, चि. सौ. पद्मजा दातार व प्रस्तुत लेखक यांची एक एक कविता असून त्या पुस्तकाला श्री. पु. पां. गोखले यांची प्रस्तावना आहे.

आज सकाळी श्रीमती आनंदीबाई दीक्षित व रंगुताई वाटवे या भेटून गेल्या. आपल्या मातोश्रींच्या हृदयस्पर्शी आठवणी निघून गंगायमुनाही (माझ्यासुद्धा) सर्वांच्या गालावर वाहिल्या.

लं. वि. काशीकर, सातारा १३-१२-१९७५

येथील साहित्य संमेलन उत्कृष्टच झाले. त्याच्या स्वागतसभासदाची वर्गणी मी भरलीच होती. सातारच्या 'समर्थ' ने अंक काढला व स्वत: संमेलनाने स्मरणिका तयार केली. त्यासाठी संपादक-संयोजकांनी जी माहिती मागितली ती मी त्यास पुरवली. पण यापेक्षा मी संमेलनात सहभागी होऊ शकलो नाही याचे कारण देशात अकारण जारी केलेला २६ जूनचा आणीबाणी निर्बंध. तो १ डिसेंबरपर्यंत उठला असता, तरी मी संमेलन सहभागी झालो असतो. स्वागतसभासद शुल्क देतानाच मी माझी ही भूमिका स्पष्ट केली होती. परिणामत: '' बोरीला बहर यावा आणि कावळ्याला मुखरोग व्हावा '' ही जी माझी अवस्था झाली, तिचा दोषच असला, तर माझ्या वृत्तीत आहे. अन्यांच्याकडे नाही. वृत्तपत्रावरील निर्बंध पाहून आपल्या मनोदेवतेने जो आविष्कार केला तो माझ्यासारख्याच्या भावाविष्काराशी मिळताजुळता आहे. यापेक्षा ती. आळतेकरांचे एक दिन हजेरीचे उदाहरण देऊन, मला व्यवहारशून्य ठरविण्याचा प्रयत्न येथे होत आहे, त्याला मी '' वृद्धास्ते न विचारणीय चरिता :'' एवढेच मोघम उत्तर देत असतो.

'' दास डोंगरी राहतो, यात्रा देवाची पाहतो '' हा आपला आनंद कोण हिसकून घेणार ?

इंदुमती पोळ ता. ३०-९-१९७६

-पुरूषोत्तम पांडुरंग गोखलेती. इंदिराकाकू दिवेकर ललिता पंचमीदिवशी २७ सप्टेंबर १९७६ रोजी सायंकाळी सव्वापाच वाजता देवाघरी गेल्या. आपणा सर्वांचा एक जिव्हाळा हरपला !

इंदुमती पोळ ता.२६-१०-१९७६

सातान्यास समर्थ सेवा मंडळाच्या रौप्यमहोत्सवाच्या सोहळ्यात माझा दासबोध-स्वाध्याय साधना हा ग्रंथ प्रसिद्ध झाला, त्यावेळी माझा शाल-श्रीफळ व चार अंकी एकरकमेच्या मानधनाने सत्कारही झाला. त्यामुळे '' ईश चिंता निवारील सारी '' हा माझा विश्वास दृढतर झाला. चि. पंडित बापट याच्या मुलाचे लग्नास अमरावतीस लांब जावयाचे तर कसे काय जमते या फिकीरीत मी थोडासा होतोच की !

... यंदा आगरकरांची ८१ वी पुण्यतिथी, माझ्या मातोश्रींची ७५ पुण्यतिथी, माझ्या आजीची ( माझ्या तीर्थरूपांच्या मातोश्रींची ) एकावन्नावी पुण्यतिथी आणि आमच्या जिल्ह्याचे पुढारी भाऊसाहेब सोमण यांचा जन्मशताब्दी येत असल्याने त्या सर्व प्रसंगी मी ( नाणेबाजारात माझ्या हाती टंचाई असल्यामुळे ) ग्रंथदान करीत आहे ते एकंदर पाचशे रूपये तरी बाजारभावाने होईल. हा माझा एक छांदिष्टपणा समजा. आयुष्याच्या उतरणीवर असे छंद चालवून मी येणारे दिवस व्यतीत करण्याचे दुसरे काही मनात आणले तरी होतच नाही आणि जगाला तरी काय जरूरी आहे ?

इंदुमती पोळ ता. १-१२-१९७६

या जगातूनच माझे मन उडाले असल्याकारणाने मला आता हक्क वगैरे काही नाहीत. नकोतही. मला प्रसन्न ठेवण्याचे तंत्र कोणी काढलेही नव्हते व कारणही नव्हते. प्रसन्न करून घ्यावयाचे ते फक्त परमेश्वरासच अशी माझी समजूत आहे. '' कोण्या मानवाचा कोण केवा?'' माणसाने फक्त प्राप्त कर्तव्यावर नेहमी खोगीर आवळलेच पाहिजे, अशी मला शिकवण मिळाली आहे व ती मी अटोकाट पाळीत आलो आहे, राहणार आहे.

हरिभाऊ देशपांडे ८-९-१९७६

माझे जीवन तरी सर्वस्वी ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे. त्यातून आजपर्यंतच्या सवयीमुळे मी केव्हा तरी काही तरी सार्वजनिक काम करीत असतो. तेही आता सोडावे असा व एवढाच संन्यास मी घेण्याचा विचार करतो आहे. माझे रागलोभ गेले असल्याने मी संन्यासाश्रमाचे सोंग करणारच नाही.....

मी १५ ऑगस्टपासून फ्ल्यूने आजारी आहे, अशक्तपणा अजूनही आहे. तरीही वृक्षारोपणात व खांडेकर शोकसभेत भाग घेतलाच आहे.

इंदुमती पोळ ता. १-१-१९७७

मी १५ डिसेंबर ते २२ डिसेंबर असा गडहिंग्लज-सामानगड या भागात स.भ. नीळकंठबुवा रामदासी यांच्या बोलावण्यावरून दासबोध प्रवचने करण्यास गेलो होतो... शिवाय माझ्याकडे बेचाळीस वर्षापूर्वी शिकावयास असलेले एक विद्यार्थी

श्री.M.N. Kulkarniयांनी आपल्या दुधड गावास आवर्जून नेले. ते गांधीवादी आहेत. त्यांनी आपल्या गावी एक प्रशाला काढली तिला अठ्ठावीस वर्षे झाली. त्या प्रशालेच्या संचालनातील मुख्याध्यापकापासून गड्यापर्यंत सगळे माधवराव कुलकर्ण्यांचे आहेत व गावात माधवरावांचा मान सगळ्या थरांतील लोकांत आहे. माझ्या विद्यार्थ्याची प्रतिष्ठा पाहून मला आनंदच आनंद वाटला. माधवराव आज विधुर आहेत आणि आपल्या विधुर सासऱ्याला ते आस्थेने सांभाळीत आहेत. तिघेही साडू फक्त सासऱ्याची इस्टेट वाटून घेऊन आपापल्या ठिकाणी मशगूल आहेत. माधवरावांच्या निष्काम कर्मयोगाचा हा केवळ दाखलाच नाही का ?

कोल्हापुरास डॉ. माधवराव गोगटे यांना माझे डोळे दाखविले. उजव्या डोळ्यात मोतीबिंदू घर करू लागला असून तो ऑपरेशनला परिपक्व होण्यास वेळ लागेल... माझे आयुर्वेदिक उपायहि चालू आहेत व पुढील चार सहा महिन्यांत चष्म्याची गरजच राहणार नाही असा त्यांचा होरा आहे. हे अगदी वाईट अर्थीही खरे ठरले तरी आता वयापरत्वे मला हात जोडून तयार असलेच पाहिजे. तो मी आहेच. दैवगती काय असेल ती होईल.

चि. विनायकराव बापट यांचे पत्र आले असून पुण्यास आल्यावर पद्मावतीस त्यांनी बांधलेल्या बंगल्यातही मी ये जा ठेवावी अशी अपेक्षा केली आहे. उत्तरी मी त्यास लिहिले आहे की माणसे जोडण्यापलिकडे या जन्मात काहीच साधलेले नाही. तेव्हा साधेल तेवढी आपली अपेक्षा (वयापरत्वे दुर्बलता आल्यामुळे) पुऱ्या करीत राहीन.

इंदुमती पोळ ता. २९-१-१९७७

माझे विद्यार्थिमित्र श्री. शंकरराव तथा गो. स. तारगावकर हे १४ रोजी दिवंगत झाल्याचे सकाळमध्ये वाचून माझ्या डोळ्याचे पाणी पाच तास खळले नव्हते.

द. र. कोपर्डेकर २-३-१९७७

हरिभाऊ हे सरळहृदयी, लोकसंग्रही व कामसू ग्रंथालयचालक आहेत. कोणाचाही हेवा न करता व कोणाकडूनही हेवा न होता श्री. देशपांड्यानी आपले जीवनकार्य केले आहे. '' कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनांचे '' सांभाळून ते वागले म्हणून मी त्यांना अनसूयोत्तम म्हणतो. ग्रंथ हरण करण्यात म्हणजे जमा करण्यात ते झडप घालण्यात पटाइत असे सिंह [हरि (सं.)] आहेत म्हणून मी त्यांना ' ग्रंथहरि ' असे म्हणतो. 'अनसूयोत्तम ग्रंथहरि ' या शब्दांत त्यांचे चारित्र्यसंपन्न सर्व वर्णन आले असे मला वाटते.

कऱ्हाड

नोव्हेंबर १९७७

ऐशीच्या घरी–

व्हावे निर्मल जीवन जे जनकल्याणवर्ति परिणामी।
लोहासम बळकटिचे सत्वपरिक्षेत तापल्या नामी ॥१॥
ही खूणगांठ बांधुनि वरूषे गत साठ ताठ साठवुनी।
ऐशीच्या घरि आलो तेशी स–दैव आठवुनी ॥२॥
नाही केला मत्सर मी कोणाचा तसा कुणी माझा।
अनसूयोत्तम ठरलो झिजुनी नित सज्जनांचिया काजा ॥३॥
सर्वत्र रीत ऐशी सतत जगत्पावनी प्रवाही हो।
सहजीवन सकलांचे उजळो, एकच मनी स्पृहा ही हो ! ॥४॥
आता प्रभुपदि विनति माझी हो वा न हो सुधी कीर्ती।
गणति अनुल्लेख घडो, नावासह विरघळो हि मम मूर्ती ॥ ५॥

इंदुमती पोळ ता. ३०–११–१९७७

कुलदेवतेच्या कृपेने व आपणांस अंगाखांद्यावर खेळविणाऱ्या आजोबांच्या आशीर्वादाने काल चि. भास्कर यास बढती मिळून तो जॉईंट जनरल मॅनेजर झाला. आपला चढत्या वाढत्या पदकांचे कौतुक करावयास आपली आई नाही !!

इंदुमती पोळ ता. ३०–११–१९७७

'' शिक्षण '' हे आवश्यक सेवेत स्वराज्यसरकार समाविष्ट करीत नाही याबद्दल निषेधपत्र प्रांतिक व केंद्रीय सरकारास धाडले आहे.

२६–१–१९७८

मी १९७७ मध्ये काविळीने आजारी असता पितृऋणविमोचनाच्या शेवटच्या हप्त्यासंबंधी काही बोललो होतो.

माझ्या आईबापांनी मला दिलेल्या शरीरामुळेच मी जगात ओळखत गेलो. त्या शरीराच्या देणगीमुळेच मी काही सदुपयोगी, पुष्कळसे निरूपयोगी असले तरी निरूपद्रवी आयुष्य काढू शकलो व आज ८० व्या वर्षाचा दुसरा महिना संपविला आहे. या शरीराची शेवटी नीट वासलात लावावी अशी तरतूद करून ठेवणे म्हणजे पितृऋणाचा शेवटचा हप्ता

तयार करून ठेवणे होय. त्या दृष्टिने १९७७ हनुमानजयंती रोजी मी कराड अर्बन बँकेत सेव्हिंग खाते क्र. ६२५ चे उघडले व या महिन्याच्या प्रारंभापर्यंत दीडशे रूपये भरले आहेत. त्यात यापुढे भर पडेल ती बँक कायद्याप्रमाणे व्याजाचीच अशी जी रक्कम होईल ती फक्त माझ्या देहाची वाट–व्यवस्था ( विसर्जनाची ) होण्यासाठीच आहे. ती चि. सौ. नलिनी गोखले यांच्या हातून घडली तर ठीकच ! ना तर जो कोणी माझ्या देहाची विल्हेवाट लावील त्याचा खर्च सौ. नलिनी व चि. भास्करराव यांनी माझ्या वरील खात्यातूनच करावयाची आहे. त्या खात्यातील साठ खर्च भागविण्यास पुरी पडली तर उत्तमच; पण त्या साठीतून काही ऊर उरल्यास ती गरिबांच्या सेवेस जावी. पण ती साठ कमीच पडली तर त्या साठीतून होईल तेवढी माझ्या देहाची व्यवस्था व्हावी व मग काशीच्या हरिश्चंद्र स्मशानासारखे जलचरभक्षणास तरतूद करावी वा पारश्यांच्या अग्यारीप्रमाणे गिधाडांना भक्ष्य मिळावे. त्यातून साठीतील कमताई भरून काढण्याचे कोणी मनावर घेतले तर त्यास विरोध करण्यास मी असणारच नाही. तेव्हा काय होईल ते होईल. हात जोडून मी उभा आहे व हाकेची वाट पहात आहे; असे म्हणण्याचे वय आहे.आगरकरांनी ३९ व्यावर्षी तशी तरतूद केली होती तेव्हा मी ती अकाली केली असे मानू नये. निर्विकार मनाने विचार करावा.

इंदुमती पोळ　　　　ता. ८–२–१९७८

मागच्या पत्रात मी पाठविलेल्या पत्राने आपण विषण्ण झाल्याचे कळले. ' मरणाचे स्मरण असावे ' असे सांगणारे रामदास, तुकाराम, विवेकानंद, गोपाळराव आगरकर यांनी सरणाची( समाधीची, देहसमाप्तीची) व्यवस्था करून ठेवली होती. तेच मी केले ! प्रत्येकाने काळाची पावले ओळखून तसे करावयास हवे.

द. र. कोपर्डेकर　　　　१–८–१९७८

आपण हल्ली चरित्रवाचनाचा झपाटा चालविला आहे व श्री. वि. द. घाटे यांच्यासारख्या दिलखुलास लेखकाचे ग्रंथ आपणांस पसंतच पसंत पडले हे अगदी व्हावयाचे तसेच होत आहे. लो. टिळकाबद्दल रँ. परांजपे सारख्या त्यांच्या विद्यार्थ्याचे नव्हते का तीव्र मतभेद ? मग श्री. विठ्ठलरावांचे असले तर आपण वाचकांनी त्यात रागावण्या–लोभावण्यासारखे काहीच नाही. आजकालच्या टोप्या–पगड्या–पक्ष–बदलकरांच्याबरोबर घाट्यांच्या मतभेददर्शनाची तुलना करण्यासारखे काहीच नाही. कारण आजकालचा पक्षबदल हा खरा '' कुर्सीका किस्सा '' आहे आणि त्याबद्दलही आपण आपल्या डोक्याला शीण करून घेण्यासारखे काहीच नाही. ते रशियन अरेरावासारखे अजून प्रतिस्पर्ध्याला ताबडतोब गोळ्या घालून स्वर्गवासी करीत नाहीत, एवढी तरी लोकशाहीला आवश्यक असलेली माणुसकी भारतीय सर्व पक्षच सांभाळताहेत ही तरी खास समाधानाची गोष्ट आहे. ' कुर्सीका किस्सा ' म्हणजेच देशसेवा आणि ' परमेश जगाचा पैका ' ही मनोधारणा ज्यांनी

या देशात गेल्या तीस वर्षांत दृढमूल केली, त्यांना याच देही, याच डोळां झाडेझडत्या द्याव्या लागताहेतच.

'' अवघे जन हे दिल्या घेतल्याचे '' असे अनुभविकांनी मागेच सांगून टाकले आहे तेव्हा प्राप्त परिस्थितीत जे काही आपणांस सुयोग्य असे कर्तव्यच करीत आलो असता, त्यात कोणी बौद्धिक इंजेक्शनांनी आपले चरित्र ( व पुष्कळ वेळा त्याचबरोबर चारित्र्यही ) धुरकट करून ठेवले किंवा धोंड्यांनी ठेचले तर त्याबद्दल विषाद उपयोगीच नाही. कारण, तसे करणारे वाचिवीर अजाण तरी असतात, आचरट तरी असतात आणि अगदीच कुजके नसले तरी '' पराधिकपणे मत्सरू करणारे '' अकारण छुपे शत्रूही असू शकतात. तेव्हा '' निंदकाचे घर असावे शेजारी '' असा खाक्या ठेवावा, '' तुका म्हणे ऐशा (बहुतोंडाळ) नरा। मोजून माराव्या पैजारा ॥'' असे म्हणण्याचे पाप आपण करूचं नये. वरीलसारखे अहेर घरच्या घरीही हल्ली कमी मिळतात असे नव्हे. पण शेखी व शेखीमहंमदी हे दोनच शब्द ज्या कालखंडाचे परवलीचे शब्द बनून राहिले आहेत, त्या कालखंडात

'' येता अशुभसा काळ नवा।
सुखाने ध्येय मनी सेवा।
स्वकर आवरा कुर्मगुरू करा ''

हाच उपदेश जनसामान्यांच्या पथ्याचा !! तेव्हा हाच उपदेश जीवनाचा आढावा घेताना राहू नये. तरी घरचा आहेरही '' सूर्याची पिल्ले '' च असतील तर त्यासाठीही आपण आहोत त्या दिवसांत विषाद न मानताच प्रगती करीत राहिलेच पाहिजे असे मला अनुभवपूर्वक वाटते.

चि. सौ. उज्ज्वला आक्का दातारची प्रवचने लोकपसंतीस उतरतात हे ऐकून मी समाधीच लावून बसतो, तेव्हा आनंदी आनंदच करतो.

२५-९-१९७८

भाद्रपद वद्य ५ मीस ( शके १९०० ) माझे जामात श्री. अप्पासाहेब पोळ जीपला अपघात होऊन देवाघरी गेले, त्यायोगे माझी कन्या चि. इंदुमती हिचा संसार एक अल्पकालीन स्वप्न ठरून तिच्या सौभाग्यावर आकाशीची कुऱ्हाड पडली. या योगे तिच्या जीवनाच्या ठिकऱ्याच उडाल्या. पण माझ्यासारख्या जीवनाच्या संध्याकाळ रात्रीच्या छायेत वावरणाऱ्या आणि जगात व्यवहारशून्य ठरून आता केवळ खायला काळ व भूईला भार होऊन राहिलेल्या माणसालाही डोळ्यांतले अश्रू डोळ्यांत आणि अंत:करणाच्या भावना अंत:करणात रिचवून प्राप्त परिस्थितीत विवेकदृष्ट कर्तव्ये करताना आपल्यासारख्यांच्या सहसंवेदनपत्रानेच आला तर थोडा फार धीर येत आहे. चि. इंदूसही तोच अनुभव पण फार सावकाशीने येणार. One must face the odds and rods of fortune ही शिकवण मला लहानपणापासूनच असल्याकारणाने दैवाशी मी आखाडे (odds) खेळत आलो. पण आठ वर्षापूर्वी सौ. सुलोचनाच्या अनपेक्षित निधनाने व आता चि. इंदुवरील प्रसंगाने मला जो दैवाचा तडाखा बसला आहे तो (rods) वयापरत्वे आणि पारिस्थितिक चमत्कारिकपणाने

एवढा तापदायक आहे की गेला महिनाभर मला सरळ ओळीने साठ मिनिटे काही झोप लागत नाही. म्हणूनच मन गुंतविण्यासाठी मी जे चाळे करतो आहे, त्यातलाच आपण वाचलेला केसरीतील सईबाई भट पेशवे ( नेपाळस्थ ) यांच्यासंबंधीचा लेख.

श्री. वा. पु. कोल्हटकर, श्री. ना. स. करंदीकर व श्री. दत्तोपंत फडके ही माझ्यापेक्षा वयाने लहान पण कर्तृत्वाने नाव केलेली मंडळी श्री.अप्पासाहेब पोळांच्या सारखीच परमेश्वराने उचलून नेली. परमेश्वराला सुगंधी फुले आवडतात; ती तो नेतो, पण मागे राहणाऱ्या गदळातील आमच्यासारख्यांना मागे ठेवून तो काय साधतो, त्याचे त्यास ठाऊक !!

यंदा अश्विन वद्य १४ रोजी ता. ३० ऑक्टोबरला तिथीने व १५ नोव्हेंबर रोजी तारखेने माझी ऐंशीची हयात संपते म्हणून मी सहस्त्रचंद्रदर्शन शांती करावी असा आग्रह माझ्या एक्कावन वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांनी व सांप्रत निलगिरी जिल्ह्यात कुन्नूर येथे राहणाऱ्या सेवानिवृत्त एंजिनियर श्री. शेटे यांनी धरला होता. पण चि. इंदूवरील प्रसंगाने मी साफ नकार दिला आहे.

हरिभाऊ देशपांडे २२-११-१९७८

घर फिरले म्हणजे वासे फिरतात अशी एक जुनी म्हण आहे. तूर्त मला साडेसाती आहे असे कोणी म्हणतात. त्याचा परिणाम म्हणून की काय माझी कन्या प्रा. इंदुमती पोळ हिजवर २३ ऑगस्ट १९७८ रोजी वैधव्याचा घाला पडला. आपल्या कपाळीच्या कहाणीने दुसऱ्यास सतावीत बसू नये म्हणून चि. अप्पासाहेब पोळ यांच्या अकाली अपघाती निधनाची बातमी मी आपण होऊन कोणास कळविली नव्हती. त्यामुळे ज्यांना वार्ता नव्हती त्यांनी माझा वाढदिवस नेहमीप्रमाणे अभिनंदनपत्रांनी साजरा केला.

मला आपणांस धारिष्ट्याने सुचवावेसे वाटते की तूर्त आपण सर्वस्वी आपल्या सौभाग्यवतींच्या प्रकृतीकडेच लक्ष द्यावे. वृद्धापकाळी पतिपत्नी एकमेकांस जेवढे आधार असतात तेवढे दुसरे कोणी असत नाही. अन्य आप्तेष्टांवर कसलाही राग न धरता व आरोप न करता, मी हे स्वानुभवसिद्ध( नऊ वर्षांच्या) खरे बोल बोलत आहे. कृपेने ते समजून घ्यावेत.

मी गेले चार महिने आपण होऊन कोणाशी ( अगदी मुला नातवंडांशीही ) पत्रव्यवहार करीत नाही. कोणाचे पत्र आले तर त्यास उत्तर तेवढे देत असतो, अगदी काटेकोर विचाराने !

सार्वजनिक जीवनात धकाबुकीचे व मानापमानाचे प्रसंग राजकीय सामाजिक आखाड्यात येतातच ! पण शांतपणे ग्रंथालयासारख्या ज्ञानदान करीत राहणाऱ्या तपोवनातही येतात, हे कै. वा. पु. कोल्हटकरांच्या शासकीय अडवणुकीवरूनही स्पष्ट झाले होते. आता ते दुर्भाग्य आणि तेही अडवणुकीपेक्षा अपमानाचे आपल्या वाट्यास येत आहे. म्हणून एकवेळ आपण कार्यकारिणीची बैठक घेऊन त्यात नौकरशाही जुलूमाचे निवेदन

करावे, दाद लागली तर बरेच ! ना तर अपमानाच्या जिण्यापेक्षा वाचनालय आपण तळेगावकरांना अर्पण केलेच आहे ते सर्वस्वी करून आपण सेवानिवृत्त व्हावे. कै. अण्णा विजापूरकरांच्या प्रशाळेसारखेच भाग्य आपल्या वाटणीला आलेले पाहून तळेगावच्या वास्तुपुरूषाचा तो प्रसाद आहे की काय अशी शंका घेण्यास मन धावते.

ता. २४-८-१९७९

श्री. शासाहेब पटवर्धन यांनी मला माझ्या डाव्या डोळ्याचे ऑपरेशन केव्हा करून घेणार? एवढेच विचारले आणि मी आता तसल्या भानगडीत पडणारच नाही असे त्यांना स्पष्ट सांगितले. तेव्हा आता आपल्यामार्फत वृद्धापकाळातील परावलंबनाची, इंद्रियांच्या दुबळेपणाची आणि विधुरावस्थेतील निराश्रितपणाची चितारणी मजकडे केली की काय याची शंका येते. विधुरावस्था व वृद्धापकाळातील इंद्रियांच्या दुबळेपणामुळे येणारे परावलंबन हे कोणी टाळू म्हटल्याने टाळू शकत नाही. ऑपरेशन वगैरे उपाय करावयाचे हे सुचविणे सदिच्छेचे गमक आहे.

दुसऱ्या डोळ्याचे ऑपरेशन न झाल्यामुळे काही काम होणार नसेल तर न होवो अगर ॲक्सिडेंट होऊन मृत्यू यावयाचा असेल तर खुशाल येवो, मला पर्वा नाही. तारखेने कालच वर्ष झाले, माझे जावई अप्पासाहेब पोळ चांगले धट्टेकट्टे पन्नाशीच्या आत असताना, अपघाताने गेले नाहीत का ? कालचा सर्व दिवस मी बेचैन होतो. त्या बेचैनीत कोणी उतारा सांगितला व दाखविला नाही. तसे करणे कोणास शक्यही होणार नाही. आणि माझ्या वयाचा विचार करता, आमच्या कऱ्हाडच्या गोखले शाखेत मीच फार दिवस जगलो आणि जनताजनार्दनाच्या सहकार समन्वयाने कळते आयुष्य सत्कारणीच लावले. म्हणून आता '' हरि ठेविल तैसे रहावे '' असे मी ठाम ठरविले आहे. मी पहिल्यापासून द्रव्यदरिद्री आहे आणि ' नको रे मना द्रव्य ते पुढीलांचे '
हा समर्थोपदेश पाळीत आलो आहे. तेवढेच ईश्वराने निभवावे.

इंदुमती गोखले

ता. १७-११-१९८०

समर्थ समाधि त्रि-शतसांवत्सरिक महोत्सव पूजा म्हणून समर्थ सेवा मंडळाने प्रसिद्ध केलेली श्रीरामसमर्थ व दासबोध स्वाध्याय-साधना ही एकवीस रूपयांची पुस्तके प्रामाणिकपणे गरजू अकरा अभ्यासकांना द्यावयाची असे ठरविले आहे. ही पुस्तके देण्याचा कस '' भाव (अस्तित्वाचे तेजस्वी प्रकटीकरण) तेथे देव'' हे सन्तवचन किंवा दासबोध २०-९-८ मध्ये म्हटल्याप्रमाणे '' जो विचाराच्या पातळीवर टिकत नाही तो देव नव्हे '' हाच ठरविला आहे.

सौ. निर्मला कुलकर्णी ता. १३-५-१९८१

चि. प्रशान्त याच्या अभ्यासाकडे बारकाव्याने लक्ष घातले पाहिजे. कारण त्याची उच्च शिक्षणाची पूर्वतयारी यापुढील तीन वर्षात झालीच पाहिजे. हे सांगणे (माझ्यासारख्या) म्हातारबाची कुरकूर वाटत असली तर खुशाल सोडून द्यावे. आपल्या मुलांची जबाबदारी आईबाप जाणत असतातच ! शिवाय माझ्यासारख्या शेळपटलेल्याचे विचार नवयुगात काय कामाचे ? याची मला जाणीव आहे. पण कर्तव्य म्हणून एका भावनाजागृतीने मी वरील मजकूर लिहिला ! राग नसावा.

चि. सौ. प्रतिभा (दातार) गोखले हिला दुसरे कन्यारत्न झाल्याचे समजले. कऱ्हाडकर गोखल्यांतच नव्हे तर तासगावकर गोखलेही अनेक घराण्यांना सुगृहिणी व सुमाता पुरवितात असे दिसते. ठीक आहे. परमेश्वरी प्रसाद काय असेल तो गोड करून घेतलाच पाहिजे.

मी आता ऐहिक जंजाळातून मोकळे होण्यात सदैव गुंतलेला असतो.... यामुळे सूचना अशी की यापुढे मला विसरण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीत असावा व आपले भाऊभावजयांशी अधिक संपर्क साधीत असावे. आपल्या मातु:श्रींनी आपणांस सोडल्यास यंदा बारावे वर्ष चालू आहे. त्या माझे स्वागतासाठी अगोदर पुढे गेल्या असे मी मानीत होतो पण अजूनही त्यांचेकडून सूचना येत नाही !

इंदुमती गोखले ११-६-१९८१

उदईक दशाहारसमाप्तिदिनी चि. मनीष याची मुंज होत आहे. त्याचा मामा प्रा. विद्याधर याचीही मुंज ( याचा मुहूर्तावर ) अशीच पस्तीस वर्षांपूवी झाली. मी प्रत्यक्ष हजर राहून आशीर्वाद देऊ शकण्याचे अवस्थेत नसलो तरी चि. मनीषचे नावे ' सन्त सेनापती ' हे पुस्तक पाठविले आहे. बटूस देण्यासारखेच ते मी पुस्तक पाठविले आहे.

वि. वा. कौलगेकर २८-१०-१९८१

मी तिथीने कालच्या २६/१० रोजी वयाच्या ८४ चे फेऱ्यात सापडलो आहे. तरीसुद्धा कोणी बोलावले तर सेवेस जातच आहे. '' पडिले वळण इंद्रिया सकळा '' त्यामुळेच ते होते.

द. र. कोपर्डेकर १९-१२-१९८१
बेळगाव

ता. १५ रोजी बेळगावच्या ( कऱ्हाडच्या महाराष्ट्र हायस्कूलमधील एका वेळच्या माझ्या विद्यार्थ्याने ) श्री. खोजाने बँकेच्या निवडणुकीचा निकाल सांगितला. त्या निकालात श्री. बाळकृष्ण शिखरे निवडून आल्याची जशी नवलाई होती, त्यापेक्षाही एक भयंकर नवलाई

त्या निकालाचे वेळीच अशी घडली की कै. सूरजमल लाहोटींचे नातू बंकटशेठ हे हृदयविकाराने निधन पावले. लाहोटी कुटुंबियांचे व गोखले कुटुंबियांचे संबंध लक्ष्यात घेता आम्हांला धक्काच होता.

द. र. कोपर्डेकर ७-१-१९८२

सातारचे श्री. बापूसाहेब सोमण सानेगुरूजी वर्धापनदिनी म्हणजे २४ डिसेंबर रोजी हरिचरणी लीन झाले. त्याकीर्तिशेष महाशयाचे माझेवर बंधुवत् लक्ष होते म्हणून माझ्या व सार्वजनिक जीवनाच्या अध्यात्माच्या फळीत मोठीच पोकळी निर्माण झाली आहे. पण बापूजींचे कार्य पुढे चालविण्यानेच त्यांच्या आत्म्यास समाधान लाभणारे आहे, याची जाणीव ठेवूनही, पुष्कळ वेळा बापूसाहेबांची विदूषकी नक्कल आमचे हातून वठण्याचा संभव फार ! तरीही प्रयत्न करणे कर्तव्यच ! तो कटाक्षाने खास करीन.

यंदा १५ जानेवारीस येथे सुरू होणाऱ्या स्वाहाकारातील ' सूतो-वाच ' भाषण वैदिकांचे पुढे मला करावे लागणार आहे. कारण यंदा सोनवादीक्षित उमराणीही गेले व सखारामशास्त्रीही गेले. पाहू प्रसंग कसा काय निभावता येतो ते !

काँग्रेस कार्यकर्ते, त्यातील विशेषेंकरून स्वातंत्र्यसैनिकांचे मेळावे ही प्रकरणे सर्वस्वी चिंतनाच्या बाहेर ठेवावीत हे उत्तम. त्या रमण्यांचा आपणांस विचार तरी कशाला हवा !

द. अ. (पंडित) खंडकर १७-५-१९८२

आपले ' कृतार्थ ' मी काल बसल्या बसल्या चाळले. आपण मजकडे पाठविलेल्या प्रतीतील काही पानावर मुद्राराक्षसांची दखल घेतल्याचे आढळले. तरीही पण आमच्या नजरेलाही धुडकावून काही '' चुकार '' निसटले आहेत असे दिसते..... (१९ चुकांची) यादी पुढीलप्रमाणे ... आपण कदाचित शुद्धिपत्र तयार केले असेल अगर मुद्रणदोष काढून पक्की छपाईही केली असेल. पण पुस्तक निर्दोष ( होऊन ) जगापुढे यावे म्हणून निदर्शनास आणले आहेत. यात आपणांस अगर प्रपंचप्रकाशनास ' उणे ' आणण्याचा अगर लावण्याचा उद्देश नाही. पुस्तकात शक्य तो उणेपणा राहू नये. ' दोष देखोन झाकावे ' असा समर्थांचा उपदेश आहे, तो शक्य तर साकारावा हा उद्देश आहे. गैरसमज नसावा.

द. र. कोपर्डेकर १२-७-१९८२

आज विद्वत्तेपेक्षा विदूषकीला, समाजस्वास्थ्याला परिपोषक असलेल्या संयमापेक्षा स्वैराचाराला आणि स्पष्टवक्तेपणातील न्याय्यतेपेक्षा फटकळ शिमगा साहित्याला समाजात वजन मारता येत असताना ' दुष्टान्न, उपवास, कारागृही वास ' हे भोगण्याची तयारी ठेवूनच कोणी रामशास्त्री झाला तर होऊ शकेल. नातर '' हे असेच चालायाचे जोवर आम्ही राहू रडवे.''

साध्या–सुध्या सर्वेश्वरास भाक
जे कोण की हरखले मम जन्म होता।
ते सर्वही हरपले ! हरिचीच सत्ता ॥
जे रंगले मजसवे, रमलेहि धाले।
जे भांडले, झगडले, सगळे निमाले ॥१॥
मी मात्र एक उरलो ! उरलो कशाला ?।
खायास काळ बनुनी उगि भार भूला ॥
नाही कसाच उपयोग, अशा स्थितीत–।
लोका, स्वतास, –तरि जीवनि काय अर्थ ? ॥२॥
मी हात जोडुनि विभो, करितोच भाक।
देई मला झडकरी, प्रभु गोड हाक ॥
ती ऐकताच म्हणतो– '' प्रभु, हा निघालो।
आता विलंब कसला ? मनि फार धालो'' ॥३॥
अज्ञात मी निसटु दे कळता न कोणा।
अश्रू गळो न मजसाठि नि '' हाय !'' हो ना ॥
काही न मी चुकुनिही पुरूषार्थ केला।
नाही कुणाहि गुरूचा कृतिसिद्ध चेला ॥४॥
साध्या– सुध्या मज '' नगण्य '' करोत लोक।
'' माझे असे '' तनुसवे जळु दे अशोक ॥
काढो न नाव कुणिही चुकुनी कधीच।
हे जन्मसार्थक मला गमतेच साच ॥५॥
तेव्हा स्मरोनि विभु रे ! तुझिया पदाशी।
कर्मानुसार गति घेउच पुण्यराशी ॥
केला न मत्सर कधी कुठल्या जिवाचा ॥
सर्वेश्वरा सतत पूजन हे त्रिवाचा ॥६॥
( वयाच्या ८४ चे फेऱ्यातून)

इंदुमती पोळ १३–२–१९८३

मी महाशिवरात्रीस कऱ्हाड येथे येऊ शकलो नाही. मी त्या दिवशी विजयदुर्गावरच आपल्या मातु:श्रींचे स्मरणी दोन अश्रू ढाळले.

विजयदुर्गच्या सफरीत बापू गोखल्यांची जन्मतारीख मिळविण्याचा प्रयत्न केला. पण जमले नाही.

सौ. निर्मला कुलकर्णी २४-३-१९८३

मी सोलापूरहून चि. भास्करबरोबर पुण्यास गेलो. तिथे माझी पुन्हा तपासणी केली. बाकी काही दोष आढळला नाही. नंतर १४ तारखेला चि. विद्याधरने मला कऱ्हाडला आणले. प्रकृती दिवसेंदिवस सुधारत आहे. पहिल्यापेक्षा बरेच बोलायला येते.

खं. मं. खंडागळे ८-६-१९८३

गेले २३ फेब्रुवारी १९८३ पासून मी मुखरोगाने आजारी आहे. माझ्या घशातील ध्वनिनलिका बिथरल्याने ( फेब्रुवारीची कोल्डवेव्ह ) मला बोलताच येईनासे झाले. जवळजवळ साठ वर्षे बोलण्याचा व्यवहार केल्यामुळे आणि त्याचा उपयोग नाही हे सिद्ध झाल्यावर '' यापुढे बोलणे बंद '' अशी नोटीसच मला निसर्गत: मिळाली. त्यामुळे माझे समाजात मिसळणे बंदच झाले. घरी लिहा-ही-मध्ये कसा तरी केव्हाचा वेळ घालवण्याचा अभ्यासच गेले (चार) महिने अंगवळणी पडली.

दत्ता इनामदार १०-८-१९८३

माझ्या जीभेवर झालेला परिणाम हळूहळूच सुधारणार. जवळ बसून ऐकणारास माझे म्हणणे समजते. पण अजून तरी अडखळावयास होते.

दे. भ. एस. एम. जोशी यांचा केसरीने सत्कार केला आणि श्रौताचार्यांचा जन्मशताब्दी साजरा केला, यावेळी आपणास माझी आठवण झाली ती आपल्या माझ्याबद्दल आपुलकीने. खरे म्हणजे दे. जोशींच्या योग्यता मला नाही आणि श्रौताचार्यांची विद्वत्ताही मजजवळ नाही.

इंदुमती पोळ १-१०-१९८३

माझ्या बोलण्यात बरीचशी सुधारणा आपणांस दिसली. ती औषधाची कमाल आहे. गेले सहा महिने औषधे घेतो आहे. पण आता मी कंटाळलो आहे तरी मी औषधे बंद करण्याचा विचार करतो आहे आणि निसर्गाकडे माझी प्रकृती सुधारित राहण्याचे काम सोपवीत आहे. पुरे झाले आता औषधावर जगणे !

स्वराज्यात ' कायद्याचे राज्य ' म्हणजे ' काय द्या (व ) याचे ' राज्य बसायचे. होय ना ? प्रत्येक गोष्टीची जागा..... आणि नीतिन्याय गुंडाळलेला बघायचा ? अशा जगण्याची मला उबगच आहे.

इंदुमती पोळ १-१०-१९८३

काल ता. ३० सप्टेंबर १९८३ रोजी आयनवमी झाली. तेव्हा आपल्या आईच्या नावे मला खीर जेवणात होती. ती खाताना चुकून का होईना, माझ्या डोळ्यांत अश्रू आले. आपल्या आईस जाऊन जवळजवळ चौदा वर्षे झाली तरी मला असे भावनाप्रधानत्व आहे. खरे म्हटले असता माझ्या वयाला स्थितप्रज्ञता यावयास हवी. तसे झाले नाही. म्हणून माझ्या आयुष्यात कोठे तरी अपुरेपणा राहिला आहे, त्याची मला खंत वाटते. ती खंत भरुन येण्याचा मार्गही दिसत नाही.

द. र. कोपर्डेकर १८-७-१९८४

मला अलीकडे कोणी पत्र घालीत नाही, त्यामुळे माझीही पत्र लिहिण्याची सवय मोडून पडली आहे. त्यामुळेच आपल्यालाही मी पत्र लिहिले नाही. हाही संन्यास निभतो की नाही अशी परीक्षा नियती घेत असावी..

चि. धुं. बापट १०-७-१९८४

कऱ्हाडास माझे बरोबरीचे बहुतेक लोक परलोकी गेल्यामुळे मीही यात्रा करावी का याचा विचार करीत आहे. निदान महिन्यातले आठ दिवस तरी एकान्तवासात काढावेत आणि जगाला विसरण्याचा व आपल्याला जग विसरेल या प्रयत्नास लागावे असे मनात आहे. पाहू काय जमेल ते !

द. र. कोपर्डेकर २६-७-१९८४

वैद्य टोणपे यांचा मृत्यू झाला (त्यामुळे) आपण म्हणता ते खरेच आहे. मला बसण्याची ठिकाणे कऱ्हाडात कमीच झाली आहेत. तेव्हा मी विचार करतो आहे की आपण महिन्यातून एक आठवडा तरी बाहेरगावी फिरावे.

' कृष्णाकाठ ' परीक्षणांनी वृत्तपत्राचे रकाने भरलेले पाहिले. पण ते पुस्तक मी पाहिलेले नाही. किंमतही फार जड आहे.त्यावर आलेल्या टीका खऱ्या की खोट्या ते ते पुस्तक पाहिल्यावर सांगता येईल. वे. शा. सं. सखारामशास्त्री घळसासी यांच्यावरील टीका चुकीची वा खरी ही साक्ष नामदारांच्या बरोबरीची आपण मंडळी म्हणू शकाल.

द. र. कोपर्डेकर दि. ८-८-१९८४

आपण सांगितल्याप्रमाणे मला खूप लोक उपदेश देतात. पण पत्करलेली व्रते, सार्वजनिक जीवनातील पथ्ये आणि आत्तापर्यंत केला तो लोकसंग्रह यांच्या योगे काही कर्तव्ये करावीच लागतात. मोबदल्यात कृतज्ञता मिळतीच असे नव्हे....बेफिकिरीही वाट्यास येते. पण लो. टिळकांच्या अनुयायाने निष्काम कर्मयोग केलाच पाहिजे.

द. र. कोपर्डेकर, पुणे दि. ३-९-१९८४

' रसिक ' ने पाठविलेल्या फॉर्मातील परिचय या सदरात मला मिळालेल्या पदव्यांची माहिती मी दिलेली नाही. ' समाजभूषण ' ही पदवी समाजानेच १९२७ साली दिली; तर मिरजेच्या श्री.शिवाजी उत्सव समितीने त्या आधीच ' समर्थभक्ताग्रण ' ही पदवी श्री. खुपेरकर शास्त्र्यांच्या हाताने दिली होती. १९७० साली भारत सरकारने 'पद्मश्री ' ही पदवी दिली. या पदव्या मला वाङ्.मयसेवक म्हणून मिळाल्या नाहीत म्हणून मी ' रसिक ' ला कळविल्या नाहीत.

द. र. कोपर्डेकर ९-१०-१९८४

तळेगावात आताशा फार चोऱ्या होत आहेत– आणि कोठे नाहीत ? निढळाचा घाम गाळून मी स्वाभिमानाने पोटाला खाईन अशी शिकवणच समाजातून गेली आहे. लाचलुचपतीपासून जेवढे काही फुकट मिळेल ते मिळवण्याची आणि समाजाला लुटण्याची नीतीच म्होरक्यांनी घालून दिल्यानंतर ठिकठिकाणी चोऱ्या होणार नाहीत, तर काय होईल ? स्वराज्यात असा शिरस्ता पडावा व तेही शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात पडावा, याचे वाईट वाटते. पूर्वी इतिहासात चेंगिझखानाच्या लुटीची हकीकत वाचली.पण आता स्वकीयच चेंगिझखान झाले आहेत. '' आत्मने एव आत्मन : शत्रु :'' हे कसले स्वराज्य ?

द. र. कोपर्डेकर १९-१०-१९८४

श्रीमती शांताबाई पाटील यांनी आपल्यास काही जुन्या नव्या आश्चर्य वाटणाऱ्या गोष्टी ऐकविल्या. समाजातील नीतिमूल्ये आता खलास झाली आहेत हे खरे व्हावयाचेच; तो कलियुगाचा महिमा आहे, असे जुन्या काळचे लोक म्हणत असत. त्यांना त्यांचे भविष्य खरे ठरल्याचा आनंद होत असेल ! त्यातून राष्ट्राचे काय होणार ही चिंता आहे. पण आपण तरी काय करणार ? परवा घाटे मास्तरांच्या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी प्रा. आंबादास माडगूळकरांनी मला व घाट्यांना नाव घेऊन बजाविले की आम्ही नवीन पिढीला स्पष्टपणे मार्गदर्शन करावयास भिऊ नये. कारण त्यांच्या मते आम्ही चारित्र्याने निर्मळ असल्याने कळिकाळाची सुद्धा आम्हांला भीती नाही. माझ्यापुरते मी ते व्रत शक्यतोवर पाळीत आहे असे माझे मत आहे.

आता ऐहिक जगातील मजा पुरी झाली हा माझा ग्रह होत चालला आहे.

१९-१०-८४

मी ' १८५७ चा महाराष्ट्र ' लिहिला. त्या योगे हरजीराजे महाडिक ( तारळे ) यांचा नातू मजकडे आला, त्यांना मी त्यांचे हरजीमहाराजांचे कागदपत्र कोठून मिळविले ते सांगितले

आणि पुढेही मार्गदर्शन केले. सातारचा तुरूंग हा हरजी महाडिकांचा वाडा होता, त्यातील पहिले राजकीय कैदी हरजी महाडिकच होते. त्यांची मिळकत ब्रिटिश सरकारने समूळ जप्त केली होती. त्यांच्या नातवाला मी फक्त मार्गदर्शन केले. त्याने खटपट केली. त्यातून तारळ्यास हरजी महाडिकाचे प्रथम स्मारक उभारले गेले आणि २७ वर्षातून एकदा श्री. शिवाजीराव महाडिकास एक लक्ष रू, पाच हजार चौ. फूट जागा आणि तीन रूपये दरमहा पेन्शन सरकारातून मंजूर झाले आहे. परवा रविवारीच १४ ऑक्टोबर रोजी श्री. शिवाजीराव महाडिक मला सर्व कागदपत्र दाखवून, नमस्कार करून व कृतज्ञता व्यक्त करून गेले.

१९-१०-१९८४

तीस वर्षापूर्वी नागपूरच्या प्रा. मंगल गंगाधर नातू यास आगरकर वाड्.मय प्रसिद्ध करण्याची परवानगी शासनाने दिली. आगरकरांच्या वारसांची परवानगी मिळवण्यापासून माझ्या ' आगरकरांशी ओळख ' पुस्तकामधून उतारे घेण्याच्या परवानगीपर्यंत माझे सहाय्य झाल्यामुळे प्रा. श्रीमती नातूंनी मला कृतज्ञतेने शाल-श्रीफळ म्हणून शंभर रूपये देऊ केले आहेत. त्यांचा उपयोग मी येथील कन्याशाळेत आगरकर पारितोषिक ठेवण्याच्या कामी करावयाच्या विचार करून त्यास प्रा. नातूंची परवानगी विचारली आहे.

चि. धुं. बापट २०-११-१९८४

आपणास माझ्या १५ नोव्हेंबरच्या जन्मतारखेची सहज आठवण झाली व त्या तारखेस ८७ व्या वर्षात प्रवेश केला हे खरे आहे. पण त्याच तारखेस माझे मित्र नारायण वामन ऊर्फ बाबुराव गोगटे बेळगावास आपल्या डॉक्टर पुत्राचे येथे दिवगंत झाले !! त्यांच्या मृत्यूने मी जगात स्नेह्यांच्या बाबत सर्वस्वी उघडा पडलो आहे. हे गोगटे आपल्या आईचे चुलते कै. तात्यासाहेब जोशी यांचे नातजावई होते.

आपण माझे अभीष्ट चिंतन केले आहे. पण माझ्या कुंडलीत ८६ वर्षाची माझी आयुमर्यादा लिहिली असता मी ' ग्रेस ' दिवस का जगत आहे हे माझ्या लक्ष्यात येत नाही. मी स्वत: हात जोडून उभा आहे, ईश्वरी हाकेची वाट पहात आहे, तोपर्यंत मी हरी ठेवील तैसे रहावे असे ठरविले आहे. कारण मी जगाला कंटाळलो आहे व बहुधा मलाही जग कंटाळले आहे, त्याचाही अनुभव मी घरीदारी रोजच घेत आहे.

माझ्या '' वाचाबंदी '' शिवाय माझी प्रकृती उत्तम आहे.

द. र. कोपर्डेकर १-१२-१९८४

स्व. यशवंतराव यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे आपण अस्वस्थ झालात हे साहजिक आहे, मीही अस्वस्थ झालो..... यशवंतरावांचे आत्मचरित्र पुरे झाले नाही ही महाराष्ट्र सारस्वताची हानी आहे.

सौ. निर्मला कुलकर्णी ४-३-१९८५

परवा ६ मार्च १९८५ रोजी तारखेने आपल्या आईची पंधरावी पुण्यतिथी ( तिथीने ती महाशिवरात्रीस झाली आहे ) त्या निमित्याने आपल्यास यासोबत माहेर ( मा-आहेर ) पाठवित आहे, त्याचा स्वीकार व्हावा.

सौ. निर्मला कुलकर्णी ३१-७-१९८५

माझ्या पायाची जखम भरून आली आहे, पण नवीन जगाच्या मामल्यात टिकू शकेन असे माझे मला वाटत नाही. माझे मित्र श्री. दादा म्हसकर २ जुलै रोजी देवाघरी गेले व सातारचे एकबोटेही २० जूनला हे जग सोडून गेले. मी अशा रितीने एकाएकी पडतो आहे. इलाज नाही.

डॉ. गजानन इनामदार १२-८-१९८५

शिकंदराबादहून मी हैद्राबादेस समर्थपंचकांपैकी केशवस्वामी भागानगरकरांच्या मठात गेलो असता माझे जावयांच्या स्कूटरवरून मी उतरण्याचा बेतात होतो, तोच वेगाने येणाऱ्या मोटर सायकलस्वाराने आपली मोटार सायकल जवळून नेल्याने माझ्या उजव्या पायाच्या मधल्या बोटात व शेजारच्या बोटात मोटर सायकल घुसून ती दोन्ही बोटे कापली गेली व मी जखमी झालो. तेव्हापासून म्हणजे १५ जूनपासून मी आज दोन महिने जखमेने रंजीस आलो होतो.

त्यांतच भर म्हणून माझे तीन स्नेही मी गमावून बसलो आहे. त्यात माझे मराठी पहिली इयत्तेपासनूचे वर्गमित्र केशव विनायक म्हसकर हे २० जूनच्या दुपारी पुणे येथे अल्प आजारानंतर गेले. ते मॅट्रिकच झाले होते. आणि इंपिरियल बँकेत नोकरी करून रिटायर झाले होते. एक तऱ्हेने ते ब्रिटिश राजवटीत सरकारी नोकर होते. तरी माझा स्नेह त्यांनी भावासारखा केला होता. मी पुण्यात त्यांच्याकडेच उतरत असे व मी राजकीय चळवळीत असतो तरी ते मला उघडपणे आर्थिक व सामाजिक साथ देत असत. ते ८७ वयाचे होऊन गेले. त्यामुळे त्यांचा मृत्यू अकाली झाला हे मी म्हणणार नाही. पण माझा पाठीराखा गेल्याने त्यांचा वियोग माझ्या जीवाला जाऊन भिडला आहे.

माझे दुसरे स्नेही, गुरूबंधू, शाहीर दामुअण्णा एकबोटे २० जूनलाच सातारा येथे वारले. ते माझ्यापेक्षा सहा वर्षांनी लहान. पण ते सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे गुरुनाथ घाणेकरांचे माझ्याप्रमाणेच विद्यार्थी होते.

तिसरे माझे स्नेही, गोपाळराव शहाणे ( चाफळकर ) हे जुलैच्या २० तारखेस सातारा येथे दिवगंत झाले. हे पक्के सावरकरांचे अनुयायी व हिंदुसभेचे काम करीत असत. माझ्यापासून त्यांची सरणी भिन्न होती तरी आमच्या स्नेहामध्ये कधीच अंतर आले नाही. तो अखंड होता. विनायकराव फणसळकरांचा जसा कऱ्हाडास होता, त्याप्रमाणेच !

या चिजा आता दुर्मिळ होऊ लागल्या आहेत. म्हणून मीही '' हाकेची वाट पहातो आहे '' काळाच्या ओघात मी धरणीला भार होऊ नये असे वाटते. परमेश्वराच्या मनात काय असेल तेच होईल. पण सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्यात अंतर पडू नये या खटपटी मी करतो. ४ ऑगस्ट रोजी सातारा येथे श्री. द. स. हर्षेंचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यावेळी मी कर्तव्यबुद्धीनेच गेलो होतो.

चि. धुं. बापट १-१-१९८६

मला हैद्राबादेस चि. सौ. निमाच्याकडे गेलो असता, एका अपघातामध्ये दुसऱ्याची स्कूटर माझ्या पायावरून गेल्यामुळे उजव्या पायाची चार बोटे ( जून १९८५ मध्ये ) चिरली होती, ते माझ्या पायाचे दुखणे गेल्या आठवड्यात बरे होत आले, आता बरेच मावळले आहे. असे गेले महिन्यापासून साडेसातीचे शेवटचे वर्ष गेले. केव्हा केव्हा तर मी जीवास कंटाळलो होतो. '' नशिबी असेल नच ते टळे ।'' चाफळचे कवि यशवंतराव पेंढारकर हे माझे (मित्र) वारल्याने मला धक्का बसला. त्यांच्या तैलचित्राचे अनावरण मी सातारा जिल्हा ग्रंथालय परिषदेत केले होते. त्या अगोदरच माझे मित्र दामुअण्णा एकबोटे या स्वातंत्र्यसैनिकांच्या श्रद्धांजलीचे भाषण सातारच्या अनंत हायस्कीलमध्ये केले होते. आता तर गेल्या आठवड्यात श्री. लंबोदर काशीकर हे माझे मित्र मी गमावून बसलो आहे.

गेले ते गंगेला मिळाले असे समाधान मानून १९८६ वर्षात मी प्रवेश करतो आहे. माझे परगावी जाणेही थांबले नाही. फक्त दिवसाचा प्रवास करतो. गावात मी हिंडतोच. पत्रव्यवहार नियमित करतोच. फक्त संपादकांनी लेख मागितल्यावर लिहितो. दोन वर्षे झाली, सार्वजनिक व्याख्यान देऊ शकत नाही. ( कोल्ड वेव्ह भावली ) तरी पण माझे विचार लोक लिहून मागतात व कोणाकडून वाचवतात !

'' मी चरित्र लिहिण्या एवढा मोठा माणूस नाही. स्वातंत्र्य चळवळीतील मी एक सामान्य कार्यकर्ता. असे हजारो कार्यकर्ते आहेत. अशा हजारो कार्यकर्त्यांपैकी जो ' मुत्सद्दी ' असतो अशाला मोठेपणा मिळतो. आमच्यापैकी यशवंतराव चव्हाणांना हा मोठेपणा मिळाला आहे. त्यांचे जीवनचरित्र लिहिण्यासारखे आहे. त्यामध्येच आमचा मोठेपणा आहे. ''

कॉंग्रेस शताब्दीच्या सोहळ्याचे निमंत्रण आले नाही याबद्दल ते म्हणाले, '' जमाना बदलला आहे. लोकांच्या आचार-विचारात बदल झाला आहे. तेव्हा आपल्या स्वत:ला बोलाविले नाही म्हणून खंत व्यक्त करणे ही देखील स्वार्थाचीच भावना नाही का ?''

( प्रा. मो. नि. ठोके यांच्याशी बातचीत महाराष्ट्र मित्र, सातारा २६-१-१९८६)

चि. धुं. बापट ७-४-१९८६

जून १९८५ मध्ये मी चि. सौ. निमाकडे हैद्राबादेस गेलो होतो. तेथे एका स्कूटरमुळे दुखापत माझ्या पायाला झाली. आता माझा पाय बरा होण्याच्या मार्गात आहे. त्या माझ्या दु:खाची विचारपूस घरच्या दारच्या मंडळींनीं बिलकूल केली नाही. आपण पत्राने ' ते दुखणे पूर्ण बरे असावे ' अशी अनुमानात्मक चौकशी लिहिली आहे. म्हणून त्या कहाणीने आपणांस भास दिला.

मी ' पद्मश्री ' घेण्याकरिता दिल्लीस आल्यावेळी आपल्याकडे आलो होतो पण तेव्हाचे घर निराळे होते. आता स्वत:चे घर उभे केले ती नवी वास्तू मी पहावयास यावे अशी आपली इच्छा असून प्रा. इंदू पोळच्या मदतीने तो प्रवास करावा अशी अपेक्षा आहे. तेव्हा तिने कळविले म्हणजे मी माझ्या भाड्यासकट व वळकटीसकट तयारच आहे.

आता अयोध्येची रामजन्मभूमी खुली झाली आहे, तिचे दर्शनही करतो येईल, असे आपल्या पत्रात अप्रत्यक्ष सुचविले आहे. तेथे चैत्रामध्ये स्थानिक हिंदू रामजन्मोत्सव करणार आहेत का ? का राज्यकर्त्यांच्या प्रमाणे मुस्लीम मताखाली दबून दर्शनावरच काम भागविणार आहेत ? खरे म्हटले तर रामभक्तांनी, रामदास्यांनी, रामराज्य चाहणारांनी भारतीय न्यायालयाच्या निर्णयास उचलून धरण्यास व न्याय मिळण्यास उशीर झाला तरी देवाघरी उशीर कदाचित होत असेल तरीपण न्याय मिळतोच मिळतो हे जाणून व्यक्तिगत व संघटितपणे न्यायाची बाजू उठावाने घेतली पाहिजे, म्हणजे ( आता ) भारतीय मुसलमानांपैकी जे त्या निकालाबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत व वेळेस दंगा करण्याची भीती निर्माण करीत आहेत, त्यांचे काहीच चालणार नाही. पण येथील सज्जनगडचे अथवा धुळ्याचे अथवा अन्य ठिकाणांचे रामभक्त, रामदासी व रामराज्याचे चाहते काहीच करावयास तयार नाहीत आणि मलाच दटावतात. की '' तुम्ही (मी) राज्याविरूद्ध का जाता ?'' आता हिंदुस्थानात कोणी परके राज्यकर्ते नाहीत आणि भारताने ' सर्वधर्मसमानत्व ' मानले आहे. ( त्याचा अर्थ हिंदू अथवा वैदिक धर्म काहीच नव्हे !) अजूनही वेळ गेलेली नाही; उद्या १० एप्रिलपासून १८ एप्रिलपर्यंत रामभक्त, रामदासी आणि रामराज्यपरिषद जागेपणाने रामजन्मोत्सव भारतीय प्रमाणावर साजरा करण्याचे मनावर घेतील तर लोकजागृती होईल व न्यायाधिष्ठित इतिहासात कायदेशीर न्यायाची बूज कायम राहील.

द. र. कोपर्डेकर ता. १६-४-१९८६

मी हल्ली बाहेर फारसा हिंडतही नाही, किंबहुना ' पुरूषोत्तम पांडुरंग गोखले ' या नावाने जी मी कुडी धारण करीत आहे ती टाकून मोकळे व्हावे हा विचार मला वरचेवर सुचू लागला आहे. या जगाची मौज, टक्केटोणपे, अपमान व मान पुष्कळ पाहिले, आता दुसऱ्या जगात जावेसे वाटते.

म्हणून या जन्मीचे कर्तव्य केले पाहिजे. म्हणून, गोखले कुळाचे ऋण म्हणून, माझी पुस्तके आपण प्रसिद्ध केलीत ती त्यांची मूळ किंमत घेऊन श्री. त्रिंबकराव गोखल्यांना द्या अशी माझी विनंती आहे. आपल्या चिरंजीवांना ( इंद्रायणी प्रकाशन ) व वसंतराव सातवळेकरांना अशीच विनंती करणार आहे.

दत्ता इनामदार ता. १७-४-१९८६

भारत देशात आजवर अनेक विभूती झाल्या आहेत. आजही आहेत. त्यांपैकी आपण आदर्श म्हणून मानले असेल ! पण आपल्यासारखाच सामान्यातील माणूससुद्धा कीर्ती करून गेला नाही तरी देशभक्तीने, भारतीय संस्कृतीप्रेमाने व ' जनसेवा हीच ईश्वरसेवा ' म्हणून आयुष्य काढू शकतो याच भावनेने आपण माझ्या छायाचित्राची इच्छा केली असावी.

श्री. दत्ता इनामदार ता. १०-८-१९८६

माझी प्रकृती वयाच्या मानाने बरीच तंदुरुस्त आहे. तथापि देशात मानवी संहार – तोही मानवाने मानवाचा केलेला पहावयास मिळतो आहे, हे खरे आहे. तूर्त जगभरच ' परमेश जगाचा पैसा ' असा झाल्याकारणाने नीतीने चालणाऱ्यांचा अभाव आहे व समाजापुढे आदर्शच नाही. तरूण पिढीतही कर्तबगार, समाजावर वजन ठेवणारा असा कोणी नाही, त्याची वाट पहावयाची आहे.

गो. रा. माटे ता. १९-८-१९८६

' आचंद्र-सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे '

आपले ता. १५ ऑगस्ट १९८६ चे ( पत्र ) आजच पावले. भारताच्या स्वातंत्र्याला त्या दिवशी ३९ वर्षे जाहली, असे म्हणतात ! ते खरे नाही ! १५ ऑगस्ट (१९४७) ला गव्हर्नर जनरल ब्रिटनचेच होते. त्या दिवशी हिंदुस्थान हे भारत आणि पाकिस्तान यात विभागले गेले भारत राष्ट्र ( म्हणून ) स्वतंत्र नांदू लागला तो २६ जानेवारी १९५० मध्ये आम्ही घटनात्मकदृष्ट्या स्वतंत्र झाल्यापासून ! त्या दिवशी आमची पारतंत्र्याची मगरमिठी सुटली ! हे मत माझे म्हणून मांडत आहे, अगदी पहिल्यापासून ! भारत स्वतंत्र व्हावयाच्या मार्गावर मात्र १५ ऑगस्ट ४७ रोजी लागला. वाईला त्या(दिवशी) मामलेदार कचेरीतील (भाषणात ) हेच मी सांगितले. त्य दिवशी व २६ जानेवारीस मी, ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता आपले बलिदान केले, त्या सर्वांना अभिवादन करूनकृतज्ञतेचे समाधान मानतो.

आता शरीर तग करीत नाही मनाच्या उभाऱ्यासारखे त्याने माझातरी नाईलाज आहे ! स्वातंत्र्य मिळवण्याचेच सामर्थ्य आम्हा भारतीयांपाशी आहे. आपणास ब्रिटिश सेनापतीने शाप भारताच्याबाबत दिले आहेत व नजीकच्या काळातच खरे ठरतील, अशी भीती दाखविली आहे. तो अनिष्ट दिवस येण्यापूर्वीच आमची इहलोकाची जीवनयात्रा संपव अशी माझी तरी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना आहे. कारण, भारताचे स्वातंत्र्यसंरक्षण आता नव्या पिढीनेच करावयाचे आहे. तीच जर नादान असेल तर कारभार संपलाच म्हणावयाचा !! पण असे व्हावयाचे आहेत.

आपल्या पिढीपेक्षा पुढे होणारी पिढी भारताचे स्वातंत्र्य खात्रीने सांभाळील ! राजीव गांधींनी म्हटल्याप्रमाणे आकाशातून विमान चालविणे सोपे असले तरी भारताचा कारभार करणे हे फार अवघड आहे. ते खरेच आहे. तरी पण जनरल वैद्य यांच्या खुनानंतर देशात ज्या प्रतिक्रिया उमटल्या व उमटत आहेत, त्यावरून महाराष्ट्र तरी भारताचे स्वातंत्र्य गमावू देणार नाही असे वाटते. भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात महाराष्ट्रच आघाडीवर होता. आता तर काय, आणीबाणीची वेळ पडली तर '' मरणासी तयार, तोच करिल ठार ' अशा निश्चयानेच महाराष्ट्र भारताची शान राखील !!

श्री गजानन प्रसन्न

ऋषिपंचमी १९८६

सज्जनहो, आपणास अभिवादन करून, आज रोजी मान्यवरांच्या मातब्बर उपस्थितीत माझा गौरव झाला. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. पण ऋषिपंचमीचा सत्कार करण्यास मी काय तपश्चर्या केली आहे, हे अजूनही मला कळलेले नाही. शील, चारित्र्य, विदवत्ता, सभाधिटता, लोकग्रहण, वगैरे शुभगुणाचे धडेच मी अद्यापी गिरवतोच आहे. कारण माझ्या तरूणपणी देशात ललामभूत झालेले महाशय माझ्या आढळात आले व त्यांचे सारखे व्हावे हाच मला '' बोध आला '' देशातील फार मोठ्यांची गाठ पडावी ही भाग्याची गोष्ट आहे. तरी पण त्या मोठ्या माणसांच्या मोठेपणास आपल्या वर्तनाने झोपेतही धक्का लागता नये ही काळजी वाहण्यास माझे वडील व गुरूजन उपदेशित, हे मी अजूनही विसरलो नाही. अजूनच मोठ्या माणसांचे देशभक्तिबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल आदर करून त्यांच्या जवळचे गुण घेण्याचा मी प्रयत्न करीत आलो. त्यातून पेन्शनधारी स्वातंत्र सैनिकही झालो नाही. मात्र तसे करताना देशद्रोही तितुके कुत्तेही हे मानत आलो. समाजातील एकजिनसीपणा मानत आलो व समाजाचा प्रवाहीधाराला म्हणजे बरे तो तुंबता नये. हे पहात आलो. एवढाच माझा गुण. तो गुण म्हणजे ऋषीची तपश्चर्या नव्हे. तो गुण आपणास दिसला त्यानेच माझा सत्कार करण्याची आपली बुद्धी असली तर सर्वांच्या गुणग्राहकतेचे उदार ह्दयाचे व उदारतेचे ते उदाहरण आहे. थोडा ही गुण मिळता घ्यावा ही पुण्याची परंपरा आहे. त्या परंपरेस अनुसरून इतर सज्जनासमवेत माझा सत्कार होण्यास आपण भूषण मानलेत त्याबद्दल आपले अंत:करणपुर्वक आपणास धन्यवाद देतो.

मी कृतज्ञ आहे. असाच लोभ निरंतन राहो ही प्रार्थना आहे.

प्रपंचातील परमार्थ !
वास्तवातील विशेष !

'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे'

– केशवसुत

संसारातही असते अद्‌भुत आणि रम्यता. 'स्मृतीची चाळता पाने', माणसाच्या डोळ्यांसमोर आपल्या जीवनातील ऐकलेल्या, पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टींचे देखावे डोळ्यांपुढे उभे राहतात आणि आपण समजतो तितके जग खरोखर टाकावू वा तिरस्कारार्ह नसून दुःखमय, संकटमय जीवन जगण्यातही अद्‌भुत्‌रम्यता आहे, या आस्वादाने जिवाची दिवाळी रंगते हेच पहाना !

## आजी

मातें लावुनिया सिधे वळण तू मातेपरी पाळिले
गीते गाऊनिया सुनीतिपर तू गीतेपरी बोधिले
देही याच तुझ्या सुनिर्मळ गुणी देवीपदा पावसी
आजी ! नित्य कृपा असो मजवरी आजी असे ते जशी ॥

## मान्यता नव्हे ही फुकाची

माझे पिताजी कोणत्याही नव्या धर्मपंथाचे अनुयायी नव्हते, तर अगदी सनातन पद्धतीने स्नानसंध्याशील ब्राह्मण होते. लौकिकदृष्ट्या त्यांचे शिक्षण इंग्रजी तीन इयत्तांचेच झाले होते; पण ते इतके पक्के की नवीन मुलांच्या शिकवण्या करुन त्यांनी त्यांना इंग्रजी तिसरीत प्रशंसनीय रीत्या उत्तीर्ण होण्याची क्षमता आणली होती. मला त्यांनी तर्खडकरांची तीनही भाषांतरे तितक्याच सफाईने शिकवली होती. तिसऱ्या भाषान्तराच्या शेवटी जी एक काल्पनिक कथा–फेबल–दिली होती, तिच्यातील मर्म सांगितल्याशिवाय मात्र ते आपली शिकवणी पुरी करीत नसत व पुरी झाली असे मानीत नसत, त्या फेबलमधील आंधळी जशी प्रार्थना करते की जे अवयव मला परमेश्वराने दिले नाहीत, ते त्याने माझ्या मुलाला तरी द्यावेत आणि त्यांच्या जीवनाची पूर्तता व्हावी आपल्याला जे उणे पडले असेल ते दुसऱ्याला तरी पडू नये, ही इच्छा धरली तर शिक्षणाचे सार्थक होते, असे माझ्या पिताजींचे प्रबोधन असे. ते तीनच भाषान्तरे शिकले व दुसऱ्यास पक्केपणी शिकवू शकत, याचे कारण शिकावयाचे व असेल पक्के शिकले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. एरवी, जे जे काही आपणासि ठावे। ते ते दुसऱ्यासी शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जन'' हे साधणार कसे, असे ते म्हणत.

कऱ्हाड म्युनिसिपालिटीत तीन रुपयावर लागून अकरा रुपयावर निवृत्त झालेला माझा जन्मदाता आमच्या घरचा एक प्रगल्भ विचारांचा सत्पुरुषच होता. फुरसत सापडली

की ते काही ना काही तरी जुने–नवे सापडेल ते वाचत असावयाचे. ही गोडी त्यांना पंडित हरीभाऊ शहाणे यांच्याकडे संस्कृत शिकल्यापासून लागली होती. पंडित हरिभाऊ शहाणे मूळचे चाफळचे; पुढे औन्धास पन्तप्रतिनिधींच्या शाळेत होते. पंडित.शाहाण्यांच्या शिकवणीने माझ्या पिताजींना एक मर्मभेदी दृष्टि आली होती. त्यांनी मला एकदा माझ्या मित्राबरोबर गीतारहस्यातील आत्मानात्मविवेकावर चर्चा करताना ऐकले. आणि आम्ही पदवीधर मंडळी कोठेतरी समजुतीचा घोटाळा करुन घेतो आहोत, असे त्यांना वाटले. तेव्हा ते हळूच सूचना देऊन चुकले की "पुन्हां एकदां ते प्रकरण शान्तपणें वाचा." आश्चर्य असे की आम्ही ते पुन्हा शान्तपणे मनन करीत वाचल्यावर, आम्हाला सर्व उलगडा नीटच नीट झाला, व "वाचिलेचि वाचावे पुनः पुन्हा" या समर्थ वचनाचे महत्त्व कळले.

तीर्थरुपांच्या वर्तनात ही अशी अद्‌भूतरम्यता सहज एकाद्या प्रसंगी आढळे. नवरात्राच्या दिवसात "सन्तु गोंधळी" आमच्याकडे नेहमी यावयाचा. गाणी म्हणून झाली की, सदरा, फेटा, धोतर मागावयाचा ! "देईन केव्हांतरी" असे आमचे तीर्थरुप म्हणावयाचे. एका नवरात्रात संतोबा खणपटीस बसले अन् "औन्दा धोतुर नेसवल्याबिगर मी जायाचा नाहीच !" असे म्हणाले. आर्थिक ताकद नव्हती, म्हणून तीर्थरूप चालढकल करीत होते. पण सन्तोबांचा हट्टाग्रह पाहून, त्यांना कुलदेवता अंबाबाईने प्रेंरणा दिली की काय, कोणास ठाऊक ! पण दांडीवर वाळत घातलेले नवे कोरे धोतर माझ्या वडिलांनी ओढले अन् सन्तोबांच्या अंगावर टाकले !

म्हणून माझे पिताजी बोलण्यापेक्षा पुष्कळ ते ऐकत, पहात, वाचत असत आणि त्याचे चिंतन करून बिनचूक निदान करण्याचा प्रयत्न करीत. विचार–उच्चार–आचार अशा सर्वच बाबतीत माणसाने "प्रभुश्च क्षमया युक्तो दरिद्रश्च प्रदानतः ।" असावे असा उपदेश तीर्थरुपानी एका प्रसंगाने मला केल्याचे आठवते. त्यासाठी "आपणास जे जे अनुकूळ । ते ते करावे तत्काळ । होइना त्यास निवेळ । विवेक उमजावा ।।" असे मात्र आम्हा घरच्या माणसांना वारंवार बजावीत. ते स्वतः तसेच वागत. १९१८ च्या दुष्काळातील प्रसंगी कडब्याचा दर ५–६ रुपयावरून ४५ रूपयांवर चढला. त्यावेळी आपल्या वाटेकऱ्याला दिलेला कडबा दुष्काळापूर्वीच्या शेकडा पाच दरानेच माझ्या पिताजींनी घातला तेव्हा आमच्या शेजाऱ्यांनी आमच्या तीर्थरुपांना "व्यवहार शून्य" म्हणून हेटाळले. पण विचार करून मला त्यांची वृत्ति "ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास" धरणारी वाटते.

त्यांनी मला "भला रे बोलती ते करावे ।।" हा समर्थोपदेश सुनावून माझ्या अठरा वर्षापासून पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य दिले इतके की मी राजकीय चळवळीत पडून तुरुंगवास पत्करला; तो त्यांना पसंत नव्हता, तरी ते एक अवाक्षर बोलले नाहीत. त्यांची तितिक्षा कमालीची होती. ती जाणून पितृपूजेत बिलकुल हेळसांड होऊ नये म्हणून मी शक्य तेवढे जपले.

पिताजींच्या नित्य नैमित्तिक आन्हिकाला रोज वेळ होई. तरी ते पानावर बसल्याशिवाय मी किंवा माझ्या सहचारिणीने कधी अन्न सेवन केले नाही. कपडालत्ता त्यांना प्रथम केल्याशिवाय आणि त्यांच्यानंतर सगळ्यांत लहान मुलापासून सुरु करुन माझ्या पत्नीसुद्धा सगळ्यांची व्यवस्था झाल्यावरच मी माझ्या कपड्यालत्त्यांची तरतूद करण्याची प्रथा ठेवली. हे जरी सगळे सांभाळले तरी ते असंतुष्ट आहेत हे मला ठाऊक होते. पण एके दिवशी एक प्रसंग घडला. माझी पत्नी १९३४ साली टॉयफॉईडने आजारी होती. त्या एका दिवसात तीन फार मोठी माणस माझ्या इथं आपण होऊन येऊन गेली. पहिले, त्या वेळचे प्रख्यात वकील दादासाहेब करंदीकर आपली मुलगी नर्स गुणाताई यांना घेऊन आले. दुपारी भाऊसाहेब सोमण तर संध्याकाळी नानासाहेब जोशी चौकशी करुन गेले. ही सारी मोठी माणस येऊन गेल्यावर वडिलांना एकदम जाणीव होऊन ते म्हणाले, ''तू आत्तापर्यंत जे वागलास याबद्दल मला काही म्हणायचं नाही. शेकडो रुपये मोजूनही जे वकील कोणाकडे जात नाहीत, तीच माणसं एक छदामही न घेता तुझी चौकशी करायला येतात. तू स्वीकारलेल्या दारिद्र्याचा अर्थ मला समजला तुझ्याइतका श्रीमंत कोणी नाही. तुझ्या बद्दलची माझ्या मनातील अढी (grudge) गेली.'' – वडिलांच्या समाधानाचा हा माझ्या सर्वोच्च आनंदाचा प्रसंग होय.

अशा साध्या राहणीच्या व उच्च विचारसरणीच्या, सामान्यातील असामान्य सज्जनांकडून माझा जसा शारीरिक तसाच वैचारिक पिंड तयार झाला ''म्या त्यासी कैसे विसरावे?'' अडीच तपे झाली ते आम्हाला सोडून गेले त्याला ! पण हर घटकेला ते आपल्या आशीर्वादासह माझ्या पाठीशी उभे असल्याचा प्रत्यय येत असतो.

✷✷✷

प्रेयसीची पंचारती

प्रश्न : हाय ! काय हें? रमणी आरती कशा ? ।
लाजविण्या काय मला रिझविसी अशा ॥१॥
उत्तर : रमणी कां लाजविती वीर हो कधीं ? ।
विक्रमार्थ गौरव हा आदरी सुधी ॥
सेवाया अविरत कीं तातपावलां ।
कीर्तिश्रीकर विद्या-संधि दवडिला ॥
पुंडलिकें परमेशा स्वस्थ उभविलें ।
आपण ही तेंच गणित आज मांडलें ।
ओवाळूं मी न कशी नेत्रदीपकीं ? ।
हृदयाची मैत्री कां होत कधिं फिकी ? ॥
त्यागवीर हे माझे देव जन्मिचे ।
सीतेचें पुण्य तेज आज कां पिचे ? ॥
मी न होउं हृदयरमा आपुली जरी ।
नाम जपत आपुलेंच सतत वैखरी ॥
पुरुषोत्तम पूजिन हा हृदयिं वा जगी ।
जीवनिंचा करुनि यज्ञ गुप्त खाजगी ॥
सेविन ती नित्य रुती भगिनि मानुनी ।
तात-माय अपुली जी धन्य कामिनी ॥
मम सोनें होय सुनें नावरी 'तुला' ।
गरिबीतिल वश जी हो तुलसिच्या दला ॥
मम 'पदवी' - परिचय ही जेथ पामरें ।
ज्ञानशून्य नोळखीवरि झडत चामरें ॥
हृदयाचें एकतान गाव गंजलें ।
प्रेमरसीं शुद्ध तरी चित्त रंजलें ।
जे अपणां तात-माय आपुले पिते ।
मन त्यांचे दुखवाया कोण दाविलें ? ॥
हृदयासी हृदय जिथें जुळत पळपळां ।
घर तें कीं संसारा जेथ ये कळा ॥
हृदयेश्वर हा माझा वरि कृतज्ञता ।
जीवनिंच्या होमुनियां वैभवा स्वतां ॥

अभिमानें याच गमें सार्थ जीवन।
''कौमार्या'' जन वदोत केतकी–वन !॥
गरिबींच्या गोपाळा व्रतिं सुखी असा।
चंपक मम मनिं फुलेल गुप्त गोडसा॥
वाहिन तो पाजळोनि हृदय–भावना।
व्रतविजया पंचारति करित पावना॥
आज तिचा हा प्रसाद आरती असे।
दृढवाया व्रतिं पतिला करिति सती असे॥

✵✵✵

जिने मला वेडा केला तिची फेर याद ..

ती माझी एक वर्गभगिनी होती. चंपा तिचे नाव. वडिलांच्या छत्राला ती आचवली आणि आईबरोबर आजोळी येऊन वाढू लागली. आजा–आजींची अलोट माया तिला लागली. पण जीवनातील एक एक जाण मेंदूत घर धरू लागली तशी आपली पितृहीनता तिला चटके देऊ लागली. गाठ पडल्यावर तिचा एक शब्द तरी ऐकण्याचे मला आकर्षण असे. त्यासाठी आमच्यापैकी कोणीच कधीही आवर्जून मात्र प्रयत्न केला नाही. कारणही नव्हते. एकतर चंपूने आपल्या श्रीमंत आजोबांच्या फैटणीतून दुपारी कॉलेजला यावयाची व कॉलेज सुटल्यावर चालण्याचा व्यायाम व्हावा म्हणून घरी पायी परत जावयाची. या घरपरतीत तिची मैत्रीण व आमच्या जिल्हयातील माझ्या ओळखीची विजया शृंगारपुरे कधी कधी असावयाची आणि अशा वेळी काही चर्चेचा विषय असलाच तर आमचा सुखसंवाद व्हावयाचा, पण आम्ही ज्युनिअरचे वर्गात असताना एक दिवस माझ्या दृष्टीने अेक नवलच घडले. चंपूच्या सहीने मला एक पत्र आले. त्यात मायन्याचा नमस्कार झाल्यावर एक संस्कृत श्लोकच फक्त होता तो असा –

वांछा सज्जनसंगते परगुणे प्रीतिर्गुरौ नम्रता।
विद्याया व्यसनं लोकापवादात् भयम्॥
भक्तिः शूलिनि, शक्तिरात्मदमने, संसर्गमुक्तिः खले।
एते येषु वसन्ति निर्मलगुणास्तेभ्यो नरेभ्यो नमः॥

या श्लोकरूप पत्राचे गूढ मला पुष्कळ दिवस उकललेच नाही. उकलणार कोण व केव्हा ? मजकडे पत्र येऊन गेल्यावर चांगली दोन महिन्यांची मुदतबंदी संपली व एका सार्वजनिक सभेच्या ठिकाणी सहज गाठ पडली. तेव्हा मी पत्राचा विषय काढला व गूढ उकलण्यास विनविले. तर उत्तर आले, ''आदराने केलेल्या नमस्कारात, तो पत्ररूपाने

असला तरी गूढच काय असणार?'' त्यावर चांगले चार दिवस गेले. आणि ज्या जोगेश्वरीगल्लीतील ढमढेरे–रेस्टारंटमध्ये मी सायंकाळी ६ ते बारा असा हाफटायमर म्हणून काम करीत होतो, तेथे विजया शृंगारपुरेआणि तिचे मिस्टर मिसळपाव चापायला रात्री ८ वाजता आले होते. त्यानी मला पाहताच काही सांकेतिक निश्चयाने माझ्याशी बोलणे सुरू केले. ते दोघे म्हणाले की 'एक दोन दिवसात तुम्हाला चंपाचे आजोबा बोलवून घेतील आणि तुम्हाला चतुर्भुज करण्याची भाषा काढतील, अशी आमच्याकडे खास बातमी आहे. तुम्ही हे हॉटेलबॉयचे काम करता हे रावबहाद्दूराना ठाऊक आहे का नाही, आम्हाला ठाऊक नाही. पण काही झाले तरी नाकापेक्षा मोती जड लाचारीनेही स्वीकारण्यात तुम्हाला गुलामापेक्षा गुलाम नाही ना व्हावे लागणार ? याचा विचार तुमचा तुम्ही करावयाचा आहे.

मी काहीच ब्र काढला नाही. आणि दोन दिवसानी आर्थिक, सामाजिक नैतिक, वैज्ञानिक आणि संचालक अशी बलसंपन्न असलेल्या रावबहाद्दूर बाबासाहेबांची फैटण माझ्या बिऱ्हाडाच्या खोलीसमोर येऊन खरोखरच उभी राहिली. त्यांच्या शिपायाने मला रावबहाद्दूरांच्या स्वदस्तुरचे निमंत्रणपत्र हाती दिले व ताबडतोब फैटणीत बसण्यास अजीजीने सांगितले.

मी त्याप्रमाणे केले. फैटण रावबहाद्दूराच्या बंगल्यासमोर गेली. उतरलो.

मला पाहताच बंगल्यासमोरच्या बागेत आरामखुर्चीवर बसलेले बंगल्याचे सरसाहेब उठून उभे राहिले आणि ''आइये आइये बाबू जी !'' अशा शब्दानी त्यांनी माझे स्वागत केले.

मीही नमस्कार केला. सरसाहेबांच्या टेबलासमोरील त्यानी दाखविलेल्या खुर्चीवर बसलो.

एवढ्यात चहाबिस्किटाचा ट्रे घेऊन स्वतः चंपूच आली. कपाकपात चहा ओतून बिस्किटांची चवड एका एका ताटुलकीत लावून तिने आम्हापुढे ते कप व त्या चवडी आम्हा दोघापुढे सारल्या. तिसरा तसाच थाट करुन तिने तो टेबलांच्या एका कोपऱ्यात घेतला व जवळची एक खुर्ची ओढून घेऊन ती स्वतः त्या कोपऱ्याला सामोरी बसली !

''मी तुम्हाला एका नाजूक कामाकरता बोलावले आहे.'' सरसाहेबानी सुरवात केली. चहाचा एक घुटका घेतला अन म्हणाले –

''ही चंपा, माझ्या मुलीची मुलगी. आडनावाप्रमाणे अगदी गुपचूप चालणारी. बोलणारी. तिचे वडील वारल्यापासून आज पंधरा वर्षे ती माझ्याकडेच वाढली. तुमच्या वर्गातच प्रिव्हीयसपासून आहे. तेव्हा दोन वर्षे ती तुम्ही पाहताच आहां ! तिला तुम्ही आपल्या जीवनाची साथी करावी, असे मी सुचवितो. आम्ही सारस्वत पण आता असले भेद कोणी मानीत नाही.

सरसाहेबानी वरील सांगी पुरी करता करताच चहा संपविला होता तसा चंपानेही. मी

तर बिस्किट व चहाही पुरा केला होता. आता चार डोळे माझ्याकडे लागले होते. मी डावीकडील आशाळू व उत्सुक तरूण डोळ्याना दुखवू नये. अशा बेताने वृद्धानुभवी नजरेला आणून दिले की ''मला माझ्या वडील–आजीना विश्वासात घेऊनच आपल्या सूचनेची प्रतिक्रिया प्रकट करता येतील.''

तरुण चेहरा हसरा झाला आणि वृद्ध ओठ पुटपुटले ''ठीक !'' त्यानंतर ''पश्चिम आघाडीवर सर्वत्र सामसूम !'' चांगली दोन महिने ! दोन महिन्यानंतर एक दिवशी कॉलेजाच्या व्हरांड्यात चंपूने मला बोटाच्या इशाऱ्याने थबकविले. जवळ येऊन तिने सुचविले – 'कॉलेज सुटल्यावर आपणास आजोबांनी बोलावले आहे. आपण बोलत बोलत स्वारगेटाकडील बाहेरच्या रस्त्याने जाऊ.'' माझ्या होकार–नकारासाठी ती थांबलीच कोठे? एकदम झटकली आणि मी फक्त अवाक् होऊन वाचनालयात शिरलो.

सायंकाळी पाच वाजता कॉलेज सुटल्यावर बाहेरच्या रॉयलरोडवरील कोपऱ्यावर चंपा माझी वाट पहात उभी राहिली ! मी कॉलेजबाहेर पडताना तिला हेरण्यासाठी नजरेच्या धिरट्या चालीत सावकाशीने पाऊलटाक करीत चाललो. दहा मिनिटातच चंपाच्या अंगावरुन मी जाईन म्हणून तिनेच मला टेहळून गाठले व माझी मार्गदर्शिका होऊन ''इतः इतः राजन् !'' म्हणत पुढे चालू लागली.

स्वारगेटपर्यंत आम्ही दोघे त्या ओसाड नसल्या तरी ओढाळ वाटेपर्यंत आलो ते अगदी ''आळिमिळी–गोपचिळीने !'' स्वारगेट ओलांडली अन् चंपू हसत हसत म्हणाली –

''मी, माझी आई व आजोबा, आपल्या वास्तुक्षेत्राची यात्रा करून आलो, म्हटले ! तीन आठवड्यापूर्वी ! आपल्या तीर्थरूपांची व पितामहींची वंदना करण्याचे पुण्य साधले !''

''आपल्या तीर्थरुपांची'' ही चंपाची भाषा आदराची, मिष्किलीची की अवमानित मनाच्या उद्रेकाची ? माझ्या मनाचा निश्चय होईना ! म्हणून मी माझी प्रतिक्रिया काहीच व्यक्त केली नाही !

तशीच दोन, नव्हे पाच मिनटे गेली. तशी चंपा अगदी जवळ येऊन विचारु लागली की, ''आम्ही इतकी सलगी केली, ते चुकले का ?''

आदर दाखवणे म्हणजे काही चूक करणे नव्हे ! – मी उत्तरलो मग ती सांगू लागली.

''आपल्या तीर्थस्वरूप मंडळीनी वधूत दोष काढला नाहीच ! पण पदवीधर मुलगी गरीबीच्या वाळवंटात कशी निभणार ? एवढाच प्रश्न त्यानीं प्रथम केला.

त्यावर, माझी आई म्हणाली, ''सदा ताजातवाना आणि मरगळ ठाऊक नसणारा जीवनसाथी हीच खरी श्रीमंति असे माझी मुलगी मानते.''

यावर आपले तीर्थरुप म्हणाले की, ''मी मुलाच्या मनाविरुद्ध जाणार नाही. पण आपल्या आजी म्हणाल्या की मी नातवाच्या आड येणार नाही. तरी आपण मंडळी सारस्वत ! तेव्हा मला या मुलीच्या हातचे अन्न चालणार नाही !!!''

पण यातले मला काहीच कळलेले नाही असे जेव्हा मी चंपूला सांगितले तेव्हा ती

म्हणाली की ''मी ग्रीक् ॲन्ड लॅटिन् का बोलते ?'' तेव्हा रस्त्याकडच्या एका झाडाखाली मी तिला चालविले आणि सांगितले की ''तुझी इतिहासकथा अगर यात्राकथा मला समजली ! तरीपण हे मला तू रस्त्यावर सांगण्यातील रहस्य मला कळले नाही आणि तुम्हा मंडळीच्या यात्रेचा उल्लेखही आजपर्यंत माझ्या वडिलांच्या पत्रात नाही.

त्यानंतर ती आपला ओठ दाताखाली चिणून जराशा स्मिताच्या लकेरी फैलावीत म्हणाली ''वडीलमंडळीनी समंजस माणसाला मतस्वातंत्र्य दिल्यावर पत्रद्वारे सूचना काय द्यायची? माझेही आजोबा म्हणाले की जुनी माणसे प्रथम अशीच ताठ असतात, पण पुढे होतात मऊ मुलांच्या भलेपणाने !!!''

या सगळ्या रिपोर्टाचा परिणाम म्हणूनच की काय, मी प्रश्न केला – ''मग आजच मला बोलावण्यात काय प्रयोजन?''

'माझ्या आजोबाकडून त्यांच्या अपेक्षित नातजावयापुढे येणाऱ्या प्रयोजनाला तोंड द्यावे लागणार आहे, म्हटले !'

''बेत तरी काय आहे?''

'सर्वत्र औदारिकस्य अव्यवहार्यमेव विषयः । असे म्हणू की ब्राम्हणो भोजनप्रियः । म्हणू?'

'तुझ्या आजोबांच्या योजना – प्रयोजनाबद्दल मी काय करावे?'

'सल्लाच पाहिजे, तर सांगते की हे लग्न होलाच कामा नये !' आणि आवंडा गिळून लगेच चंपा म्हणाली –

'असे डोळे विस्फारून पाहू नये गडे! आपली आई वारल्यानंतर ज्या वृद्धेने आपल्याला अंगाखांद्यावर जोपासले, ती जर आपल्या अर्धांगीच्या हातचे जेवणारच नसली, तर तसल्या विवाहाचा अर्थच काय? विवाहसंबंध माणसे जोडण्याकरता करावयाचे का माणसे तोडण्याकरता ?'

'छे ! हा घाट बांधायचे आज तरी मला जमणार नाही !'

'आपली संमति असेल तर ते अवघड काम मी आईकडून सावरते !'

अन् तोपर्यंत आम्ही सरसाहेबांच्या बंगल्यापर्यंत आलोच होतो. आत गेलो. सरसाहेबांच्यापुढे मी जाऊन बसलो. चंपा आत गेली व आईला घेऊन ओसरीवर आली. नेहमीप्रमाणे चहा फराळ झाला. तसे सरसाहेब म्हणाले ''आता लग्नाचा मोसम सुरु झाला आहे, तेव्हाऽऽ''

त्याना मध्येच त्याच्या कन्येने थांबवले आणि म्हटले – 'काका, आपली आपण सगळी आखणी नीट करू या आणि मग नक्की बोलू या !' सरसाहेबानी मान्य केले. बैठक संपली !

पुनः त्याबाबत कधी बैठकीचा प्रसंगच आला नाही. मग काय जादू चंपाने व तिच्या आईने केली ते त्या दोघी, सरसाहेब आणि परमेश्वर जाणोत !

त्यावर चांगली अकरा वर्षे आली व गेली. म. गांधीच्या राजकीय चळवळीत मला १९३२ च्या प्रारंभी लागलेली पोलिसी हजेरी मी देण्याचे नाकारल्याने मला दीड वर्षाची शिक्षा झाली. येरवडा, नाशिक, धुळे, विसापूर अशा तुरुंगातून माझ्या बदल्याही झाल्या. मला शिक्षा झाल्याची वार्ता १९३२ च्या जानेवारीचे शेवटीच वृत्तपत्रात आली होती. त्या गोष्टीलाही आठ महिने झाले. आणि–

गांधीजयंतीदिवशी आमचे घरी एक चमत्कार घडला. एक खादीचे पातळ नेसलेली तरुणी आमचे घरी अनपेक्षितपणे आली. तिने माझ्या तीर्थरूपाना, ते देवाची पूजा करीत होते, तेथे येऊन नमस्कार केला आणि 'मला वहिनीची भेट हवी आहे' असे सांगितले. सासऱ्यानी सौभाग्यवती सूनबाईस हाका मारुन पाहुणेबाईना आत घेऊन जाणेस सांगितले. पाहुणेबाईचे स्वागत झाले. दुपारची जेवणीखाणी आटोपली. विश्रांतिसाठी गप्पा–चप्पा चालल्या. दुपारी तीन वाजले. आणि ? पाहुणेबाईनी आपल्या पर्समधून पंधराशे रुपयांच्या नोटा काढल्या व माझ्या घरमालकीणीपुढे ठेवल्या.

पाहुणेबाई म्हणाल्या, ''वहिनी हे कागद तुमच्याजवळ असू द्यात ! यांचा उपयोग करा, बाबूजी सुटून आल्यावर यांचेकडून मी माझ्या परीने कसा वसूल करायचा वा करायचाच नाही, ते माझे मी पाहिन, ही बहीणबीज म्हणून समजा तर खरी !!''

दुपारी जेवताना पाहुणेबाईची ओळख माझ्या तीर्थरुपानी माझ्या गृहस्वामिनीस सर्वसामान्यपणे करुन दिली होतीच. तरीही माझी गृहलक्ष्मी म्हणाली 'ताई' आमच्या कुटुंबाच्याबद्दल तुम्ही दाखविलेल्या जिव्हाळ्याबद्दल धन्यवाद ! माझ्या दोन्ही मुलाना तुम्ही मावशीचे कौतुक दिलेत याबद्दल मी तुमची कशी उतराई होऊ ? पण तुमचे पैसे मी ठेवून घेतले तर ह्यांना बिलकुल खपणार नाही. मुलाना तू लाचारी शिकवलीस असे ते मला बजावतील व रागावतीलही ! तेव्हा हे सर्व पैसे पर्समध्ये भरूनच तुम्ही निरोप घ्यावा. हे पैसे या घरात राहतील तोवर मी व माझे सासरे पाण्याचा घोटही घेणार नाही !!!'

सन १९३३ च्या फेब्रुवारीस मी तुरुंगातून सुटून आल्यावर मला ही सर्व हकीगत कळली ! माझी वर्गभगिनी चंपा हिचा तसा अवमान नसला तरी हरमोड झालेला; पण तिने त्याबाबत चुकूनसुद्धा एका शब्दाच्या निरोपाने वा पत्रानेही मला कळविले नाही. आमची जीवने आणखीही बारा वर्षे अलग, कोणी कोणाची चौकशी न करताच गेली ! चंपा आपली शिक्षकी करीत तपस्विनीचे जीवन काढीत होती पण केव्हातरी माझ्या राजकीय चळवळीची वार्ता वृत्तपत्रातून येईल, ती टिपून ठेवण्यास ती चुकत नसे ! हा प्रकाशही माझे डोक्यात १९४५ च्या फेब्रुवारी, मार्चात पडण्याचा योग आला !

त्याचे असे झाले. त्या फेब्रुवारीचे शेवटी मला नाशिकच्या बंदीखान्यात मी ''चलेजाव'' चळवळीमुळे असताना एक पत्र आले. ते होते माझ्या एका वकील बंधूचे. त्यानी लिहिले होते की, ''आपली सुटका आता लवकरच होईल, असे वातावरण आहे. तेव्हा सुटल्याबरोबर मला तार द्यावयाची आणि सरळ गांवी न येता दादरला माझे

सासुरवाडीस येऊन थांबावयाचे ! बाकी सर्व समक्ष !!''

मी मार्चचे प्रारंभी सुटलो. माझ्या वकीलबंधूना तार दिली आणि दादरला त्यांच्या सासुरवाडीस सायंकाळी थडकलो ! त्यांच्या सासुरवाडीस माझे नेहमीप्रमाणे स्वागत झाले, पण त्यानी बोलावले नसताना मी आणि माझ्या सांगीप्रमाणे त्यांचे जावई का येणार ? हे त्याना उलगडेना. मलाही उलगडा करता येईना.

दुसरे दिवशी माझे वकीलबंधु आले. चहापाणी झाले अन् वकीलानी आपण व आपला देशभक्तबंधु गिरगावात आपल्या स्नेह्याकडे जेवावयास आणि मुक्कामास जाणार असल्याचे सासुरवाडीस सांगितले. परत आल्यावर एक दिवस राहणार असल्याचेही आश्वासन सासूबाईस मिळाल्यामुळे, आम्ही सटकू शकलो. गिरगावात गेलो आणि शिरलो ते चंपूच्या मामांचे मकाण ! कायद्याचे शिक्षण घेत असता वर्गबंधू असलेले ते दोघे वकील कडकडून भेटले आणि माझ्या वकीलबंधूचा शब्द ऐकून चंपूच्या सौ. मामीनी शिरा ढवळता ढवळताच विचारले – ''अण्णासाहेब, आणायला लिहिलेले माणूस आणलेत ना !'' होकार मिळताच वातावरण एकदम आनंदी आनंदाने फुलले.

दुपारी जेवणे झाली. आम्ही पानावरून उठणार तोच सौ. मालतीमामी माधवमामाना उद्देशून म्हणाल्या ''मीं जेवून बाहेर येईपर्यंत बाबूजींशी करावयाच्या वाटाघाटीचा निर्णय घ्यायचा नाहीं, बरे का ?'' आणि माझ्या वकीलबंधूचीही त्या गोष्टीला त्यानी संमति घेतली.

सौ. मालतीमामी जेवून येईपर्यंत राममोहन प्रशाळेतील चंपूच्या शिक्षकी जीवनाची आणि तिची मातृछाया मावळल्यानंतर तिने काढलेल्या एकजिनसी व्रती जीवनाची माहिती माधवमामानी मला व माझे वकीलबंधु अप्पासाहेब पालकर यांना दिली.

तेवढ्यात सौ. मालतीमामी आल्या. त्यानी माझ्यापुढे एक पत्र उघडे करून ठेवले. ते १९ फेब्रुवारी १९४५ चे होते. चंपूच्या हातचे होते. ते तिने आपल्या मामामामींना लिहून आपल्या उशाशी ठेवले होते. त्या दिवशी ती थोड्याशा टाईफाईडसारख्या आजाराला बळी पडून देवलोकी गेली होती. तसे होण्यापूर्वी, किती वेळात का ते पत्र लिहिले होते. याचा अंदाज नव्हता. पण चंपूचे हस्ताक्षर व सही निःसंदिग्ध होती. मामामामींना विनंती होती की ''माझे म्हणून येथे जे दहा हजार रुपये आहेत, त्याचा विनियोग – मी माझे जीवन देव कसे म्हणू ? पण माझे जीवन वेध''. (आणि या ओळीखाली माझा १९२० मधील फोटो डकवला होता व त्याखाली बहुधा अश्रुंचा अभिषेकही केलेला) ''यांच्या संमतीने करावा.''

मला मृताच्या इच्छेला मान देण्याची जबाबदारी कर्तव्य् करणेच आले. कारण तसे करण्यास मला भागण्यासाठी चंपूने वरील मजकूराखालीच चंपूने लिहिले होते की ''मामा, आपले मित्र अप्पासाहेब पालकर वकीलच आपल्या या भाचीची इच्छा पूर्ण करवू शकतील.''

मी मग त्याच पत्राच्या शेवटच्या कोन्या जागेत लिहिले की 'श्री. माधवराव व सौ. मालतीमामी ठरवतील त्या विनियोगास माझी शंभरटक्के संमति आहे. मृताने ज्या शिक्षण प्रशालेत जीवनाचे सार्थक केले, त्याच प्रशालेला लोकशिक्षणासाठी शक्य ते करून ती रक्कम द्यावयाचे श्री. माधवराव व सौ. मामीनी मनावर घ्यावे.''

झालेही तसेच आणि बाकीच्या कशाकरता नसले तरी चंपूच्या उदात्त चित्तवृत्तीला कृतज्ञतेचा अभिषेक केल्याशिवाय राहवतच नाही.

(साप्ताहिक लालबहाद्दूर; विटे दि. १ मे १९८०)

***

## देवी सुशील !

मंदावत्या प्रकाशें ताऱ्या ऐसा कशास घुटमळसी ? ।
प्रभातपाणीग्रहणा अतुर गड्या ! मार्ग काय मज मळसी ? ।।
ठावें परंतु मजला, रविचा तुज तीव्र ताप तावेल ।
सुशील – विरहीं पडलों कायमचा ऐन पातता वेळ ।।
देवी सुशील ! कोठें रम्य तुझी सांग सांग मज वसती ? ।
समय न चेष्टेचा हा, होरपळे विरह फार मजसि सती ।।
जिव्हाग्रीं तव ज्याचें नाम विराजे तयास बघसी कां ? ।
पंकांत या जगाच्या पिचला तो ज्यावरी तुझा शिक्का ।।
चालक घनशब्दास्तव मम वचनास्तव तसे तुझे कान ।
या माझ्या हृदयाच्या मूकाक्रोशास ऐकती कां न ? ।।
पुण्य क्षण तो माझ्या स्मृतिमंदिरिं ना क्षयास पावेल ।
मराठ देशीं जैसा देहूचा सन्त – भाक्तिचा वेल ।।
विसरेन लाडके, कां पर्वतिची पुण्य टेकडी ती मी ? ।
जेथें तुझिया हृदया माझें समरस बने सखे नामी ।।
तव सहवासें रचलीं काव्यें रसपूर्ण तीं पुसायाला ।
जातां थंड पडेल प्रलयाचा कर ! नको पुसायाला ।।
होतां परस्परांतें वचनानें बद्ध, अश्रु मोदाचा ।
तव आईच्या डोळां, आज बने पाट तोच खेदाचा ।।
फुलले गुलाब हृदिं जे भावाच्या आज बनति ते काटे ।
की पारिजात होई जास्वंदी आणि गान रोदन तें ।।
झाली तुझिया विरहें जचम तिच्यामाजि हे असे मीठ ।
केल्या कर्तव्याची शांति जिवाचा न आणते वीट ।।
वचनास्तव वडिलांच्या फेटळिले मी स्वतां स्ववचनाला ।
पुंडलिके पितरांस्तव वीटेवर वेढिलें विठोबाला ।।
सजवुनि तव कर वलयीं सरिं करि मकरंद पडुनि सुमनांचा ।
त्यांच्या पाशीं पडणें भालिं न दृढण्यास योग सुमनांचा ।।
तैसें न भालिं आतां मूर्ति तुझी चर्मचक्षुंनीं बघणें ।
हां ! हां ! दैवें हृदयी जोराचा घाललाच घाव घणें ।।

✽ टीप : बाबुरावांचे एक परममित्र कै. दत्तात्रय रघुनाथ आठवले यांनी लिहिलेले बाबुरावांचे संक्षिप्त चरित्र 'गोखले व गोखले – रास्ते घराण्याचा इतिहास' (आवृत्ती पहिली प्रकाशन वर्ष १९२२) मध्ये आले आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे. ''केवळ माझ्या दारिद्र्याकडे बघून रा. पुरुषोत्तमपंतांनी माझ्या सुशीलाताईचा स्वीकार करण्याचे वचन दिले होते. पण पुढे ईश्वरी इच्छा काही निराळीच होती. ती काय हे पुरुषोत्तमपंतांनी सुशीलाताईच्या निधनावर लिहिलेल्या 'माझी सुशीला' या खंडकाव्यावरुन चांगले निदर्शनास येईल.'' (प्रत्यक्षात हे काव्य 'देवी सुशील !' या नावाने १९२३ च्या जानेवारीत प्रकाशित झाले)

दुर्वासनेस पळवी नांव तुझें सतत उच्चरूं रसना।
यावो कानीं म्हणुनी यत्नित मी आव आणुनी उसना॥
गणणें मृगजळ वारिद, गुंड कुणी लोकमान्य बळवन्त।
मम कृतिचा अर्थ असा हो, तरि रडकी सुखास मज तेथ॥

(२)

पेरू दुधांत तिचिया मधुशर्करेला।
ना मीठ एक कणही परि जाउ केव्हां॥
पुष्पी सुरेख खुलवूं तिचिया लतांला।
कीं कीड ती चुकवुया करुनिच हां ! हां !
तारांगणास सजवूं तिचिया शशीनें।
काळोख कांपवुं दुरी निज तर्जनीनें॥
चित्रा तिच्या चमकवूं रमणीय रंगी।
मूलाकृतीस न विकार करूं अभागी॥
पुष्पीं तिच्या मधु सुवास भरोनि ठेवूं।
त्या म्लानता परि कधीं लवही न येऊं॥
भारूं जगा दर पळास सुशील काव्यें।
ना एक अक्षर परी कधिं अंधुकारें॥

(३)

देखे जिची भ्रुकुटि तों रतिनाथ लाजे।
चंद्रापरीस चमकें वदन स्वतेजें॥
जी संकटा सुहृदयाहि गमे सुशीला।
इच्छाबलें विहरवी स्वहृदीं मला जी।
प्रेमासनीं बसवुनी मज नित्य पूजी॥
न्हाणोनियां मधुरशा शुभ दिव्य हास्यें।
दृष्ट्यां सरोजगण अर्पुनि ध्यानिं बैसे॥
जी कोकिला मधुरवी मम शुष्क गाणें।
ती आज तेथ न, गमे जग दैन्यवाणें॥
होईल धन्य सहवासिं तिच्या कवी हा।
वेडीच या क्षणिं झणीं मज मृत्युराया॥

(४)

''कंटाळसी वद असा जगतास कां या ? ।
कांही विवेक धरुनी उभवी सुकार्या ॥
रत्नें धरेवर किती ! कसली सुशीला ? ॥''
सन्मित्र हो, मज असें चुकुनी न बोला ॥
दैदिप्यमान शुभ रत्नच पंधरावें ।
माझी सुशील – सकलीं पदिं नम्र व्हावें ॥
नेलें हिरावुनि परी जुलमी सुरांनीं ।
कंगाल मी वणवणें जगतांत ? रानीं ॥
स्वर्गीं सुशील बघते बहु वाट माझी ।
मी सिद्ध जाउनि तिला करण्यास राजी ॥
हातीं तिथें तुळस ये, तिज का गमावूं ? ।
कां स्वस्थ येथ बसुनी उगि भांग सेवूं ? ॥
ते मायदूध मिळतां मग अन्य काय? ।
सोन्यासमोर पितळा करणेंच काय ? ॥
बाभूळ चंदनसमान कशी असावी ? ।
कांचेस कां हिरकणी सुजनें गणावी ? ॥
भागीरथीपद कधीं मिळवील नाला ? ।
ये तेज काय रविचें कधिं काजव्याला ? ॥
होई हिरा चुकुनि कां कधिं गारगोटी ।
काकास हंस कधिं कां कुणि बोलताती ? ॥
केव्हांहि होत न सुवर्णलता कण्हेरी ।
श्री काव्यधी धडपडीहुनि भिन्न भारी ॥
बन्सीपुढें लव न किंमत फुंकणीला ।
येथेंच बैसुनि मुकूं सुशिलेस ? – बोला ॥

(५)

सर्वां सदा गुणवती गमली हवीशी ।
आनंद – बाग वचनें, कृतिनें उभारी ॥
ज्यांनी तिला दुखविलें – छळिलें हि भारी ।
माझी सुशील हितकारक हो तयासी ॥
तें झोंबलें जरिहि लोह बळें परीसा ।
त्यातें परीस न करी कधिं काय सोनें ? ॥
वारा मदें उडवुनी जरि कस्तुरी ने ।

लोगे तिचा गुण तयास – पहा, परीसा ॥
फोडोनि संकट–कटा गुणगंध वाहे।
मैलागिरी दरवळे फुटला कुठारें ॥
फुंकेसवें त्वरित विस्तव तावताहे।
निंदेमुळेंच शिव–बाळ–कथा बहारें ॥
सोन्यास ताव बसतां झळकें स्वतेजें।
दूरत्व गोडपण दे अपुलेपणाला ॥
युद्धांत येत उजळा बहु शूरतेला।
औत्सुक्य जोम भलता धरि दावलें जें ॥

(६)

ओसाड माळ, न दिसे जल, वृक्ष कोठें।
पायीं खडे खुपत बोंचत तीक्ष्ण काटे ॥
तो पाखडी वरुनि सूर्यहि सर्व आग।
राहे सुशील टिकुनी लव हो न भंग ॥
नाश्चर्य ! काय न करी जगतांत आशा ? ।
सृष्टी जिची नवलवी प्रभुला कवीशा ॥
अश्रांत चेतवित ती अपुल्या स्वभावें।
उत्साह ज्या सकल विघ्नगणीं नमावें ॥
आशा सदैव मनिं पाळित ही सुशीला।
''घालीन मीच पुरुषोत्तम–कंठिं माला'' ॥
संकल्प पावत जरी सगळेच सिद्धि।
या मृर्त्यलोकिं हि नुरे कसली उपाधी ॥
आशा परिस्थितिंत जों वितळोनि गेली।
माणी सुशील हृदयांत उदास झाली ॥
लागेच जीवन तिचें खुरटावयाला।
ये आणखी दिवस एक लुटावयाला ॥

(७)

वेळादर्शकयंत्रिका घणघणा दे पांच ठोके जशी।
श्रीविद्यालयराज–शिक्षणसुधा प्राशोनि ये मी घरां ॥
दारीं ठेवित पाय तों पळत ये ''भाऊ'' बहू घाबरा।
''ताई ! भेट तुझी घडो – घुटमळे'' बोलोनि ओढी मसी ॥
गेलों वायुजवें तसाच सुशिला डोळेभरी पाहिली।

दुःखें ऊर भरोनि येत गळती नेत्रां तशी लागली।
इच्छा जाणुनि मी तिचें शिर तदा अंकावरी घेतलें।
प्रेमानें धरूनी तिनें मम करा माझ्याकडे पाहिलें ॥
गेलेला स्वर खोल नेत्रहि तसे, शक्ती पुरी लोपली।
नाडी मंद उडे, तनूहि अवघी छातीविणें थंडली।
होता स्पर्श मदीय तीस बिजली संचारली त्या पळीं।
त्या निस्तेज मुखीं जरा उमलली प्रेमादरांची कळी ॥
नेत्रीं साठवितां सुशील मजला क्षीणस्वरें बोलली।
(नाही शब्दहि पूर्णसा उमटला ! वाक्यें पुरीं कोठलीं ? ॥
''आशा फार मला बनोनि गृहिणी हे पाद सेवीन मी।
या देवा अधरामृतें सुखवितां मातें न काहीं कमी ॥
माझ्या अंतरिच्या मिळेल अपुल्या चित्रास लग्नें सही।
मोत्यांचे गुण ओवुनी मम गळां घालाल माला शुभा ॥
माझें जीवन आपुल्याच हृदयीं घेईल सत्यप्रभा।
प्रीतीच्या कवना लिहाल नखरीं माझ्या आस ही ॥
होतां वाचनिं दंग येउनि हळू डोळे कधीं झाकिन।
ताऱ्यांचा गजरा कधीं बसवुनी वेणीवरी घेइन ॥
मौजेनें कधिं मी बसेन जवळी दोल्यावरी वायुच्या।
काव्योद्यानि करांत घालुनि करा हिंडेन – इच्छा हिच्या
दारिद्र्यें दळल्या, सुखास मुकल्या, रोगीं हि हैराणल्या।
स्वातंत्र्यें त्यजिल्या, परीं पिळियल्या या भारता आपुल्या ॥
प्रेमानें झटतां स्वतां चढविण्या उत्कर्ष शैलावरी।
होणारा छळ अश्रुंनी निथळण्या मी सज्ज होतें खरी ॥
दैवीं ना म्हणुनी प्रभो ! नच तुम्हां दैवास मी निंदतें।
माझें मानस तातभक्ति आपुली पाहोनि आनन्दतें ॥
व्हावे तात असत्य ना – वरितसां अन्या वधू हो सुखी।
देशाच्या चरणीं वहा तनुस या मागें न मी आणखी ॥''

(८)

आला कंठ भरोनि गद्गद वचें आईस बोलावलें।
ती येतां निकटीं कडाडुनि तिला प्रेमांत आलिंगिलें ॥
''आशीर्वाद तुझा असो मम शिरीं '' ध्वन्यब्धिही आटला।
दोघींच्या नयनांतुनी मग तदा गंगौघ तो लोटला ॥
पाहोनी करुणप्रसंग कढला तो काळही निष्ठुर।

विश्वाचें फिरतें हि चक्र फिरलें ! दुःखी घडीला स्थिर ॥
ईशाच्या नयनांस ये रडुनियां लाली नभीं ती उठे ।
भाऊ – मी थिजलों तिथेंच अमुचें चैतन्य सारे घटे ॥
एकाकी गळुनी सुशील पडली माझ्याच अंकावरी ।
मूर्च्छेनें तिचिया अम्ही सकलही झालों तदा कावरीं ॥
वारा, वारि न तीस सावध करी प्रेमार्द्र हांका जशी ।
भाऊला खुणवोनियां स्वनयनें बोले हळू त्या अशी ॥
''जातें मी, जननीस एक पळही भाऊ विसंबू नको ।
शार्षी संकटशैलही उपटल्या त्वन्मातृभक्ती टिको ॥
हे माते, – प्रिय नाथ येत ''म्हणतां डोळां म्हणे राम ती ।
अर्धाही न पुरा दिवस तो देवी सरे सन्मती ॥

(९)

जातां सुशील बनलें जग हें असार ।
काशास तोंड जरि नाकच हो पसार ? ॥
देवीविणें सुबक मंदिरिं काय आहे? ।
विद्या नसे तरि नीर मुळिं तथ्य नोहे
गाणें गळ्याविण, हिऱ्याविण आंगठीचा ।
व्हावें कशास तु बुळाविण नेत्र किंवा
पावले कां कळकळीविण मला मोल ? ।
नाहीं प्रतीति तर सर्व पुराण फोल
संशोधकी मतिच सोडत वोसराया ।
रामशास्त्र्या वाणी तशी त्यजित निःस्पृह
हो पारखी रसिकता पटवर्धनांला ।
कीं वाग्मया त्यजुनि जात निबंधमाला

(१०)

स्वप्नीं न मी ? मग अशी मति कां चळावी ? ।
गेली कुठें ? हृदयें या करि वास देवी ॥
''कर्तव्य हें ।'' प्रतिपळी विनये बजावी ।
हृत्स्वामिनीं जगिं नरास अशी मिळावी ॥

***

## साईक्स, गो बॅक !

२६ जानेवारी १९३० रोजी काँग्रेसचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचण्याच्या ज्या अकरा सभा कऱ्हाडास झाल्या त्यातील पहिली सभा कृष्णा काठावरील वीर मारूतीच्या देवळातच होऊन गावात आळीआळीत सभा घेता घेता शेवटची अकरावी सभा पांढरीच्या मारुतीजवळ घेतली आणि सभा उधळून लावण्यास धावणाऱ्या लाठीधारक पोलीसांची त्रेधातिरपीट उडाली. गव्हर्नर सातारा–कऱ्हाडला आले असावेत ते याचमुळे ! काँग्रेसने जो उठाव केला, तो राजकीय दृष्टया 'राजकारणा'चे अंती रण असते हे सिद्ध करणाराच होता. त्यातून मिठाचा व जंमलचा सत्याग्रह उफाळल्यापासून लोकचळवळ भल्याबुऱ्या मार्गानी नेस्तनाबूद करण्यावर ब्रिटिश विरासत टपलेलीच होती. त्यातलाच एक एक भाग म्हणून आपली रियासत किती लोकप्रिय आहे. हे जगासमोर मांडण्यासाठी, ठिकठिकाणच्या स्थानिक स्वराज्यसंस्थांकडून युरोपियन राज्यपालांना मानपत्रे देण्याचे कार्यक्रम घडवून आणणे हा त्या रियासतीचा एक डाव होता. सातारा जिल्ह्यात सातारा व कऱ्हाड नगरपालिकांची मानपत्रे मिळण्याचे कार्यक्रम ता. १२ व १३ जुलै १९३० रोजी ब्रिटिश रियासतीने आपल्या हस्तकाकरवी मुक्रर केले. तर राज्यपालांचे स्वागत काळ्या निशाणाने करुन, "साइक्स, गो बँक" ची गर्जना लोकाकडून उघडपणे उठवावयाची, असे लोकचळवळ्यानी ठरविले.

त्याप्रमाणे दोही बाजूनी संघटना बांधण्यास सुरवात झाली. दक्षिण साताऱ्यातील सर्वपक्षीय देशभक्तानी कऱ्हाडास "साइक्स, गो बँक" च्या कार्यकमासाठी जमावे, तर लोकांचा तो व्यूह हाणून पाडावा म्हणून रियासतीचे बरकंदाजही प्रयत्नास लागले. ७ जुलैंपर्यंत प्रचाही भरपूर झाला. मसूर, काले वगैरे ठिकाणाहून समुदायचे समुदाय १२ जुलैंच्या सायंकाळपर्यंत डेरेदाखल होतील. अशी लेखी पत्रेही आली. पण मग विचार आला की लोक कऱ्हाडास हजारोनी आले, तर त्यांच्या जेवणाची तरी दोन दिवसांची सोय करावयास नको काय ? कारण १३ जुलैला "कऱ्हाड बन्द" चा हरताळ करावयाचा हे ठरले होते. तेव्हा मला एक कल्पना स्फुरली की कऱ्हाडातील प्रत्येक हिंदु, मुसलमान, स्पृश्य अस्पृश्य अशा नागरीकी घरातून कृष्णाबाईचे घाटावर पाच भाकरी व त्या घराला परवडेलतसे कालवण पाठविण्याची भीक जनताजनार्दना जवळ मागावी. मग उशीर कसला ? स्वयंसेवक धाडून व आम्ही कांही मंडळी "समक्ष हिंडून तो कार्यक्रम केला आणि "भिक्षापति तो लक्षापती" असा अनुभव १२ जुलैच्या दुपारपासूनच येऊ लागला.

१२ जुलैच्या सायंकाळपर्यंत जवळ जवळ पंचवीस तीसहजार पाहुणे कऱ्हाडात राज्यपालांच्या स्वागतासाठी जमले. तेव्हा इतक्या सगळ्यांना काळी निशाणे कोठून पुरवावयाची, असा प्रश्न पडला. लगेच, गावातील प्रत्येक बैलगाडीच्या वंगणाचा उपयोग करून मिळतील तेवढ्या धडप्याची काळी निशाणे करावयाची ठरले आणि स्वयंसेवक

कामाला लावले. १३ तारखेस स्वागतासाठी लोकानी कसे शिस्तशीर वागावयाचे हे सांगण्यासाठी गोळा झालेल्या लोकांची प्रचण्ड सभा कृष्णा घाटावर घेतली. त्या सभेत मी भाषण करीत असता मला एका कुत्सिताने प्रश्न केला की, ''उद्या राज्यपाल कार्यक्रमावर बहिष्कार घालण्यास तुझी आम्हाला सांगत आहा ! पण तुमचे मित्र बळवंतराव जाधव म्युनिसिपल मेंबर आहेत. ते उद्या मानपत्रसभेला जाणार आहेत ना ?'' त्यावर मी परमेश्वरावर विश्वास ठेवून ठणकावून उत्तर दिले की ''नाहीत !''

आणि आता या पुढची हकीगत नवाकाळच्या बातमीदारानेच १५ जुलैच्या अंकात दिली आहे, ती वाचली म्हणजे पुरे ! तो म्हणतो – ''ता. १३ जुलै रोजी कऱ्हाडास काळ्या निशाणांच्या स्वागताची कोणी एक फिल्म घेतल्याची बोलवा आहे. मानपत्र देण्याचा टेंभा मिरविणाऱ्या म्यु. सभासदापैकी श्री. बळवंतराव जाधव हे मानपत्र समारंभास हजर नव्हते. अधिकारी कक्षेतील काही भोळे – बापडे असे वेचक २२५ लोक तालुक्यातून बोलावले होते. निमंत्रितापैकी अवघे एक पंचमांश लोक हजर राहिले म्यु. ऑफीसशेजारी गव्हर्नरसाहेबांचे आगमन होताच काळ्या निशाणांनी त्यांचे स्वागत गोपाळराव बदामी प्रभृति गुप्त स्वयंसेवकांनी करुन महात्माजींच्या नावाचा लोकांनी एवढा जयजयकार केला की, म्यु. त मानपत्र – वाचन चालू असता तो मानाचा देखावा सोडून खुद्द डी. एस्. पी. ना बाहेर यावे लागले ! कऱ्हाडच्या सरहद्दीवरील कोयनेच्या पुलापासून गव्हर्नरांची स्वारी कृष्णेच्या फरशीपर्यंत ज्या ज्या मागे गेली त्या त्या मार्गे सर्व ठिकाणी दुतर्फा लोक 'शेम ! शेम !' अगर ''महात्मा गांधी की जय'' अशा आरोळ्यांनी आणि काळ्या निशाणांच्या प्रदर्शनानेच गव्हर्नर साहेबांचे स्वागत करीत होते. राघुअण्णा घोपाट्यांच्या सेनापत्याखाली व काले मसूरकर मंडळीच्या प्रोत्साहनाने हे सर्व घडून आले. सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागातून पस्तीस हजार लोक काळी निशाणे दाखविण्यास आले होते. त्यांच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था घरोघरी भाकरी–भाजी मागून कृष्णाघाटावर भाऊकाका गरुड, नारायणराव पोतनीस, बाबूराव गोखले प्रभृतीनी केली होती. शिवलाल उगरचंद वगैरे व्यापाऱ्यांनी पत्रावळी दिल्या. घाटावरील पायऱ्यावर आणि स्वामीच्या बागेत पंक्ती उठल्या.''

त्या दिवशीचा कऱ्हाडचा हरताळही एवढा यशस्वी झाला होता की सरकारी धमकावणीला भिऊन अगर पैशांच्या लोभाने हॉटेलवाल्यानी व खानावळवाल्यांनीही सरकार–सामीलाना जेवण देण्यास दुकानची फळीसुद्धा उघडली नाही. तेव्हा दुपारी तीन वाजता आमचेकडे निरोप आला की ''आमच्या पोलिसांना तुमचेकडे जेवावयास मिळेल काय? ते जेवणाचा चार्ज देतील !'' या निरोपात आम्ही लोकांच्या उदारमनस्क सहानुभूतीचा बाजार करतो की नाही, हे पाहण्याची सत्वपरीक्षा होती. तिला आम्ही उतरलो आणि निरोप दिला की, पोलिस झाले तरी आमचे देशबांधव आहेत. त्यांचे नौकर

म्हणून करावयाचे कर्तव्य त्यानी केले असेल. आता ते साधे भुकेले नागरीक म्हणून आमचेकडे येतील व पोलिसी खाक्या दाखवणार नसतील तर खुशाल खाजगी पोशाखात येऊ देत. आम्ही त्याना जेवावयास घालू.'' आमचा निरोप पोहोचल्यावर साध्या नागरीक पोशाखात शंभर एक पोलिस अगदी सभ्यपणाने जेवून गेले.

हा लोकांचा बहिष्कार विजय कायदेभंग चळवळीला उत्तेजक ठरला. तेव्हा ब्रिटीश रियासत चिडली आणि कऱ्हाडच्या काळ्या निशाणाचा खटला उभारला, तो वृत्तपत्रातून गाजला. २० जुलै १९३० ला लोखंडे म्हणून पोलीस मला पकडण्यासाठी घरी आला. त्यावेळी वडील व्यंकटेशाच्या मंदिरात गेले होते. बायको बाळंतपणासाठी माहेरी (वाईला) गेलेली. घर कोणाच्या ताब्यात देणार ? म्हणून 'वडील येईपर्यंत थांबा' असे सांगितले, तर तेवढ्या अवधीत घराजवळ अक्षरशः हजारो माणसं, थेट मामलेदार कचेरीपर्यंत पोचवायला. वाटेत तेल्याच्या गणपतीजवळ व्याख्यानास परवानगी दिली होती. माझ्या बरोबर गुलाबभाई बागवान आणि राघुअण्णा धोपाटे यांनाही पकडले होते.

आम्हाला तीन चार महिने कच्च्या तुरुंगात व आरोपी म्हणूनच दिवस काढावे लागले ! पण सुदैवाने १९३१ साली गांधी आर्विनकराराने तो खटलाच बारगळला ! १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेस सनातनी मंडळीचे भारतीय प्रतिनिधी म्हणून आमचे कऱ्हाडचे नानासाहेब देशपांडे गेले होते त्यांनी तेथे कऱ्हाडच्या काळ्या निशाणस्वागताची फिल्म पाहिली. ते दुसऱ्या गोलमेजपरिषदेतील काम आटपून परत आल्यावर त्यांनी जेव्हा वरील बातमी सांगितली तेव्हा काळ्या निशाणानी राज्यपालाचे स्वागत करणारे लोकमत ब्रिटीश रियासतीच्या राजधानीत पोहोचल्याचे समाधान तर झालेच; पण ''यत्नः फलेनहि पुनर्नवता विधत्ते'' याचाही सुखसोहळा १९३२ च्या जानेवारी पासून स्वातंत्र्य सैनिकाना (आणि त्यातील मी एक म्हणून मलाही) सुखद ठरला.

(साप्ता. लालबहाद्दूर, विटे १७ मार्च १९८०)

सध्याच्या सत्कार समारंभात मला फारसा रस नाही. माझा खरा सत्कार लोकांनी पूर्वीच केला आहे तो दिवस म्हणजे १९३० साली गव्हर्नरला काळी निशाणे दाखविल्याबद्दल मला पकडण्यात आलं तेव्हा. त्यावेळी मी कुणी मोठा नव्हतो ! पण अगदी उत्स्फूर्तपणे हजारो लोक माझ्या पाठोपाठ मामलेदार कचेरीपर्यंत मला निरोप द्यायला आले होते. त्यांचे प्रेमाश्रुंनी भरलेले चेहरे आठवले की आजही मला समाधान वाटते !

(महाराष्ट्र टाईम्स, मुंबई ३/२/१९७४)

* * *

## "लोकश्रीचा प्रसाद"

१९३२ च्या ४ जानेवारीचा दिवस ! मसूराश्रम बेकायदेशीर संस्था ठरली मसुराश्रमामार्फत त्यांचे अगोदर तीन महिने कराड मधील पुरुषांचे व स्त्रियांचे लाठीकाठी वर्ग चालू होते ते सहाजिकच बंद पडले.

आश्रमाचे ब्रह्मचारी कराडला होते, ते बंदिस्त होण्याची भीति वाटत होती. तसेच मसूरच्या महाराजासकट आश्रमाची मिळकत काय होणार यांची चिंता आश्रमाच्या हितचिंतकाना वाटत होती.

प्रथम (गणेश विनायक) फडके फोटाग्राफरनी दोन ब्रह्मचारी जटाभार उतरवून जंटलमन केले व सायकलवरुन कोपर्डेमार्गाने मसुरास धाडले व आश्रमावर सकाळी आठच्या सुमारास धाड घालतील असा अंदाज कळविला. लगेच सीतारामपन्त गरुड व किसनशेटप्रभृतीनी आश्रम 'स्वच्छ' केला व पोलिस तपासणीस मोकळा केला. कराडात उतरलेले ब्रह्मचारी 'ब्राह्मण हिंडता वराडी' म्हणून जिकडे जमले तिकडे फिरविले.

श्री. नाना भावे (नारायण कृष्ण) यानी कडेकोट बन्दोबस्त करून निःश्वास सोडण्यासाठी मंडळी मोकळी झाली. पण दिवेकर वैद्यांच्या येथे मी बसलो होतो. त्यांच्याकडे म्यु. अक्ट्रॉय इनस्पेक्टर नाना भावे आले. गेले तीन महिने आश्रमात लाठी काठी फिरविण्यासाठी येणाऱ्यासाठी गोटे सैदापुरच्या गोरगरीब दूधावालिणी दूध घालीत, त्याचे एकशेबावन्न रूपये देण्याबद्दल त्यानी चिंता व्यक्त केली !

त्यावर मी "त्या सर्व दूधवालिणीना उद्या आपल्या घरी बोलावून घ्या. त्यांचे पैसे भागतील"

"कसे ?"

दिवेकर वैद्य व भावे यांच्या प्रश्नाला उत्तर द्यावयास मी होतो. कोठे तेथे ? मी घरी गेलो. जवळ होते ते दोन रूपये हाती घेऊन दीडशे रूपयांची आणखी भिक्षा मागण्यास शेजाऱ्यापासून सुरवात केली. आश्रम जप्तीची थोडक्यात बातमी देऊन गरीब दूध वालिणीचे पैसे भागविण्यास मदत करता येईल ती करा. मात्र या देणगीची पावती नाही व या भिक्षेचा बभ्रा करावयाचा नाही हेही मी प्रत्येकास बजावू लागलो.

"उदंड करावे परी गुप्त रूपें" म्हणून मी निघालो.

मला 'सदा सर्वदा देव संन्निध आहे। कृपाळूपणे अल्प घारिष्ट पाहे॥" असा अनुभव आला. एका अर्ध्या तासात लोकगंगेने माझ्या हाती पन्नास रूपये दिले.

आता फक्त शंभरच रूपये जमावयाचे होते. मी श्री. नानासाहेब देशपांडे (कऱ्हाडच सर्व प्रथम लोकनियुक्त म्युन्सिपल प्रेसिडेंट १९११) यांचे येथे गेलो. त्याच्याशी आपल्या भिक्षेची कानगोष्ट केली. नानासाहेबांनी लागलीच दहा रुपये माझ्या हाती ठेवले. पण सदर भिक्षेतील धोक्याचे इशारेही त्यानी वत्सलतेने दिले. आश्वासनही दिले की "धोक्यात सापडू नका. सरळ येथे या. आश्रमाची भिक्षा पुरी होईल. !

आता नव्वद रुपयेच हवे होते. विश्वासाच्या वेचक माणसाकडेच गुफ्तगू करून मी पदर पसरी.

नव्वद रुपये जमावयाला पंधराच बाकी असताना, शेंगाच्या तळावर दादा बळवंत महादेव जाधवांच्या वखारीत मी शिरलो. तो काय ? मसूरास आश्रमाची टाळेबंदी करून परतलेले नाइक इन्स्पेक्टर दोन फौजदारांसह, दादांच्या बैठकीवर !

ते दर्शन होताच, मी दादाना, घरात चुलीजवळ बोलावले व कानात 'जयजय रघुवीर' केले !

दादा म्हणाले ' तुम्हाला जवळच्या पैशासकट जप्त करून नेणे बाहेर बसलेल्याच्या हाताचा मळ आहे. तेव्हा पळा इथून ! 'असे म्हणत म्हणत माझ्या खिशात दादानी पंधरा रूपयांच्या नोटा चुरगाळल्या आणि नंतर मी शांतपणे बाहेर पडलो.

माझ्या कानावर चेपल्या घालता घालता प्रश्नोत्तरे आली.

'का देशभक्त अकरा वाजता कशाला आले होते अन् थांबले का नाहीत ?

'घरांत तांदूळ नाहीत खायला घालायला पोराना ! म्हणून बायकोनें पिटाळले तेव्हा आले 'द्या दान' म्हणायला मग दिली चिठ्ठी शिवलाल उगारचंदाला !'

मी तडक नाना भाव्यांच्या गाढीस गेलो आम्ही दोघे गोटे व सैदापूर येथे समक्ष गेलो आणि दूधवालीचे हिशोब सर्व भागवून दोन वाजता आपापल्या घरी जेवलो.

साप्ता. लालबहाद्दूर विटे, १ मे १९८०.

* * *

## हिंसेला ठाणबंद केले

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे नववे अधिवेशन सातारा येथे ३१ जाने. व १ फेब्रु. ४८ रोजी व्हावयाचे होते. पत्रकार परिषदेच्या प्रतिनिधीचे स्वागतासाठी मी (स्वागताध्यक्ष) आणि स्वागतमंडळ सातारच्या बुधवार नाक्याजवळ उपस्थित होतो पुण्याहून, वाईहून प्रतिनिधींची एस. टी.; मोटारी आल्या श्री. श्री. शं. नवरे प्रभाकर मुंबई यांनी एस्. टी. तून खाली उतरताच श्री. गोखले यांच्या कानी त्यानी ऐकलेली दुष्टवार्ता (दिल्लीस म. गांधींचा खून झाल्याचा घडलेची) सांगितली. मग सगळेच स्वागत थंडावले. सातान्यास राजवाड्यापुढे शोकसभा घेण्यात आली; तोपर्यंत खुनीचे नाव बाहेर आले. यावेळेपर्यंत तो खुनी बहुधा मुसलमान असेल या कुतर्काने आपापल्या मकाणात दबून बसलेले मुसलमाबांधवसुद्धा राजरोसपणे सभेस आले.

गोडसे या खुनीचा आणि ब्राह्मण समाजाचा व त्यातल्या त्यात रा. स्व संघाचा शिमगा – पौर्णिमा साजरा होऊ लागला. अशा स्थितीत शोकसभा सुद्धा पार पाडणे सोपे नव्हते. तथापि परिषदचे नियुक्त अध्यक्ष दे. भ. बामणगावकर आणि स्वागताध्यक्ष यांची

खुनीचा धि:कारच धि:कार करणारे आणि म. गांधींच्या राष्ट्र सेवेचा व मानव्याच्या उन्नती – सेवेचा कृतांज्ली समर्पणपूर्वक गौरव करणारी भाषणे होऊन सभा शांतपणे पार पडली व विरघळलेल्या अंत:करणाने लोक घरोघर परतले.

पण दुसरे दिवशीच्या शनिवारपासून खुनाशी कसलाही संबंध नसणाऱ्या आणि राजकारणाचा वाराही न घेणाऱ्या ब्राह्मणाची घरे–दारे होळी करुन टाकण्याची भाषा सुरू झाली. पुण्याकडील तशाच दुष्कर्मयोगाच्या बातम्या येऊ लागल्यावर त्या प्रवृत्तीला उधाणच आले.

रविवारी भाऊसाहेब मोडक प्रभृतीची घरे भस्मसात झालीच आणि दादासाहेब करंदीकरांच्या घरावर कांही भस्मासूर चालून गेले.

पण बॅ. विठ्ठलराव करंदीकर स्वत:च्या दारात हात जोडून उभे होते व समोरच देशभक्त तात्यासाहेब साठे खडे होते, शेजारी मीही ! ३ तास हे ठाणें जसेच्या तसे पाहिल्यावर भस्मासूर वरमले आणि त्यांचे पडद्यामागचे कर्मचांडाळ आपल्या अनुयायांच्या पराक्रमाला वेळ का लागला हे पहावयास आले असता तात्यासाहेब साठे ताठ उभे आहेत. हे पाहून शांतीप्रस्थापकांचा आव आणून गरजले, ''का रे, तुम्हाला काही अक्कल आहे का ? कुणाचे घर जाळायला तुम्ही आलात ?''

झाले ! समाज पांगला !!

त्याच दिवशी सायंकाळी मी कराडास परतलो तेव्हा कराडच्या वखार भागात महात्मा गांधीच्या मृत्यूबद्दल शोकसभा असल्याचे ऐकून तिकडे गेलो.

त्या सभेत माझ्या बरोबर दे. भ. काशीनाथपंत देशमुख, दादासाहेब अळतेकर व प्रभृतीची भाषणे झाली पण ...

पण, गुंडांनी गावात काय करायचे हे अगोदरच ठरवून ठेवल्याप्रमाणे वखार भागातील शोकसभेच्या वेळेसच आपल्या 'सत्कार्यास' सुरुवात केली.

अळतेकर व मी कराडच्या रविवार चौकात परतत असताच आम्हाला कळले की अण्णासाहेब घाट्यांच्या वाड्यात रहाणाऱ्या गोविंदराव केळकरांच्या स्वयंपाकगृहात लिंगायत बोर्डिंगच्या भिंतीवरुन मुस्लीम उडाणटप्पू शिरले व त्यांनी रा. स्व. संघाच्या संचालक केळकर वकिलांना त्यांच्याच चुलीतील जळक्या लाकडांनी ठोकले ! वकिलांच्या प्रवेशद्वारातून आम्ही शिरत असतानाच धास्तावलेल्या वकिलीण बाईनी किंचाळी फोडली व ''त्या चांडाळांच्या तडाख्यातून यांना सोडवा हो !!'' असा टाहो फोडला ! पुढे धावून मी दांडगेश्वरांच्या हातातील ती जळकी लाकडे हिसकावून घेतली व त्याचा प्रयोग 'त्या' गुंडावरच केला !! तेव्हा ते गुंड साखसुरत विचारु लागले की, 'हीच का तुमची गांधीची अहिंसा'? मी त्या चांडाळाना पिटाळण्याचा उद्योग न बोलताच चालू ठेवला.

मी या उद्योगात गुंतलो असता आळतेकर हे केळकरकन्या रडकुंडीला येऊन थरथर कापत एका कोपऱ्यात तडफडत होती तिला पोटाशी धरुन शांतवीत होते. मग केळकर

कुटुंबाला सुखरूप बंदोबस्तात ठेवून आम्ही रस्त्याला लागलो.

तोच आम्हास कळले की केळकरांच्या घरुन सटकलेले आडदांड कोळेवाडीकरांच्या येथे रहाणाऱ्या गोपीनाथपंत गरगट्यांच्यावर चालून गेले आहेत. गरगटे वकील त्यावेळी टायफाइडने आजारी होते. तेव्हा आम्ही त्यांच्याकडेच धावलो. आम्ही आलेले पहाताच त्या अडदांडानी तेथून काढता पाय घेतला.

चावडीचौकातील कॅशकेमिस्टाच्या दुकानावर धाड घालून तेथे रॉकेलचे बोळे चेतवण्यास सुरुवात केली. इतक्यात गरगट्याचे येथून आलेल्या आम्हाला हे दिसताच कॅश केमिस्टांच्या दुकानाच्या पायरीवर आळतेकर आपले दोन बाहू पसरुन उभे राहिले व गोखले या आडदांडाच्या नजरेला नजर भिडवू लागले. झाले ! पुण्यप्रभाव यशस्वी झाला व आडदांड आपले साहित्य तेथेच टाकून पळाले.

दुसरे दिवशी त्यांची आणखी अेक कहाणी बाहेर आली. ते जळीताचे साहित्य गोखले-आळतेकरांनीच कॅश-केमिस्टचे दुकानावर नेले होते अशी वर्दी त्या आडदांडानी पोलीसापर्यंत पोचविण्याची व्यवस्था चालविली; पण पोलिसापासून फाटक्या माणसापर्यंत कोणीही त्याचेवर विश्वास ठेवला नाही, अुलट 'तुमची थोबाडे रंगविण्याचा प्रसंग आमचेवर आणू नका !'' असे कित्येकानी त्यास बजावले.

फेब्रुवारी १९४८ च्या पाच तारखे पासून सातारा जिल्ह्यात खेड्यापाड्यातील ब्राह्मण -विधवांची व अज्ञानांचीही घरे जाळण्याची मोहीम जोराने सुरू झाली. तेव्हा मी व आळतेकर रोजच्या रोज शांति प्रस्थापनेसाठी खेड्यापाड्यात हिंडू लागलो. आम्हांला पुष्कळ ठिकाणच्या विविध बातम्या कळू लागल्या.

त्यात उंब्रजेला श्री. बाबुराव जोशी व अनंत शिराळकर यांनी, मसुरास विष्णुपंत निगडीकर मास्तरांनी गांधी तत्वज्ञानांच्या विरोधी असे कोणालाही आपण जिवंत आहो तोपर्यंत काही करू देणार नाही. अशाही वार्ता आल्या त्याबद्दल समाधान मानण्यात गुंग व्हावे. तर गोखले आळतेकर हे ब्राह्मणांच्या संरक्षणाकरिता हिंडताहेत, म्हणून लोक चिडून गेले आहेत, अशी चाफळची खबर आल्याचे त्यांना उंब्रज पोलीस ठाण्याच्या कोपऱ्यात कळले मग मी मग फौजदार जोग यांना भेटलो व या प्रकरणाची चौकशी तातडीने करा असा आग्रह करुन आलो. जोगानी चौकशी आरंभली पण दोनच दिवसात ज्यांच्याकडून ती अफवा आली होती. त्यास बैल-गाडीतल्या बैठकीवरच एका झाडाच्या फांदीने शेतातून घरी येत असता सत्यवान करून पाठविल्याची वार्ता उंब्रज पोलीस ठाण्यावर आली आणि सगळेच जेथल्या तेथे थंडावले !!

कऱ्हाडशेजारील एक कारखानाच जाळून टाकण्याकरता, ताकारीपर्यंतच्या व तारगांवपर्यंतच्या आडदांडाचा एक घोळका दिवसाढवळ्या तीनशे पलिते पेटवून आल्याची बातमी सदाशिवगड शाळेतून घाबरुन पळत आलेल्या एका घामाघूम झालेल्याने कऱ्हाडात पसरविली.

मी व आळतेकर मामलेदार कचेरीत गेलो व पोलीस संरक्षणाची व्यवस्था लावून तो घोळका शोधू लागलो. टेंभूच्या एका रानात तो शेवटी गवसला. आम्हाला पाहताच घोळकरी म्हणाले, ''का आलासा?''

'आपल्या भेटीला,' असं माझं शांत उत्तर ऐकून गांधीवध, खुनी गोडसे त्यांच्या संघ बंधूची हालचाल असे विषय चर्चेला निघून कारखाना व कऱ्हाडातील काही जाळावयाची म्हणून ठरलेल्या घरांची यादी आमच्या समोर घोळकरांनी ठेवली.

ती पाहून मी चपापलोच ! कारण ती यादी करणाऱ्या हस्ताक्षरांचा परिचय मला होता.

तेव्हा शहाण्या माणसाकडून ही यादी आलीय खरी पण कारखाना जाळण्याने दोन हजार कुटुंबे रोजगाराला मुकतील व ती कुटुंबे काही ब्राह्मण नाहीत हे मी त्यांचे निदर्शनास आणताच सगळेच वातावरणच बदलले.

कऱ्हाडातील घरे जाळावयाची त्यांना आपण नोटीस देणार आहोत काय ? असा मी प्रश्न केला तेव्हा मी गांधीच्या अनुनयांना न शोभणारे हे सारे आपल्या हातून घडत आहे, ते सगळ्यांच्या लक्षात आले आणि सगळे जिथल्या तिथे थिजले.

दरम्यान कांही तत्वज्ञान न समजल्यामुळे, अज्ञानापोटी खेड्यापाड्यातून जी जाळपोळ झाली, तिच्याबद्दल माफी मागणाराना मोकळे करावयाचे असे मुंबईसरकारचे धोरण जाहीर झाले.

त्यास अनुसरुन माफी पत्रे येऊ लागली आणि गांधीप्रेमाच्या नावाखाली चाललेला व्यक्ति द्वेष व जातीय गुंडगिरीचा पुंडावा संपला.

---

म. गांधीच्या वधानंतर १९४८ च्या फेब्रुवारीतील निंद्य व निषेध्य दंगलीचे वेळी एकंदरीत निष्क्रांय ठरलेल्या जिल्हाधिपतींच्या कारकीर्दीची आठवणही नाहीशी होणार नाही. श्री. बाबुराव गोखले यांच्यासारख्या सालस स्वभावाच्या निरलस काँ. कार्यकर्ता आमदाराला काही काँग्रेस श्रेष्ठींचा रोष पत्करूनही मुंबई ले. अ. च्या गेल्या पुणे बैठकीत श्री. हुबळी यांच्या कारभाराबद्दल बोचक खोचक प्रश्न विचारावे लागले नसते तरच जवळ !

ऐक्य दि. ५/३/१९५१

✱ ✱ ✱

## 'उणे पडू देऊ नेय। कोणी एकाचे'

'साहेब, माई देशपांडे आल्यात !' 'उणे पडू देऊ नेय। कोणी एकाचे आल्या असतील. आज रविवार सुट्टीचा दिवस. आज काही काम व्हायचे कसे ? त्याना उद्या यावयाला सांगा, स्वामी.'

'आज रविवार, सुट्टीचा दिवस. आपण टपाल बघायला आलात, हीच आपल्या

एकट्याशी मोकळेपणाने बोलायला संधी, म्हणून त्या आल्यात.' स्वामी म्हणाले.

'मग घेऊन या त्यांना. संकटाचे अन् चिंतेचे दिवस आहेत हे. त्यांची सेवा करता आली नाही तरी निदान त्यांचे दु:ख, अडचण, अडवणूक, काय असेल ती ऐकून तरी घेऊ.'

माणसाला काही नसले, ती कुठेतरी निदान रडायला जागा हवी असते. आवश्यक तो मदतीचा हात कोठे मिळायला अशा नसली तरी डोळे पुसणारा पदर, निदान हातरुमाल मिळाला तरी समाधान होते. म्हणून मी ज्या पेढीचा कार्याध्यक्ष होतो, त्या पेढीच्या वडिलधाऱ्या शिपायास देशपांडे ताईना घेऊन येण्यास सांगितले. स्वामी हे त्या शिपाई महाशयाचे नाव. स्वामी देशपांडेबाईना घेऊन आले, तेव्हा टपाल पाहून झाले होते. १९४८ च्या त्या काळात रविवारीही टपाल येत असे, म्हणून नित्य नियमाने सकाळी टपाल पाहण्यास मी जात असे, तसा त्या दिवशीही गेलो होतो.

मी टपाल हातावेगळे केले, बंदिस्त ठेवले आणि समोर आलेल्या माई देशपांड्यांना नमस्कार करून माझ्या टेबलासमोरच्या खुर्चीवर बसण्यास विनविले. पण त्या उभ्या उभ्याच बोलू लागल्या. केविलवाण्या स्वरातील ते आर्जवाचे सद्‌गदित उद्‌गार होते.

'मला ऽ ऽ अं हे जिन्नस ठेवून घेऊन देता येती ऽ ऽ ल तेवढे रुपये कृपा ऽ करून द्या ऽ, द्या च.'

असे म्हणून बाईनी माझ्या टेबलावर एक पिशवी ओतली. त्या पिशवीच्या गोमुखीतून पळी, पंचपात्रे, ताम्हन, शंखाची अडणी, घंटा, नैवेद्याची वाटी असे जिन्नस तर माझ्यासमोर घरंगळले ! पण त्यांच्यातून एक लंगडा बाळकृष्ण, एक अन्नपूर्णा आणि एक डाव्या सोंडेचा गणपति या चांदीच्या देवमूर्ती होती आडव्या तिडव्या लोळत घोळत पडल्या !!

ते दृश्य पाहून मी चरकलोच ! इतका की बाईंच्यावर कसला प्रसंग आहे, याची स्पष्ट कल्पनाही मला येईना आणि देवासुद्धा देवपूजेची उपकरणी गहाण ठेवण्याची पाळी त्या एकवेळच्या जहागीरदा. देशपांड्यांच्या सुनेला गांधीवधोत्तरच्या धगधगत्या काळात का आली, कोणी आणली, असे प्रश्नही माझ्या मनाला भेडसावू लागले. उलगडा करून घेण्यासाठी काही प्रश्न विचारावेत तर अगोदरच दुखावलेल्या अगर चिंताग्रस्त झालेल्या मनावर आपल्या एकाद्या शब्दाने चिरफाड होईल की काय, अशी उगीचच भीतीही वाटू लागली. तेव्हा डोळ्यातील टिपे डोळ्यात मुरवून कृतज्ञतेच्या भावनेने आटोक्यात असेल तर बाईंचे आपण सोळा आणे काम करावयाचे, असे मी मनाशी ठरविले. आणि विचारले –

'वहिनी, किती पैसे लागावयाचे आहेत तुम्हाला ?'

वहिनी उत्तरल्या –'लागावयाचे आऽ हे ऽ त पंचवीस. पण तुम्हाला या जिनसांवर देता येतील तितके जास्तीत जास्त द्या. ही भाऊबीज मला घालाच बाबुराव ! माझ्या सासऱ्यांचा लौकिक जाईल, नाही तर ! उद्या ऽ लिलाव ... हूं ! जप्तीबिप्ती आली तर..' आणि बाई हुंदके देऊ लागल्या !!!

त्यांच्या एकेक हुंदक्याबरोबर माझे अंत:करण खालीवर होऊ लागले, एका लौकिकवान् पेढीचा मी कार्याध्यक्ष होतो. स्वत:च्या कामकाजकचेरीतील खुर्चीवर बसलो

होतो. पण काही करु शकत नव्हतो. काही करू देणारा कायदाच नव्हता. ती सहकारी पेढी होती. सहकारी पेढी सभासदाशिवाय कोणाशी कर्जवामाचे व्यवहार करु शकत नव्हती. देशपांडे–वहिनी आमच्या पेढीच्या सभासद नव्हत्या. पण त्यांना कोणीतरी माझ्याकडे जाण्यास सांगितले होते. त्या मोठ्या विश्वासाने माझ्याकडे आल्या होत्या. चटकन् त्यांना ठाऊक नसलेली एक घटना मला आठवली. प्रेरक ठरु लागली. देशपांडे माई १९४८ खाली तीन मुलांची जबाबदारी अंगावर असलेल्या विधवा आई होत्या. पण त्यांचे लग्न होण्यापूर्वी कितीतरी वर्षे त्यांचे सासरे आमच्या जिल्ह्यातील धाडसी–साहसी वकील म्हणून गाजत असता, त्यांच्याजवळ कारकून या नात्याने त्यांचे स्नेही व माझे वडील काम करीत होते, याची मला आठवण आली; एवढेच नव्हे, तर 'बाबू, तू मॅट्रिक हो; मी तुला बॅरिस्टर करून आणतो.' असे माझ्यासारख्या दरिद्रीनारायणाच्या सुदामास्वरूप स्नेह्याला त्यानी शिक्षणोत्तेजन दिल्याचेही स्मरले. मी १९१९ साली मॅट्रिक होण्यापूर्वीच काळाने त्यांना ओढून नेले आणि इन्फ्लुएंझाच्या साथीपासून देशपांडे कुटुंबावर दैवानुसार मिळते धन आणि जाते !' एवढाच प्रसंग ओढवला नाही; तर ? वकिलांच्या धर्मपत्नीला अक्षरशः गडकऱ्यांच्या 'सिंधुसारखी लोकाघरची कामे उपसून दिवस निभवावे लागले. दोन मुलींची लग्ने आणि एका मुलाचे शिक्षण आपल्या घराचा आब राखून त्यानी पार पाडले व मुलगा भुसारमालाचे दुकान चालवावयास लागल्यावर त्याच्या दोन हातांचे चार हात करून वकिलीणबाईंनी आपले 'आनंदी' नावास सार्थकता आणली. एक नात व एक नातू पाहून वकिलीणबाई यांनी इहलोकांची रजा घेतली आणि 'विप्रदि धैर्य' दाखवण्याचा वारसा त्यांनी पुढिलांस ठेवला.

वकिलीणबाईच्या मागे पंधरा वर्षे त्यांच्या चिरंजीवानी आणि सूनबाईनी मोठ्या रुबाबाने घर चालविले. पण एक दिवस 'आले देवाजीच्या मना । तेथे कोणाचे चालेना ॥ अशी आपत्ती आली. भरल्या ताटावरून उठून जावे, तसे माई देशपांड्यांचे सौभाग्य अनपेक्षितपणे संपले !! मनुष्य जन्माला येतो त्याचवेळी त्याचे परतीचे तिकीट परमेश्वराने म्हणा, देवाने म्हणा, काढून ठेवलेले असते पण ते कालौघाच्या हाती ! त्यामुळे कालौघाची 'जागा खाली करा' अशी हाळी (हाक) येताच ती माणसाला टाळी देऊनच पाळावी लागते. मधूसुदनराव देशपांड्यांचे तसेच झाले आणि माई देशपांड्यानी आपल्या सासूबाईच्या श्रुतकीर्तिचाच कित्ता वळवला.

त्या माई देशपांडे आज माझ्यापुढे निकडीच्या गरजेने उभ्या होत्या. नगरपालिकेकडील घरपट्टी–भंगीपट्टी दुसरे दिवशी सोमवारी भरली नाही तर घरावर, जप्ती आणावी लागेल अशी नोटीस त्यांना आली होती.

खरे म्हटले तर नोटिशीतील शब्दांनी त्या विनाकारण घाबरल्या होत्या. कारण गांधी वधोत्तरच्या ब्राह्मणभाईवरील अग्निदिव्याचा तो काळ होता. त्यामुळे कायदे शब्दांच्या गर्दभलत्तेचा त्यानी धसका घेतला होता. अशा वेळी, त्यांच्या सासऱ्यानी मला जी

शिक्षणोत्तेजना दिली होती, तिचा गहिवर मला झाला आणि?

आणि मी वहिनीना म्हटले –

'वहिनीसाहेब, काही काळजी करु नका. दुपारी तीन वाजता तुमच्या घरी पंचवीस रूपये पोहोचते होतील. त्यासाठी या जिनसांची गरज नाही. आणि हे जिन्नस ठेऊन घेऊन आपल्याला पेढीकडून मला कर्जही देता येणार नाही. शिवाय, तुमच्याकडील देव आणि त्यांची उपकरणी गहाण ठेवून घ्यावयाइतका निलाजरेपणा मजजवळ तरी नाही. तुम्ही हे सर्व पिशवीत भरुन घरी जा आणि या देवांची मनापासून पूजा करा. तेच सगळी विघ्ने दूर करतील.'

'पण ! पण !! पण !!' वहिनींना त्या एका शब्दाशिवाय बोलताच येत नव्हते. शेवटी आवंढा गिळून त्या म्हणाल्या 'मला मिंधेपणा कशाला आणता ? मी तुमचे पैसे केव्हा व कसे फेडणार ?'

'परमेश्वराची मर्जी !!' असे उद्गारून मी त्याना पेढीकचेरीतून रवानाच केल्या.

काही हातपाय हलवून दुपारी तीन वाजता माई देशपांडे यांच्याकडे पंचवीस रुपये पाठविले व चिठ्ठी दिली की 'सकाळी सांगितल्याप्रमाणे पंचवीस रूपये पाठविले आहेत.'

वहिनीसाहेबांनी त्याच चिठ्ठीवर 'रोख पावले. कोणत्या शब्दांनी उतराई होऊ ?' असे लिहून सही केली व चिठ्ठी परत पाठविली.

अकरा वर्षे लोटली त्यानंतर मी अगर माई देशपांडे घडलेल्या गोष्टीबद्दल कोठेही काढीत नव्हतो. पण १९५९ साली मी माझ्या तिसऱ्या मुलीचे लग्न केले. माईना कोठून तरी कळले की त्या लग्नापायी मी थोडासा ऋणको झालो आहे. एके दुपारी मी घरी नसताना, माई माझ्या धर्मपत्नीकडे आल्या. काही समाचार दोघीनी दिला घेतला शेवटी माई माझ्या धर्मपत्नीपुढे दहा रूपयांची नोट ठेवून म्हणाल्या – 'किती दिवस झाले ! मीं बाबुरावांकडून पंचवीस रूपये घेतले होते. त्यातले हे दहा रुपये द्यायला मला आज परवडताहेत. ते मी देते. त्याना म्हणावे, रागावू नका.'

अकरा वर्षापूर्वीच्या त्या अर्थव्यवहाराची माहिती माझ्या गृहलक्ष्मीला त्या दिवशी प्रथमच झाली. तिने दहा रुपये ठेवून घेतले. तिन्हीसांजेनंतर मी घरी आल्यावर मला जेवावयास वाढताना दहा रुपयांच्या परतफेडीची वार्ता सौभाग्यवतीने दिली. मी तिला म्हटले.

'अकरा वर्षापूर्वी शिमग्याच्या दिवसात चिंताग्रस्त वहिनीनी मला भाऊबीज मागितली होती. ती मी घातली होती. तू माहितगिरीच्या अभावी ते पैसे ठेवून घेतलेस. उद्या त्यांच्या घरी नेऊन ते पैसे त्यांना दे.'

माझी सौभाग्यवती दुसरे दिवशी माईंच्याकडे गेली. पैसे परत करु लागली तर माईनी साफ नकार दिला. त्यानी निक्षून सांगितले की 'बाबुरावांनी माझा पदर फाटत होता तो वाचविला. ही त्यांची भाऊबीज मी परत करीत नाही. ती मी परत करणारच नाही.

माझ्या ताकदीच्या बाहेरचे आहे ते. वेळेवरचा टाका, नवाचा राखा असतो. पण पैशाची गोष्ट तशी नाही. आता माझी परिस्थिती बरी आहे. हे दिले तसे बाकीचे पैसेही मी सवडीने देणारच आहे. जरा माझाही स्वाभिमान सांभाळा की !'

माझी सौभाग्यवती ते दहा रुपये घेऊन परत आली. म्हणाली -- 'तुम्हीच माईंची समजूत कशी काढणार असाल तशी काढा.'

दारिद्र्याचे चिमटे, चपाटे, धपके, धपाटे सोसत समाज काळ कंठीत होताच !! त्यातच निसर्गनियमाप्रमाणे मुलांची शिक्षणे आणि मांगल्ये माई करावयास धडपडल्याच. शेवटी १९७२ साली त्यांची मुले स्वावलंबी झाली आणि आणि पदवीधर झाल्याने त्यांच्या हाती नोकरीचा पैसा महिन्याच्या महिन्यास खेळू लागला. मुलांच्या नोकरीवरून आईच्या हाती मुठी भरून पैसा येऊ लागला. माईना वाटले आपण आता कोणाच्या देण्यात चुकूनसुद्धा राहू नये. म्हणून त्या आमच्या घरी यावयाचा बेत करू लागल्या, तेव्हा त्यांच्या डोळ्यात १९७० साली महाशिवरात्रीस निर्वाण साधलेल्या माझ्या धर्मपत्नीची आठवण अश्रू साठवू लागली. आमच्या घरी आता माईंच्या सलगीच्या कोणीच बाई नव्हत्या. तेव्हा पुढील आठवड्यात, त्यानी घर सांभाळून राहणाऱ्या, आणि संसार चालविणाऱ्या मुलाची गाठ पडताच, त्याला बोलावून घरी नेले आणि चोवीस वर्षापूर्वीची हकिगत सांगून त्याला पंचवीस रुपये दिले व ते बाबुरावांना देण्यास सांगितले.

रात्री घरी जेवणानंतर चिरंजीवानी मला माई देशपांड्यांच्या उदात्त अंतःकरण प्रवृत्तीचा वृत्तान्त सांगितला. मी चिरंजीवाना म्हटले – 'अण्णा, तू कशाला ते पैसे आणलेस ?' 'आपल्या येथे माईच्या सहीची पंचवीस रुपये रोख पावल्याची चिठ्ठी आहे. म्हणून त्यानी हकीगत सांगून पैसे देताच मी ते घेतले !'

'ठीक आहे !' मी म्हणालो, 'काळाच्या ओघात काही गोष्टी विसरावयाच्या असतात. तसेच काही कागद फाडून टाकावयास चुकावयाचे नसते. पण चूक घडली खरी, आणखी असे आहे की चांगली तेराएक वर्षे झाली किंवा होत आली; माईनी तुझ्या आईजवळ दहा रुपये दिले होते. तेव्हा माईंच्या हिशोबाप्रमाणे चालवायचे म्हटले तरी, फक्त पंधराच रुपये त्यांनी द्यावयास व आपण घ्यावयास हवेत. पण खरे सांगू कां ? आता आपल्याला एकही पै नको. उद्या ते सर्व पैसे माईंचे माईंना नेऊन दे.'

आण्णाने तसे केले. पण त्या, त्या पैशाना हात लाविनात आणि अण्णा ते पैसे उचलेना. आम्हा बापलेकात झालेल्या बोलण्याचा मतितार्थही त्याने माईंच्या कानावर घातला. तेव्हा माई म्हणाल्या – 'अण्णा, खरे म्हणजे बाबूरावांना मी आता चोवीस वर्षांनी दामदुप्पट रक्कम परत करावयास हवी ! तरच मी वकिलांची सून शोभेन. पण तुझे वडील तर व्याज राहोच पण मूळ उसनवारीतील पैशाचेही नाव काढीत नाहीत ! तेव्हा माझ्या परीने मी व्यवहार सांभाळून मनाला पाणी घालते आहे. तेरा वर्षापूर्वी तुझ्या आईजवळ दहा रुपये परत केले होते, हे खरोखरच मला आठवत नाही !!'

जमिनीवर पडलेले पैसे निराश्रित पडलेले पाहून माईंच्या घरात भाडेकरु म्हणून आता रुळलेला माझा परिचित म्हणाला, की 'हा सगळा वेड्यांचा बाजार आता मी आवरू का ? अहो, त्या पैशानी अनाथासारखे का पडावे ? मीच उचलून ठेवतो ते माझ्याकडे. तुमचा शेवटचा फैसला झाला. म्हणजे त्या पैशाना स्थानबद्धतेतून मोकळे करू.'

घरभाडे नियंत्रण–कायद्याच्या मर्कटलीला ऐकलेल्या माईनी मग आमच्या अण्णाला सांगितले; 'तू आपल्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणे केले. आता माझ्या मनसांगीप्रमाणे मी तुझ्या वडिलांची उद्या गाठ घेते. म्हणजे सगळीच रुखरुख दूर करता येईल.'

ही घडामोड माझ्या कानानी ऐकली. दोन दिवस गेले अन् मी माझ्या एका वकील मित्राकडे गप्पा मारीत बसलो आहे आणि आम्हा दोघांशिवाय तेथे दुसरे कोणी नाही, याची खात्री करुन घेऊन माई तेथे आल्या.

वकिलांनी आपला धंदा वयपरत्वे आता गुंडाळलाच होता. माई देशपांड्यांना अनपेक्षित पण एक कागदाचे पाकिट घेऊन आलेल्या पाहून, वकील म्हणाले– 'वहिनीसाहेब, माझी वकीलीची पाटी धुतली आहे की !' वहिनी म्हणाल्या 'फुकटची वकिली नाही तर तोंडपाटीलकी तर करा !'

असे म्हणून वहिनींनी झाला इतिहास सांगून वांधा तोडण्यास विनविले. तेव्हा वकील म्हणाले – 'वहिनी, आजकालच्या भ्रष्टाचारांच्या अन् सार्थसाधु काळात, केव्हा दोन तपापूर्वी घेतलेले पैसे परत करण्याची तुमची वृत्ती वंदनीय आहे. मुदतीबाहेर कर्जे थकवायची आणि सपशेल बुडवायची, अशा झोकांच्या लोकांना हल्ली प्रतिष्ठा आली आहे. तुम्ही अगदीच स्वच्छ, पण आमचा बाबूही बिनहिशोबी नाही. तो दहा रुपये तुम्ही अगोदर घेतले असता, पुन्हा ते घेणारच नाही. वांधा राहिला पंधरा रुपयांचा. बाबुची मुलेही आता कर्तीसवर्ती आहेत. त्याला संसार निवृत्तीमुळे पैशाची गरज नाही. त्याच्या मुलांनी तुम्हाला पैसे दिले नसल्यामुळे मुले ते पैसे घेणार नाहीत. त्यांनी ते घेऊही नयेत. मग तुम्ही म्हणाल पंधरा रुपयांचे तरी करायचे काय ? होय की नाही ? मग ऐका माझा निर्णय. पण तो सांगण्यापूर्वी, हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवायला तुम्हाला काय होते ? असा दोष तुम्ही मला देणार नाही, असे सांगत असाल तरच मी निर्णय सांगतो, बाबू व मी साठ वर्षे स्नेही आहोत. तो मला दोष देणार नाही. पक्षभेद असूनही त्याचे माझे संबंध अतूट आहेत, यातच माझ्या म्हणण्याचा पुरावा आहे.'

'वकील, मी तरी आपला सरळ सल्ला का नाकारू? हल्ली सरळ सल्ला देणारांचाही दुष्काळ झाला आहे.' इति माई.

'मग,' वकील म्हणाले 'ऐका माझा सल्ला वहिनी, तुम्ही प्रसंगात सापडल्याने तुम्ही बाबूकडून पैसे घेतले होते. पैकी दहा रुपये तुम्ही बाबूच्या घरधनिणीजवळ मागे दिलेच होते. राहिलेले पंधरा बाबूला नकोत अन् तुम्हाला ते तर परत करावयाचे आहेत. मग तुमच्या सारखीच अडचण कोणाला पडलेली आढळली तर त्याची अडचण पंधरा

रुपयापर्यंत निघेल तेवढी तुम्ही काढून टाका आणि बाबूची परंपरा पुढे चालवा. 'उणे पडू देऊ नये। कोणी एकाचे ॥' ही रामदासांची शिकवण आहे. लोकसंग्रह ती शिकवण करणी लावण्याने उत्तम होतो. माझ्या या निर्णयाने तुम्हा दोघा वादीप्रतिवादींनाच काय, पण हे सगळे खटले ऐकणाऱ्यावाचणाऱ्यानाही समाधान होईल. वहिनी, तुमच्यासारखी सत्त्वशील माणसेच समाजाच्या बळकटीचा पाठकणा असतात.'

सामान्यातील असामान्य असते ते असे. त्याचा अनुभव धन्य होय. मग तो प्रबोधक असतो, हे काय सांगावयास हवे ?

मासिक एकता (दीपावली शके १८९६ – १९७४)

***

## जगायचे, मरायचे, माणुसकीसाठी

सांगलीच्या दत्त आपट्यांची चिठ्ठी, नव्हे तोंडी निरोप घेऊन, एक दिवस रात्रौ पावणे तीन वाजता, एक टांगेवाला माझे दारावर आला. त्याने हाका मारल्या, ''बाबुराव, बाबुराव !'' अशा मोघम हाकाना मी रात्रौ सहसा प्रतिसाद देत नाही. कारण, आमच्या शेजारी रॉयल टॉकीज आहे. तेथे जमणाऱ्या आणि जाणाऱ्या येणाऱ्यात अनेक बाबुराव असतात. एकदा अशाच एका बाबुरावाला एका मिजासखोराने हाक मारली. ती मलाच हाक मारली असे समजून आणि अडल्यानडल्याशिवाय रात्रौ कोण उगीच कशाला हाक मारील ? अशा समजुतीने, मी दरवाजा उघडून बाहेर गेलो आणि हाक मारणाराची चौकशी करु लागलो, तो त्या मिजासखोराने सांगितले की ''मी कशाला तुम्हाला हाक मारू ? तुम्ही आपली झोपमोड करून कशाला आमच्या फंदात पडता ?''

तेव्हापासून कानाला खडा लावून घेतला. परिचिताना सांगून टाकले की रात्र दहाच्या पुढे आमच्या दरवाजावर हाक मारावयाची झाली तर 'बाबुराव गोखले' म्हणून हाक मारावयाची. त्या परिचितात टांगेवाला नव्हता. पण पाचदा हाका मारुन निभले नाही तेव्हा त्याने हाक मारली – ''अहो, गोखले बाबुराव, दार उघडा.''

मी तसे केले. टांगेवाल्याने ''हा घ्या मुलगा. सांगलीच्या दत्त आपट्यानी व स्टेशनमास्तरनी तुमच्याकडे पोचता करायला सांगितले आहे.''

मुलगा टांग्यातून उतरला. ओक्साबोक्शी रडतच होता तो. पण त्यासाठी टांगेवाला थांबतोय कशाला ? तो गेला सुद्धा घोडा पिटाळत. इकडे त्या अकराबारा वर्षाच्या रडत्या मुलाला पोटाशी धरले. घरात आणले. त्याचे डोळे पुसले. माझ्या घरधनिणीने त्याला ''चहा तुला चालतो का ?'' असे विचारले.

सद्गद होऊन तो उत्तरला –

''चालतो. पण मी घेणार नाही. मी सुतकात आहे.''

मग त्याला तोंड धुवावयास पाणी दिले. शांतपणे जवळ बसविले. विचारले की "बाळ, सुतक कसले ? काय भानगड आहे ?"

त्याचा भानाचा गड कोसळलाच होता. तो तुटक शब्दात सांगू लागला. त्या शब्दांची आज आठवणारी साखळजोड अशी :-

"मी बेळगावच्या डॉक्टर देशपाड्यांचा मुलगा. माझे वडील आणि आई, मी आणखी दोन भावंडे आणि आमची आजी म्हणजे आईची आई, मुंबईला गेलो होतो माझ्या मावशीकडे. तिच्या मुलाची मुंज होती. मुंज व्यवस्थित झाली. आम्ही परतलो. मुंबईहून पुण्यात आलो. पुण्यास जी. आय्. पी. मधून सदर्न मराठा रेल्वेमध्ये बसलो. थर्डक्लासचा डबा. गर्दी तोबा, गाडी रात्रौ साडे आठला निघाली. मेल होती ती. नीरा स्टेशन सुटले अन् माझ्या आजीला कसेसेच होऊ लागले. माझे वडील डॉक्टर पण मुंजीला जाताना परगावी त्यांची बॅग औषधानी कोठून भरलेली असणार ? पण गवयाचे पोर जसे संगीतातच रडायचे, शेतकऱ्याचे पोर जसे चुन्या तंबाकूची चिमटी खिशात बाळगूनच असायचे, तशीच डॉक्टरच्या हँडबॅगमध्ये खोकला पडशाच्या दोन गोळ्या तरी असायच्याच. माझ्या वडिलांच्या बॅगेत तशा सापडल्याही. त्यानी त्या आजीला दिल्या. आजी घोटभर पाणीही प्याली.

वाठार स्टेशन गेले, साताराराडही गेले अन् आजीची जास्तच धालमेल होऊ लागली. तसे डॉक्टरच अस्वस्थ झाले. मग आम्ही कावरीबावरी झालो. रडकुंडीला आलो. एवढ्यात कोरेगाव स्टेशन आले. गाडी थांबली. माझे वडील खाली उतरले. त्यानी स्टेशन मास्तरांच्या जवळ जवळपास असणाऱ्या डॉक्टराना बोलावण्याची आणि थोडा वेळ गाडी उशीरा सोडण्याची विनंती केली.

माझ्या आजीची अवस्था पाहून माझ्या वडिलांची विनंती कोरेगाव स्टेशन मास्तराना यथायोग्य वाटली पण ते म्हणाले – "एका पॅसिंजराकरता एका तासभर मला गाडीचा खोळंबा करता येणार नाही. पण युगत् सांगतो. आत्ता आजीबाईंना तुमच्या जवळची गोळी शिल्लक आहे ती द्या. पाणी पाजा. गाडी चालू होईल. ती तासाभरात कऱ्हाड स्टेशनला जाईल. इथून गाडी सुटताच मी कऱ्हाड स्टेशन मास्तरला फोन करतो व कऱ्हाड स्टेशनच्या फलाटावर ओगलेवाडीच्या डॉक्टरांना हजर ठेववितो.'

गाडीने कोरेगाव सोडले, तारगावहून गाडी निसटली, मसूर गाडीने ओलांडले अन् शिरवडे स्टेशन मागे टाकताना आमच्या आजीने डोळे व डोके फिरवले. माझे बाबा डॉक्टर असूनही उद्गारले, नशिबी असेल नच ते टळे !'

आम्हा सर्वांना भडभडून आले पण रडण्याची काय, पण हुंदका देण्याची सोय नव्हती. आशा चिकाटीने पालवतच होती. अन् एकदम कऱ्हाड स्टेशन आले. आमच्या डब्याच्या तोंडाशीच स्टेशनमास्तर व एक डॉक्टर उभे होते. डॉक्टर आत आले. माझ्या वडिलानी त्यांना आजी दाखवली. ओगलेवाडीच्या आगाशे डॉक्टरानी माझ्या आजीची

नाडी चापचली,डोळे पाहिले, तिच्या छातीला स्टेथॉस्कोप लावला अन् गंभीर चेहऱ्याने माझ्या वडिलांचा हात धरून त्यांच्यासह ते खाली प्लॅटफॉर्मवर उतरले. त्यानी एकच 'उपयोग काय ?' एवढाच उद्गार काढला.

काय झाले ते सर्वजण समजनू चुकले. पण गाडीतून आजीचे शरीर न्यायला कायदा आड येत होता. दुसऱ्याही साधनानी कलेक्टर साहेबांच्या परवानगीशिवाय प्रेत न्यायची सोय नव्हती हा कायदेशीर पाश दिसल्यावर आम्ही देशपांडे मंडळी ! काय आमची अवस्था !! भोवताली इतकी माणसे पण निर्जन अरण्यात गवसलो. खांडववनाला आग लागली तर पांडव इतके रडले नाहीत, इतके आम्ही रडलो, असा शेरा स्टेशन मास्तराने मारला. पण तो तरी काय करणार ? त्याला त्याचे कर्तव्य करावयाचे होते. कायदा पाळावयाचा होता. त्याने आम्हा देशपांडे मंडळीना सामानासकट खाली उतरवले. आजीचे प्रेतही बाहेर निघाले.

कोणी तरी प्रवाशापैकी म्हणाले, हरिश्चंद्राच्या तारामतीला पुत्राच्या मरणाने संकट ओढवले. देशपांडे बाईना आईच्या मरणाने संकट ओढवले. तारामतीच्या हरिश्चंद्राला कठोर कर्तव्य करता तरी येत होते. देशपांडे बाईंच्या हरिश्चंद्राला ना ओळखीच्या ना पाळखीच्या या जिल्ह्यात काय करता येणार ?

आमचा हलकल्लोळ ऐकून गाडीत असलेले सांगलीचे दत्त आपटे खाली उतरले होते. त्यानी आमची निरुपाय, निराश्रित, निर्गाठी दैना पाहिली. ते माझ्या वडिलांजवळ आले. ते म्हणाले, 'डॉक्टर, थांबा, धीर धरा, हे कऱ्हाड आहे. येथे समाजसेवक बाबुराव गोखले रहातात. त्यांच्याकडे जा. झाली हकीगत सांगा, ते तुमची सर्व व्यवस्था लावतील.'

एवढ्यात गाडीने शिट्टी दिली. आपटे गाडीने निघून गेले. जाता जाता त्यानी आपली ओळख सांगितली होती. म्हणून गाडी निघून गेल्यावर स्टेशन मास्तर माझ्या वडिलाना म्हणाले, 'आपट्यानी बाबुराव गोखले यांचे नाव सांगितले आहे. तेव्हा मी टांगा बोलावतो. त्याला तुमच्यापैकी कोणाला तरी बाबुरावांच्याकडे न्यायला सांगतो. बाबुराव एम्. एल्. ए. आहेत. पाहू या ते काय व्यवस्था करतात ते !"

होकार देण्याशिवाय डॉक्टर देशपांड्याना इलाजच नव्हता. स्टेशनमास्तरानी शिराज टांगेवाल्याला बोलावून कामगिरी सांगितली. त्याला रुपाया देऊन माझ्या वडिलांनी मला आपट्यांच्या विश्वासासह तुमच्याकडे पाठविले आहे. गोखलेसाहेब, मी सुतकात असा आहे. आता काय करता ?"

मी म्हणालो, "बाळ, काळजी करून नकोस. चल आपण फिरुन स्टेशनवर जाऊ."

आणि मी माझ्या सौभाग्यवतीला सांगितले – "तू ही कहाणी ऐकली आहेस. मी या बाळ देशपांड्याला घेऊन स्टेशनवर जातो. तेथे त्या प्रेताचा पंचनामा व्हावा लागेल. तो झाला म्हणजे मी भाऊकाका गरूड, वैद्यकाका दिवेकर, यांना निरोप देतो. पण आज

दुपारी ही देशपांडे मंडळी आपली पाहुणेमंडळी आहेत, असे धरून चाल.''

विजेचे बटण दाबावे तसे आम्ही घराबाहेर पडलो. एक टॅक्सी केली. स्टेशनवर गेलो. मी स्टेशनमास्तरांची गाठ घेतली. त्यानी देशपांडे मंडळीची फर्स्ट क्लास वेटिंरूममध्ये सोय केली होती व प्रेताचा पंचनामा वगैरे करण्याकरता मिरज रेल्वे-पोलिस संबंधित अधिकाऱ्याना बोलावले होते. ती मंडळी पहाटे साडेचारला निघणाऱ्या पुणे पॅसेंजरने कऱ्हाडास यावयास निघाली होती.

हे कळल्यावर मी डॉ. देशपांड्याची गाठ घेतली. त्याना समजावले की '' सातारचे कलेक्टर हुबळीसाहेब, सातारला असले तर ठीक ! पण त्यांचा कँप दुसरीकडे असला तर परजिल्ह्यात प्रेत न्यावयास किती उशीर लागेल कोणास ठाऊक ! तेव्हा, कऱ्हाड क्षेत्र आहे. तेथेच, पंचनामा झाल्यावर, आपले सासूबाईंचे देहास आपण गति देऊ !!''

''अहो गोखले, मृतबाईना मुलगा आहे. त्याचे हातूनच त्याच्या आईचे दहन नको व्हायला ?'' डॉ. देशपांडे व त्याच्या पत्नी कळवळून बोलल्या.

मी उत्तरलो – 'अगदी बरोबर ! आपण म्हणता त्याप्रमाणे त्यांच्या चिरंजीवानी येथे येण्यासही बारा-पंधरा तास जाणार आहेत तोपर्यंत ही तुमची चिलीपिली सुद्धा कुचंबून ठेवायची काय ? त्यापेक्षा आजीबाईचे आपण जामात आहा. जावई मुलासारखाच असतो. आजीबाईच्या कन्या बरोबर आहेतच !''

माझे म्हणणे स्टेशनमास्तरानाही सयुक्तिक वाटले. त्यानीही त्या उभयतांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. जमले, पंचनाम्याचे वेळी डॉ. आगाशे आलेले बरे, असे स्टेशनमास्तरानी सुचविले.

तेव्हा मी ओगलेवाडीस गेलो. डॉ. अप्पासाहेब आगाशे यांना सर्व सांगून स्टेशनकडे रवाना केले. मग तडक ओगलेवाडीचे व्यवस्थापक काकासाहेब पाध्ये याकडे कऱ्हाड स्टेशनवरून कऱ्हाडच्या कृष्णाकाठी प्रेत न्यावयास ट्रक मिळेल का म्हणून चौकशी व याचना केली. दोन मिनिटात काकासाहेबांनी सहा ट्रक ड्रायव्हराना हाक मारुन, जो येईल तो घेऊन जा अशी आज्ञा दिली. सहाही जण ट्रक घेऊन यावयास तयार झाले. त्यात ज्याची आंघोळ झाली नव्हती, त्या रामजी पोवारास त्याच्या ट्रकसह घेऊन मी स्टेशनवर आलो.

एव्हाना पूनापॅसेंजर शेणोली स्टेशनपर्यंत आली होती. म्हणून मी स्टेशनवरूनच पांडुअण्णा शिराळकरांच्याकडे फोन होता तेथे वैद्यकाका दिवेकरांना बोलावून घेतले आणि भाऊकाका गरुडांच्या सहकाराने कृष्णेवरील अग्निची तयारी करविण्यास सुचविले. त्यांचा होकार आला.

इकडे पुणे पॅसेंजरही वेळेवर कऱ्हाडला आली. रेल्वेचे पोलीस व पंचनामा अधिकारी खाली उतरले. डॉ. आगाशे, स्टेशन मास्तर व मी ह्यानी त्याचे स्वागत करताच, पंचनामा-अधिकारी एकदम महात्मागांधींच्या उद्‌गारले –''वैष्णव जन तो तेने कहिये, जो परपीडाई

जानेरे ॥''

पंचनामा झाला. सासुबाईंचे प्रेत जावयांच्या स्वाधीन झाले. स्टेशन मास्तरानी आणि डॉक्टर आगाशांनी केलेल्या माणुसकीच्या सहाय्याबद्दल डॉ. देशपांड्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आजीबाईंचा देह देशपांडे परिवारासह ट्रकमध्ये व्यवस्थित ठेवला. रामभाऊ पोवाराच्या शेजारी मी बसलो.

स्मशान भूमीत ट्रक आला. भाऊकाका गरुड, वैद्यकाका दिवेकर सर्व तयारी करून बसलेच होते. आजीबाईंच्या देहाला कृष्णास्नान घालण्यात आले. मग चितेवर त्यांची स्थापना करुन देशपांडे परिवाराने त्याला दंडवते घातली. मग त्या देहाचे अग्निदिव्य झाले.

स्नानोत्तर दुपारी आमचेकडे मोठ्या कष्टाने पोटपूजा करून रामभाऊ पोवारासुद्धा सगळ्या सहाय्यकांना कृतज्ञतेचा नमस्कार करीत देशपांडे परिवार रेल्वेस्टेशनवर गेला. त्याला दुपारचे अडीचचे पॅसेंजरने त्यांच्याजवळच्या तिकिटावरच स्टेशनमास्तरानी बेळगावास बसवून दिले.

मध्ये एक दिवस गेला आणि मृत आजीबाईंच्या चिरंजीवासह डॉ. देशपांडे अगदी सकाळच्या पॅसेंजरने कऱ्हाडास मजकडे आले. चिरंजीवानी शास्त्रोक्त पद्धतीने मातोश्रींचे रक्षाविसर्जन केले. कृष्णास्नानानंतर त्यांना मी घरी घेऊन आलो. आम्ही तिघे जेवलो. माझ्या सहधर्मचारिणीला उभयता मेहुण्यांनी साष्टांग केला. आम्ही मग लाकडाच्या वखारीपासून सगळ्यांची उधारी भागवत भागवत ओगलेवाडीस रामभाऊ पोवारापर्यंत गेलो. त्याला पैसे देऊ करताच, तो म्हणाला – ''काका पाध्यानी मला सोडले, म्हणून मी आलो. नडलेल्याचे नडून द्यायचे नाही, हे काकानी आम्हाला शिकवले. देशपांडेबाबा, पैशानी सारी कामे होत नाहीत. माणुसकीसाठी जगायचे व मरायचे असते !''

***

## परी कोण जाणेल ते अंतरीचे !

''तेथे शब्द कुंठित झाला ! अनुभव अनुभवी निगाला ! आता असों हा गलबला ! कुणी करावा ?'' – रामदास

घाई ! घाई !! घाई !!! कसली ? कडेगांवच्या उरसाला जायची ? कोणाला ? मुसलमानाला न् त्यांपेक्षाही बिगर मुस्लीमाना !

खरे पण ते करताना एस्. टी. च्या गाडीस बेशिस्त घुसा घुशी ? न करावी तर काय करावे ? तास तास खोळंबूनही, जायास मिळत नाही तर ही धडपड चालायचीच !

असा काहीसा संवाद माझा व विट्याचे श्री. ताहेर अब्दुल यांचा चालला असताच, एस्. टी. च्या गाडीत पाय ठेवता ठेवताच एका पासिंजरांच्या डोक्यावर हेंदकाळलेले प्रवेशद्वार थडकले व तो रस्त्यावर पडला आणि एस्. टी. नें सुंबाल्या केला. वकीलांना विट्यात जावयाचे होते व मी रेल्वेने मिरजेकडे जाणार होतो ती पुण्याकडून सदर्न मराठा

रेल्वेची गाडी यावयाची होती अन् वकीलाना सहज आसन एस्. टी. त मिळू शकेल, अशी संधि हवी होती. म्हणून आम्ही स्टेशनमागील एका कोपऱ्यात रहदारीच्या टांग्याचे व एस्. टी. चे आवार सोडून बोलत उभे होतो. रेल्वेस्टेशनावरच्या मागील प्रवेशस्थानाशी पाहुण्यांना उतरून द्यावयास आलेल्या दोन टूरिंगाही होत्या. मी व वकील उरुसावरून बोलता बोलता, सामुदाईक मनाच्या आणि समाज पुरुषाच्या चव्हाट्यावरील शिस्तीपर्यंत ओघाओघाने आलो होतो. आणि इतक्यात ? फर्रर्र टर्रर्र करीत एक एस्. टी. ची गाडी आली ती विट्यास जाणारी होती. ती थांबावयाचा अवकाश ! रेल्वेसाठी उतरणाऱ्याकडे सरळ उतरून देतो कोण ? त्यांना उतरण्यासाठी गाडीचे प्रवेशद्वार उघडे होताच गाडीवर आणि एकमेकावर अक्षरशः चढाई करून उरुसप्रेमी गर्दी करु लागले. रेल्वेसाठी आलेले चार उतारु मुठीत जीव घेऊन उतरले. चढणाऱ्या पॅसिंजरानी एवढा हमला केला की त्यांना कंडक्टरने आर्जवून, रागावून कांही समजूतीच्या गोष्टी सांगितल्या तरी ऐकतो कोण ? एस्. टी., पब्लिक सर्व्हिस ना ? तिच्या आत सूचनेचा फलक होता ना का. ही तुमची गाडी तुम्ही स्वच्छ ठेवा ! मग आमच्या गाडीत घुसून बसायला, नोकर कंडक्टर कोण बंदी करणारा ? गाडीला किती पासिंदर वाहून नेण्याची ताकद आहे याची कदर कोण करतो ? कंडक्टरने थडबडणारे दार लावून घेण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ ! व्यर्थ !! व्यर्थ !!! गाडी तर वेळेवर सुटू शकली नाहीच ! पण कंडक्टरचा नाईलाज व चढणाऱ्या पॉसीदराचा हक्क बजावणीसाठी चाललेली हालअपेष्टा यातून मार्ग काढण्यासाठी ड्रायव्हरला सुचले की मोटार जोरात मागे रेटावी ? त्याने आपला 'आतला' आवाज कृतीत उमटविला. भर्कन त्याने गाडी मागे खेचली आणि ओगलेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याने त्याची मोटार वारे वेगाने चालू सुद्धा झाली.

या धुमश्चत दाराच्या तोंडाशी असलेले दोन चार प्यासेंजर परस्परांच्या अंगावरुन रस्त्यावर कोसळले आणि मग चढणाऱ्याची रांगही मोडली. पण मागे सरणाऱ्या मोटारीने ओगलेवाडीच्या रस्त्याकडे मोहरा वळविताना मी व वकील बोलत उभे होतो त्या स्टेशनामधील मारुतीच्या समोरिल जागेत वळण मारताना मागचे डबल टायरचे एक चाक माझ्या बुट घातलेल्या डाव्या पावलांस एवढे चेंगरून व चेचून गेले की, पायावरचा बुट फाटून तळव्याच्या मध्यापासून अंगठ्यापर्यंतच्या बोटापर्यंत माझा डावा पाय कातरला गेला. रक्ताच्या झिरपाच्या झिरपा लागल्या आणि दुमडून रस्त्यावर कोसळलो. वकील भांबावले, तेथील गर्दी बावरली, मी डोळ्यापुढील काजवे मोजू लागले. माझा बूट काढून घेऊन माझा रक्तस्राव थांबवण्याचा उपाय वकील शोधू लागले. तेव्हा मी त्यांना क्षीण स्वरात म्हणालो – अगोदर काका पाध्याच्या त्या ड्रायव्हर आत्माराम बापूस बोलवा.

वकीलांनी आत्माराम बापूस बोलावले. अजूनही पुण्याची गाडी यावयाची होती. त्यामुळे माझी अवस्था पहाताच त्याला एकदम दयाच आली. मी विनंती केली की झट्कन मला ओगलेवाडीच्या दवाखान्यात. एकदम आत्माराम बापूच्या काकासाहेबांची गाडी

मझ्याजवळ आणली. त्यांनी व वकीलांनी मला पाध्यांच्या गाडीत मागच्या बाजूस निजवले अन् मला झरकन सर्कत ओगलेवाडीच्या दवाखान्यात आणले होते. मला दरवाखान्यातील बाकावर आडवे टाकले अन् आत्मारामबापू काकासाहेबांच्या पाहुण्यांना घेण्यासाठी रेल्वेस्टेशनवर गेलेसुद्धा !

वकीलांनी डॉ. आप्पासाहेब आगाशे यांना बोलावणे केले. माझ्या अंगातील डबडबलेल्या घामानें अंगावरचे कपडे केव्हाच ओलेचिंब झाले हेते. तोंडावर आलेल्या कळेने, दवाखान्यातील तरुण ओगल्यांच्यासह सर्वमंडळी काही भलतेच समजून चुकली होती. मला कमालीची तहान लागली होतो. मी कोटवगैरे कपडे काढले, कोणीतरी आणलेले घोटभर पाणी प्यालो तिक्यात डॉ. अण्णासाहेब आगाशे आले. त्यांनी समाचार घेतला कॉफी पिता का ? म्हणून विचारले मी विनविले डॉक्टर प्रथम मला धनुर्वात न होईल हे पहा. तेच तर मी करणार आहे पण थोडे झोपेचे औषध – म्हणजे गुंगीचे का ? मी विचारलें मला वाटलेच तर मागणे झाले ! इतक्यात काकासाहेब पाध्ये आले, भाऊसाहेब ओगले आले, त्याचें बंन्धु आले. डॉक्टरांनी मला टेबलावर घेतले. माझ्या कमरेच्या बेताला उभ्या माणसांची भिंत झाली डॉक्टर माझे पायावर उपचार करु लागले. वीसएक मिनिटात त्यांचा उपचार संपला. माझ्या तोंडाशी डॉक्टर आले. विचारु लागले – 'कसं काय ?' त्रास नाहीना झाला.

मी उत्तरलो – 'मुळीच नाही आपण काही जवळ जवळ भासूच दिले नाही. प्रथम जखम धुतलीत तिला कांही तरी (लोशन वगैरे) औषध लावलेत आणि चौदा टाके घातलेत होय ना ? –'धन्य आहे तुमच्या स्टॅमिनाची ! आताथोडी कॉफी घ्याच ? मी होकार दिला कॉफी चांगली दीड दोन कप प्यालो. मला स्ट्रेचरवरुन फॅक्टरीच्या आवारात एका खोलीत हलविण्यात आले.

मी आडवे होण्याचा विचार करीत होतो. एवढ्यात एस्. टी. च्या विटा. डेपोचे व्यवस्थापक आपल्या बरोबर तीन माणसे घेऊन आले. ते डॉक्टर अप्पासाहेब आगाशे याचेकडे चौकशी करुन त्यांच्या परवानगीनेच आले होते. तोच डॉ. अप्पासाहेबही आले. डेपो मॅनेजरांनी विचारले आपण काय करावयाचे ठरवले आहे ? आमचे येथील वकील श्री. ताहेर अब्दुल्लानी आम्हाला सर्व हकिगत सांगितली; म्हणून आम्ही आलो.

'आपण तसदी घेवून समाचाराला आलात. हे काय थोडे झाले?' मी उद्‌गारलो, मी काय करावे अशी आपली अपेक्षा आहे?'

सगळे गप्पचं तेव्हा पाणावलेल्या डोळ्यांनी गुदमरलेल्या स्वरात माझ्या पायावरुन गेलेल्या मोटारीचा ड्रायव्हर म्हणाला, 'चुकी झाली' लगेच मी त्यास हटकले. 'हां ! रडतोस का बाबा ? चूक तू माझी तर काही केली नाहीस ? तुझ्या मोटारीत चढणारा समाजच अनावर होता. त्याच्या तडाक्यातून मोटार काढण्याच्या कर्तव्यास तू जागलास. तू काय जाणून बुजून माझ्या पायावर मोटार घातली नाहीस, तुझे माझे थोडेच वाकडे वा वांधे होते

की आहे ?' तो ड्रायव्हर कृतज्ञतेने कशाबद्दलच्या कुणास ठाऊक ! पाया पडू लागला मी त्याला म्हटले. बाबा देवाच्या पाया पडायचे. माझ्या कशाला ? म्हणजे ? 'विटा डेपो मॅनेजर विचारु लागले' आपण सरकार दरबारी अगर आमच्या डिपार्टमेंटकडे तक्रार वगैरे काही करणार नाही काय ? नाही ! नाही ! नाही मी म्हणालो.

मग आम्ही आल्यासारखे आपण लेखी देता का, की आपली काही तक्रार नाही म्हणून ! डेपोमॅनेजरांनी पृच्छा केली.

मी माझी काही तक्रार नसल्याने लेखी दिले. विट्याहून आलेली मंडळी निघून गेली. सुमारे तासाभराने कऱ्हाडचा एक पोलीस कॉन्स्टेबल आला, जवळ बसून माझ्या प्रकृतीची चौकशी केल्यावर विचारु लागला. मला जरा महिती देता का ?

कसली ?

आपल्या पायावर विट्याच्या दत्तात्रय तातोबा गायकवाडने मोटार घातली यासंबंधी.

मी उत्तरलो – माज्या पायावरुन त्याची मोटार गेली त्याने घातली नाही.

त्याने रेकलेस ड्रायव्हींग केले नाही काय ?

मला तसे वाटत नाही. तसे काही असलेच तर ती एक रेकलेस रिॲक्शन होती.

सामुदाईक अशा रेकलेस सीटक्याप्चरिंगची.

''मग आपली कांही त्या ड्रायव्हरविरुद्ध वा एस्. टी. विरुद्ध तक्रार नाही, असे समजावे काय? होय.''

सन १९५५ सालातील कडेगावच्या उरसाचा तो दिवस असाच चर्चा वाटाघाटी नि मी चूक केली बावळटपणा केला, की आलेली संधि घालविली अशाच काट्याकुथात लोकांचा गेला म्हणाना ! पण मी त्यात जवळजवळ भाग घेतलाच नाही' म्हणून ! कऱ्हाडात अन आसपास मी ओगलेवाडीच्या हॉस्पिटलमध्ये आहे हे सर्वत्र पसरले. माझ्या घरची मंडळी, स्नेही सोबती व भेटभाऊ यांची रीघ दोन दिवस संपेनाच ! तेव्हा, काकासाहेबांच्या संमतिने मला ओगलेवाडीच्या गेस्ट हाऊसमध्ये स्ट्रेचरवरुन नेण्यात आले. तेथे मग वरदळ पुष्कळच कमी होऊ लागली.

तेथे मी पंधरा दिवस राहिलो. माझ्या चहाच्या किंवा जेवणाच्या वेळी तेथे कोणी भट भाऊ परवानगी घेऊन आलाच, तर त्यांचेही चहापाणी व भोजन तेथे होई. कऱ्हाडातील काय पण सातारा–पुणे येथील मंडळी भेटून गेली. वाईचे गोविंदराव वैद्य यांनी अभिप्राय दिला की पाचशे रुपये पर्यंत दुखण्याचा खर्च सहज मागता आला असता ! मी त्यांना सांगितले, ''स्वभावो दुरतिक्रमः'' नाही काय ?

मी बरा होऊन घरी परत आलो. दुसरे दिवशी तुरंत हप्ता म्हणून ओगलेवाडीच्या क्यांटीनला देण्यासाठी सव्वाशे रुपयाचा चेक श्री. भय्यासाहेब पाध्ये याच्याकडे पाठवून क्यांटीनची बाकी व डॉ. आगाशे यांचेकडून चौकशी करून दवाखान्याचे बील कळविण्यास विनंती केली. आणि आश्वासिले की – काय वाटेल ते करुन एका पंधरवड्यात मी पैसे

चुकते करीन. मात्र माझ्या जीवावरचा प्रसंग असता, ओगलेवाडीच्या डॉक्टरापासून व्यवस्थापनातील लहानमोठ्या सर्व घटकांनी मजबद्दल जो जिव्हाळा दाखवला त्याचा उतराई होण्यास, कृतज्ञतेच्या अश्रुशिवाय मजजवळ काही नाही.

तिसऱ्या दिवशी माझ्या हातात पोस्टाने एक लिफाफा आला. त्यात मी पाठवलेला चेक जशाचा तसाच परत आला होता. आणि श्री. भय्यासाहेबांनी लिहिले होते. क्यॉंटीनचे व डॉक्टरांचे बीलच काही नाही. आपण चिंता करु नये.

ओगलेवाडीस १९५५ साली मला मिळालेल्या अशा कुशल निरपेक्ष जिव्हाळ्याची आठवण झाली म्हणजे एकांतही मी त्या सर्व उदारधैर्यांना साध्य नयनांनी कृतज्ञतेचे नमस्कार करित असतो. कारण त्या जिव्हाळ्याच्या रुपाने ईश्वरी कृपेचा मेघ मजवर 'वोळला, होता.'

(रयत साप्ताहिक विटे, दीपावली अंक १९७५)

***

## कोणी, कोणाला, काय शिकविलें ?

त्या दिवशीं घरीं जावयाला मला उशीरच झाला होता. घरधनिणीचा बोल कितपत घ्यावा लागतो, या फिकीरींत मी पावलें जणूं विमानवेगानें उचलतच घरीं गेलो. मी जेवल्याशिवाय घरधनीण जेवावयाची नाहीं. हा घरचा शिरस्ता. त्यामुळें वाळून कोळ झालेलें अन्न माझ्यासारखेच तिलाहि विनाकारण खावें लागणार हा विचारही मला डाचत होता.

मनाच्या अशा बोचणींतच माझा घरप्रवेश झाला. अपेक्षेपेक्षां निराळेच दृष्य दिसले मला. फणफणणारी नागीण दिसेल घरधनीण ! अशी जी माझी भीति होती, ती कोठल्या कोठें विरली. माझें पाऊल अंगणांत वाजल्याबरोबर चटकन घरधनीण पुढें स्वागताला आली अन् म्हणाली –"सदू आज कित्ती दिवसांनी घरी आलाय ! अन् नेमका इतका उशीर आज अँ !"

घरधनिणीचें तें वाक्य पुरें व्हायच्या आंतच एका तरुणानें मला वांकून नमस्कार केला. त्याच्या मागून एका तरुणीनें अन् तिच्यामागून दोन चिमुकल्यांनीं. मी सद्‌गदित झालो. कारण तो तरुण सदूच होता. छे ! सदाशिवराव भोसले एम्. ए. पी. एच. डी. प्रिन्सिपाल महात्मा गांधी कॉलेज होते ते. त्याला या मोठेपणाच्या विनम्र भावनेंत पाहून हा गृहस्थ आमच्या येथील गणू चांभाराचा मुलगा आहे, हें कोणा बुद्रुकानेंही कबूल केलें नसतें. पण कालमहिमा असा आहे खरा ! सदू मजजवळ मॅट्रिकपर्यंत मोफत शिकला अन् तो एम्. ए. होईपर्यंत दरमहा फक्त एकेक रुपयाची मदत मी त्याला देत आलों पण

तेवढ्यासाठी त्यानें बायकोमुलासकट माझ्या पायां पाडावें याचा उलगडा मला होईना !

पण ती वेळ तसले उलगडे करीत बसण्याची नव्हतीच. कपडे काढून मी चटकन हातपाय धुतले नि सदुभाऊंना जेवावयास हांक मारली. घरधनीणीनें पाटपाणी केलेंच होतें. पारू, नव्हे, पार्वतीबाई चुळबुळूं लागली. सदू आपल्या चंदरला खांद्यावर टाकित मला म्हणाला, ''पारू काय विचारतीय तें ऐका गुरुजी !''

''ऐकायचंय काय ?'' माझ्या घरधनिणीनं प्रश्न केलान मी मघांच तिला सांगून टाकलंय ! तुह्मी दोघं जणं एकमेकांपुढं बसून रोज जेवतां, तर आज यांच्या पंगतीला दोघंही बसा. माझ्या बालगोपाळांबरोबर चंदर–पुतळा जेवलींच आहेत.''

''तसं नव्हं !' मॅट्रिक झालेली पारू अगदीं संवयीच्या शद्वांनी बोलली. 'जसा देश तसा वेश, ज्या घरांत नांदायच, तिथली रीतभात पाळायची, एवढंच बायकास्नी ठावं ! वहिंनी जवां जेवत्याल तवांच मी.''

पारूच मग पदर खोवून 'वरचं' वाढायला लागली अन सदू नि मी हंसतखेळत जेवलों. आमचे मागून सास्वा–सुना जेवल्या; हो, माझ्या घरघनिणीची ओळख चंदर पुतळांना ''ही तुमची आजी', म्हणूनच पारुने करून दिली होती.

पुढें आम्ही रात्रभर बोलत बसलों. जुने सर्व प्रसंग आठवले. अनेक ताज्या विषयावरही चर्चा केली. या चर्चेंत माझी घरधनीण श्रवणभक्ती करीत होती तर पारू अगदी मनमोकळेपणानें भाग घेत होती. आजकाल सार्वजनिक जीवनात पसरलेल्या उदासीनतेबद्दलही उहापोह झाला. तेव्हां पारू म्हणाली.

''ही उदासीनता कांही योग्याची नाही. समाजांत जाऊन सांगायसारखं जवळ नसलेल्या नादार मेंदूची ती भीतीग्रस्त अवस्था आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें हात बांधलेल्या इंग्लंडने हिंदुस्थान सोडलें; त्यांतून आम्हाला मिळालेलें स्वातंत्र्य स्वस्तांत पडले ! तसा लौकिकार्थ स्वार्थत्यागाचा त्रिदंडी घेतलेले सगळे सोंगाडे अर्जुन सत्तालालसेची सुभद्रा पकडूं लागले. सेवाबुद्धिनें समाजासाठीं स्वराज्याची चळवळ करणारे लोक एक कोपऱ्यांत पडले आणि संधिसाधु होते, त्यांना मुळीं स्वराज्य मिळालें. या गोष्टीनें आपल्या आयुष्यांतला वाराच गेला असें वाटून आपल्या शिव्या देण्याच्या व हुल्लडबाजीच्या वृत्तीचें समाधान करण्याकरतां चांगल्या गोष्टींचाही चिवडा करायला सुरवात केली. या सगळ्याचें कारण स्वतंत्र राष्ट्राच्या नागरिकाची राष्ट्रीय जबाबदारी मनांत नि मेंदूत न मुरतांच आम्ही कॉंग्रेसवाले नि बिगर कॉंग्रेसवाले लोकशाहीच्या तंत्राचे व मंत्राचे नुसते पोपट बनलो आहोंत......''

पारू असें कांहींसें सांगत होती. एकच विचार मला आनंदवित होता कीं मॅट्रिक झालेली सारींच मुलेंमुली पारुसारखाच मूलग्राही विचार करीत असतील तर या देशापुढें आज असणारा काळोख फार टिकणारा नाही. म्हणून पारुच्या बोलण्यांतील गुणदोषांची

बारकाव्यानें छाननी न करतांच मी उद्‌गारलों, ''सदा, खरा भाग्यशाली आहेस बेटा ! कुठून ही जोडीदारीण तूं पैदा केलीस ?''

'आपलीच ती कृपा आहे गुरुजी !' सदू एकदम म्हणाला. मी आश्चर्यानें डोळे वासले तेव्हां पारूच सांगू लागली कीं ''बारा वर्षाखालीं तुम्ही परळी भागांत काम करीत होता, तेव्हां वर्धनगडाखालच्या गोविंदबाबाला तुम्ही यांचे स्थळ जिच्याकरतां सांगितले होते, तीच मी तुमची सून !

अन् मग पारूला अक्षरमित्र करण्यापासून मॅट्रिक परीक्षा पास करीपर्यंत सदूनें कसे कष्ट घेतले याचा इत्थंभूत इतिहास तिनें मला सांगितला. समानहक्काच्या पतिपत्नींचा प्रेमळ संसार हें आपलें कौटुबिक ध्येय व्यवहारशुद्ध करण्यासाठीं सदूनें जें केलें तें मी त्याला शिकविले होतें, असें त्या जोडप्याचें म्हणणें पडलें. शाळा पुस्तकांच्या छाननींतून असें कांही शिकविलें जाते कीं काय, आणि मी तें खरोखरच शिकविलें कीं काय, याची मला शंका आहे पण, तसें होत असेल तर बरें वाटून सदू आपल्या छात्रांना तशी शिकवण देत असेल या आनंदातच मी गर्क झालों.

गप्पांना कां घड्याळ ठाऊक असतें ? पांचाचा गजर झाला. अन् माझी बालचमू अभ्यासासाठीं उठली. तसा सदूभाऊ नि पारूअक्का यांनी तर प्रातर्विधि उरकलाच; पण चंदर–पुतळांना उठवून त्यांची बाळवाटी करीपर्यंत सारे कार्यक्रम झटपट केले कारण ते साताच्या गाडीनें कोल्हापूरच्या जोतीबाला जावयाचे होते.

टांगेवाल्यानें स्टेशनवर जाण्यासाठीं ''हाळी'' दिली. माझ्या घरधनिणीनें आपल्या सुनेची खणानारळानें ओटी भरली. नातवंडांना खाऊ दिला. ''पुन्हां केव्हां येणार सदुभाऊ ? वहिनी, आतां फिरून चार दिवस रहायला या हं सवडीनें.'' असा आग्रह माझ्या चिमण्या वारसांनीं केला. शेवटीं निघतांना, माझ्या पिताजींच्या फोटोला सदूनें नमस्कार केला अन् आपल्या मंडळींना करायला लावला. त्यासरशीं मी विचारलें, ''सदा, हें रे काय ? ते तर तुझी सावलीही घेत नव्हते !'

''पण मी जेवल्याची चौकशी केल्याशिवाय जेवतही नव्हते गुरुजी ! आपले पिताजी मर्यादापुरुषोत्तम होते. ते अस्पृश्यता मानीत होते, पण माणुसकी विसरले नव्हते. बोलघेवड्या सुधारकापेक्षां तो कृतीकेवडा पुराणपुरुष मला 'इथवर ! याच्यापुढें नाहीं !!' असा आवाक्याचा व्यवहार शिकवून राहिला आहे.''

या शद्बाबरोबरच टांगा चालू लागला अन् आमचे डोळे ओले झाले.

(समर्थ साप्ताहिक, सातारा)

***

## कॉलेज – कुमारांच्या श्रीमुखांत !

फाड् फाड् फाड् !

एकामागून एक चपराका कडाडल्या. आजूबाजूंचीं घरें चपापलीं ! खिडक्याचीं दारें किलकिलीं झालीं नि झाकलीं गेलीं.

तालुक्याचें शहर. भर दुपारची वेळ. भरवस्तींतील चौक ! आणि तेथें —

६३ वर्षांचा एक थोर समाज–सेवक श्रीमुखांत भडकावीत आहे – डोळे वटारून, दांतओठ खाऊन थपडामागून थपडा देत आहे. तसें करतांना त्याचे गाल लाल झाले आहेत आणि मानेवरील शिरा तटातट फुगल्या आहेत.

त्याच्या सणसणीत चपराकांची चारचार बोटें प्रत्येक मुलाच्या गालावर उमटलेलीं आहेत. आणि तरी ती तरुण मुलें स्वस्थ ! कां ? त्या वृद्धावर तीं उलट हात कां उचलीत नाहींत ? त्या चार तरुणांना तो म्हातारा भारी थोडाच होता ? मग तो मार भरदिवसा, भर बाजारांत, तो रागाचा मार खाऊन त्या तरुणांना अपमान कां वाटत नाहीं ? ते त्या जरठावर तुटून कां पडत नाहींत ? त्यांनीं त्याची दामटी केव्हांच वळली असती. पण हात राहूं द्या, आपली जीभसुद्धां त्या तरुणांनीं उचलली नाही.

कां ?

उलट, तो स्थविर त्या युवकांना जोरजोरानें आव्हान देत होता, ''या, पुढें या, मला मारा, नाहीं तर तो शिपाईदादा चालला आहे. त्याला सांगून मला अटक करवा. निदान, शेजारच्या बंगल्यांत नाणावलेले वकील आहेत, त्यांच्यामार्फत माझ्यावर खटला तरी भरा. मी हा इथें – इथेंच – तब्बल पंधरा मिनिटें उभा रहाणार आहें. तुम्हांला सुचेल त्या मार्गानें तुम्ही मला प्रतिकार करा.''

पण छेः ! हूं नाहीं कीं चूं नाहीं ! चारी तरुण अगदीं दगडी पुतळ्याप्रमाणें उभे ! त्यांच्या शरिरांतील सारें तेज, सारें अवसान, सारा प्राणच जणू नष्ट झाला होता.

कशानें ?

लाकडी ठोकळ्याप्रमाणे स्वस्थपणे मार खात उभे असलेल्या त्या तरुणांचे खांदे हालवून तो वयोवृद्ध समाज–सेवक त्यांना विचारू लागला, ''अरे, असें स्वस्थ कां ? तुम्ही कांहींच हालचाल कां करीत नाहीं ? मग निदान माझ्या एका प्रश्नाचं उत्तर तरी द्या.''

एका तरुणानें मान वर करून पाहिलें व प्रश्न ऐकण्यासाठीं आपले कान धीट केले. वृद्धानें विचारलें,

''लेकांनो, तुमच्या आयांनीं काय पातक केलं होतं रे, म्हणून तुम्ही आईमाईवरुन अर्वाच्य शिवा देत होता ?''

सायकलवर डबल सीट घेऊन ते चार तरुण वेगानें येत होते. आणि त्या सायकलींची टक्कर झाली होती आणि त्यासरशीं त्यांनीं एकमेकांना अर्वाच्य शिव्या देण्यास सुरुवात केली होती. थेट शिमग्यांतल्यासारख्या ! त्या, तो बापडा म्हातारा वैद्याच्या घरुन औषध घेऊन येतांना, त्याच्या कानावर पडल्या. आईचा उद्धार करणाऱ्या त्या शिव्या कानीं

येतांच त्या देशभक्ताचें रक्त एकदम तापलें–सळसळूं लागलें आणि त्यानें त्या चौघां तरुणांना खरपूस प्रसाद दिला. त्याच्या रक्तांत, त्याच्या संस्कृतींत, कोणाच्याहि आईविषयीं, कोणाहि स्त्रीविषयीं, भक्ति होती, आदर होता. युगानुयुगें जतन केलेल्या त्या संस्कृतीला धक्का लागतांच तो म्हातारा बेभान झाला व त्या तरुणांना विचारु लागला,

'पोरांनो, तुमच्या आयांनीं काय पाप केलें म्हणून तुम्ही त्यांचेवरून शिव्या देतां ?''

अकस्मात् मिळालेला तो मार आणि प्रश्नांचा तो भडिमार. यामुळें त्या कॉलेजच्या तरुणांच्या वृत्ति बधिर झाल्या होत्या. त्यांत दोन मराठे होते, एक महार होता नि एक मुसलमान होता. मुसलमान मुलगा सर्वांत आधीं भानावर आला आणि डोक्यावरील केंसांवरुन हात फिरवून म्हणाला.

''आम्ही आमच्या आयांना कांहीं बोललों, म्हणून तुमच्या बापाचें काय गेलें ?''

मुसलमानी मग्रुरी उसळलेली पाहून तो तपोवृद्ध राष्ट्रभक्त किंचित् हसला व म्हणाला,

''माझ्या बापाचें कांहींच जात नाहीं रे, पण माझ्या गांवाचें सर्वस्व जातें ना ? अरे, तुम्ही एवढे शिकलेले – रघुवंश एकाच्या हातांत, तर शेक्सपीयर दुसऱ्याच्या हातात; त्या सर्व लेखकांनीं मातेविषयीं अशीच भावना व्यक्त केली आहे का रे ? एका द्रौपदीची विटंबना झाली, तर अठरा अक्षौहिणी सैन्य भारतीय युद्धांत लढलें ना ? उद्या तुम्ही शिक्षणमंत्री व्हाल, तेव्हां 'आईला शिव्या देणारा' म्हणून तुमची बदनामी होईल. अशी तरुण पिढी या माझ्या गावांत आहे, असं जगाला कळलं, तर सारं जग माझ्या गावाची बेअब्रू करील. छीः थूः करील; तें मी सहन कसें करूं ?''

मग त्या वृद्धानें, एकाद्या शांत शिक्षकाप्रमाणें, मातेच्या महिम्याचा जणू पाठच, त्या रस्त्यावर घेतला आणि आपल्या घरचा रस्ता सुधारला.

रात्रीं ८ ची वेळ ! जुन्यापुराण्या घरांत पिठलें भाकरी खात, तो वृद्ध जेवत बसला होता. तों —

ते चार विद्यार्थी आणि त्यांचे चार पालक आलेले !

विद्यार्थ्यांनीं त्या वृद्धाच्या पायावर डोकें ठेवलें व माफी मागितली.

पालक जागच्या जागींच, भिंतीला टेकून, हात जोडून बसले. पण त्यांच्या डोळ्यांतून घळ् घळ् घळ् वाहणाऱ्या अश्रूंनी कबुली दिली,

''मुलांच्या या संस्कृति–भंगाच्या पातकाचे धनी आम्ही आहोंत–आम्हीच घरी शिवराळ भाषा वापरतों तीच त्यांनीं उचलली – तुम्ही त्यांना चांगला धडा शिकविला – ते जन्मभर विसरणार नाहीत. मानवी संस्कृतीचें खरें तेज आज आपण दाखविलें. समाज टिकून रहातो तो यामुळेंच.''

तो वृद्ध फक्त हंसला !

(महात्मा मासिक पुणे, जुलै १९६३)

***

## जीवन – सिंहावलोकन

यंदाच्या ऑक्टोबरचे शेवटी तिथीने मी ८१ या वर्षात पदार्पण करीत असलो तरी, सहस्र चंद्रदर्शनविधि करण्यासारखी वा वर्धापन दिनाबद्दल उत्साहाने कांही विधि करण्यासारखी जराहि प्रसन्न परिस्थितीच नाहीं, शिवाय महाराष्ट्रांच्या इतिहासात म्हातारा व्हायला परवानगी नाहीं, हे मी आजपर्यंत तरूणांना सांगत आलो. ते मत माझे आजही कायम असले तरी आणि त्या मताप्रमाणे वागण्या चालण्याचा मी प्रयत्न करीत असलो तरी समारोह समारंभाची मजा करीत वा करवीत राहण्यासारखी माझीहि मन:स्थिती नाही.

आजारानें जिकीरपणाचा हा प्रयत्न नाशक परिणाम आहे, असे कृपेने कोणी समजूं नये की मानू नये. १९७५ साली आणिबाणीचा पुकार झाल्यानंतर २० महिने ज्या डोळ्यांच्या तडाक्यांतच होते, त्यांचा व त्यातच आजाराचा परिणाम मिळून झालेल्या अवस्थेतूनही मी हे म्हणत नाही, भारतीय स्वातंत्र्याच्या संपादनापासून भारतीय एकजिनसीपणा, समर्थ आणि तेजस्वी करण्यासाठी जे सांस्कृतिक व कर्मयोगी लोकशिक्षण-व्हावयास हवे होते. ते न करता, लहान लहान संस्थापासून थेटच्या शासन प्रतिष्ठेपर्यंत 'कुर्सीका किस्सा' चालविल्यामुळे राष्ट्रीयत्वाचा दिमाख ढासळला आहे व तो लवकर सावरण्याची आशा किरणे अजून प्रभावीपणे चमक दाखवीत नाहीत, यामुळें ''वृद्धोऽपि तरुणायते ।'' हे साधणेच अवघड झाले आहे.

अगदी माझ्या जन्म सालांत म्हणजे सन १८९८ सालीच क्यूरी दम्पतीने रेडियम या मूलद्रव्याचा शोध लावला आणि रेडियम क्षारे स्वयं प्रकाशी असतात हे सिद्ध केले. अशा कर्तृत्ववंतांच्या वर्धापन–दिनाला महत्त्व आहे. नसता आणला दिवस ढकलला की वर्षा अखेरीस वाढदिवस साजरा करु पाहण्यात काय अर्थ आहे ? समर्थांनी म्हटल्याप्रमाणें अशा कर्तृत्ववंतांना ''पराधिकपणे मत्सरू'' करणाऱ्यांच्या धिक्कारांच्या अग्निदिव्यांतून जावे लागते. कारण ''मत्सरे सत्य मानिना । सत्याचे लटके करी । खऱ्याचे वोखटे सांगे । मज नाही म्हणोनिया ॥१॥ आपणू भ्रष्टला आहे । भल्याला भ्रष्टभावि तो । आपणू ठायीचा लंडी । रणशूरांसि हासतो ' ॥२॥ असा 'मत्सरू' चा स्वभावच असतो, त्याचे चटके मलाही १९७७ च्या एप्रिल अखेरपर्यंत बसावयाचे तेवढे बसले. पण मी १९ मे १९७७ रोजी काविळीने व पुढे मोतिबिंदूने आजारी झाल्यापासून त्या सुखाला मी आचवलोच आहे.

फ्रेडरिक मार्टिन बोर्डनस्टेटे (१८१९ ते १८९२) या जर्मन कवीच्या 'दि सॉंग्ज ऑफ मिर्झांशाफी' या काव्य–संग्रहाच्या त्यांच्या हयातीतच शंभराहून अधिक आवृत्त्या निघाल्या, तशी कीर्ति माझ्या कोणत्याच पुस्तकांची झाली नाही आणि आजारांतून उद्भवलेल्या अशक्तपणामुळे मी काही फारशी हालचालही करूं शकत नव्हतो. ही परिस्थितीच बहुधा मला प्रसन्न असावी. काविळीच्या आजारांतून जरा बरे वाटताच मी वाशीमला गणेशोत्सवात चार व्याख्याने देऊन आलो. तसाच मोतीबिंदूने जोर करण्याच्या

ऐन धुमश्चक्रींत ऐशिव्या वर्षात मी प्रवेश केल्यावरही कल्याण येथे समर्थोत्सवांत चार प्रवचने केली. गोखले कुलवृत्तांताचे सिद्धि सभेत बोललो किंवा लो. टिळक पुण्यतिथीला मी पाटण कॉलेजात दोन तास बोललो, हे खरे असले तरी ते लोकांना माझ्या एका 'चटके' चा भाग वाटतो असा माझा अनुभव आहे. गेल्या पांच वर्षांत श्रीमद्दासबोध स्वाध्याय साधना हे एक अभ्यास टिपणीचे माझे पुस्तक प्रसिद्ध झाले. पण तो छांदिष्टपणाच नव्हे काय? हल्ली रामदासांचे अभंग जमवून मी टिपणे-टापणे काढण्यांत व अधूनमधून एकादा दुसरा आवश्यक वाटणारा अगर एकाद्या संपादकानीं मागितला तर लेख लिहितो. तोसुद्धां वेळ वाया न दवडता तो सात्विकपणे घालविण्याच्या साधनाच्याच योग्यतेचा, बरोबरीच्या सात्विक मंडळींनी माझ्यापुढेच परलोकी दौड मारल्यामुळे, गप्पा मारीत बसावयासही निकोपस्थान हुडकावयास लागते. म्हणून वयपरत्वे ईश्वरी हांकेसाठी उत्सुक असलो तरी, ती येईपर्यंत काय करता येईल याचा विचार करता, आमच्या गोखले कुलांच्या देवतांच्या आदेशाचाच अवलंब करावा अशा निर्णयास मी येत आहे. ''कुलदैवत-पूजा' म्हणून परंपरेने आलेली एक समग्र रचना नुकतीच हाती आलीं आहे ती अशी :-

''निर्माणक्षम तेजे श्रम पुरुषार्थी भलेपणात मन।
रंगुनि राहो म्हणुनी कुलदैवत वेळणेश्वरा नमन ॥१॥
एकान्ती, लोकान्ती, शहरी, कुहरी कुठे असो वसती।
'कल्याणच करणे' ही जीवन-निष्ठा सदैव होऊ सती ॥२॥
कुलदैवते दिल्या या आदेशाचे अखंड पालन हो।
त्याच व्रतपूजेने प्रसन्न जीवन पसाय पावन हो ॥३॥
स्वार स्वये तरीही सम्यग् संसार सरकती पुढती।
सहकारी, सहजीवी, सहानुभूती जरी न आखुडती ॥४॥
मात्र प्रपंचि पंच प्रखर प्रत्येक होउनी वसतो।
कृतिवृत्तिचे पैलू सूक्ष्म, चिकित्सेवरी सदा कसतो ॥५॥
त्यासाठी जिद्द हवी निज-संभव व्यक्तिमत्व टिकवाया।
निर्माण क्षमतेचा जोम कदा दवडिता न ये वाया ॥६॥
या पायी ब्रह्मासह कुलदैवत मल्लिकार्जुनी प्रगटे।
अम्बेजोगाई ही सहजच मग शक्ति देवता लगटे ॥७॥
ती घे काली, लक्ष्मी, सरस्वती ही प्रकाशमय रूपे।
साक्षात्कारी होई पूजाया भक्तिभावना भूपे ॥८॥
त्यांच्या कृपाप्रसादे लोक प्रगतोन्नतीस लागावे।
काळाने अमरपणे इतिहासाचे प्रभाव नितगावे ॥९॥
या सेवाधर्मास्तव ईश्वर हो नीळकंठ निष्काम।
आणिक मारुति होउनि करि रामायण जगास विश्राम ॥१०॥

मन मेंदू–मनगटिचा बळकटिचा हाच राम–दास असा।
ज्याने अगम्य अथवा अशक्य नाही जगात या सहसा ॥११॥
कर्तव्यदक्ष मारुति कर्तृत्वे सत्वशील निष्काम।
दैत्यांच्या दमना ये रोमरोमात रंगुनि राम ॥१२॥
श्रीरामाच्या पुढती नित हा कर जोडुनी उभा राहे।
अन्यत्र वीरवृत्ती साधु परित्राणिंच्या उभारा ये ॥१३॥
दैत्यांच्या मदकेन्द्री मारुतिने रुद्ररूप धरिले।
त्याच्या विवेकधारे भारति मग रामराज्यही स्थिरले ॥१४॥
इतिहासी ही घटना पुढीलाना वरदहस्तशी ठरली।
पुनरावृत्तीसाठी कास तिथेची विवेच की धरली ॥१५॥
जो म्लेंच्छ दैत्य गति ठोकरुनी धर्म संस्कृति–जनता।
तो ये महंत ठोसर रुद्र – पंथ चालविता ॥१६॥
तो दे गांवोगावी तरुणा आदर्श वीर मारुतिचा।
सत्ता – मदांध – केंद्री रुढ महारुद्र नीतिपंथाचा ॥१७॥
सामूहिक उत्थाने सेवाधर्मिय कर्मयोग उभा।
त्यावरि शिवशक्तींचा ध्वज फडके नेटुनी विवेक नभा ॥१८॥
त्याचीच आण घेउनि नरविरी रास्त राष्ट्रभक्तानी।
समर्पिले निजजीवन परमार्थी सतत ध्येयनिष्ठानी ॥१९॥
कुलदेवता पूजेचा चालो हा वारसा अहोरात्र।
तेणे जगद्‌गुरु हो भारत हा वंद्य वंद्य सर्वत्र ॥२०॥

या कवितेतील आदेश आचरण शुद्ध ठेवावयास शरीराची उतरती भाजणी जेवढी मदत करील तेवढी घेऊन मी चालणार आहे. भेट–भाऊनी मोकळ्या मनाने रोज रोज पुढे हांकणाऱ्या समस्यांची चर्चाही करणार आहे आणि कोणी नव्या दमाचे नेतृत्व अपेक्षील तर स्वयंसेवक म्हणून त्याला होईल तो सहकाराचा हातभारही लावणार आहे. आपण होऊन कांहीं नव्या कार्याचा उभार करण्याची धमकच काय, पण उमेदही आज वाटत नाही एवढे खरे ! तरीही कोणाला अडचण वा अडवणूक न होता, प्राप्त रिकीबीत पाय ठेवून चाललो असतांच देवाची हांक यावी आणि त्या हांकेला शिरसावंद्य मानण्याचा योग यावा. तो असा कीं त्याचा चटका तर कोणाला लागू नयेच. पण शक्य तर नांवासह जगाला माझा विसरच व्हावा अशी इच्छा आहे.

(फलटण – जनसेवा, १९७९)

***

## 'वळे वळवळू लागले !'

सन १९४९ साली जैन साधुवर्य लक्ष्मण सुरिजी यांच्या कर्मयोगावरील प्रवचनांची प्रसारणी करण्यासाठी भाषांतर सेवा केली होती. तीवर संतुष्ट होऊन मला साधुवर्यांनी प्रसाद म्हणून अनामिकेवर (करंगळी जवळच्या बोटावर) एक छोटेसे सोन्याचे वळे चढविले होते. साधुवर्यांची सांगी होती की, त्या प्रसादाचा उपयोग गोखल्यांनी स्वतःच्या संसारात रूपांतरानेसुद्धा करावयाचा नाही. एकतीस वर्षे आपल्या बोटावर रुळलेला साधूचा प्रसाद आपल्या मागेही प्रपंचाचे उपाधीत गळवटू नये. असा विवेक मला माझ्या दोन सहकाऱ्यांच्या मृत्युमुळे काही व्यवस्था करू लागला. प्रसादाला बाजारी कस पहावयाचा नाही व सौदा तर करावयाचा नाही हे देवच बोलून चुकला होता. तेव्हा मी आपल्या जिव्हाळ्याच्या मंडळींचा सल्ला घ्यावयास सुरुवात केली त्याच जिव्हाळ्याच्या मंडळीपैकीं एका व्यक्तीनें माझ्याकडून तो प्रसाद घेऊन आपल्या आवाक्याप्रमाणें पांचशे रुपये मी सांगेन त्या देवसेवेला अर्पण करण्याची तयारी दाखविली. सुमारे अर्ध्या तोळ्यांच्या आंत बाहेर वजनाने असलेले सोन्याचे वळे शके १९०२ च्या ऋषीपंचमीस मी त्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीस अर्पण केले आणि गोखल्यांचे कुलदैवत श्री. वेळणेश्वर त्याचें सेवेस दोनशे एक रुपये पिताजी पांडुरंग गुंडो गोखले यांच्या कृतज्ञ स्मरणार्थ वेळणेश्वर ट्रस्टकडे सादर करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे माझ्या जन्माच्या सुखदुःखाच्या वाटेकरी सौ. सुलोचनाबाई गोखले यांना ज्या त्यांच्या ग्रामदेवतेने बालपणापासून बाणेदारपणाने वळण लावले, त्या पांचवड (ता. वाई, जि. सातारा) श्रीकज्जलेश्वराचे सेवार्थ सादर करण्यास सांगितले. एकावन्न रुपये असे दोनशेबावन्न रुपये देवांच्या सेवार्थ लागलेची रीतसर व्यवस्था झाली आहे.

राहिलेले दोनशे अठ्ठेचाळीस रुपयांची अशी एक सूचना आहे का, राष्ट्रगुरु समर्थांच्या त्रिशताद्वि समाधी महोत्सवानिमित्त उमलत्या पिढीमध्ये समर्थ साहित्याचा प्रसार करावा.

प्रसाद म्हणून मिळालेले वळे एकतीस वर्षानन्तर सत्कारणी लागण्यासाठी वळवळ करूं लागले व माझ्या डोळ्यादेखत आपण कारणी लागावे असे सुचवूं व समजावूं लागले. त्याची इच्छा पूर्ण करण्याच्या मार्गावर मी आहे.

***

## संसार निवृत्ताचें निवेदन

'तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ॥'

आज मी माझ्या आयुष्यांतील आखलेल्या नित्यक्रमांतून मोकळा होत आहे. 'संसार साधूनी परमार्थाचा लाभ जयानें केला ! तो नर भला, भला, भला !' अशी आपल्या

भारतीय परंपरेची शिकवण आहे. आज माझ्या संसार–सुरवातीपासूनच्या तीस वर्षांच्या कालांत मी वरील कसोटीला कितपत उतरलों, हें आपल्यासारख्या आप्तेष्ट निराक्षकांनीं ठरवावयाचें आहे किंवा कौटुंबिक, सामाजिक इतिहासकारानें ती गोष्ट नोंदवायची आहे. 'आधीं प्रपंच करावा नेटका ! मग पहावें परमार्थ – विवेका !' असें समर्थवचन आहे. त्याही कसोटीला मी कितपत उतरलों, हें माझ्या प्रपंचाचे ज्यांच्यावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम झाले, त्या माझ्या आप्तांनी, नातेवाईकांनी, शेजाऱ्यांनीं आणि संबंधितांनीं ठरवावयाचें आहे. दुसऱ्या कोणाच्याहि अधिकारावर आक्रमण करण्याची माझी मूसच नसल्याकारणानें त्या खटाटोपांत मी पडत नाहीं. पण प्रपंचाबरोबरीनें परमार्थ घडलेला असो वा नसो, प्रपंच साधून मग परमार्थ घडला असो अगर नसो, मी आत्मविश्वासानें एवढें म्हणूं शकतों कीं, केवळ प्रपंच मी केला नाहीं, तर प्रपंचाबरोबर परमार्थ नसला तरी परार्थ म्हणजे दुसऱ्यांची सेवा, दुसऱ्यांचा उपयोग केला आहे. पण त्याचाहि पाढा वाचण्याचा हा प्रसंग नाही आणि परार्थदेखील माझे हातून कितपत घडला; हें देखील जीवनाच्या शास्त्रीय संशोधकांनींच ठरविण्याची खास बाब आहे. कारण श्री समर्थांनी म्हटलेच आहे कीं, 'यथासांग रे कार्य तेंहि घडेना ! घडे कर्म तें पुण्य गांठी पडेना ॥' कारण कीं, 'दया पाहतां सर्व भूती असेना !'

आणि म्हणून मला सांगणे भाग आहे कीं, 'दया करी जे पुत्रासी तेच दासां आणि दासी ॥' या तुकाराम महाराजांच्या वचनाच्या कसाला मीं उतरल्याचे माझें मनच जेथें मला सांगत नाहीं, तेथें 'कोणाही जिवाचा न करी मत्सर ! वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥' माझ्या वर्तनांत उतरलें होतें, 'असें मी असें म्हणूं ? मी इतकेच म्हणूं शकतों कीं, मी जन्मभर स्वार्थं केला तो सोज्ज्वळ स्वार्थं केला आणि आपल्या कर्तव्याच्या हांकेला उभे राहण्यात कसूर केली नाहीं. आणि एवढेंहि म्हणण्याइतका मला आत्मविश्वास नसता, आज माझ्या विवाहमांगल्याच्या तिसाव्याहि वाढदिवशीं एवढें बरीक म्हणूं द्यावयास मी संमति दिली नसती आणि प्रपंचाची मानसिक रजा घेतांना असें आत्मनिवेदन करण्याचा घटिंगणपणा मी केला नसता.

कालाची गति विचित्र आहे. तशीच अखंड आहे. म्हणून माणसांचीं वयें किंवा एकाद्या सत्कर्माचीं नि संस्थेचीं वयें वर्षांनीं मोजावयाचीं नसतात; त्यांच्या त्यांच्या कार्यकर्तृत्वांनी आणि समाजधारक परिमाणांनी मापावयाची असतात. इतिहास तरी असा न्यायनिष्ठुर असतो, असावा. त्या दृष्टीनेंच, विवाहाचा देखील विचार व्हावयास हवा. लग्नाची वेदी ही जीवनांतील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. 'लग्नाचा दिवस तिप्पट ताकदीनें स्मरणांत राहतो' असें कविवर्य गडकऱ्यांनी म्हटलें आहे, त्याला फार गंभीर अर्थ आहे. लग्नाच्या वेदीवर खेळकर वृत्तीनें व खेळकर वयांतच चढावयाचें असतें; पण 'कोण्याहि जीवाचा' खेळखंडोबा करावयाचाच नाही, या प्रतिज्ञेनें लग्नाची वेदी ही संस्था या दृष्टीनें दैवी संपत आहे. दोन जीवनांच्या समरसतेनें त्या वेदीवर पाऊल टाकून पुढे अनेक जीवांचें मीलन आणि संमेलन साधत जावयाचें असल्याकारणानें विवाहवेदीवरील समरसता, मांगल्य

केवळ मांगल्य आहे, भविष्याच्या भगवतीची व भगवंताची भेट विवाहवेदीवर होत असतांना भाग्याचा चंद्रमा अनुमानाच्या आकाशांतच असल्याकारणानें विवाहवेदीवरील हातमिळवणी पवित्र गूढगुंजन आहे. विवाहवेदीभोवतीं चालणारे सोहाळे व थाटमाट सदिच्छांच्या पावनपताका असतात. वडीलधाऱ्यापासून सगळें आपुलकीच्या गणगोतांचे डोळे वधूवरांना आशीर्वाद, शुभेच्छा समार्पिण्यासाठीं अहमहमिकेनें लागलेले असल्याकारणानें विवाहवेदीला व तिच्यावरील वधूवरांना लक्ष्मीनारायणासारखे प्रतिष्ठापूजनाचें स्थान प्राप्त झालेले असते. जीवनांत पुढें येणाऱ्या प्रत्येक बऱ्यावाईट प्रसंगात एकजीनसी भावनांत रंगून जाण्याच्या शपथा दोन जीव विवाहवेदीवर घेत असल्याकरणानें त्या करारांतदेखील कर्तव्यामृत ओतण्याची धार्मिकता व मार्मिकताहि विवाहवेदीवर आहे. समाजात त्याचें सत्यव्रत विवाहवेदीवर घेतलें जात असल्याकारणानें विवाहवेदी ही समाजधारणेचा कणा आहे.

म्हणून वैवाहिक जीवनाची सुखी सुरवात म्हणजे एक संजीवनी असते. जीवनाचें सुख आणि सुखाचें जीवन, शेजाऱ्याचा धर्म व धर्माचा शेजार अतिथी अभ्यागतांचे आदर कौतुक आणि आदर कौतुकांतील आतिथ्य, यांचा उगम नूतन वधूवरांच्या संमीलनानें मांडलेल्या नवीन चुलींत असतो. गृह्याग्नि म्हणतात तो हाच. लाडावलेल्या बालपणांत आणि मस्त प्रकृतीने केलेले अनेकानेक प्रमोद भूतकाळाच्या गर्तेत गाडून अनुभवाच्या सोनखतानें प्रेमळपणाचे, धीराचे, आशाआकांक्षांचे, शक्तिसंपन्नतेचे मळेच्या मळे पिकवावयाचे, या निश्चयाचें स्वस्तिक चिन्ह म्हणजेच नव्या चुलीपुढे घातलेले पोतेरें आणि उंबऱ्यावर नवीनच काढलेली रांगोळी !

जामानिमा जेथल्या तेथें लावून सुखाचा संसार दांपत्य करीत असेल, तर ते आनंदभुवनच असेल. तेथे कधी शिवी की गाळ ऐकावयास यावयाची नाही. 'एकरुप सुखदु:खपणी गडी' असाच मामला तेथे आढळावयाचा. एकाच्या डोळ्याला अश्रू आले रे आले, तर दुसऱ्याचा हातरुमाल ते पुसावयाचाच; आणि एकाला हसें आलें तर दुसऱ्याचीही कळी खुलावयाची यालाच घर म्हणतात.

आम्ही घर करुन राहिलो, असे आपण जेव्हा म्हणतों, तेव्हा त्याचा अर्थ हा आहे. कोणी कोणापासून लप्पंछप्पी करावयाचें नाहीं कीं, कोण कोणाला 'खायला काळ आणि मिळकतीला भार' व्हावयाचें नाहीं. हात जोडून स्वस्थ बसले तरी सेवा साधील, अशाच ठिकाणी 'सर्व सुखाचें आगरु । नान्दे शान्ति सर्वघर ॥'

अरे ! मी चुकलों वाटतें. 'सर्वसुखाचें आगरु । बाप रखुमादेवीवर ॥' परमार्थाच्या दृष्टीनें असले, तरी प्रपंचाच्या दृष्टीनें परस्परपूरक असा विठ्ठल रखुमाईचा जोडा हाच घराचें घरपण उभारीत असतो ॥ संतुष्ट भार्यया भर्ता, भर्ता भार्या तथैवच ।' असाच दंडक मनुनेहिं पण सुखी घरासाठीं सांगितला आहे. यांत खुषमस्करीची वा लाचारीची अपेक्षा नाही. 'कार्येषु मंत्री, भोज्येषु माता' असणारी 'गृहिणी गृहमुच्यते ।' तसेच, ज्या

गृहस्थाच्या वागण्यासवरण्याच्या सरणीमळे' 'यत्रं नार्यस्तु पूज्यंते, रमन्ते तत्र देवतः ।।' एवढ्यानेहि भागत नाही. अन्यायाने जो आक्रीताचा पैसा जेथे कमावला जाते नाहीं. धनापासून विश्वासापर्यत कोणाच्याहि कसल्याहि ठेव्याचा जेथे अपहार होत नाही. आणि ज्या ठिकाणी होणाऱ्या खर्चाबद्दल कपाळाला हात लावण्यारी अथवा छाती बडवून घेण्याची पाळी येत नाही, याला घर म्हणतात, कुटुंब म्हणतात.

कुटुंबाचा किंवा घराचा फुलबाग म्हणजे मुलें ! 'गृहरत्नानि बालानि ।।' असें वचन आहे विवाहानें प्रेमळपणा कसाला लागतो. कदाचित कोणी कधीच न धिक्कारलेला असा, पण कधीं कधीं विवाह हा अनेक आकर्षणांनी व मोहनास्त्रांनी जुगारहि ठरतो. पण उत्पादन संरक्षण, विध्वंसन वा तीनहि सामर्थ्यांचा 'दत्तात्रय' असलेला मनुष्यस्वभाव पुण्याईचा पुरुषोत्तम अगर संकटांचा सुंदोपसुंद आपल्या दैनंदिन जीवनात होतो. 'अकलेच्या पायाडावर' जीवनाचे यशोमंदिर मरणाच्या घाटातूनच गांठतां येते, हें खरें; पण त्या घाटांतून माणसें तोडण्याचा खुळेपणा करीत गेलें, तर घरी काय किंवा दारीं काय, तंट्याबखेड्यांच्या अक्काबाईपेक्षा आपल्या वांट्याला अधिक काय येणार ? पण घाट उतरतां चढतांना माणसें जोडावयाची आणि कर्तव्याच्या शिस्तीनें विवेकाच्या जपणुकीनें जावयाचें ठरविलें, तर 'भाग्यासी काय उणे रे ?' कारण, कर्तव्य म्हणजे समाजानें आपल्याला दिलेल्या आचारस्वातंत्र्याबद्दल आणि मालमत्ता मिळवणीबद्दल समाजाला सन्मानानें द्यावयाचा नजराणा असतो. हा नजराणा आपापल्या परी विवेकशुद्ध कृतज्ञतेचा असावा लागतो. समाजाचें नैतिक स्थैर्य राखावयासाठी प्रत्येक माणूस म्हणविणाराने घ्यावयाचा कडूलिंब म्हणजे कर्तव्य असूं शकते; तरी पण या कर्तव्याची पूर्ति पतिपत्नींच्या परस्पर प्रेमादरांत जेवढी प्रगट होते, त्यापेक्षाहि तिचा आविष्कार घरचें जवाहिर जड होऊं न देण्यात होत असतो. आईबाप होण्यांत तारूण्यसुलभ भावनांची गंगा अवतरविल्याचा भगीरथानंद सगळ्यांना होत असतो. पण ते पुत्रकन्यारूपांनी फुटणारे कुटुंबाचे कोंब समाजाची सातत्यसरस्वती राष्ट्राला आणि एकंदर मानव समाजाला टवटवीतपणें आणि पाणीदारपणें समर्पण करणें, हें एका तऱ्हेंच्या अनिर्वाच्य आनंदाचें, आपण परवानगी देत असाल तर मला म्हणावयाचें आहे. कीं, ब्रह्मानंदाचें आहे.

पितृत्वाची जबाबदारी माझ्या मताने आणि अनुभवानेहि मुत्सद्यापेक्षांही चतुराईची व खोल स्वागतार्ह विचारप्रणालीची आहे. ही जबाबदारी सांभाळण्यात जरा कां कुचराई झाली तर केवढा हलकल्लोळ आपल्या हातून झाला. याबद्दल जन्मभर अश्रु ढाळत बसण्याचा प्रसंग यावयाचा. जीवनाच्या क्षेत्रात निर्माण होणारे अनेकानेक प्रश्न आणि त्यांच्या गुंतागुंती याबाबत चटकन निर्णय घेण्याची ताकद बाप होणारांच्या मेंदूला तल्लखपणें असल्याशिवाय आजकालच्या विज्ञानानें जवळ आणलेल्या व गजबजलेल्या जगांत निभाव नाही. बापाचें मन कट्यारीसारखें कठोर असून चालत नाही. कीं फुलाइतके नाजुक राहून भागत नाही. शहाण्या व सत्यनिष्ठ शिक्षकासारखी त्याला कामगिरी करावी

लागते. छोट्या छोट्या फसगतीनीं जसा त्याचा धीमेपणा सुटून चालत नाहीं, तसाच त्याला बरे काय व वाईट काय. यातील फरकाचे स्पष्टीकरण सुद्धा मुलांच्या बुद्धीला पटेल असे खुलासेवार सांगण्याची कला अवगत हवी. आपल्या अनुभवाचा मगज मुलांच्या वयापरीनें त्यांच्याजवळ असतो. याची जाणीव राखून 'मुलांच्या चालीने चालण्यांत आणि मुलांच्या बोलीनें बोलण्यात बाप म्हणविण्याचा व्यक्तीला बाकवगार वागावे लागते. अगर अथांग प्रेमाचें पाणी त्यानें शहाणपणाचें कालवे काढून मुलांच्या मनांचे मळे, मेंदूच्या मळ्या आणि मनगटांचे फड पिकविण्यांत कसबी कोशल्यानें वापरावें लागतें. कुंडल्यांच्या कोष्टकांनीं आणि दैवाच्या दयेने कुलवन्त अगर समाजसेवक निर्माण होत नाहीत; किंवा 'आत्मैव पुत्रनामासि' म्हणून बापसेवाई बेटे निर्माण होत नाहीत. छाटून काढून वळण लावून, मंडपीवर चढवलेल्याच वेलींना द्राक्षें आणि त्याचे घोस दिसतात; एरवीं असे तसे वाढलेले वेल द्राक्षे देतात; पण त्यांची चव लागेल ती लागेल, म्हणून गप्प बसावें लागतें. नुसत्या ऊन आणि पावसांनी जर मनासारखा वनस्पतींचा विकास होत नाही, तरी नुसते उन्हाळे पावसाळे पाहून वा घालवून वाढलेली माणसें जिवंत समाजाचे आधारस्तंभ होतीलच, असा काय नेम सांगावा ? याचा अर्थ असाहि नव्हे की, दर घटकेला बापाने मुलास भरविलें पाहिंजे अगर हाताला धरून चालविलेंच पाहिजे. मुलांनाहि स्वतःचें व्यक्तिमत्व बिकसवितां यावें म्हणून, आणि आपली सामर्थ्यें – शारीरिक मानसिक, बौद्धिक इत्यादि – कितपत आहेत, यांचा आत्मविश्वासानें अंदाज यावा म्हणून मुलांना भरपूर मोकळेपणा मिळावयास हवाच. मात्र, ठेंच लागली तर बोट बांधायला, पेच पडला तर त्यातून बाहेर पडावयाला, आपल्याला आपले वडील खास आहेत, हा विश्वास जसा मुलांच्या मनांत सदैव जागा हवा, तशीच आनंदाच्या वेळीं, यशाच्या वेळीं ती आपल्याजवळ पांखरासारखी किलबिल करीत शाबासकीसाठीं, अभिनंदनासाठी येतीलच, असा आपला दिलदारपणाहि मुलांना मनोमन पटलेला असला पाहिजे. संयमी व्यक्तिस्वातंत्र्याचे निकोप धडे यायोगेंच मुलांना मिळत जातात. मी बाप झालों आहे. पण याहि गोष्टीचा दाखला द्यावयाचा कोणास अधिकार असला तर तो माझ्या मुलाबाळांचा आहे; माझा नाहीं. त्यापेक्षां तो आपणां आप्तेष्टांचा आणि स्नेह्यासोबत्यांचा आहे; तथापि आता कोणी कसाहि दाखला दिला, वा न दिला, तरी घडलेल्या गोष्टी सुधारावयाच्या म्हटल्याने सुधारणार नाहींत, 'हें जाणून गतं न शोच्यं' असे आपण सर्वांनी म्हणावें आणि माझे धोरण व वागणूक यांतील जें सुचरित असेल, तेवढ्याचा स्वीकार करावा.

हो अशी विनवणी मी माझ्या अर्धांगीबाबत मुळींच करणार नाहीं कारण ती सर्वार्थांनी सतीच आहे. पत्नी म्हणून जेवढी ती मला प्रिय आहे. त्यापेक्षाहिं माझ्या मुलांची आई आहे. म्हणून ती मला आदरणीय आहे. आईने घेतलेला एकच 'पापा' मुलांचा केवढा ब्रह्मानंद असतो, हें आपले व्यक्तिमत्व आईच्या मुक्यातून उद्‌भवलें हें सांगणाऱ्या बेंजामिन

बेस्टपासून मला शिकावें लागले नाहीं, तर तो सोहाळा माझ्या घरांत मी दररोज पाहिला. पोर पडलें तर त्याला चटकन् उचलून धेणारी, त्याला कोठे लागलें, सवरलें तर त्यावर फुंकर मारुन वेदना विसरावयास लावणारी, गंमतीदार गोष्ट सांगून मुलांच्या मनाची बांधणी करणारी आईशिवाय कोणती शक्तिदेवता आहे? चिमण्या चांचपडत्या पायांना 'चाल, चाल मोते' करून मुलांचा पाय जमिनीला टेकवणारी आणि मजल-दरमजल कूच करण्याचें सामर्थ्य देणारी मार्गदर्शिका आईवाचून आहे कां ? बोबडकांद्या जिभेला स्पष्ट शब्दोच्चारांचें आरोह-अवरोह पटविणारी आणि बचकणीएवढ्या डोळ्यांना विचारप्रवृत्त करणारी संस्कारसंजीवनी 'आई' या दोनच अक्षरांनीं प्रगट झालेली नाही काय ? आपल्या मांडीवर लोळणारें आणि पुढें ओच्याला धरून चालणारें मूल हळुंहळूं सुटें आणि नेटानें चालूं लागलेलें पाहण्यांत दिवसेंदिवस आईच्या अंतःकरणाला नवनव्या गुदगुल्या होत असतात; कारण मुलांच्या वाढत्या स्वावलंबनांत आपण अंगावर पाजलेल्या दुधाचें सामर्थ्य वाढीला लागलेलें आईला दिसत असतें. आई आणि बाळें यांचा प्रेमरज्जू इतका चिवट असतो कीं, 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी ।।' असें कविराज यशवन्तांनीं अनुभवसिद्ध म्हणून सांगितले आहे. आईच्या ठिकाणीं मुलांना ईश्वराचा साक्षात्कार एवढा होतो की, वयापरत्वें आपण मोठे झालों व कर्तव्यपरत्वें आपणांस आईपासून दूर रहावें लागलें तरी आईच्या एका आशीर्वादाच्या शब्दावर मुलें कळिकाळाशीं सामना करण्याला तयार असतात. जग कांही म्हणो, आईचा एक शाबासकीचा शब्द आणि तिनें पुसलेला एक अश्रु, मुलांना गरुडाची झेंप न्यावयास आणि हनुमन्ताची सेवावृत्ति पत्करावयास तात्काळ लावल्याशिवााय सोडत नाहींत. माझ्या जीवनसंगिनीनें मला हा अनुभविक चमत्कार अनेक वेळां दाखविला आहे, म्हणून तिला धन्य म्हटल्याशिवाय व अभिवादन केल्याशिवाय माझ्यानें राहावत नाहीं.

आपणा सर्वांच्या सहकारानें, वडिलांच्या आशीर्वादानें आणि समाजाच्या सहानुभूतीनें मला तीस वर्षें संभाळून घेतलें, म्हणूनच माझा संसार निभला, याची मला कृतज्ञतापूर्वक जाणीव आहे. म्हणून माझ्या ज्ञाताज्ञात हितचिंतकांना, आज या संसाराची रजा घेतांना, कृतज्ञतापूर्वक अभिवादन करून एवढेंच आश्वासन देतों कीं, यापुढें माझ्या आयुष्यांतील कोणताहि क्षण मी चरितार्थाच्या साधनसंवादनांत खर्चं न करता. उत्कटत्वानें लोकांचा कांहीतरी उपयोगच करीन. परमेश्वर व आपल्या सदिच्छा मला ते सामर्थ्य देवोत.

***

'ही एकादश सेवावी व्रते सुदृढ निश्चये।'

A forlorn travel on the sands of life
Comes to an end and its strife,
Duty then me prompts to thank
Every love's and censure's bank,
They have built me and my bliss
Them with gratitude, let me kiss,
Good-bye, goodbye, friends and foes,
Merrily merrily time all goes,

हा ! हा ! जीवनवालुकेमधिल हो एकाकि यात्रा अता।
आली संपत, संपवीत सगळे संघर्ष मात्रा स्वता ॥
साधावी नति की कृतज्ञ हृदये कर्तव्यबुद्धी वदे।
ज्यांनी प्रेम अमाप धिक्कृति दिली त्यांची धुवोनी पदे ॥
मी किंवा सुखाशाश्वती मम घडे धिक्कार मैत्रीतुनी।
त्याचे पूजन साधु दे उमजुनी माते मनापासुनी ॥
मित्रानो, हितशत्रुनो, तर बरे ! येतो नमस्कार हा।
चाले जम्मत–गम्मतीस करुनी कालौघ की हा महा ॥

अशा शब्दानी निरोप घेऊन मी संन्यासाश्रम स्वीकारीत नाही. कारण तो मला झेपणारा नाही. माझ्या मनांतील रागलोभादि विकार गेले नाहींत, जाण्याचा संभव नाहीं, मग ज्या छाट्या श्रीमच्छंकराचार्यानी पांघराव्या, त्या पांघरुन मी त्या आश्रमाला व त्या छाट्यांचा अपमान कशाला करु ? मी वानप्रस्थातही जात नाही; कारण मी संसारसंतृप्त नाहीं, मी स्वतःचा संसार अपरिहार्य तेवढीच कर्तव्ये करुनच केला हे खरे; पण समाजाचा संसार उत्कटत्वाने केला, विशेषतः 'आर्तत्राणय' झटलो; सर्व अनर्थांचे मूळ जे पारतंत्र्य ते जावे, कायमचे मावळावे म्हणून धडपडलो; ते पारतंत्र्य राजकीय शासनापुरते गेले पण शासन स्वदेशी होऊन 'आर्तत्राण' हे सामाजिक जीवनाचे दैनंदिन ब्रीद व्हावे अशी जी अपेक्षा ती दीड तपाच्या स्वातंत्र्यानंतर अणुमात्रही सफल झाली नाहीं. गोरा जाऊन काळा साहेब आल्यानें हिंदुस्थानचे स्वराज्य होणार नाहीं, तर शासन आपले आहे, आपल्याविषयीं आस्था बाळगणारे आहे व भारतीय जीवनाच्या प्रतिष्ठेपायी सर्वस्व पणाला लावून झटणारे आहे, अशी खात्री प्रत्येक लहानमोठ्या भारतीयाची पटल्यानेच स्वराज्य सार्थ होईल, असें १९०५ पासून भारताचें विशाल दृष्टीचे एक सुपुत्र सांगत होते, त्याचा अजून मागमूसही नाही !!!

राजकीय दृष्ट्या अशा निराशेच्या वणव्यांत असलेला मी ''हेचि फळ काय मम तपाला ?'' असे म्हणण्याइतका मोठा नाही. लो. टिळकांच्या स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षण या दोन तत्त्वाना स्वराज्याच्या वीस वर्षांत, खरे म्हटले तर असे स्वरुप यावयास हवे होते की

भारतीयाना स्वतंत्रपणें व्यापार उदीमात पडण्याची प्रेरणा होत रहावयास हवी होती. पण बोलला बोल चाटणार नाही, लिहिला शब्द खुडणार नाही, टाकले पाऊल मागे घेणार नाहीं अशा जिद्दीनें जे जे स्वदेशात पिकते, रुजवून पाहिले तर टिकते, पूर्वपरंपरेने वा नव्या जोमानें राष्ट्राचें सामर्थ्य वाढविते व बळकट करते, ते ते स्वदेशी जीवाभावाने जपून, जे कोणी आमचे नव्हेत, जे आमच्याशी तेढीनें वागतात वा जे जे संधिसाधू वा साधनें वेळप्रसंगी आपल्यावर उलटण्याचा संभव आहे. अगर स्वार्थबुद्धीने वा भोळेपणाने आमच्या हिताविरुद्ध जाण्याचा संभव आहे, त्यांच्यावाचूनच आपला योगक्षेम, दिमाख व जीवनतेज प्रगति पथावर ठेवण्याचे बाळकडूच तरुण पिढीला पाजले जावयास हवे होते ! तेल्यातांबोळ्यांचे पुढारी व भारतीय असंतोषाचे साम्राज्यशाही विरोधी लढवय्ये वीर व विद्वर्य टिळक यांच्या चतुःसूत्रीची आचारप्रणाली आमच्या सरितेचा प्रवाह बनलेलीच नाही ! पोपटानें म्हटलेल्या रामनामानें जशी पुण्याई होत नाही, तशीच स्वदेशीची नुसती महती गाण्यानें राष्ट्राची उन्नति साधू शकत नाहीं, परदेशची भरमसाट कर्जे उभारुन आणि तोट्याची अर्थसंकल्पे करून स्वराज्यसरकारने अपेक्षा केली की निढळाच्या घामानें आणि अक्कलहुशारीने उत्पादन वाढेल; कारण लोकांचे देणे असेल तर स्वतःचे पोट भरून, जाळून किंवा मारूनही, मनुष्य लाचारी टाळण्यासाठीं परिश्रमाची पराकाष्ठा करतो व प्रथम लोकांचे देणे देऊन टाकतो. स्वाभिमानाने प्रस्फुरित झालेल्या स्वतंत्र राष्ट्राच्या नागरिकाकडून ही अपेक्षा ठेवून, अक्कल आणि प्रयत्न पुरुषार्थ यांची कुचंबणा केवळ पैशाच्या अभावानें होऊं नये, म्हणून लाचारीच्या कसल्याही शर्ती न पत्करता, भारतानें पैसा उभारला आणि मुक्त हस्तानें तो शेवटच्या थरापर्यंत वाटला. पण पर्वतीच्या रमण्यांत वेदशास्त्रसंपन्नानी नव्हे तर वेदशास्त्रपढितानी पेशव्याकडून उपटलेल्या दक्षिणेपेक्षां कांहींएक अधिक सत्त्वशुद्ध उपयोग झाला नाहीं. सैन्यसंघटनेपासून राजकाजसूक्ष्मतेपर्यंत वेदांत मार्गदर्शन असता तो अर्थ राज्यसूत्रधाराना समजावून जर वेदपठण–पंडितानी सांगितला असता व तो समजावून घेऊन वैदिक राजनीति आचरण्याची राज्यसूत्रधारानी काळजी घेतली असती, तर कोणत्याही पांढऱ्या पायांच्या तागडीतुळाप्पांची तलवार–तख्ते भारतांत चमकलीच नसती ! मग विजयी व्हावयाची गोष्ट बोलावयासच कशाला हवी ? पण पर्वतीच्या रमण्यावरील दक्षिणेस नाके मुरडणारानी लोकशाही, स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण यांची व्रते विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत ज्या पिळाने व जिद्दीने देशभक्तानी पाळली होती, तो पीळ व जिद्द स्वराज्यसंचालित राष्ट्र उभारणीमध्ये राहिला असता, तर रुपयाच्या अवमूल्यनापासून पत्कराव्या लागलेल्या नामुष्क्या कोणाच्या स्वप्नांतही आल्या नसत्या ! पण संकटाशिवाय शहाणे व्हावयाचेच नाहीं, हें चंद्रगुप्तहर्षोत्तर भारतीयांत सरावलेले गेल्या पाक–भारत चकमकीत जसें प्रत्ययाला आलें, तसे न येतां, स्खलन होऊच द्यावयाचे नाहीं, ''अचूक चुकेना कोठे त्याची राज्ये समस्तही।'' हे समर्थ वचन जागृतिपूर्वक डोळ्यापुढें ठेवावयाचे आणि प्रयत्न

पुरुषार्थ शीलसंपन्नतेनें जगास दिपण्यासारखा प्रखर हा भारतीयांचा स्व-भाव बनवावयाचा हा दृढ निश्चय भारतीय देशभक्तीचा पाठकणा बनवून सोडावयाचा, ही तपस्या व्यवहार-शुद्ध नको का व्हायला ? याची 'अंतरीची जाणीव' देशांतील श्रेष्ठींना पुन्हां होऊ लागली आहे. एरवी, स्वदेशीचा मंत्र महामंत्री इंदिराजी गांधीपासून सर्व कसे जपावयास लागले असते ? माझे हे नादब्रह्म, नादिष्ट नव्हे ! चिंतन कोणाला कसें काय वाटेल या चिंतेपेक्षां उतरत्या वयांत, सगळ्यानी वेगळा काढलेल्या वा समजलेल्या अशा माझ्या हातून प्रभावीपणें कांहीं होणार नाहीं, या जाणीवेनें माझ्यावर मीच चिडलो आहे. तरीही मी माझ्या दुबळेपणांतसुद्धां माझे कर्तव्य करणार आहे. कारण "स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।" अशी गीतेची सांगी आहे.

प्रशिक्षित कर्मचारीच कारखान्याची, संस्थेची आणि राष्ट्रांची निर्माण-संरक्षण-शक्ति जोपासत असतो. गृहखात्यापासून परराष्ट्र-संबंध खात्यापर्यंत ही दक्षता घेतल्याशिवाय राष्ट्रजीवन कसे निभावयाचे ? व्यक्तिस्वातंत्र्य सांभाळूनही सामूहिक एकदिल कृतीची जोपासना लोकशाहीला व लोकशासनाला आवश्यक असते. पण व्यक्तिस्वातंत्र्य याचा अर्थ स्वयंनिर्णय स्वयंसंयमानें पण समाजसेवाभावानें स्वास्थ्यनिर्मितीसाठीं करावयाचा असतो. मर्यादा पुरुषोत्तमाची ही शिस्त पार झुगारुन देऊन व्यक्ति स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार होऊ लागला तर कोणाचाच पायपोस कोणाच्या पायांत उरणार नाहीं. "बापासि बाप न म्हणे ऐशाशी काय होय आजोबा ? । देव कशा ? देश कशा ? देहाची दुर्दशाच वाजो बा ! ॥" हाच अनुभव येणार नाही का ? म्हणून व्यक्तिस्वातंत्र्यासह सामूहिक एकजिनसीपणा साधण्याचा अर्थात् "लोकसंग्रहमेवापि सपश्यन् कर्तुमर्हसि ।" अशी पात्रतासिद्धि प्राप्त करुन घेण्याचा वाव निर्माण करणारे शिक्षण घरीदारी पिकावयास नको काय ? शासनापासून शिष्टापर्यंत कोण करतो काळजी ? कळकळ, श्रद्धा, प्रयत्नशीलता, संकटाशी सामना करून त्यावर मात करण्याची जिद्द व हातोटी, हाती असलेल्या वा घेतलेल्या अगर अंगावर पडलेल्या अथवा परिस्थितिशरणतेने कराव्या लागणाऱ्या कर्तव्याच्या पूर्ततेचा हव्यास व ध्यास, जबाबदारीची जाणीवपूर्वक पेलणूक, मानापमानाबद्दल उदासीनता पण राष्ट्रीय प्रतिष्ठेबद्दलचा मानबिंदु आणि या सर्वांबरोबर "ध्येय वा साधयेत् देहं वा पातयेत् ।" हा निश्चय यांचे शिक्षण आपल्या वर्तनाने, शब्दाने आणि चारित्र्याने देणारे आदर्श तरुण पिढीपुढे सतत मांडित राहिल्याशिवाय, दिवाळे वाजलेले घरात व राष्ट्रात दिवाळीचा म्हणजे दीपावलीचा आनंद आपले किरणझोत कसे टाकणार ? 'आधी प्रपंच करावा नेटका !" त्याची तयारी वरील गुणानीं संपन्न अशी वैयक्तिक व सामूहिक मनोवृत्ति बनविणाऱ्या शिक्षणानेच होणारी आहे. पण जीवनगाथेचा हा अभंग लक्षांत कोण घेतो ? तो अभंग लक्षांत आला तर वैश्यवृत्ति ही लुबाडणूक वा छळणूक तर करणार नाहीच; उलट विद्वत्ता व पराक्रम यांच्या प्रमाणेंच "समाजदेवो भव" म्हणून भारताच्या ताजमहालांतून जगाला पुकारत राहील.

प्रत्यक्ष व्यापारात पडणाऱ्या भारतीय तरुणाला देशात कोठेही भाषेची अडचण पडता कामा नये, ही काळजी आम्ही स्वराज्यांत कितीशी घेतली ? भारत देश बहुभाषी आहे. विविधतेने नटलेल्या या देशांत एकजिनसीपणा असल्याचा आमचा अभिमान वैदिक काळापासूनचा आहे. पण वडिलार्जित दुकानांत गिऱ्हाईक सांभाळावयास शिकलेल्या शेठजीइतकीही मनुष्यस्वभावाची पारखच काय, पण विचारविनिमयाची व 'राजी राखणे सकळ लोक ।' ची कला कॉमर्स कॉलेजचा कोर्स पुरा करुन व्यापारांत पडलेल्या व्यापाऱ्याजवळ का असू नये ? ''केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेत संचार । शास्त्रग्रंथ विलोकन मनुजा चातुर्य येतसे फार ॥'' या कविवचनातील कोणती साधना त्याला कशी पडते, याचा विचार आमच्या वाचिवीर नेतृत्वाला कधी सुचला आहे काय ? व्यापारी शिक्षणांत परप्रांतीय भाषा, राष्ट्रभाषा व युरोपची लिंग्वा फ्रेका (Lingua Frauca) सर्वसमज असलेली फ्रेंच भाषा यांचा समावेश असल्याशिवाय भारतीय व्यापारव्यवहाराची पोटतिडीक राष्ट्राला लागली आहे, असे समजता तरी येईल का ? भारतीय बुद्धिमंतानी व्यापारी शिक्षण घेऊन इंजिनेराशी सहकार साधावा आणि आफ्रिका – अमेरिकेतीलही टेंडरे मिळवावीत, अशी महत्त्वाकांक्षा कितीशी उत्तेजित केली जाते ? अरे, आपण जगभर रानटी–गावठी जनावरांच्या सर्कशी फिरवून जुन्या डोंबाऱ्यांच्या नव्या आवृत्तीने पारतंत्र्यांत जग झुलविले, आणि आतां स्वातंत्र्यांत अकलेचे टेंभे पाजळून जगाला दिपविण्याची संधि असतांना, भारतीय तरुणांची पावले त्या दिशेने पडावीत म्हणून कितीशी कोशीस होते ? काळाची पावले ओळखणारे नेते, प्राचार्य, पंडित, शिक्षण, पालक आणि उपदेशक ज्या राष्ट्रांत असतात, तेथेच कालपरिपक्व समाजरचनेची तरतूद मुकाट्याने होत असते. 'उद्या, कधी संपत नाही. त्या उद्याचे स्वप्न सदैव पहात राहण्याचे आणि त्यास अनुसरुन 'आज' उभा करण्याचे जीवन जगणारे तरुण दुष्काळासारखे अभावाने दुर्मिळ राहिले नाहीत. म्हणजेच राष्ट्राचा जीवंतपणा राष्ट्राला मानवतो आणि जगालाही ! विवेकाने सुखाबरोबर कर्तव्याचा उठाव जाणीवपूर्वक होत राहण्यात जीवंतपणाचा नेटकेपणा प्रतीत घेत असतो. ज्ञान, चारित्र्य व एकी हे त्या नेटकेपणाचे त्रिगुण होत. या त्रिगुणांचा उपयोग दूरदृष्टीने व्हावयास हवा. ती दूरदृष्टी वास्तव हवी तशीच पाण्याच्या नाचऱ्या कारंज्याप्रमाणे अखंडही हवी ; तरच तिच्यातील संग्राहक आणि संकलक वृत्ति टणकपणे भरीव बनलेली असेल. तशा उद्यमशील व विचारशील दृष्टीच्या माणसांलाच 'जन' म्हणतात ; कारण त्यांच्यात निर्माणक्षमता असते. पण ज्याच्या हातून काहीं झालें तर चांगलेच होईल, वाईट म्हणून होणारच नाही, त्याला सज्जन म्हणतात. ''सदा संगति सज्जनाची धरावी ।'' असे जगातील सर्वच संतानी सांगितले आहे, हें लक्षात ठेवण्यासारखे आहे.

वैदिक काळापासून भारत, इंदुस्थान वा हिंदुस्थान हे सज्जनांचेच राष्ट्र आहे. चिनी भाषेंत म्हण आहे की राष्ट्रात एका वर्षाची तयारी करावयाची असेल, तर अन्न धान्य पेरा ;

दहा वर्षाची तयारी करावयाची असेल तर झाडे वाढवा; आणि शंभर वर्षाची तयारी करावयाची असेल माणसे निर्माण करा. अर्जुनाला प्रज्ञावाद सांगून युद्ध करण्याच्या गोष्टीकरु लागलेला पाहताच, ''क्लैब्यं मा स्म रामः पार्थ नैतलयुपपद्यते !'' असें सांगणाऱ्या पूर्णपुरुष श्रीकृष्णाच्या भारतात सज्जन पुरुषोत्तमांची वाण पडता कामा नये ही दक्षता म्हणजे भारतीय इतिहासाची व संस्कृतीची परंपरा सांभाळण्याचा कुलधर्म पाळणे होय. त्यासाठी ज्ञानेश्वरांनी म्हटले प्रमाणे राष्ट्रात 'सर्वार्थ–मतिप्रकांशु गणेशु' अर्थात् अष्टावधानी पुढारी लागतात. ते एकनाथानी म्हटल्याप्रमाणे 'सकलांचे सोयरे साचोकारे' असणे जरूर असतें.

राष्ट्रातील व्यक्तिव्यक्तित समानता, स्नेह, सौजन्य आणि सहकार्य सहजीवन निर्माण होणे ही स्वतंत्र राष्ट्राची किमान 'धारणा' असते. ती धारणा वरील व्यवस्थापनेशिवाय कशी होणार ? प्रत्येक नागरीक राष्ट्रीयाला आपल्या कुवतीच्या मर्यादेपर्यंत स्वकल्याण आणि त्याचेच परिणत स्वरूप स्वार्थो यस्य परार्थ एव' होऊन तो 'पुमान्' समाधानी व्हावयाची संधि मिळत राहिली पाहिजे. ''संत येती घरा । तोचि दिवाळी–दसरा ।।'' हा जमाना बदलवयाचा असून ''सज्जन, सत्कृति घराघरा । दिवाळी अन् दसरा ।।'' असा जमाना लोकशाही स्वातंत्र्याच्या सांगतेसाठी व सार्थकतेसाठी उभारावयाचा आहे. अर्थदारिद्र्यापासून तो कर्तृत्वदारिद्य पर्यन्त सर्व दारिद्र्ये दूर करुन 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे पश्यन्तु, मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ।।'' असे रामराज्य भारतात उभारावयाचे आहे ना ? मग माझ्या विचारसरणीत दोष काय आहे, तो सांगा तरी !!

राष्ट्रीयधोरणे आणि समाजसेवा यात रस घेणारे नागरीक किमानपक्षी एक्कावन्न टक्के असल्याशिवाय लोकशाही स्वातंत्र्य तेजस्वीपणे कसे स्थिरावेल ? सगळ्यांच्या भल्याकरता सहाय्य, सहकार आणि सहानुभूति यांची सवय लावून घेणे हे लोकशाही स्वातंत्र्याच्या बळकटीसाठी माणूसकीची पहिली पाऊल–टाक असते. भारतीय स्वातंत्र्यात या दिशेने केवढी प्रगति झाली आहे ?

वरील विचारसरणी जी मी प्रगट केली आहे तिची पार्श्वभूमि अर्थातच भारतीय संस्कृतीच्या महान् तत्त्वांची आहे. (अ) जगातल्या प्राणिमात्रांचा व वस्तुमात्रांचा आत्मा एकच आहे व तो जगन्नियंत्याच्या सामर्थ्य संपन्नतेचा अंश आहे. हे ओळखून ''सर्व भूतांचे ठायी । आप–पर नेणेचि काही । चैतन्य जैसे ।।'' तशाच दिलदार समानतेने हरएकास वागवावे आणि सर्वांना सुख, निदान जास्तीत जास्त प्राणिमात्रांना जास्तीत जास्त हिताचे होईल अगर कमीत कमी तोशीस अथवा कष्ट लावणारे होईल, असे आपण मनुष्य–मात्राने वागावे. अशा तऱ्हेने 'भला रे भला बोलती ते करावे । (आ) कोणाचेही अनहित वा वाईट चिंतू सुद्धा नये, मग करू तर नयेच नये !'' (इ) ''मनसि, वचसि, काये पुण्यपीयूषपूर्ण'' सत्य बाणलेले असावे (ई) इंद्रियाची रति, उपभोग लालसा किंवा चैन ही कायमच असते.

त्या लालुचीलाच इंद्राणी म्हणतात ती सर्वत्र एकच असते. पण प्रत्येक इंद्रियांचा रसास्वादक्षम दम वेगवेगळा असतो. यामुळेच इंद्राणी उर्फ भोगलालसा एकच असली तरी इंद्र उर्फ वेगवेगळ्या अवयवातील रतिस्वादाला जिव्हाळा वेगवेगळा असल्याने इंद्र अनेक असल्याचे समजतात. म्हणून रसस्वादलालसा काबूत ठेवून सर्वच इंद्रियातील रतिप्रेमी सामर्थ्य ईश्वरांश असल्याने जगरूपानें नटलेल्या ईश्वरांशात प्रथम समरस आणि अखेर विलीन करण्याची तपश्चर्या करावी. (उ) जगच्चैतन्याशी एकजिनसी होण्याचे सदैव चिंतन करावे आणि तशी संधीच आली तर त्या जगच्चैतन्यात अखंडपणें रममाण होऊन जावे, तसे साधले तर ''मनी धरावे ते होते। विघ्न अवघेचि नासोनि जाते।'' असा अनुभव येतो. कारण ''रिता ठाव या राघवावीण नाही'' अशा रघुनाथाने कृपा केलेली असते. (ऊ) ''आपण यथेष्ट जेवणे। उरले ते दुसऱ्यास वाटणें। परंतु वाया दवडणें। हा धर्म नव्हें।'' हा समर्थोपदेश व्यवहारशुद्ध राखून यथेष्ट जेवतांना अगर उपभोग घेतांना, तो विषय चोरलेला नसावा, फसवून लुबाडलेला नसावा किंवा त्या मूळ विषयास प्राप्त करून घेतांना दुसऱ्याच्या सुखावर पाणी पडलेले वा ते सुख ओरबडलेले नसावे. अशी दुसऱ्याची वंचना करून ''यो भुक्ते स्तेन एव सः॥'' (ऋ) ''सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजाप्रतिः। अनेन प्रसविष्यध्वम्॥'' कारण 'सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम्।' म्हणूनच आपल्याजवळ जे जे काही आहे ते ते 'रंजल्या गांजल्यांच्या', 'संतप्तांच्या' उणीवा भरुन काढण्यासाठी देऊन टाकावे. अशा जिव्हाळ्यामुळेच देणाराच्या आणि घेणाराच्या अंतःकरणातील परमेश्वरी चैतन्यशक्ति कार्यक्षमतेनें जागृत होत असते. ''तेन त्यक्तेन भुंजीथाः।'' याची मजा ही अशी आहे. (ऋ) ज्याच्या वाचून नडते त्याला व्यसन म्हणतात. मग ते संस्कृत अर्थानें संकट समजावे किंवा प्राकृत अर्थानें छंद-फंद समजावे; कसल्याही संकटावर मात करण्यातच पुरुषार्थ असतो. म्हणून कशावाचूनच आपले नडू द्यावयाचे नाही तर आपल्या गरजा अशा मर्यादेत ठेवल्या पाहिजेत की त्यांच्या मोजकेपणाचे म्हणजेच मायेचे पाश वेळप्रसंगी तडातड तोडता आले पाहिजेत. त्याचीच दुसरी बाजू म्हणजे गरज नसलेला वस्तुमात्राच्या संग्रहवृत्तिला संपूर्ण आळा घातला पाहिजे, असंग्रही वृत्तीचा हा व्यवहार होय. (ए) आपले वैयक्तिक अनहित करणाराला क्षमावृत्तीनें वा उपेक्षेनेंच वागवावे, हीच खरी अहिंसा होय. पण आपल्या अस्तित्वावर व प्राणावरच तो प्रहार करीत असेल आणि त्यातून होणाऱ्या वा ओढवणाऱ्या आपल्या मरणांतून समाजाची वा राष्ट्राची सेवा होणार नसेल, तर त्या आपल्या हितशत्रूचा समाचार ''ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।'' या प्रभु वचनाप्रमाणेंच घेतला पाहिजे. कारण जगणे किंवा मरणे हा मुद्दा नसून जीविताचा क्षण अन् क्षण व मरणक्षण देखील विश्वात्मक देवाच्या सेवेलाच लागला पाहिजे. ही दक्षता घ्यावी. (ऐ) शूराची अहिंसा पाळताना वा जनताजनार्दनाच्या सेवेसाठी अपरिहार्य हिंसा आचरताना मन वाणी आणि शरीर केवळ पावित्र्यमयच राहिले पाहिजे. खरी साधनशुचिता हिलाच म्हणतात. (ओ) दिसणारे आणि व्यवहारावयाचे सारे जग

आणि त्यांतील कर्तव्यक्षेत्रे आंतर्बाह्य चैतन्यशक्तीनें व्यापलैली असून 'स्थिर, चर व्यापुनि दशांगुले उरले' त्या त्या चैतन्यशक्तीलाच परमेष्टी अशी संज्ञा आहे. "तिच्या दंष्ट्राकरालानि भयानकानि" सुद्धा ईश्वराच्या अंगभूत असतात. म्हणून विश्वरूपदर्शनानें घाबरून न जातां, त्यांतील परमेष्टीचे स्वरुप ओळखावयास आणि आपल्या पवित्र साधनानी आदरयुक्त पूजण्यास स्मरणपूर्वक विनम्रभावानें झटले पाहिजे. "ही एकादश सेवावी व्रते सुदृढ निश्चयें।"

तथापि माझी ही विचारधारा माझ्याच घरांत जेथें अरण्यरुदन ठरते, तेथे इतरत्र काय बोलावयाचे ? जीवनांतील सुखदुःखांच्या वाटेकऱ्यानी मला आतां एकाकी करुन सोडला आहे. कारण मी माझ्या देशभक्तीचा बाजार मांडत नाहीं. आपल्या देशभक्तीची परंपरा लाखांच्या पोशिंद्याचे शब्दासाठी जीविते कुर्बान करणाऱ्या तानाजी-बाजीची आहे किंवा देशाच्या प्रतिष्ठेसाठी सेवायोगानें हालअपेष्टांच्या आणि दारिद्र्याच्या यज्ञकुंडांत दग्ध होत राहणाऱ्या टिळक आगरकरांची आहे, स्वातंत्र्य सैनिकांच्या धारातीर्थावर सत्ता लोलुपानी अन्नछत्रे व पाणपोया घातल्या तरी त्याकडे ढुंकून न पाहणाऱ्या निःस्पृह ब्राह्मणांची आणि बाणेदार क्षत्रियांची देशभक्ति ही आपली स्फूर्तिदात्री भवानी आहे. तेथें सुवर्णमालिनी व अधिकारमोहिनी उभ्या असल्या तरी त्यांच्या जाळ्यांत सापडून लाचारी पत्करणारी आपली देशभक्ति नव्हे !

पण याचा शान्तपणें विचार करुन, धिक्कार तरी करू नये येवढी सावधानता देखील भोवताली आढळत नाहीं, म्हणून "येता अशुभसा काल नवा। स्वकर आवरा, कूर्म गुरु करा॥" या कवि कृष्णाच्या उपदेशास अनुसरून, "ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान॥" असा निर्णय मी घेतला आहे.

***

## मला रडूं कोसळते पण !!

"दुसऱ्यांच्या दुःखे दुखावे। दुसऱ्यांच्या सुखे सुखावे" असा उमाळा असतो सन्त सज्जनांचा. जनसामान्याला तेवढी ताकद असणारच कशी ? तेव्हां स्वतःच्या जीवनात आनंदाचा प्रसंग लाभला तर तो हुराळतो व दुःखाचा प्रसंग आला तर तो उराळतो. माझेच पहाना.

१. वंदनीयांची उपेक्षा अथवा अवमान झाला तर मला रडें कोसळते. त्याचप्रमाणे 'गा-व' मधील 'ढ'चा काका म्हणून सन्मान झाला तरी मी रडतो.

२. घरलक्ष्मीची खेटरांनी नवरोबानी पूजा बांधली तर, आणि ढालगज भवानीची मिजास मांडली तर मला रडू कोसळते. पिंगला-महानन्दांची, पुराणे सांगणाऱ्या आणि सीता-सावित्री पुराणे करणाऱ्या दारुड्यांना आणि पुस्तकी बडबड्यांना पाहतांच मला रडूं येते ते संतापाने !

३. साधनाशील संन्याशी आणि प्रगल्भ पंडित जेव्हा शीलभ्रष्ट पैसेवाल्यांच्या घरांचे उंबरठे स्वतःचे पोट जाळण्यासाठी झिजवितात तेव्हां मला रडूं कोसळते. त्याचबरोबर, पुंजीवाले जेव्हा शीलवंत कार्यकर्त्यांना, संन्याशाना, पंडितांना श्रमप्रतिष्ठेची प्रवचने झोडतात तेव्हांही संतापाने मला रडूं कोसळते.

४. 'उच्चत्वी पदि थोरही बिघडतो, हा बोल आहे खरा।' या वचनाला चुकूनही बाध येऊ नये. म्हणूनच जणु, जेव्हां राष्ट्रधुरीण, उच्चभ्रू आणि पर्यंकपंडित निष्पाप गरिबावर बालंटे रचून खोटे खटले उभारतात किंवा न्यायमंदिरांत परमेश्वर शपथेनें खोट्या-नाट्या साक्षी देतात अगर राष्ट्रसेवेची शपथ घेऊन स्वतःची व स्वतःच्याच आप्तेष्टांची घरे भरतात अथवा उभारतात तेव्हा मला रडूं कोसळतेच कोसळते !

५. मला रडूं उन्मळून येते आणि आवरतच नाहीं, जेव्हा अंगावर किंवा अंगभर चापून चोपून माणसे देवभक्तीच्या किंवा देशभक्तीच्या निशाण्याच निशाण्या सजवतात, पण मनाला 'परधन-पर-कामिनीकडे धावू' देतात किंवा शत्रूला सामील होऊन सफाईने देशाचा केसाने गळा कापतात, नव्हे, तसा नुसता संकल्पही करतात !!!

६. प्रजेचे मन, मेंदू, मनगट शुद्ध सात्विक राखण्याची शासकीय अधिकारी, मठाधिपति, शिक्षक आणि विवेकवन्त अथवा अनुभविक जेव्हा आपली जबाबदारी टाळतात आणि अंगचुकारपणा करतात, तेव्हा माझ्या अंगाची आग आग होते. पण याच्याही पुढे जाऊन जेव्हा त्यापैकी म्होरके जेव्हां प्रजेलाहि जाणून बुजून मानसिक दुर्बलता, अक्कलेचे खोबरे आणि भावनांची माती करावयास लावतात, तेव्हा 'तुका म्हणे ऐशा नरा। मोजून माराव्या पैजारा।' ती संतवाणी साकारता येत नाही म्हणून मी रडतो.

७. दुसऱ्यावर संरक्षणाचे वा मायेचे छत्र धरण्याची गोष्टच सोडा, पण स्वतःचे स्वतः पावसापासूनही संरक्षण करणारे छत्र ज्याला निर्माण करता येत नाही. अगर दुसऱ्या जिव्हाळ्याच्या माणसाची सुखदुःखपणी आपुलकी ज्याला लाभणे शक्यही नाही, अशा केवळ उडाणटप्पू अगर मग्रूर अथवा रावणी-रुबाबी माणसाला 'छत्रपति' म्हणून कोणी विनोदाने, उपहासाने, तिरस्काराने जरी संबोधूं लागला, ते माझ्या कानात तापले तेल ओतल्यासारखे होते व मला रडूं कोसळते. कारण महाराष्ट्राची, भारताची व वैदिक संस्कृतीची शान राखणाऱ्या व जगांत अद्वितीय ठरलेल्या छत्रपति शिवाजीमहाराजांचा तो कळत न कळत अवमान होतो, असा माझ्या अंतःकरणांतील स्पंदनांचा उद्रेक आहे.

८. कोणाशी मतभेद झाले म्हणून अगर कोणी आपल्या म्हणण्याप्रमाणे होस ही ठोकत नाही आणि वागत तर नाहींच नाहीं, म्हणून त्याला माणसातून व जीवनातूनही उठविण्याचे प्रयत्न स्वतःतील माणूसकीचा प्रथम खून करून जेव्हां मनुष्य करू लागतो आणि फिरून समाजाच्या डोक्यावर नाचत राहतो, तेव्हा त्यांचे पारिपत्य करण्याचे सामर्थ्य असणारे, कौरव सभेतील 'अर्थस्य पुरुषो दासः' अशी सबब द्रौपदीला सांगणाऱ्या भीष्म-द्रोणाप्रमाणे, मूग गिळून बसलेले पाहिले कीं स्वतःच्याही दुबळेपणाची जाण येऊन

माझे अंतःकरण तडफडते व मला रडू कोसळते.

परमेश्वरा, आज ८ ऑगस्ट १९७९ रोजीही काय माझ्या भोवतालची परिस्थिति आणि तिची मजवर घडलेली प्रतिक्रिया !! स्वातंत्र्य-संग्रामातील ८ ऑगस्ट १९४२ कोठे व आज कोठे ? तरी पण डोळ्यांत टिच्चून येणारे रडू आवरुन, १५ ऑगस्ट १९७९ या नव स्वातंत्र्यदिनी नव्या दमाने कालावर मात करण्याकरतां 'वृद्धोऽपि तरुणायते' असा अनुभव घेतला पाहिजे व आसमंताला दिलाच पाहिजे.

(फलटण जनसेवा - दि. १५/८/१९७९)

✱✱✱

## पितृऋणाचा शेवटचा हप्ता

मरण कसलेही आले तरी मी (आत्मा) जाता, मग उरेल काय, त्याची वाट काय ? त्या उरलेल्या कायेच्या विल्हेवाटीची चिंता भोवतालच्या, निकटच्या, अगर सार्वजनिक संस्थांच्या जनानी स्वतःस त्या मृतदेहाचा उपसर्ग होऊ नये म्हणून करावयाची हे कितपत बरोबर ? असा एक प्रश्न आताशा अनायासीपेक्षा अनृणी अशाच मरणाची इच्छा करणाऱ्या विचारवन्तापुढे जोराने येत आहे. "नको रे मना, द्रव्य ते पुढिलांचे ॥" असे रामदासी ब्रीद घेऊन चालणाऱ्या निस्पृहालाही त्या प्रश्नाने प्रस्तुत जमान्यात घेरलेले कित्येक ठिकाणी आढळते कारण मनुष्याने जीवन काढताना. ज्या शरीराचा त्याने सर्वस्वी उपयोग केला, चांगल्या अव्यंग बळकट देहाच्या जोरावर मनुष्याने परमेश्वरही वश करुन घेतला तो देह त्याला त्याच्या मातापित्यापासून मिळालेला होता. आणि म्हणून त्या देहाच्या विल्हेवाटीची व्यवस्था लावून, त्यापायी समाज ऋणातून अनृणी झाला, असे साफ साफ कसे म्हणता येईल ?

म्हणून मग असा प्रश्न उपस्थित होतो की दारिद्र्यातच जन्म काढलेले देशभक्त, निरपेक्ष वृत्तीने समाजसेवा करणारे सामाजिक आणि आपल्यांच प्राप्तीवर स्वाभिमानाने गुजराण करणारे पण बँकेपासून घरातील फाटक्या पाकिटापर्यंत कोठेच काही शिल्लक न ठेवू शकणारे यांच्या मृतदेहाची वाट कोणी लावायची ? अन म्हणून त्याचे दफन होवू द्यावयाचे काय ? युरोप, अमेरिकेमध्ये अशा सार्वजनिक माणसांनाच काय पण आपल्याच ऐषआरामात व संसारात खुशालचेंडू म्हणून नांदणाऱ्यासही एक सोय कोठे कोठे चुकून तरी असल्याचे आढळते ती सोय म्हणजे - "जरामरणमोक्षाय" विम्याची. तशीच सोय भारतात होणें आता एक आवश्यकता आहे असे सामान्य माणसांच्या स्वाभिमानास जपण्याकरता स्पष्टपणे सुचवणें जरूर वाटते. ती होईपर्यंत किंवा ती झाली तरीही काही दानशूरांनी यासाठी म्हणजे ज्यांनी आपल्या देह विसर्जनाची तरतूद केलेली नाही अशांच्या देहविसर्जनासाठी सार्वजनिक निधी उभारून व्यवस्था करणें जरूर आहे. तिचा

फायदा मृताचे दरिद्री नारायण वारसही घेणार नाहीत. आणि मृताचा स्वाभिमान दुखावणार नाही. तरीही अपरिहार्य अवस्थेत कोणी गरजू आल्यास त्याला अशा संस्थेचा आधार मिळू शकेल. पण या सर्वांपेक्षाही आणखी एक तरतूद जगाच्या सुधारलेल्या बाजारात क्वचित आढळते. ती ही की पतसंस्थेत, कारखान्यात, दुकानात किंवा व्यवसायात मनुष्य आपले पोट हातीतोंडी भरत असेल त्या संस्थेतून, कारखान्यातून, दुकानातून किंवा व्यवसाय क्षेत्रातून कर्मचाऱ्याच्या घरच्या कोणाचाही मृत्यु झाला तरी त्याच्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी काही ठराविक रक्कम पाठवण्यात येते आणि मग ज्याज्या त्याच्या घरच्या रिवाजाप्रमाणे मृत देहाची वाट दहनानें, पशुपक्षांस समर्पणाने (पारशी वगैरे जमातीत करतात तसे) अगर जलप्रवाह समर्पणाने होते.

पण असे काही झाले तरी आपल्याला मिळालेले देहरूपाचे पितृऋण आपण फेडले हे समाधान माणसाला मिळणारे नाही. त्यासाठी माणसाला मरणमोक्ष मिळण्यासारखी योजना उपलब्ध झाली तर विम्याचे हप्ते, ''थेंबे थेंबे तळे साचे'' या न्यायाने आपल्या मिळकतीतून भरून मनुष्य थोडेतरी समाधान पावू शकेल. तशी काही योजना होईपर्यंत मनुष्याने आपल्या भविष्य तरतुदीत एक मरणमोक्ष निधी काढून ठेवण्याची सवय लावून घेतली पाहिजे. मनुष्य मिळवत्या वयाचा झाल्यापासून याबाबत दक्ष राहील तर ''स्वल्पमल्पस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।'' असा त्याला अनुभव येईल. आपल्या पोटी येणाऱ्या मुलांच्या संवर्धन शिक्षणासाठी आपल्या वृद्धापकाळाच्या योगक्षेमासाठी माणसाने मिळवत्या वयापासून तरतूद करीत राहणें हे जसे कर्तव्य ठरते तसेच मरणमोक्षासाठी तरतूद करणे त्याचे कर्तव्य ठरते.

अशाच काहीशा कल्पनेने सुधारकाचार्य गोपाळराव आगरकरांनी आपल्या उशाखाली ''माझ्या प्रेतदहनार्थ'' अशी अक्षरे लिहिलेली एक पुरचुंडी ठेवली होती तशी तरतूद त्यांनी आपल्या तुटपुंज्या मिळकतीतही करुन ठेवली.

''अहारे विधी। त्वा असू काय केले।

पराधीनता पाप माझे उदेले॥'' असे म्हणण्याची पाळी आपल्या कर्मानुसार जाणाऱ्या (स्वर्गी) आत्म्याला येऊ नये म्हणून मरणमोक्ष निघीची काही निश्चित योजना मनाने ठरवली पाहिजे. माझ्या डोक्यात ठसत असलेली तूर्तातूत योजना तरी अशी –

१) आजकालच्या बाजारदरांचा विचार करता देह विसर्जनासाठी कमीत कमी रु. १५०/– तरी खर्च येईल असे गृहीत धरून तेवढा मरणमोक्ष निधी प्रत्येकाने बँकेमध्ये स्वतंत्र खाते म्हणून ठेवावा.

२) हा निधी मृतदेहाची वाट लावण्याकरताच खर्च व्हावयाचा दुसऱ्या कशाकरताही नाही म्हणून या निधीतील एक पैसा देखील ठेवीदाराने आपल्या हयातीत स्वतःसाठी वापरावयाचा नाही.

३) हल्ली ठेवीदाराकडून बँका आपल्या पुढील वारसाचे नाव नोंदवून घेतात.

त्याप्रमाणे आपल्या पश्चात या निधीतील पैसे कोणाच्या सहीने सम्मतीने आणि मंजुरीने खर्च व्हावेत त्याचे नाव ठेवीदाराने बँकेकडे देऊन ठेवावे म्हणजे त्या नावाचा मनुष्य ठेवीदार मृत झाल्यावर त्या ठेवीदाराच्या देहाची वाट लावण्यात करता झालेल्या खर्चाची व्यवस्था निर्धास्तपणे करू शकेल.

४) या निधीतून शिल्लक उरल्यास ती गरीबांचे सेवेतच लागली पाहिजे.

५) सदर निधी देहसमाप्तीसाठी अपुरा पडल्यास ठेवीदाराबद्दल जिव्हाळा बाळगणारांनी जरूर तेवढी पदरमोड स्वखुषीने करावयाची असल्यास करावी. नाहीतर अपुऱ्या राहिलेल्या देहसमाप्तीसाठी ठेवीदाराचा देह असेल त्या स्थितीत (सदर निधी खर्च झाल्यावर) पारशांप्रमाणे पशुपक्षांस अर्पण करावा वा जलप्रवाहात जलचरासाठी सोडून द्यावा.

६) सदर मरणमोक्षास निधी आणि त्यात साठलेच असेल तर बँकेने दिलेले व्याज मिळवून देहविसर्जनाचा सगळा खर्च भागला तरी ती परमेश्वराची खैरच मानण्यात यावी हे उघड आहे.

७) सदर खात्यात ठेवीदाराचे कडून १५०/- रू. ची तरतूद होताच त्याने आपल्या आप्तेष्टास सदर खात्याचा बँकेतील क्रमांक आणि देहविसर्जन खर्चाची व्यवस्था करण्यास आपण केलेला तो आपला उत्तराधिकारी आपण बँकेकडे नाव देऊन कळवला असेल त्याचे नावही आप्तेष्टास कळवून ठेवावे.

ही अशी किंवा असली दुसरी योजना साठी उलटलेल्या प्रत्येक जाणकार माणसाने विचारपूर्वक केलीच पाहिजे अशा हिशोबाला मी येऊन ठेपल्या कारणाने वरील योजना समाजहितचिंताकाच्या समोर ठेवण्याचे धाडस करीत आहे. त्याबाबत समाज हितचिंतकाने काही नवा वैचारिक आणि व्यवहारशुद्ध मार्ग सुचवल्यास त्याचाही उपयोग मला किंवा माझ्यासारख्या समान विचारकांना खास होईल. समाजातील आर्थिक दृष्ट्या मध्यम स्तरातील तळभागच्या लोकांना आणि त्याहीपेक्षा दरिद्र नारायण म्हणण्याइतक्या अवस्थेत असलेल्या व अल्प वेतनाच्या लोकांना मात्र त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षापासून पन्नास वर्षाअखेर पर्यंत सौम्य व सुलभ विमा हप्त्यांनी 'मरण मोक्षाय निधी' प्राप्त व्हावा अशी योजना आखण्याची नितांत सामाजिक गरज आहे. ''मरणमोक्षाय-निधि-विमा-योजना सर्वकष होऊन पुढे आली, तरी स्वागतार्ह ठरूनही एक गोष्ट खटकत राहील की देहाच्या अंतीम-विसर्जन स्थळी तो नेण्यासाठी होणारे समाजऋण फिटणारच नाही. जन्मदेचे, जन्मभूमीचे व समाजपुरुषांच्या त्या न फिटणाऱ्या ऋणाला कृतज्ञतांजलिंच्या अश्रूंच्या अभिषेका शिवाय दुसरे पूजासाधन अजून तरी लक्षात आलेले नाही.

***

## माझा वृद्धाश्रम

डॉ. जी. मॉरिस कारस्टेअर्स याने आपल्या द्विज (Twice Born) या सुप्रसिद्ध ग्रंथात म्हटले आहे की भारतीय धार्मिक ग्रंथांत जो सर्वधर्मसमभाव शिकवला जातो, 'तशी सोय दुसऱ्या कोणत्या ही धार्मिक शिक्षणात नाहीं.' संस्कृति संपन्न व्यक्तिमत्वाचा आदर हाच राष्ट्रीय चारित्र्याचा अभ्यास असतो. तो निष्ठेने करून व गृहस्थाश्रमात अतिथीपूजन चालवित असतातच; सन १९७० शिवरात्रीस माझी सहचारिणी शिवचरणी विलीन झाली. मग माझा वृद्धाश्रम सुरू झाला. घरीच राहून, पुढील पिढी करीत असलेला संसार साक्षात पहावयाचा, पण त्यात लुडबुडावयाचे नाही परिस्थितिप्राप्त कर्तव्य करताना ही नवीनांच्या व्यक्तिमत्वाला धक्का पोचेल असे काही करावयाचेच नाही; कोणाच्या प्रसंगास पडता आले तर तनमनधनाने उपयोगी पडावयाचे; नियतकालिकात लिखाण व जाहीर सभेत थोडे फार व्याख्यान आणि गप्पातून चर्चा विवेचन, लोकास हवे असेल तरच लोकशिक्षणबुद्धीने करावयाचे; असा इत्यर्थाने व्रताचरणी जीवनक्रम मी आखला व तो एक तपाच्यावर आचरणशुद्ध राखला. "रिकामा जाऊ ना दे क्षण । सेवेत नसावा लोभाचा कण ॥" या दक्षतेनें वृद्धाश्रम आचरण शुद्ध चालविताना मला 'करून अकर्ता' असल्याचे समाधान गेली बारा वर्षे लाभत आलेच आहे.

दुसऱ्याना भेट देण्यासारखा आपला संसार यथासांग करता करताच, त्यात "परोपकारस्तु पुण्याय" अशी जी सवय लागलेली असते, तिच्या जोरावर, नव्या उमेदीच्या मंडळीकडे गृहस्थी नव्या काळास साजेशी करण्याचे सोपवून, मनुष्य आपल्या वृद्धावस्थेत साधेल तेवढी सार्वजनिक सेवा करण्यास लागणे हाच "नवा वानप्रस्थ" ठरणारा आहे. स्वाभिमान संपन्न पराकाष्टेची लोकसेवा करण्यात धन्यता मानण्याचा वानप्रस्थ अंगी लागता लागता. "उरलो उपकार पुरता" हा व्यावहारिक संन्यासाश्रम आपोआपच रुळेल. याच प्रक्रियांना "वृद्धाश्रम" हे सर्वसंमत नाव असून त्यात सांप्रदाय म्हणून कसा तो नाही. फक्त एकच व्रत आहे ते हे की जागतिक जीवनाच्या संघर्षातील उठाठेवी करावयाच्या नाहीत आणि अर्थोपार्जनाची हाव धरुच नये.

"जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळू हळू शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥" एवढी तरी समाजसेवा प्रत्येक वृद्धाला खास करता येईल जर ती तो संपर्कात येणाऱ्या व्यक्तिमात्राला हळूवारपणे विश्वासात घेऊन स्नेहभावानें करील तर ! साधारणपणे सत्तरी उलटलेल्या वृद्धानी तर संपर्किताशी होणारी आपली भेट बहुधा शेवटचीच अशा निकरानेच सांभाळणे जरूर असते. माणूस हाडाचा बळकट, वृत्तीचा बाणेदार, आल्या प्रसंगाशी खिलाडू झुंजारपणाने झटणीस येणारा असला तरी लोकशिक्षणाचे कार्य तो स्वतः नामोहरमान होता व दुसऱ्यास तसे बिलकुल न करता, करुच शकतो. त्याला पक्केपणी ठाऊक असते. की सत्तरी उलटली असता आपल्या बरोबरीची वा बरोबरी करु शकणारी माणसे विरळच भेटणार. "मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात् तोही पुढे जात आहे ॥" अशा वार्तावर्ताचीच खात्रीची !! म्हणून धीम्या शान्तिनेच वृद्धाश्रम चालविणे विवेकवन्तानी केले पाहिजे. एवढेच नव्हे, तर "जो जो

ज्यामाजि दिसे सद्गुण । ते ते तेवढे समर्थ–दर्शन ॥'' मानून त्याचे गौरव करून लोकसंग्रह साधावा हेच उचित.

गुणग्राहकतेने समाजपूजन व भारतीय संस्कृतीची समजूत देऊन घेऊन तिचे संगोपन हे आपले व्रत वृद्धाश्रमात माणसाने चालविण्यात त्याला अखंड समाधान लाभते, हे प्रत्ययाचे बोलणे आहे. आमच्या मातृभूमीत ब्राह्मणानी ज्ञानाच्या द्वारे, क्षत्रियानी शौर्याने वैश्यानी व्यापार विचक्षणतेने, शूद्राने कारागिरीने अनेकानेक विक्रम केले, सर्वांनी संपूर्ण सहकारसमन्वयाच्या जोरावर संघटन करून साधूंचे परित्राण व दुष्कृतांचे विनाशन साधले. ती आमची मायभू ज्ञान, विज्ञान, शौर्य, तेज, ऐश्वर्य व स्वास्थ्य यानी सदैव समृद्ध नांदो (अथर्व १२–१–५) ही प्रत्येक भारतीयाची इच्छा आकांक्षा साहजिकच असणार ती तृप्त होण्यासाठी करून करून भागलेल्या वृद्धांच्या कित्यावरून जगाला हे पटलेच पाहिजे की ''नको रे मना, द्रव्य ते पूढिलांचे । अतिस्वार्थ बुद्धी, नुरे पाप साचे ॥'' याचे उदाहरण वृद्धानी आपल्या आचरणशुद्धीनें घालून दिले आहे. ''जे जे उच्च उदात्त दिव्य, उजळे'' तेवढ्या तेवढ्याचा आदर आवर्जून त्यांच्या चरित्रात झाला आहे. आणि ''दुष्कृताचा नाशच साधला आहे. निष्काम कर्मयोगाने सिद्ध होणारे यथार्थज्ञान हेच खरे मुक्तीचे साधन असून ज्याचे चित्त निर्मळच निर्मळ तोच पुण्यपुरुष असतो आणि विवेकवन्तच खरा पण्डित ठरतो. विवेकी पुण्यपुरुष स्वतःच्या आणि लोकांच्या हिताकरताच आपला जन्म आहे असे मानतो व त्या योगे त्याचा ''धन्य संसार होतसे'' वैयक्तिक व सार्वजनिक ! आळसा सारखा या जगात माणसाचा दुसरा वैरी नसून, आपल्या कोणत्याही गरजेसाठी माणसाने कोणाचाही ''भिकारदास, मारुती'' न होण्यातच माणसाचा मोठेपणा विराजमान झालेला असतो. परोपकारी, पवित्र जीवन विवेक जागृतीने सर्व संकटावर आणि काळाच्या करणीवर मात करण्यात माणसाचे तेजोवर्धन होते. ''पारतंत्र्याहुनि बरि निरयगति ।'' हे जसे खरे तसेच ''साधल्या श्रेयाचा उपभोगशून्य राजा'' होण्याइतके जगात कोठलेच सुख नाही. अशा निष्कर्षांचा माझा द्वादशवर्षीय वृद्धाश्रम प्रबोधितो की मूर्ख, संशयी, खिन्न आणि कृतघ्न अशाना ''बुझावू शकेना विधाता ।'' तेथे माणसाचा काय पाड ?

तेव्हा आता माझी ईशचरणी प्रार्थना आहे कीं –

''अज्ञात मी निसटु दे कळता न कोणा । अश्रू गळो न मजसाठी नि हाय !'' हो ना ॥<br>
काही न मी चुकुनिही पुरुषार्थ केला । नाही कुणाहि गुरुचा कृतिसिद्ध चेला ॥१॥<br>
साध्यासुध्या मज 'न–गण्य' करोत लोक । माझें असे तनुसवे जळु दे अशोक ॥<br>
काढो न नाव कुणिही चुकुनी कधीही । हे जन्मसार्थक मला गमतेच साच ॥२॥<br>
तेव्हा स्मरोनि विभु रे, तुझिया पदाशी । कर्मानुसार गति घडेच पुण्यराशि ।<br>
केला न मत्सर कधी कुठल्या जिवाचा । सर्वेश्वरा, सतत पूजन हे त्रिवाचा ॥३॥''

(भालचंद्र नाशिक डिसेंबर १९८२)

***

१९८० मध्ये १९४६-५२ या काळात जे आमदार होते, त्यांना दरमहा ३०० रूपये पेन्शन देण्याचा ठराव झाला. त्याचप्रमाणे ठराव मान्य झाल्यापासूनची बाकी त्या आमदारांना देण्याचे ठरले. सरकारी यंत्रणेतून फारशी नसली तरी, थोडी दिवसगत होत अखेर १९८२ फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात प्रकरण पूर्ण होऊन त्या वेळेपर्यंतच्या थकबाकीसह १४,७०० रुपये नक्त रक्कम माझ्या हाती देण्यात आली

एकरकमी एवढा पैसा, एकोणतीस वर्षापूर्वीच्या सेवेबद्दल आपल्या हाती येईल, याची मला कल्पना नव्हतीच, कारण ती अपेक्षाच नव्हती. १९२१ ते १९६१ या ४० वर्षांच्या काळात गोखले कुलाची कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी हिची महापूजा करण्याची माझ्या वडिलांची सततची इच्छा होती. पण त्यावेळी या पूजेसाठी लागणारे ५० रूपये एकरकमी कधी उपलब्ध झालेच नाहीत. या पार्श्वभूमीवर १४,७०० रुपये हा मोठांच ऐवज. ''ही रक्कम बँकेत ठेवली असती तर दरमहा १०० रुपये व्याजाचे सुटायला काहीच हरकत नव्हती. पण बऱ्याच दिवसापासून गोखले कुलाला मोठे करणाऱ्या त्रिमूर्तीबद्दल मनात एक वेगळी भावना नांदत होती. या निमित्ताने त्याचे थोडेफार उतराई होण्याचे ठरविले. ही त्रिमूर्ती म्हणजे मराठ्यांचे शेवटचे सरसेनापती बापू गोखले, दुसरे समाजसेवक व मिशनरी हिंदू म्हणून गौरविले गेलेले विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि तिसरे नामदार गोखले.

पुण्यातील भारत इतिहाससंशोधन मंडळात १९०८ पासून बापू गोखले यांची जयंती साजरी केली जाते. यावेळी व्याख्यान आयोजित करून, त्यांचे छोटे टाचण श्रोत्यांना देण्यासाठी एक योजना बऱ्याच दिवसापासून विचाराधीन आहे. एक व्याख्यान, त्याचा खर्च इत्यादी धरता निदान ५००० रुपयांचा निधी जमवण्याचा संकल्प होता. त्यातला 'कऱ्हाड' च्या गोखल्यांचा वाटा म्हणून मी माझ्या या मानधनातून १७६० रुपये त्यासाठी दिले. विष्णुबुवा ब्रह्मचारी हे समाजसेवक तेव्हा त्याच्या नावाने पारितोषिक देण्यासाठी कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसला २१०१ रुपयांची देणगी दिली नामदार गोखले यांच्यासाठी ५०० रुपये याच रीतीने दिले.

सतरा नातवंडांना प्रत्येकी १०० रुपये दिले तर पाच नातींना प्रत्येकी १००० रुपये दिले. सातारा समर्थ संत ज्ञानपीठ आहे त्यांना १००० रुपये दिले. कऱ्हाडला कृष्णाबाईचा उत्सव चालतो, त्यात चार कीर्तने होतात. त्यातील अल्पसा वाटा उचलावा म्हणून उत्सव चालवणाऱ्या मंडळास १००० रुपये दिले. कऱ्हाडच्या वैदिक संशोधन मंडळास १०१ रुपये दिले. एकनाथांच्या वाङ्मयावर पी. मिळवणाऱ्या कुमुद गोसावी यांच्या पुस्तकांच्या सात प्रतीची किंमत ५४५ रुपये दिली. दासबोध प्रचाराचे कार्य मसुराश्रम येथून चालते. त्यांना १२० रुपये दिले. एका अपंगाला निराधार योजनेतून पेन्शन मिळेतो ७६ रुपये दिले.

''भुसावळला हिंदी माध्यमाची शाळा काढण्याची योजना १० वर्षापूर्वी आखली गेली होती. त्यावेळी तिचा खर्च तीन लाख रुपये अपेक्षिला होता. त्यावेळी तेथील इंजिन ड्रायव्हर डब्ल्यू. वी. स्टुअर्ट म्हणाले होते की, यातील निम्मी रक्कम मी जमवीन. एका इंजिन ड्रायव्हरने एवढी रक्कम उभारून देतो म्हणणे हा विशेषच. पण संकल्पाप्रमाणे गेल्या दहा वर्षात त्यांनी विविध स्टेशनांवर देणग्या जमवून १,३०,००० रुपये मिळवून दिले. ही हकीकत मला त्यांनी सांगितली. ते आता निवृत्त झाले आहेत. ते म्हणाले की, 'अजून काम बाकी आहे, मला २०,००० रुपये जमवून द्यायचे आहेत. मी त्यांना अल्पशी मदत म्हणून १११ रुपये दिले.''

''वडिलांची इच्छा महालक्ष्मीची पूजा करण्याची होती. ती पूर्ण झाली नाही. मागे मी १९६१ नंतर एकदा पूजा केली होती. हे १४,७०० हाती आल्यावर ४५० रुपये खर्चून परवा महापूजा केली. समाजऋण, पितृऋण आणि ऋषिऋण अशा प्रकारे अल्पांशाने फेडलें''

''कदाचित या पैशात एखाद्या नातीचे लग्न झाले असते. कदाचित हा पैसा बँकेत ठेवून दरमहा व्याजाची भर पडली असती. पण ज्या पैशाची अपेक्षाच नव्हती, ते मिळाले असताना हा विचार करण्याचे कारणच काय ? शिवाय जे ऋण फेडता आले ते केवढ्यातरी मोलाचे.''

* * *

## स्वातंत्र्य-सैनिकांच्या मानधनासंबंधात

''स्वातंत्र्य सैनिक म्हणून सन्मानपत्र, ताम्रपट अगर वेतन मला नाहीं. मी त्यापैकी कांही मिळविण्याची खटपटही केली नाहीं. मी देशभक्ति केली, त्याची पावती जनतेनें मला पदोपदीं दिली आहे. देशभक्तीचा मोबदला मानानें वा धनानें समाजाकडून अगर शासनाकडून मिळालाच पाहिजे, ही कल्पनाच मला असह्य आहे. पातिव्रत्यासारखेच देशभक्ति हे सतीचे वाण आहे. शासनानें सन्मानपत्राच्या, ताम्रपटाच्या अगर जीवन-वेतनाच्या कल्पना प्रचलित केल्या यातील गुणग्राहकतेची व गुणगौरवाची वृत्ति आदरणीय आहे; पण शासनाला ही बुद्धि स्वराज्य रुळून फार वर्षे झाल्यावर सुचली ही त्यांतील खेदाची गोष्ट आहे. कारण स्वतःच्या जीवित वित्ताचेच नव्हे तर आपल्या संबंधितांच्या संसाराचेही परकीय सत्तेने बळी घेतले, हे ज्या देशभक्तांना उघड्या डोळ्यांनी पहावे लागले, त्यापैकी बहुतेक इहलोक सोडून गेल्यावरच शासनानें आपल्या गुणग्राहकतेच्या व गुणगौरवाच्या कल्पना कार्यान्वित करण्यास सुरुवात केली ! षटकारापेक्षा उशीर बरा, या दृष्टीनें ''तेही कांही वाईट नाहीं !'' असे लोक म्हणतात; पण गुणग्रहण आणि गुणगौरव व्हावयास, माणसाला याचना, अर्ज लाचारी करावयास लागणे ही देशभक्तीच्या क्षेत्रांत

तरी नामुष्कीची गोष्ट आहे. देशभक्तांना जसें देशाचे प्रेम असते तसाच स्वाभिमानही असतोच की ! त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, जशा आपल्या पुराणांत खऱ्या सहनशीलतेचे अग्निदिव्य जन्मजन्म करणाऱ्या सती विकृतीनं जाऊन महानंदा, पिंगला यांचे करार केले ते सतीत्व काव्यांचे विषय झालें, तसेंच अनुभवाचे चटके देशभक्तीच्या शासनमान्यतेच्या जमान्यांत बसलेले आढळतात. त्यांत सहभागी होणें अव्वल प्रेरणेच्या देशभक्ताला खपेल तरी कसें ?

शासनाच्या सूक्ष्म संशोधनाला देशभक्तांची हलाखी दिसताच, ती त्यानें दूर करावी. हे त्याचे कर्तव्यच आहे. पण तसें झालें तरी सरकारी करातूनच शासन सर्व तरतुदी करणार असल्या कारणानें, खरोखरीच निरुपाय, असहाय्य अगर गलितगात्र देशभक्तांना शासनानें सांभाळणे न्याय्यच न्याय्य आहे. याची जाणीव शासनाला असल्यामुळें कौटुंबिक वार्षिक प्राप्ति पांच हजार रुपयांच्याखालीं असणाऱ्या देशभक्तांनाच अत्यावश्यक म्हणून जीवनवेतन देण्याचे निर्बंध शासनानें पत्करले. पण ते निर्बंध अंमलबजावणीच्या वेळी उडालेलेच दिसतात ! त्यामुळे स्वातंत्र्यसैनिकांचे अगर देशभक्तांचे जीवन वेतन म्हणजे पूर्वीच्या पेशवाईतील पर्वतीच्या रमण्यांतील दक्षिणा तर होऊन बसली नाहींना ? अशी निरीक्षकांना शंका येत असल्याचे आढळते.

खरोखर ज्यांना जीवनवेतनावाचून जगणेच अशक्य आहे. त्या देशभक्तांना शासनानें स्वयंस्फूर्तीनें ते गुणग्राह्यतेनें पुरविणे जरूर असले तरी केवळ मागच्या देशभक्तीच्या कीर्तींवर त्या जीवनवेतनावर हक्क सांगत बसणे हे कोणाही देशभक्ताला मानवणारच नाहीं.

''सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख'' या समर्थ वचनाप्रमाणेच ''सांगे कालची कीर्ति'' तो आयत्या पिठावरच रेघोट्या मारणाराच देशभक्तीच्या पृथक्करणांत ठरेल. त्यांतून ही प्रकरणे निघाल्यापासून जुन्या देशभक्तांच्या कारकीर्दी पाहिलेले. ''कर–भरे'' देशांत आता फारच थोडे उरलेले आहेत. तेव्हां नवे करभरे म्हणतील तर त्यांना आपण काय सेवा रोजच्या रोज आपल्या कुवतीप्रमाणें देतो, हे ज्यांना हिशेबीपणानें सांगता येईल. त्यानीच जीवन वेतनाला हात लावावयास हरकत नाहीं. कारण देशभक्ति ही कांही ठरोतीनें केलेली नोकरी नव्हती. ती अशी होऊच शकत नाहीं. मग आयते जीवनवेतन कशासाठी घ्यावयाचे ? जुन्या कुटुंबव्यवस्थेत देवपूजा करून नातवंडे सांभाळून किंवा स्वयंपाकपाणी करून स्त्री–पुरुष वृद्धावस्थेत आपल्या मागे क्षेमाची सेवा हजेरी देत. तशी सेवा हजेरी जीवन–वेतनी देशभक्तांनीं करभऱ्यांना द्यावयास नको काय ?

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशभक्तींच्या मागे जात असतांना ती तपश्चर्या म्हणून तिचा गौरव जनतेने केला हे ठीकच. पण स्वातंत्र्य प्राप्त्युत्तर जे देशसेवेतून उरले आणि आपापल्या संसाराची नीट बांधणी करू लागले, त्यांचे ते करणें वास्तवच होते. कारण पारतंत्र्यांतून देशाची मुक्तता होईपर्यंत, लढाईच्या वेळच्या रंगरूटाप्रमाणे त्यांनी

राजकारणांत खडतर प्रसंग येईल तर आपल्या देशासाठी प्राणपणानें लढावयास ते परत येतीलही.

त्या सरळमार्गी देशभक्तांना उपेक्षित देशभक्त म्हणून किंवा अन्य तऱ्हेने हिणवावयाचे अगर ते आजच्या राजकारणाच्या आखाड्यात छातीला माती लावून गुळाच्या ढेपेवरचे मुंगळे झाले नाहींत म्हणून ते राजकारणाला भ्याले असा त्यांच्यावर आरोप करावयाचा याच्या इतका टीकाकारांच्या देशभक्ति मीमांसेचा दुसरा अधःपातच नाहीं. तर उलट जे राजकीय नसल्या तरी सामाजिक वा अन्य क्षेत्रांत स्वतंत्र भारताचे सुराज्य करण्याबद्दल आपापल्या कुवतीप्रमाणें स्वार्थ निरपेक्ष खटपट करीत असतात, त्यांच्या बद्दलचा आदर समाजांत वाढला पाहिजे. माझ्या निरीक्षणाप्रमाणें तो तसा वाढतो आहे. देशभक्ति केली अगर स्वातंत्र्यसैनिक झालो म्हणून शासन जे जीवनवेतन देते ते घेतल्याने आम्ही स्वाभिमानानें व स्वावलंबनानें जगतो आणि मुलांचे मिंधे नसतो कीं, त्यांच्या संसारावर आमचा बोजा घालीत नाहीं, असा एक दावा त्या जीवन वेतनासंबंधी मांडण्यांत येत असतो. त्यांतला हेत्वाभास बोलणारांच्या लक्ष्यांत येत नाही काय ? जीवनवेतन घेण्यांत स्वाभिमान व स्वावलंबन सांगावयाचे असेल, तर आपण स्वातंत्र्यप्राप्त्युत्तरसुद्धा सेवा काय देत राहिलो. याचा अहवाल देता आला पाहिजे. मुलावर बोजा कदाचित त्या वेतन स्वीकारानें कोणास पडत नसेल, तरी तो सर्व करभऱ्या जनतेवर पडतो आणि तिचा मिंधेपणा येतोच (निदान शासकांचा तरी जनता प्रतिनिधी म्हणून येतोच) जनतेवर कर रुपाने अप्रत्यक्षरीत्या आपल्या जीवनाचा बोजा ठेवणारांना आपल्या मुलाबाळांचा मिंधेपणा येतच असला तरी तो, पत्करण्यांत कमीपणा कां वाटावा ? उलट तो मिंधेपणा आला तरी मी व माझी मुले नागरिकत्वाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावत असून कुटुंबाचा एकजिनसीपणा सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो असा त्यांना अभिमान कां वाटूं नये ?

माझे हे विचार आपले समाधान करतील की नाही याचा मी विचारच केला नाहीं, करण्याची जरूरच नाहीं, कारण त्यांच्या पाठीमागे निष्काम कर्मयोगाची प्रेरणा आहे. या विचारसरणीला वेड म्हणावयाचे धाडस करणारालाही त्या वेडाला एक शिस्त आहे हे मान्य करावयास हवे.

***

## 'समाजभूषण' बाबूराव गोखले

(लेखक : प्रल्हाद केशव अत्रे)

दैनिक 'मराठा' चा वाढदिवस ज्या पंधरा नोव्हेंबरला येतो त्याच दिवशी आमचे एक दीर्घकालीन मित्र आणि कराडचे सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते श्रीयुत पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबूराव गोखले यांचाहि वाढदिवस येतो, याची आम्हाला गंमत वाटते. श्री. बाबूराव

गोखले यांची राजकीय मतें आणि त्यांचा राजकीय पक्ष यांच्याशी आमचे कधी जमले-जुळले नाहीं. पण व्यक्तिशः बाबूरावांचे नि आमचे स्नेह संबंध जे एकदी जुळले ते कायम वाढत आहेत ! तसे पाहिले तर आम्हां दोघांची कार्यक्षेत्रे वेगळी, कार्यपद्धति निराळी. त्यामुळें आम्ही दोघे सार्वजनिक व्यासपीठावर क्वचितच एकत्र येतो. मराठी पत्रकार परिषद हाच काय तो त्यांच्यात आणि आमच्या समान दुवा होता. तोहि अलीकडील काळांत नावापुरताच उरला आहे ! असें असूनहि श्री. बाबूराव गोखले हे आम्हांला जवळचे मित्र वाटतात. त्यांचे लोभसवाणें व्यक्तिमत्व आणि मनमोकळा स्वभाव आम्हाला फार आवडतो. कोणाविषयीहि कसलीहि कटुतेची भावना बाबूरावांच्या पोटांत नसते आणि ओठांतहि कधी येत नाहीं ! बाबूराव स्पष्ट नि सत्य बोलण्यास न कचरणारे आहेत. गोपाळराव आगरकरांचे त्यांनीं मराठीत अतिशय सुंदर असें चरित्र लिहिलेलें आहे. आणि आगरकरांच्या विचारांचा बाबूरावांच्या जीवनावर नि साहित्यावर चांगला परिणामहि झालेला आहे. 'सत्य असेल तें बोलणार' हा आगरकरांचा बाणा बाबूरावांनीं उचललेला आहे. ते सत्य बोलतात. स्पष्टहि बोलतात. पण त्याला स्वार्थाचें अस्तर चिकटलेलें नसते. त्यामुळें त्यांच्या स्पष्टोक्तीनंतरहि सर्वांचे स्नेहसंबंध ते कायम ठेवू शकतात. बाबूराव कोठेहि केव्हाहि भेटले तरी दीर्घकालीन, जिव्हाळ्याचा रसिक स्नेही भेटल्याचा आनंद होतो आणि गप्पागोष्टी अशा रंगतात म्हणता ! वेळ कसा गेला याचा पत्ताच लागत नाहीं. बाबूरावांना राजकारण आणि साहित्यकारण या दोन्हीमध्ये विलक्षण रस आहे. समाजसेवेत नि साहित्यसेवेंत त्यांनी उभी हयात वेचली.

त्यांच्या प्रमुख पैलू जरी नजरेसमोर घेतले तरी बाबूराव गोखले यांच्या सर्वस्पर्शी समाजसेवेचें चित्र डोळ्यापुढें उभे राहते. याखेरीज मराठी पत्रकार परिषदेच्या आर्थिक निरीक्षण समितीचे अध्यक्ष म्हणून बाबूरावांनी जी कामगिरी केली ती तर सगळ्या मराठी पत्रकारांनी कृतज्ञतेनें सदैव लक्षांत ठेवली पाहिजे. आज सरकारनें 'वेजबोर्ड' नेमून पत्रकारांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न भारतव्यापी भूमिकेवरून सोडवलेला आहे, पण त्या दृष्टीनें पहिलें पाऊल मराठी पत्रकार परिषदेनें टाकले होते आणि या कार्यासाठी नेमलेल्या चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून बाबूराव गोखल्यांनी घेतलेले परिश्रम अन् तयार केलेला अहवाल सदैव कौतुकास्पदच राहील. स्वतः बाबूराव गोखले १९२०-२१ मध्यें ज्ञानप्रकाशचे नि १९२४ मध्यें केसरीचे सहसंपादक होते. सातार्‍याच्या 'समर्थ' साप्ताहिकाचेहि ते संपादक होते आणि १९६६ पासून ते 'पुरुषार्थ' मासिकाचे संपादक आहेत. त्यामुळें पत्रव्यवसायाचा त्यांचा अनुभव दीर्घकालीन आणि विविधांगी स्वरूपाचा आहे. या कार्याच्या अनुभवाचा उपरोक्त चौकशी समितीच्या कामाच्या वेळी चांगला उपयोग झाला. साहित्यसेवेचा छंद त्यांना तरुणपणीच लागला. पुण्याच्या तेव्हांच्या 'चित्रमयजगत्' मासिकांत 'जननीजनकज' या विचित्र नावानें त्यांनी काव्यलेखन सुरु केल्यामुळें त्यांच्याकडे रसिकांचे चटकन् लक्ष वेधलें गेले पण काव्यरचनेचा छंद त्यांनी पुढें सोडून दिला. त्यांची कविता आजहि क्वचित वाचायला मिळते; पण तीत कल्पकतेपेक्षा

प्रचाराचा प्रादुर्भाव जास्त असतो ! बाबूराव हे राजकारणी प्रचारक असल्यामुळे त्यांच्या लेखणीनेंहि पुढें पुढें प्रचारसाहित्याकडेच जास्त लक्ष दिले. बालवाङ्मय नि इतिहास चरित्र हे बाबूरावांचे आवडते साहित्यक्षेत्र. त्यांची मुलांसाठी लिहिलेली गोष्टीरूप पुस्तकें प्रसिद्धच आहेत. प्रौढ वाचकांसाठीहि त्यांनी विपुल लेखन केलेले आहे.

अर्धशतकाच्या जवळपास पुस्तकें लिहिणाऱ्या या साहित्यिकाचें एक वैशिष्ट्य लक्षांत घेण्यासारखे आहे. केवळ रंजनासाठी ते लेखणी झिजवीत नाहींत. त्यांना सद्विचाराचा प्रसार नि प्रचार करावयाचा असतो म्हणून ते लेखन करतात. राजकीय कामासाठी त्यांना खेड्यापाड्यांतून फार हिंडावे लागते. तेथील जनता, तिच्या गरजा नि बौद्धिक कुवत, तिच्यासमोर ठेवायचे आदर्श, या सर्वांचा समतोल साधून बाबूराव गोखले नेहमी आपलीं पुस्तकें लिहितात. त्यामुळें त्यात भाषेचा सुबोध गोडवा आणि विचारांचा प्रचारकी थाट हा वरचढ असतो.

निःस्वार्थी वृत्तीनें मनाला पटलेल्या कार्यांत मग्न होऊन राहणें हा त्यांचा पिंडच बनला आहे. पदाधिकार अगर पुढारीपण यांचा त्यांना मोह नाहीं. ते लोकसेवक आहेत आणि लोकांचे आपल्या हातून थोडेफार चांगले होते. यांतच ते संतुष्ट आहेत. त्यानी कॉंग्रेसच्या राजकारणांत प्रथम प्रवेश केला, तेव्हांचे कॉंग्रेसचें राजकारण आणि आजच्या कॉंग्रेसचें राजकारण यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. तरीहि बाबुराव यथाशक्ति जें करता येईल ते मनापासून करतात. जे मनाला पटत नाहीं तेथून चार पावले दूर राहतात. जमाना बदलला आहे याची जाणीव त्यांना आहे. त्याचा पण बदलत्या जमान्याशी झगडत बसण्यात कालापव्यय करण्याकडे त्यांचा कल नाही. जे पटेल ते जसे जमेल तसे करीत राहावे; पण लोकसेवेत खंड पडूं देऊं नये ही त्यांची धारणा आहे. बाबूराव गोखले जरी टिळक काळांत जन्मले तरी त्यांचे सारे जाणकारी जीवन गांधीच्या काळात गेले. त्यांच्या अंगावर एकदा स्वच्छ खादीची वस्त्रे चढली, ती आजहि कायम आहेत. त्यांनी पक्ष पालटला नाही. निष्ठा बदलल्या नाहीत. त्यागाची कांस सोडली नाही जनसेवेचा 'राजीनामा' हि कधी दिला नाही ! माझा देश आणि माझी जनता' या भावनेनेच ते सर्व गोष्टींकडे पहात आले. लोक चुकले तरी बाबुरावांनी आपुलकीमध्यें तूट पडूं दिली नाही. इतरांच्या उण्या अधिकाचे वैषम्य मानलें नाही. लहानमोठ्यांनाहि वेळच्या वेळी सत्य स्पष्टपणे सांगण्यास अनमान केला नाही. या स्पष्टक्तेपणाचें 'फळ' मिळाले. तरी तोंड वाकडे केले नाही की वेंगाडलेंहि नाहीं ! निरलस समाजसेवक म्हणून बाबुराव गोखल्यांची योग्यता मोठी आहे. सारे जीवन असे निष्ठेनें, त्यागपूर्वक लोकसेवेला वाहणारे बाबूराव गोखल्यांसारखे कर्मयोगी आतां दुर्मिळ होत चाललेले आहेत. सगळे भलेबुरे अनुभव घेऊनहि बाबूराव गोखल्यांच्या स्वाभावांतील मनमोकळेपणाची माधुरी कधी संपली नाही, की वाणीतील रसनिर्झरी आटली नाही ! बाबूराव केव्हांहि भेटले तरी त्यांच्या चेहऱ्यावरील ते प्रसन्न भरघोस हास्य सदैव ताजेतवाने असल्याचा अनुभव येतो. कसल्याहि तऱ्हेची फालतु 'प्रस्तावना' न करता बाबूराव एकदम मनमोकळ्या गप्पागोष्टी करूं लागतात. सगळे

अनुभव स्पष्टपणे सांगून टाकतात. त्यांत मोकळेपणा असतो; पण मतलबीपणा नसतो ! जीवनाकडे अत्यंत आशावादीपणानें पाहाण्याची त्यांची वृत्ति आहे. सगळे भलेबुरे अनुभव ते अलिप्तपणे स्वीकारूं शकतात. म्हणूनच त्यांचा जीवनानंद सदैव टवटवीत असतो. समाजसेवा निर्लोभीपणानें करीत असल्यमुळें मानमरातब न मिळाल्याचा खेद नाही. उलट वयानें साठी ओलांडल्यावर त्यांनीहूनच अनेक जबाबदाऱ्या स्वखुषीनें सोडल्या. कोणाला त्यांचा सहाय्याची जरूर लागल्यास ते आजहि केव्हाहि मिळू शकते पण स्वतः बाबूरावांच्या ठिकाणी मात्र आसक्ति नाही. 'दासबोधा'ची शिकवण त्यांनी उराशी बाळगली आहे. आगरकराचा आदर्श त्यांनी समोर ठेवला आहे. गांधीवादांतील मूलतत्त्वाचा गाभा त्यांनी आत्मसात केला आहे. या सर्वांना त्यांच्या रसिक, बहुश्रुत विनोदप्रिय स्वभावाची जोड मिळाल्यामुळे बाबूराव गोखले ही व्यक्ति जेथे जाईल तेथे प्रसन्नता, मोकळेपणा, विनोदप्राचुर्य यांनी वातावरण प्रफुल्ल होऊन जाते ! तत्त्वाबाबत तडजोड न करता ते सर्व विचाराच्या नि विविध पक्षांच्या मंडळीशी स्नेहसंबंध ठेवू शकतात, वाढवूहि शकतात, आमच्यापेक्षां बाबूराव तीन महिन्यांनी लहान आहेत. आमच्याप्रमाणेंच त्याचे पूर्ववय शिक्षकी पेशांत गेले आहे. (प्रा. बापूसाहेब माट्याप्रमाणेच बाबूराव गोखले हेहि सातारा न्यू इंग्लिश स्कूलचे विख्यात शिक्षक सीतारामपंत देवधर यांचा कित्ता पूजणारे आहेत.) आमच्याप्रमाणेंच बाबूरावांचा पत्रव्यवसायाशीहि संबंध जडलेला, साहित्यकारण आणि राजकारण या दोन्ही बाबीचे आमच्याप्रमाणेंच त्यांनाहि विलक्षण आकर्षण आहे. आणि त्यांच्या स्वभावांतील गोडवेपणा, दिलखुलास वाणी, हास्यप्रचुर गप्पा आणि लहानथोर सर्वांशी पटकन समरस होण्याची वृत्ति या ह्या वैशिष्ट्यपूर्ण बहुमोल गुणांमुळे बाबूराव गोखले आम्हांला आवडतात, तसेंच ते सगळ्या महाराष्ट्राचेहि अत्यंत आवडते समाजसेवक आहेत. सतत पन्नास वर्षे आपल्या रसील्या स्वभावानें सर्वत्र लोकप्रिय झालेल्या आणि त्यागपूर्वक केलेल्या समाजसेवेने 'समाजभूषण' या किताबास पूर्णपणें पात्र झालेल्या श्री. बाबूराव गोखले यांच्या एक्काहत्तराव्या वाढदिवशीं आम्ही त्यांचें अंतःकरणपूर्वक अभीष्टचिंतन करून 'शतायु भव !' असा शुभाशीर्वाद देतो !

दै. मराठा दि. १५/११/१९६८

* * *

## बाबुराव गोखले ह्यांचें विनम्र निवेदन

संपादक 'मराठा',

आपण मजसंबंधी लिहिलेला आशीर्वादपर अग्रलेख मी संग्रह करून ठेवावा असाच आहे. त्यांत आपला मनमोकळेपणा, दिलदारी व गुणग्राहकता ह्यांचा प्रत्यय ओळीओळीतून येतो. पण त्या लेखांत ''१९२४ मध्ये 'केसरी' चे सहसंपादक होते'' असें विधान आले आहे. ते खरें नाही. मी त्या सालापासून 'केसरी' चा अधूनमधून लेखक' आहे एवढेंच. 'पुरुषार्था'चा संपादक मी १९६७ पासून आहे. १९६६ पासून नाही. तसेच जिल्हा पत्रांच्या वतीने मी पत्रकार परिषदेच्या आर्थिक चौकशी समितीवर सभासद होतो, पण अध्यक्ष नव्हतो.

आपण अग्रलेख लिहून मला फार महत्त्व दिले आहे. मी स्पष्टच सांगतो की, वृत्तपत्रांतून शिकारीचें रान उठविल्यासारखे प्रतिपक्षाला भेदरविणारे, रसिक गुणग्राहकतेने कर्तृत्ववंताची कामगिरी विवेचून लोकशिक्षण करणारे, मराठी रंगभूमि जिवंत ठेवून तिच्यात क्रांति करणारे, चित्रपटसृष्टीला प्रबोधक स्वरुप देणारे, कवि, टीकाकार, विडंबनकार, दणकेबाज व विनोदब्रह्म आचार्य अत्रे कोणीकडे आणि खेडेगांवात चार र ट फ अक्षरें काढणारा मी ? कशास कांही मेळ ?

गडकऱ्यांच्या गोकुळचे एक वाक्य माझ्या मेंदूवर फार ठसलें आहे. तो न्यायमंदिरांतील साक्षीत सांगतो ना की, पंचवीस वय सांगण्याऐवजी प्रथम पंधरा सांगितले, ते ''वाया गेलेली वर्षे जमेला धरली नव्हती'' म्हणून ? वाया गेलेली वर्षे जमेला धरली नाहीत तर माझें वय सत्तरीने खास मोजता यायचे नाही. 'रिकामा जाऊ नेदी क्षण' सांगणाऱ्या रामदासांच्या या सातारा जिल्ह्यात, रामदासांच्या उपदेशाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करूनही वर्षेच्या वर्षे रिकामी नव्हे, पण निकामी अशी माझ्या पदरांत पडली आहेत. कदाचित कालौघाचा तो तडाखा असेलही !

आणि तरीहि

परगुण परमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निज हृदि विकसन्तः सन्ति सन्तः ।

ह्या विशाल, उदार व उदात्त दृष्टीनें आपण सर्वजण माझ्या जीवनाकडे पाहातां आहा, ह्याबद्दल मी कृतज्ञच कृतज्ञ आहे.

१९/११/६८

–पु. पां. गोखले
कराड

* * *

## पुरूषोत्तम पांडुरंग गोखले

## ' कालवाचक क्रियापदे '

| | |
|---|---|
| १८०४ | तळेखाजण (जि. रत्नागिरी) येथील लक्ष्मण गोविंद गोखले ( पु. पां. गोखले यांचे खापरपणजोबा ) कऱ्हाडास आले. |
| १८४८ | ( आजोबा ) गुंडो सखाराम गोखले जन्म. |
| १८५६ | ( चुलत आजोबा) लक्ष्मण सखाराम गोखले यांचा जन्म. |
| १८७३ | (वडील) पांडुरंग गुंडो गोखले यांचा जन्म. |
| १८७९ | ( चुलत चुलते ) महादेव लक्ष्मण गोखले यांचे निधन. |
| १८९८ | ( आजोबा) गुंडो सखाराम गोखले यांचे निधन. |
| १८९८ | नोव्हेंबर १५ औध जि. सातारा येथे जन्म. |
| १९०१ | मार्गशीर्ष वद्य १२ ( शके १८२३) आई सौ. लक्ष्मीचे प्लेगमुळे निधन. |
| १९०२-४ | चाफळ ता. पाटण जि. सातारा येथे बालपण. |
| १९०४ | प्रा. शिक्षणसाठी म्युनि. शाळा नं.१ कऱ्हाडमध्ये दाखल. |
| १९०७ | व्रतबंध |
| १९११ | वडील पांडुरंग गुंडो यांनी नगरपालिकेतील नोकरीचा राजिनामा दिला. ' केसरी' समजू लागला. |
| १९१२ | कऱ्हाडच्या म्यु. इंग्लिश स्कूलमध्ये इंगजी पहिलीत दाखल |
| १९१४ | ( चुलतचुलते ) महादेव लक्ष्मण गोखले यांचे निधन. |
| १९१५ | कऱ्हाडच्या सार्वजनिक वाचनालयाचे मांग मास्तर यांचे वाचनास प्रोत्साहन |
| १९१७ | सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजी ६ वी साठी दाखल. दादासाहेब करंदीकरांच्या षष्ठ्यब्दपूर्तीवेळी साताऱ्यास लोकमान्य टिळक आले, त्यांची भेट घेऊन वचन. |
| १९१८ | ' शालापत्रका ' त पहिली कविता प्रसिद्ध झाली. ( सावत्र बंधू ) कृष्णाजी पांडुरंग गोखले यांचा जन्म. |
| १९१९ | मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात दाखल. वैरणदुष्काळात स्वयंसेवक कऱ्हाडच्या श्रीकृष्ण मोफत वाचनालयाचे कार्यवाह ( १९१९-२८) सातारा जिल्हा सहकारी परिषदेत स्वयंसेवक सूतकताईस आणि खादी वापरास सुरूवात. (सावत्र आई) सौ. रूक्मिणीबाई व सहा भावंडे यांचा एन्फ्युएंझाच्या साथीत मृत्यू. |
| १९२० | नोव्हेंबर २१ मृत्यूची खोटी बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध. |
| १९२१-२२ | शिक्षणावर एका वर्षासाठी बहिष्कार ( असहकार चळवळ ) . |
| १९२१-२४ | पुण्याच्या गणेश मोफत वाचनालयाशी संबंध. ' पंजाब ' या हस्तलिखिताचे संपादन. |
| १९२२-२३ | पुण्याच्या दै. ज्ञानप्रकाशमध्ये सह संपादक. |
| १९२३ | मे ६ विवाह चिंधोली पाचवड ता. वाई जि. सातारा येथे. |

प्रागतिक पक्षाच्या कऱ्हाड येथे झालेल्या प्रांतिक परिषदेस स्वयंसेवक.

१९२४ बेळगाव येथे अ. भा. काँग्रेसला उपस्थिती.

कऱ्हाडला श्रीकृष्ण क्लबातर्फे ' शूरसेन ' हे नाटक.

१९२५ बी. ए. उत्तीर्ण. ' केसरी ' त लेखन. कायद्याच्या अभ्यासाचा प्रयत्न. परेदशगमनाची संधी गमावली.

१९२५ मे १९४२ सुमारे सतरा वर्षे कऱ्हाडात खाजगी शिकवणीचे वर्ग.

१९२६ रा. ब. काळे यांच्या निवडणुकीसाठी प्रयत्न.

मार्गशीष शु-१० (आजी) सरस्वती ( सखुताई ) यांचे निधन.

पुणे येथील स्वदेशी बझार व औद्योगिक प्रदर्शनात ' लोकजागृती ' साठी गुणवत्ता प्रमाणपत्र व रौप्यपदक.

१९२७ त्रिशतसांवत्सरिक शिवजयंत्युत्सव. हसन निझामी याने शिवाजीविषयी गलिच्छ लेखन केले, त्याच्या निषेधासाठी गणपतराव नलवडे यांच्याबरोबर दौरा.

कऱ्हाड तालुक्यात ' ब्राम्हण- ब्राम्हणेतर वाद ' या विषयावर नलवडे यांच्याबरोबर भाषणे.

१९२८ कोयना धरणेसंबंधी लोकसमजावणी. तुकडेपट्टी बिलाचा सार्वत्रिक निषेध. 'नेहरू रिपोर्ट ' चा जिल्हाभर प्रचार. ' ऐक्य ' मध्ये लेखन.

१९२९ जंगल सत्याग्रह

मसूर येथे ' अत्याचार ' विषयावर भाषण.

१९३० जानेवारी २६ काँग्रेसच्या निवेदनाचे वाचन.

जुलै १२ कऱ्हाडात गव्हर्नरांना ' काळी-निशाणे ' निदर्शने, कारावास.

ऑक्टोबर ३० कन्या उज्ज्वलाचा जन्म.

१९३०-३२ कऱ्हाडच्या ' अभ्युदय ' पाक्षिकात लेखन.

१९३१-३२ कऱ्हाड तालुका काँग्रेस कमिटीचे चिटणीस.

१९३२ जानेवारी १६ न्या. रानडे यांच्या पुण्यतिथीचे भाषण.

जानेवारी २३ राम गणेश गडकरी यांच्या ' लोकमान्यास निरोप ' या कवितेवर भाषण.

जानेवारी २६ कारावास.

१९३३ ऑक्टोबर २३ ( कन्या ) इंदुमतीचा जन्म.

१९३४ पत्नी टॉयफाईडने आजारी.

१९३५ महाराष्ट्र हायस्कूल, कऱ्हाडमध्ये अध्यापन. राष्ट्रभाषा प्रचाराचे वर्ग.

१९३५ डिसेंबर १५ (पुत्र) भास्करचा जन्म.

१९३७ लोकसेवा संघ, साताराचे काम (१९३७-४०)

कऱ्हाड तालुका काँग्रेसचे कमेटीचे सेक्रेटरी.

पांडुअण्णा शिराळकर, भाऊसाहेब सोमण, आत्माराम पाटील यांच्या निवडणुकीत प्रचार.

जून २७ ( चुलतेचुलते ) लक्ष्मणराव गोखले यांनी पुरूषोत्तम वासुदेव जोशी यास दत्तक घेतले.

१९३८ जाने २६ स्वातंत्र्यदिनाच्या महतीची भाषणे.

फ्रेबुवारी १७ ( पुत्र ) विद्याधरचा जन्म.

( चुलतेचुलते ) लक्ष्मणराव गोखले यांचे निधन.

कृष्णा कॅनॉल बागाइतदार संघाचे सल्लागार ( १९३८–१९५३ ).

' समाजभूषण ' पदवी

१९३९ बिळाशीस चरखा परिषदेचे उद्घाटन.

वैयक्तिक सत्त्याग्रहाचे सेक्रेटरी.

१९४० फ्रेबुवारी २१ (कन्या) विजयाचा जन्म.

आगामी राष्ट्रीय लढ्यात भाग घेता यावा यासाठी लोकसेवा संघास रामराम.

जिल्हा नोकरशाहीच्या दडपणशाहीस उत्तर म्हणून आठवडाभर कॉंग्रेसधोरणाचा प्रचार आणि जिल्हा अधिकाऱ्यास सभा रिपोर्टबद्दल पत्र.

जुलै– (दत्तक चुलतचुलते) पुरूषोत्तम लक्ष्मण गोखले यांचा विवाह व नोव्हेंबर ८ रोजी निधन.

१९४१ ' समर्थ ' साप्ताहिक साताराचे कार्यकारी संपादक.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन अधिवेशनात ३ रे कऱ्हाडचे स्वागताध्यक्ष.

१९४२ जानेवारी १३ ( कन्या ) मंगलाचा जन्म.

कारावास–येरवडा, नाशिक (७ म)

पत्नी आजारी असूनही पॅरोलवर आले नाहीत

मूळव्याधीची व्यथा असूनही सवलत मागितली नाही

भास्करचा पाचवड येथे व्रतबंध ( उपस्थित राहू शकले नाहीत )

१९४३ मराठी नाट्य शताब्दीनिमित्त नटश्रेष्ठ गणपतराव बोडस यांच्या हस्ते गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरण.

१९४४ डॉ. भडकमकर गौरव ग्रंथ–संपादनात महत्त्वाचा सहभाग

मुंबई विद्यापीठ सीनेट निवडणुकीसाठी पदवीधर मतदारसंघातून उभे–निवडून आले नाहीत.

१९४५ श्री. शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना

भूमिगतांचा कैवार घेतल्याबद्दल एक वर्ष कारावास.

१९४६ मुंबई विधानसभेवर दक्षिण सातारा मतदारसंघातून यशवंतराव चव्हाण, व्यंकटराव पवार व के. डी. पाटील यांच्या समवेत आमदार म्हणून निवड.

ग्रामविकास मंडळाचे बिनसरकारी कार्यवाह (१९४६–४८)

प्रा. मो. वा. दोंडे यांच्या नेतृत्वाखालील प्राथमिक शिक्षकांच्या आंदोलनास पाठिंबा. विद्याधर याचा व्रतबंध.

जुलै १६ (आषाढ वद्य ३ ) वडील पांडुरंग गुंडो गोखले यांचे निधन.

| | |
|---|---|
| १९४७ | ऑगस्ट १५ पहिले स्वातंत्र्यदिन- वाई येथे प्रमुख पाहुणे. |
| | कऱ्हाड अर्बन बँकेचे संचालकपदी व अध्यक्षपदी निवड (१९४७-५६). |
| | पुणे विद्यापीठावर पदवीधरांचे प्रतिनिधी म्हणून निवड (१९४७-५२). |
| १९४८ | सातारा येथे (होऊ घातलेल्या) मराठी पत्रकार परिषदेचे स्वागताध्यक्ष. |
| | गांधी-वधोत्तर काळात जाळपोळ व गुंडगिरीस प्राणपणाने प्रतिकार. |
| १९४९ | नॉर्थ सातारा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को ऑप-बँकेचे संचालक (१९४९-५७) |
| | मराठी पत्रकार परिषदेच्या 'आर्थिक चौकशी समिती' चे सभासद. |
| | कन्या सौ. उज्ज्वलाचा विवाह. |
| | ऑगस्ट २६ (कन्या) निर्मलाचा जन्म. |
| १९५० | मुंबई येथे झालेला सुरीहल्ला. |
| | बेळगाव मराठी पत्रकार परिषदेस जाताना कऱ्हाड रेल्वे स्टेशनावर आचार्य अत्रे यांचा सत्कार. |
| १९५१ | सातारा जिल्हा लँडमॉर्गेज बँकेवर संचालक (१९५१-५९) |
| १९५२ | आळतेकरांच्या खासदारकीच्या निवडणुकीसाठी प्रचार. आळतेकर विजयी. |
| १९५३ | वैवाहिक जीवनास तीस वर्षे पूर्ण. |
| १९५४ | जानेवारी २३ कऱ्हाड अर्बन बँकेच्या सभागृहात महर्षि धों. के. कर्वे यांच्या हस्ते सत्कार व तैलचित्र अनावरण. |
| | भारतीय स्वातंत्र्यचळवळ इतिहास संशोधन समितीवर संशोधक म्हणून नेमणूक (१९५४-५६). |
| १९५५ | कुलाबा जिल्हा ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष. |
| १९५६ | कऱ्हाड अर्बन बँकेच्या देखरेख समितीचे सभासद व अध्यक्ष (१९५६-५९) |
| १९५७ | दासबोधाचे इंग्रजी भाषांतर तयार |
| | महाराष्ट्र ग्रंथालय संघाच्या जळगाव अधिवेशनाचे अध्यक्ष. |
| | आळतेकरांच्या खासदारकीसाठी प्रचार-पराभव. |
| १९५९ | महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष (१९५९-६१). |
| | कुलाबा व रत्नागिरी जिल्हा सहकारी परिषदांचे अध्यक्ष. |
| | डिसेंबर १५ कन्या सौ. विजयाचा विवाह. सातारा येथे एकसष्टी समारंभ. |
| १९६० | सातारा जिल्हा कविसंमेलनाचे अध्यक्ष. |
| १९६१ | कऱ्हाडात महाराष्ट्र वाङ्.मय मंडळाची स्थापना व अध्यक्ष. |
| १९६२ | फडके इंडस्ट्रीयल वर्क्स कऱ्हाडचे संचालक व अध्यक्ष. |
| | पत्नी सौ. सुलोचना व कन्या यांना अन्नातून विषबाधेचा त्रास. |
| १९६४ | पुत्र भास्कर, विद्याधर व कन्या मंगला यांचे विवाह. |
| १९६६ | मुंबई येथील पत्रकार संघात पत्रकारदिनी महनीय प्रवक्ते. |

' पुरूषार्थ ' मासिकाचे कार्यकारी संपादक.

१९६७ ' पुरूषार्थ ' मासिकाचे संपादक (१९६७–७१).

१९६९ कन्या निर्मलाचा विवाह.

१९७० भारत सरकारने ' पद्मश्री ' पदवी देऊन केलेला गौरव.

मार्च ६– पत्नी सौ. सुलोचनाचे निधन.

१९७२ महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेस पुणे विभागाचे प्रतिनिधी म्हणून निवड (१९७२–७५).

कुरूंदवाड येथील पुणे विभाग ग्रंथालय संघाचे पहिले अधिवेशन.

१९७३ संकेश्वर करवीर मठाचे शंकराचार्य (कल्याणसेवक) यांनी 'समर्थ भक्ताग्रणी' पदवी दिली.

१९७४ सातारा येथे अमृतमहोत्सवी सत्कार.

मिरजेच्या शिवछत्रपती उत्सव मंडळातर्फे ' समर्थ भक्तमयूर ' पदवी देऊन सत्कार.

कन्या इंदुमती विवाह.

१९७५ ' साने गुरूजी जीवनगाथा ' या राजा मंगळवेढेकर यांच्या ग्रंथाचे कऱ्हाड येथे प्रकाशन.

आणीबाणी संबंधकाळातील निवेदनावर स्वाक्षरी व ' निर्भय बनो ' चा प्रचार.

कऱ्हाडात झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातील अनुपस्थिती.

१९७६ ' समर्थ स्वाध्याय साधना ' प्रकाशित.

गोखले कुलवृत्तांतास ' पुर:स्वन ' ही प्रदीर्घ प्रस्तावना.

१९७७ काविळीने आजारी व मोतीबिंदूची शस्त्रक्रिया.

१९७८ जामात अप्पासाहेब पोळ यांचे अपघाती निधन.

१९७९ सातारा–सांगली–बेळगाव–कोल्हापूर विभागीय पत्रकांराचे शिबिराचे स्वागताध्यक्ष.

१९८२ श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या विश्वस्तपदाच्या जबाबदारीतून मुक्त.

आमदारकीचे मानधन मिळाले.

१९८३ सोलापूर येथे जाताना प्रवासात त्रास होऊन बोलता येईनासे झाले.

हैद्राबाद येथे किरकोळ अपघात.

१९८४ कऱ्हाडात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळा बसविण्यात पुढाकार.


१९८६ ऋषीपंचमीस पुणे येथे शारदा ज्ञानपीठातर्फे सत्कार. प्रोस्टेटची शस्त्रक्रिया.

डिसेंबर ५ पुणे येथे देहावसान.


डिसेंबर ६ कऱ्हाड येथे कृष्णा–कोयनेच्या काठी वीर मारूतीनजिक अंत्यसंस्कार.


## वंशावळ

### तळेखाजण– कऱ्हाडचे गोखले
हरी
(उपलब्ध माहितीप्रमाणे मूळपुरुष)




(संदर्भ : गोखले कुलवृत्तान्त पृ. ९५४)


पुरुषोत्तम–सौ. सुलोचना (यमुना धुंडिराज बापट, पाचवड)
भास्कर
व
सौ ( नलिनी शंकर आपटे, पुणे )
सौ. सीमा
(सौ. वृषाली श्रीपाद बापट, पुणे)
कणाद
स्वाती
विद्याधर
व
सौ. विनया (उज्ज्वला नारायण सप्रे, चाफळ)
सौ. स्मिता
(सौ. मैत्रेयी माधव
मुतालिक,मिरज)
मधुमित्रा
संवेद
सौ. आरती
( सौ. शिवांगी प्रशांत कुलकर्णी,
सांगली)
सौरभ
सौ. मेधा
( सौ. मेधा अद्वैत
फणसळकर,
माणगाव)
केतकी
कैवल्य


पुरुषोत्तम-सौ. सुलोचना
सौ. उज्ज्वला
(सौ. पद्मजा व्यंकटेश
दातार, पुणे)
सौ. प्रतिमा
विश्वास गोखले,
डोंबिवली
कीर्ती
श्रुती
नंदन व
सौ. माधुरी
पुणे
प्रिया
प्राची
इंदुमती
(इंदुमती बळवंत
पोळ, पुणे)
मनीजित्
सौ. विजया
(सौ. विजया वसंत
सप्रे, औरंगाबाद)
अजय
सौ. राधिका
(पंडित)
नाशिक
कौशिक
सुधन्वा
संदीप
सौ. संगीता
(सहस्त्रबुद्धे)
नागपुर
प्रदीप
सौ. प्रेषा
(जहागीरदार)
औरंगाबाद
सौ. मंगला
(सौ. अरूणा अविनाश
दीक्षित, जळगाव)
आशिष
जळगाव
अर्चना
जळगाव
सौ. निर्मला
(सौ. निर्मला सुधीर
कुलकर्णी, पुणे)
प्रशांत
पुणे
वर्षा
पुणे


## जन्मकुंडली

॥ श्री ॥


श्री गणेशाय नम: । सजयति अस्य श्री नृप शालिवाहन शके १८२० विलंबी नाम संवत्सरे दक्षिणायने शरद्दतौ अधिक अश्विने मासे कृष्णपक्षे त्रयोदश्यां तिथौ गुरूवासरे घटी ३० पळे ५ नक्षत्रे उत्तरा घटी ६० पळे पूर्ण योग ब्रम्ह घटी ४० पळे ३५ करण वणिज घटी ३० अस्मिन् शुभ दिने श्री सूर्यास्त् गत घटी ३० पळे ५ तत्समये प्रसूत लग्न कन्या राशी कन्या, संध्येतील नाव पीमदेव उत्तरा चतुर्थ चरण-

। शुभं भवतु ।

### राशी कुंडली




### लग्न कुंडली



॥ श्री जगदंबा प्रसन्न ॥



कृ. सा. न. वि. वि. आमचे घरीं श्रीकृपेकरून आमचे चि. रा. पुरूषोत्तमपंत यांचा विवाह मित्ती वैशाख व. ६ रोज रविवार ता. ६ मे १९२३ रोजीं सकाळीं घ.११ प. ४८ ( स्टँ टा. १० वाजून ५३ मि. ) चिंधोली पांचवड मुक्कामीं करण्याचें योजिलें आहे. वेदमूर्ति रा. धुंडिराज गणेश बापट यांची कन्या चि. सौ. कां. यमुना इजला वधू योजिली आहे. ईश्वरी कृपा व आपली सदिच्छा सहवास व आशीर्वाद यांची कार्यसिद्धीस अत्यंत आवश्यकता आहे. तरी आपण सहकुटुंब सहपरिवारें अगत्य यावे हि विनंति.

कऱ्हाड
ता. २७/४/२३

आपला कृपाभिलाषी.
पांडुरंग गुंडो गोखले.

(रामदास छापखाना शाखा कऱ्हाड)

## पु. पां. गोखले यांची साहित्य–संपदा

| | |
|---|---|
| अठरा श्लोकी गीता (मराठी, संस्कृत, हिंदी, इंगजी, गुजराथी) | ८ वी आवृत्ती १९८४ |
| अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र | दोन आवृत्त्या १९५७ |
| असे आपले आगरकर | १९६६ |
| आगरकर चरित्र | चार आवृत्त्या |
| आगरकरांशी ओळख | १९४५, १९६९ |
| ईशावास्य (मराठी) | दोन आवृत्त्या |
| एकाध्यायी गीता (७१ श्लोकी–मराठी, हिंदी, इंगजी) | |
| कर्मवीर सोमण | १९४६ |
| काँग्रेस पक्ष | १९६१ |
| गणपती बाप्पा | १९६८, १९७०, १९७३ |
| गीताधर्म प्रवेश | १९४२ |
| गीताधर्म विश्वधर्म कसा ? | १९७४ |
| गीतापुरूषोत्तमी | १९८५ |
| गुरू–शिष्य (गोखले–गांधी) | २ आ. १९६६ |
| गोखले आणि– | १९३४ |
| गोखले कुलवृत्तान्त प्रस्तावना ('पुरःस्वन') | १९७६ |
| गोखल्यांच्या गोष्टी | |
| जय बजरंग | १९७०, १९७३ |
| जागृत सातारा | १९३५, १९६६ |
| झाकले माणिक | १९२० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | १९८१ |
| दिलके बोल (हिंदी) | |
| देवी सुशीला ! | १९२३ |
| नारायणराव काजरोळकर | |
| निरोप | १९३२ |
| न्यायमूर्ति व आगरकर (आगरकरांशी ओळखमध्ये समाविष्ट) | १९३२ |
| परिचित सातारा | १९४० |
| बंडवाले नानासाहेब | १९७२ |
| बाबा राघवदास (हिंदी) | १९६१ |
| बाहुलीचे लग्न | १९२२ |
| बोलबाला | १९३८ |
| भगिनी निवेदिता | १९६७ |
| भले भले साने गुरूजी | |

| | |
|---|---|
| भारतभाव | १९४०,१९७५ |
| भारतसेवक ना. गोपाळ कृष्ण गोखले | १९६६ |
| महादजी शिंदे | १८७५ |
| मुंजा मुलास | २ आ. १९५६ |
| राजारामबापू पाटील (उपाळेकर) | |
| रा. ना. गोडबोले जीवनदर्शन | १९७३ |
| रामदासांचा जीवनवेद | १९७१ |
| रामदासांचा बालबोध | |
| राष्ट्रभाषामें आगरकर (हिंदी) | |
| ललित-लहरी | (हस्तलिखित) |
| लोकप्रिय भाऊसाहेब सोमण | १९५६ |
| लोकमान्य टिळक | |
| वेदव्यास पं. सातवळेकर | १९६७ |
| शाळा सोडल्यावर | |
| शुभ मंगल सावधान | |
| शूरसेन | (हस्तलिखित) १९२४ |
| श्रीराम समर्थ | १९७३ |
| श्री समर्थ दासबोध-स्वाध्याय साधना | १९७६ |
| संत सेनापती | १९६८,१९८१ |
| सत्याग्रही गांधीजी | १९७३ |
| समर्थ रामदास | १९७१ |
| समर्थांचा धावा | १९३३,१९५३, १९७१ |
| समर्थांचा विशद भक्तिमार्ग | १९६२ |
| सहकार-संपदा | १९५० |
| सार्थ गणपती अथर्वशीर्ष | १९६९ |
| सांजवात अर्थात 'दिव्या दिव्या दीपत्कार' | (हस्तलिखित) |
| सातारा जिल्ह्याची कालवाचक क्रियापदे | १९४१ |
| सातारा जिल्ह्यातील मराठी ग्रंथवाङ्.मयाचे धावते दर्शन | १९६२ |
| साहित्यिक कऱ्हाड | २ आवृत्त्या १९४१, १९४८ |
| सॉक्रेटिस आणि आगरकर | १९३३ |
| ( 'आगरकरांशी ओळख' मध्ये समाविष्ट) | |
| स्वामी रामतीर्थ | |
| हे पहा पंडितजी ! | |
| दासबोध इंग्रजी (भाषांतर) | (अप्रकाशित) |

## जीवनसंगिनी

'प्रत्येक यशस्वी, कर्तबगार पुरुषांमागे एक स्त्री असते' असे म्हणतात. बाबुरावांची पत्नी सौ. सुलोचना (माहेरची 'यमू') हिने २५ जानेवारी १९३२ ला आपल्या वडिलांना लिहिलेले पत्र खाली दिले आहे. त्यावरून तिची पतीच्या कार्यात साथ कशी लाभली असेल याचा प्रत्यय येईल.


२५-१-३२

ती. वडिलांचे पवित्र चरण सेवेसी सा.न.

आपले कृपापत्र पावले. आपण लिहिल्याप्रमाणे ह्या चळवळीत कोणत्याही तऱ्हेने भाग घेतला नव्हता. पण दर शनिवारी मांग रामोशाप्रमाणे हजेरी देण्याची नोटीस लागली होती.* त्याप्रमाणे गेल्या शनिवारी हजेरी न दिल्या कारणाने धरून नेले. आज रोजी खटला चालेल असा अंदाज आहे. पुढील हकीगत वर्तमानपत्रावरून कळेलच. माझी कोणत्याही तऱ्हेची काळजी नसावी. मला मुळीच वाईट वाटत नाही. कारण ह्या वेळी स्वदेशापायी देह वाहणे हेच भूषण आहे व प्रत्येक तरूणाचे कर्तव्य आहे. ते करीत असता असा थोडा वियोग आम्ही सहन केला पाहिजे असे मला वाटते. आपणही वाईट वाटून घेऊ नये.

आपली सौ. यमू.

* या पुस्तकात पृ. ३७ वर 'राजकारणी प्रमाद' या शीर्षकाखालील परिच्छेदाचा येथे संदर्भ आहे.



## 'सांगे वडिलांची कीर्ती '

'सांगे वडिलांची कीर्ती ' त्याला समर्थांनी कोणती पदवी दिली आहे हे माहित असूनही, समर्थांचीच ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे ' ही उक्ती सार्थ करणाऱ्या माझ्या वडिलांसंबंधीचे, वडिलांनी स्वत:च प्रसंगा परत्वे शब्दबद्ध केलेले आत्मकथनसदृश लेखन संकलित करून ' हे प्रत्ययाचे बोलणे ' या नावाने त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने सादर करण्यास विशेष आनंद होत आहे.

बाबुराव, होय, बाबुराव याच नावाने आम्ही भावंडं त्यांना संबोधत असू. या संबोधनामुळे इतरांना आमच्यात असा परकेपणा कसा ? असा संभ्रम पडला असेलही, आमची त्यांच्याविषयीची आदराची आणि आपुलकीची भावना किंचितही उणी नव्हती. तरीपण माझ्या–त्यांच्या वयात जवळ जवळ चाळीस वर्षांचं अंतर असल्यामुळे असेल, अथवा संस्कारक्षम वयात त्यांच्या सहवासाचा लाभ माझ्या वाटणीला अल्पसा आला असल्यामुळे असेल त्यांच्या आयुष्यातील शेवटच्या पंचवीस वर्षात त्यांच्या अगदी निकट असूनही आम्हां दोघांत अंतर होतं, अंतर राहिलं असं मी म्हटलं तर इतरांना चमत्कारिक वाटलं तर त्यात नवल नाही. वस्तुस्थिती होती ती.

बाबुराव माझे वडिल होते, पण त्यापेक्षाही ते आणखी कोणीतरी विशेष होते, वेगळे होते हे माझ्या शालेय काळातच अनुभवायला मिळाले. प्रगतिपत्रकावर पालकांची माहिती या सदरात माझ्या बरोबरीची मुलं जमीनदार, सावकार, अधिकारी, व्यापारी, नोकरदार असं आपल्या वडिलांच्या व्यवसायाबाबत लिहित. मी लिहित होतो ' लेखक आणि समाजसेवक ' म्हणून. ते निष्ठावंत स्वातंत्र्यसैनिक होते, त्यावेळी आमदारही होते; कऱ्हाडातच यशवंतराव, व्यंकटराव, गौरीहर अप्पा असे इतर आमदारही त्याच वेळी होते आणि स्वातंत्र्यसैनिक तर त्यावेळी भरपूरच होते. त्यामुळे या दोन उपाधींपेक्षा ' एकमेवाद्वितीयम् ' अशी मला वाटणारी उपाधी लेखक–समाजसेवकाची होती. प्रत्येक छापलेला शब्द वाङ्‌मय समजून वाचायचं व्यसन असलेल्या मला, त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमुळं त्यांचं मोठेपण जाणवत होतं, ते कऱ्हाडात असले, आले की जी मैफल जमत असे, त्या मैफिलीला तास न तास मंत्रमुग्ध करण्याचं त्याचं कसब त्यांच्या खोलीच्या बाहेरून अंगणातून, माजघरातून मी कुतूहलाने बघत असे. त्यावेळीही या त्यांच्या मोठेपणाचा कोठे, कसा फायदा घ्यावा हे पाहिले नाही, माहितही नव्हते. पुढे मोठा झाल्यावर माहिती होऊनही समजून उमजून वडिलांच्या मोठेपणाच्या पुण्याईवर कुणाकडं जोगवा मागितला नाही. १९५४ साली कऱ्हाड अर्बन बँकेच्या सभागृहात बाबुरावांचा सत्कार महर्षि कर्वे यांच्या हस्ते झाला, त्यावेळी मी बँकेसमोर सध्या जिथं 'प्रदीप मेडिकल' आहे त्या व्हरांड्यात बसून ऐकत होतो. पण त्यामुळंच जनसामान्यांत माझ्या वडिलांच्या नावाचा केवढा मोठा दबदबा आहे हे मला कळलं, साताऱ्यास नगरपरिषदेची शताब्दी होती म्हणून ज्या कार्यक्रमाला साताऱ्याचे त्यावेळचे नामवन्त येऊ शकले नाहीत, त्याच बाबुरावांच्या सत्काराच्या कार्यक्रमासाठी कर्मवीर भाऊराव पाटील मात्र आवर्जून हजेरी लावून जातात यात कर्मवीरांचं वेगळं दर्शन घडलं, तसेच बाबुरावांचे वेगळेपण जाणवलं.

एका फार मोठ्या माणसाचा एक फार छोटा मुलगा आहे याची जाणीव मात्र त्यावेळी झाली; आणि त्यानंतर माझे वडिल म्हणून नव्हे, तर कऱ्हाडातील एक लोकोत्तर व्यक्ती म्हणून त्रयस्थपणे त्यांच्या जीवनचरित्रातील विविध पैलू, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या बहुविध छटा, बारकावे माझ्या परीने टिपू लागलो.

आमच्या घरातील पुस्तक-संग्रहात ' गोखले व गोखले रास्ते घराण्याचा इतिहास ' या नावाची दोन पुस्तकं (प्रती) होती. त्यापैकी एका पुस्तकात छापील मजकुराला जोडून एक पृष्ठभर मजकूर बाबुरावांच्या हातचा होता. वर शीर्षक होते की नाही तेही आठवत नाही. पण सुरूवात अशी ' हर हर दत्ता, काय केलंस हे !' वाचनाबरोबरच नाटकाचीही आवड असल्यामुळं तो मजकूर एखाद्या नाटकातले स्वगत असावे असंच प्रथम मला वाटले. पण वर नमूद केलेल्या पुस्तकात बाबुरावांचेच एक मित्र दत्तात्रय रघुनाथ आठवले यांनी बाबुरावांचे चरित्र ' कऱ्हाडचे झाकले माणिक ' या नावाने (पृ. २०१ ते २०३) दिले होते, त्या निमित्ताने बाबुरावांनी लिहिलेला तो मजकूर होता. पुस्तक १९२२ मध्ये प्रकाशित झालेले. अवघ्या चोवीस वर्षांच्या, पदवीधरही नसलेल्या त्यावेळच्या तरूण बाबुरावांच्या चरित्राला गोखले कुलवृत्तांच्या सव्वादोनशे पानांपैकी एक टक्का ' मानाचे पान ' दिलेले पाहून मी आणखी उत्सुकतेनं, कुतूहलानं माहिती मिळवू लागलो. काही गोष्टींचे खुलासे बाबुरावांच्या हयातीतच त्यांना मी समक्ष विचारायला हवे होते असे आता वाटते.

माझ्या लहानपणापासून मला पत्रकारितेचे आकर्षण होतं; कऱ्हाडला नरूभाऊ लिमये वगैरे मंडळींनी ' प्रकाश ' दैनिक सुरू केलं त्यावेळी मी बारा वर्षांचा असेन. मी तिथं जाऊन बसत असे. त्यामुळं असेल, बाबुराव ( व त्यामुळं त्या वेळचे कऱ्हाडातील पत्रकार बाळासाहेब विहेकर, वा. वा. देशपांडे हेही गंमतीने ) मला ' संपादक ' म्हणून त्यावेळी संबोधित असत. त्याच सुमारास बेळगाव येथे आचार्य अत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मराठी पत्रकार परिषद १९५० साली झाली, त्यावेळी बेळगावच्या वाटेवर कऱ्हाड रेल्वे स्टेशनवर स्थानिक पत्रकारांनी सत्कार केला. तर अत्र्यांच्या गळ्यात हार घालायचा मान पत्रकारांनी मला दिला होता. तर सांगायचं कारण असं की, पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना याच पत्रकारितेच्या हौसेने मी पुण्यात राहून साताऱ्याच्या 'समर्थ' साप्ताहिकात अनंतराव कुलकर्णी यांच्या सौजन्याने, प्रोत्साहनाने ' आठवड्यामाजी काहीतरी ' 'संपादकीया'पासून 'वाचकांच्या पत्रा ' पर्यंत लिहित होतो. १९५८ साली बाबुरावांना साठ वर्षं पूर्ण झाली, त्या निमित्तानं 'समर्थ' मध्ये ' पवित्र सेवेचा नंदादीप ' या नावाचा बाबुरावांच्या चरित्राचा आढावा घेणारा एक प्रदीर्घ लेख मी लिहिला होता. (१५ व २२ नोव्हेंबर १९५८) , एवढेच नव्हे तर त्याच अंकात ' कृतज्ञतेची अभिवंदना ' या शीर्षकाने जे ' संपादकीय ' होते तेही माझेच होते. त्यात मी म्हटले होते, '' त्यांचे अनुभव अनेकांना मार्गदर्शक ठरण्यासारखे असल्याने त्यांनी आत्मचरित्रात्मक स्वरूपाचे लिखाण 'समर्थ' साठी करावे.'' पुढे १९६८ साली बाबुरावांच्या सत्तरीवेळी 'समर्थ' मधूनच ( १४ नोव्हेंबर १९६८ ) 'संपादकीया' त मी लिहिले,

''बाबुरावजींच्या सत्तरीनिमित्ताने त्यांना अभिवादन करीत असताना, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा एवढा धावता चित्रपट नजरेपुढून गेला की त्याचे शब्दांकन करण्यास आमची लेखणी अपुरी आहे. या देशाच्या उगवत्या पिढीला 'जागृत साताऱ्या' चे 'समाजभूषण' परिचित होणे अगत्याचे वाटते. बाबुरावजींच्या पिढीच्या तेजस्वी गुणांचा वारसा नवीनांना लाभावा, त्यांच्या अनेकविध अनुभवांचा फायदा मिळावा म्हणून प्रा. बापूसाहेब माटे यांनी लिहिलेल्या 'चित्रपट' ग्रंथाप्रमाणे किंवा काकासाहेब गाडगीळ यांच्या 'पथिक' प्रमाणे बाबुरावजींनी आपले आत्मचरित्र, निदान आपल्या आयुष्यातील आठवणी लिहून काढाव्यात अशी इच्छा प्रकट केल्यावाचून राहवत नाही. श्री. बाबुरावजींच्या खाजगी बैठकींत त्यांच्या जीवनातील अनुभव ऐकत असताना त्यांच्या निकटर्वीयांना मिळालेला आनंद इतरांनाही लाभावा म्हणून ही विनंती.''

आज वरील परिछेद उद्‌धृत करत असतानाच आचार्य अत्रे यांनी 'नवयुग' मध्ये लिहिलेल्या लेखाचे कात्रण हाताशी लागले आहे. अत्र्यांनी लिहिले होते-'' कऱ्हाडला आमदार बाबुराव गोखले आम्हांला येऊन मिळाले. दोन दिवसांआधी मुंबईला गोखले ह्यांना काही तरी अपघात झाल्याचे ऐकले होते.... म्हणून बाबूराव समक्ष भेटताच ही अपघाताची काय भानगड आहे असा त्यांनाच मी सवाल केला. त्यांनी आपल्या डोक्यावरची टोपी काढून डोके वाकवून दाखविले, तो मागल्या बाजूला डाव्या भागावर तळहाताएवढे बँडेजचे पाकळीदार फूलच पहावयाला मिळाले. बाबूराव म्हणाले,'' अहो, अपघात कुठला ! परवा मी सकाळी नऊ साडे नऊच्या सुमारास दादरच्या प्लाझा सिनेमाच्या मागल्या बाजूच्या रस्त्याने असा जात असता कोणी तरी मागून येऊन जोराने माझ्या डोक्यावर प्रहार केला मी एकदम बेशुद्ध पडलो. पंधरा मिनिटे तरी तसाच रस्त्यावर पडून होतो. मग आपोआप उठून स्वत:च्या पायांनी दवाखान्यात चालत गेलो व तेथे जखमेवर उपचार करून घेतला.'' खरोखर बाबूरावांच्या जागी दुसरा कोणी असता तर इतक्या लवकर बरा होऊन तो पायावर तसाच उभा राहिला नसता. बाबूरावांच्या या हल्ल्यावरून साहजिकच सातारा जिल्ह्यातील गुंडांच्या खुनी राजकारणाकडे आमच्या गप्पांचा ओघ वळला. सातारा जिल्ह्यातील गेल्या तीस चाळीस वर्षांतील काही भीषण अत्याचारांचे बाबूरावांच्या तोंडून वर्णन ऐकून आमच्या अंगावर काटा उभा राहिला. एकादी रोमांचकारी कादंबरी वाचता वाचता जसा वाचक आपले देहभान विसरून जातो, तशी बाबूराव बोलत असताना आमची स्थिती झाली. स्टेशनमागून स्टेशने कशी भराभर गेली ते आम्हांला कळलेच नाही.''

खाजगी अनौपचारिक बैठकीत बाबुराव असे छोटे-मोठे प्रसंग मोठ्या रंजकपणे सांगत असत. तेव्हा त्यांना कोणीतरी बोलते करून त्यांना नकळत ते ध्वनिमुद्रित केले असते अथवा स्मरणाने लिहून काढले असते तर ते एक खरोखरच चांगले आत्मचरित्र झाले असते. तसा प्रयत्न माझे एक मित्र प्रा. डॉ. गजानन अनंत इनामदार (मोकाशी) यांनी करून पाहिला. त्यांनी ७ जुलै १९८३ रोजी बाबुरावांना एक विस्तृत प्रश्नावली पाठवून 'विद्यमान व पुढील पिढ्यांना उपयोगी होऊ शकतील ' अशा या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहून पाठविण्याची

विनंती केली होती. बाबुरावांनी त्यावरून डॉ. इनामदारांना दि. १२ जुलै १९८३ रोजी लिहिले की,' तसे करावयाचे तर माझे चरित्रच सिंहावलोकनासह सादर करावयाचे व त्याचबरोबर माझ्या सहकाऱ्यांचे आणि परिस्थितीचे चित्रणच करायचे ! मी आणि माझे साथी सामान्यजनच ! अशा हजारो सैनिकांना रणांगणात खेळवून शत्रूला तोंड देतो त्या सेनापतीचे अगर हजारो स्वयंसेवकांना कामाला लावून जो राष्ट्रकार्य करतो त्या मुत्सद्याचे नाव इतिहास आपल्या कपाळी कोरत असतो. त्यातून जनसामान्याचेच कस आपणांस समजून घेणे असल्यास आपल्या प्रश्नांची उत्तरे मी समक्षच देईन.

माझ्या सर्वांशी मिसळण्याच्या स्वभावामुळे माझ्यात स्वाभिमान आणि तत्त्वाभिमान असला तरी ज्वलन्त पक्षाभिमान नाही. हेही एक कारण मी आपल्या प्रश्नांना मी भितो याचे कारण होऊ शकेल. '' प्रा. डॉ. इनामदारांनी कऱ्हाडात समक्ष गाठी घेऊन प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याबाबातीत डॉ. इनामदार मला लिहितात,'' जास्तीत जास्त नेमकेपणा व पूर्णता येण्याच्या दृष्टीने त्यांनी स्वत:च लिहावयाला हवे होते. मी यथाकाल तुमच्या घरी आलो. प्रश्नावलीतील बरेच प्रश्न मी त्यांना विचारले, त्यांनी तोंडी उत्तरे दिली ती यथाशक्य तिथेच कागदावर उतरविली. बोलण्याचा वेग व ते उतरविण्याचा वेग यांचे पारस्पारिक प्रमाण व्यस्त असते. उतरवून घेतलेला मजकूर मला विशेषत: तत्काळ व नंतरही संस्कारित करण्यास जमले नाही. ''

मध्यंतरीच्या काळात 'कल्याणयात्रा' या नशाबंदी मंडळाच्या मासिकात, त्या मासिकाचे संपादक श्री. गो. बा. महाशब्दे यांनी निकड लावल्यामुळे का होईना बाबुरावांनी 'हे प्रत्ययाचे बोलणे' या शीर्षकाखाली ऑगस्ट १९७१ ते मार्च १९७२ या आठ महिन्यांत आठ लेखांक लिहून प्रसिद्ध केले होते. साताऱ्याचे बाबुरावांचे एक स्नेही गोविंदराव माटे (मास्तर) यांनी २७ नोव्हेंबर १९७४ रोजी त्या संदर्भात बाबुरावांना लिहिलेल्या एका पत्रात लिहिले होते,''दिसामाजी काहीतरी लिहिताना '' जीवनातील स्मृतिचित्रे आठवू लागली हे फार चांगले झाले. स्मृतिचित्रांचा खजिना एवढा विविध रंगी व अमाप आहे की तोच आमच्यासारख्यांना कित्येक दिवस पुरेल. हा खजिना नष्ट होऊ नये म्हणून फार घालमेल होत होती. सुभाषबाबूंच्या भावाने एका प्राथमिक शिक्षकाचे केलेले स्वागत, कॉलेज विद्यार्थ्याच्या मारलेली थोबाडीत, प्रार्थनेच्या नियमाकडे बोट दाखवून घरी सिगरेट ओढीत आरामात पडलेला मामलेदार, ***मंडळींनी बायको नसलेल्या बायकोची काढलेली वाटणी, वर्तमानपत्रात ओल्या पराक्रमाचे बेधडक वर्णन केल्यामुळे घरावर आलेला मोर्चा व दिलेल्या धमक्या, सुनेच्या शस्त्रक्रियेची फी परत करणारा डॉक्टर, पाचशे रू. च्या सोन्याच्या दागिन्यांच्या तारणावर ५ रू. चे दिलेले कर्ज, पाडव्याच्या दिवशी सकाळीच यशवंतरावांच्या खांद्याला खांदा व मांडीला मांडी लावून डोक्यावर घेतलेला कर्जाचा बोजा, एका मुसलमान मुलाला त्याच्या दांडगाईसाठी मारले म्हणून मुसलमान बायकांनी घातलेला वेढा- ११९ उपसूचना आणून मुरारजीभाईंना दिलेला धडा, भाऊराव पाटलांच्या बरोबरीची कुस्ती- एक नी दोन, किती गोष्टी लक्षात ठेवायच्या ? आपण जॉन्सन असलात तरी मी बॉस्वेल होणे

मला जमण्यासारखे नव्हते आणि मग विनायक करायला जाऊन वानर मात्र केला असता व कदाचित त्यात अनवधानाने चुकून आपणांस अगर इतर कोणास अन्याय झाला असता.''

तथापि दुधाची तहान ताकावरच भागवावी लागली. ' कल्याणयात्रे ' तील आठ लेखांकातील शेवटचा लेखांक तर घाईघाईनेच संपविलेला दिसतो. शिवाय ही लेखमाला ज्या मासिकात छापली गेली त्या मासिकाचे स्वरूप लक्षात घेता माझ्या पाहण्यातही ती फारच उशिरा आली. माझ्याप्रमाणेच फारच थोड्या लोकांच्या वाचनात ती आली असावी. तसेच शालेय काळातील संस्काराविषयी सविस्तर लिहिले आहे पण पुढे असहकार चळवळीपासून स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या काळातील राजकीय चळवळीतील घटनांच्या उत्तरार्धात आढावा घेतला आहे. त्यामुळेच हे आत्मचरित्र फारच त्रोटक झाले आहे. म्हणून बाबुरावांच्या निधनानंतर वृत्तपत्रात एक निवेदन देऊन मी बाबुरावांनी लिहिलेली पत्रे, वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रे पाठविण्याविषयी विनंती केली होती तथापि त्याला प्रतिसाद फारच अल्प मिळाला. तथापि दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर, माझे मामा चि.धुं. (पंडितराव) बापट, गो. रा. माटे, डॉ. गजानन इनामदार, रमेश फणसळकर व माझी भावंडे यानी बरेचसे साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी मनापासून सहकार्य केले हे कृतज्ञतापूर्वक नोंदले पाहिजे. माझ्या दृष्टीने बाबुरावांचे आत्मपर वाटणारे काही लेख, मुलाखती,(त्यांनी इतरांना लिहिलेल्या व मला उपलब्ध झालेल्या ) पत्रांचे उतारे अशा भागाची जोड देऊन आज हे त्यांचे आत्मचरित्र म्हणून प्रसिद्ध करीत आहे. हे परिपूर्ण झाले आहे असे मीच म्हणणार नाही. तथापि बाबुरावांच्या निधनानंतर मी प्रसिद्धीस दिलेल्या एका निवेदनात मी बाबुरावांच्या पहिल्या पुण्यतिथीस (५-१२-१९८७ रोजी) ' हे प्रत्ययाचे बोलणे ' हे बाबुरावांचे आत्मचरित्र प्रकाशित करणार आहे असे लिहिले होते. अकरा वर्षे उशीर आधीच झाला आहे, म्हणून जसे जमले तसे हे सादर करून दिला शब्द अंशत: पाळत आहे. यात जो उणेपणा आहे त्यास सर्वस्वी मीच जबाबदार आहे.

बाबुरावांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनीच लिहिलेले 'आत्मचरित्र' प्रसिद्ध करणे म्हणजे गंगेचे पाणी गंगेला अर्पण करण्यासारखे आहे. खरोखरच यात माझे असे काहीच नाही. ' वाया गेलेली वर्षे जमा धरावयाची नाहीत अशा निश्चयाने वये मोजू लागलो तर जे वाढदिवस साजरे होतील तेच खरे जगाचे इतिहास ' असे बाबुरावांनीच एके ठिकाणी म्हटले आहे. बाबुरावांचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्यामागे तोच हेतू आहे. त्यानिमित्ताने त्यांचेच ' हे प्रत्ययाचे बोलणे ' ज्यांच्या सहकार्यामुळे सिद्ध झाले त्याचे श्रेय त्यांना देऊन मी नामानिराळा होतो.

१५-११-१९९८

–' तो एक '
( विद्याधर पुरुषोत्तम गोखले )



रामदासांनी सांगितले आहे
'मरणाचे स्मरण असावे'
पण मला ते सांप्रदायिक वाटते.
समर्थांनी जगण्याचे स्मरण असावे
हेही सांगितले आहे. म्हणून ते म्हणतात
'मरावे परि कीर्तिरुपे उरावे'.
तेव्हा त्याच्या इतके सुंदर जगणे कोणते.?
कारण रामदास मेल्यानंतरही जगावयास
शिकवत आहेत.
आपण जगतो का व मरतो का
याचा खुलासा समाजाला देता आला पाहिजे.
तसेच तू तुझ्या एकट्याकरिता नसून
भोवतालच्या समाजाकरिता आहेस
आणि समाज तुझा आहे हे
समाजात रुजलं पाहिजे.

- पु. पां. गोखले